
पालकनीती

मूल्य रु. ८०/-

शिक्षणमाध्यम विशेषांक

ऑक्टोबर - नोव्हेंबर २०१२



With Best Complements From

Xquisite Print Solutions Pvt. Ltd.

34/8, Erandawane, Parashuram Process Building
Near Mehandale Garrage, Pune - 411004.
Phone : 2545 9251, 2545 9252

या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतीलच असे नाही.


या अंकात प्रदर्शित केलेली सर्व मते ही लेखकांची वैयक्तिक समजावीत.

संपर्कासाठी पत्ता
अमृता क्लिनिक, संभाजी पूल कोपरा,
कर्वे पथ, एरंडवणा, पुणे - ४११००४.
दूरध्वनी - २५४५७३२८, २५४४१२३०
ई-मेल : palakneeti@gmail.com
वेबसाईट : www.palakneeti.org

- **वार्षिक वर्गणी रु. २००/-**
- **आजीव वर्गणी रु. २५००/-**

चेक/ड्राफ्ट 'पालकनीती परिवार' नावाने काढावेत.

या अंकाच्या संपूर्ण प्रक्रियेत आभा भागवत ही आमची चित्रकार मैत्रीण आमच्या बरोबरीनं समरस झाली होती. त्यामुळे अंकातील लेखांना चित्रभाषेची सुयोग्य साथ मिळाली आहे. (संवाद-चित्रांमधील पक्ष्यांची चित्रे छोट्या मुलांनी काढलेली आहेत.)
हा अंक तयार होताना रेश्मा लिंगायत, अनिता चलवादी या पालकनीतीच्या खेळघरातल्या सहकाऱ्यांसह अनेक सुहृदांची साथ लाभली.
या सर्वांचे मनापासून आभार.
तसेच सर्व जाहिरातदारांचेही मनःपूर्वक आभार !




पालकनीती

वर्ष बारावे • अंक सातवा
ऑक्टोबर-नोव्हेंबर २०१२

नूतन वर्ष आपणा सर्वांना भाषासमृद्धीचे आणि वाचनपठनाचे जावो !

- **संपादक**
 संजीवनी कुलकर्णी
- **संपादक मंडळ**
 वंदना कुलकर्णी, प्रियंवदा बारभाई, नीलिमा सहस्रबुद्धे, शुभदा जोशी
- **संपादन साहाय्य**
 उर्मिला पुरंदरे, कादंबरी मुसळे
- **विशेष आभार**
 सुजाता लोहकरे, दिवाकर शिधये
- **मुखपृष्ठ छायाचित्र**
 शमिन कुलकर्णी
- **मुखपृष्ठ मांडणी**
 रमाकांत धनोकर, जयश्री धनोकर
- **अक्षर जुळणी**
 अभय ढमढेरे, यश अक्षरजुळणी
- **मांडणी व सजावट**
 रमाकांत धनोकर, शुभदा जोशी
- **आतील चित्रे**
 रमाकांत धनोकर, आभा भागवत
- **कार्यालयीन साहाय्य**
 अविनाश टोळे, गणेश खांबे आणि प्रयास आरोग्य गटाचे सर्व सहकारी
- **मुद्रण**
 ग्रीन ग्राफिक्स, पुणे.





अ नु क्र म

- स्वभाषेतुनी बालकांनी शिकावे... / वर्षा सहस्रबुद्धे / ८
- भाषिक साम्राज्यशाही / डॉ. सुलभा ब्रह्मे / १८
- स्वभाषा, परभाषा आणि शिक्षण / डॉ. अशोक केळकर / २६
- वाचन आणि भाषा-विकास / डॉ. मंजिरी निमकर / २८
- शिक्षणाच्या माध्यमाचं राजकारण / किशोर दरक / ३२
- मुलं (कविता) / रेवतीरमण शर्मा, अनुवाद : गणेश विसपुते / ४३
- ज्ञानभाषा मराठी / अनुराधा मोहनी / ४४
- 'इल्म'कडे नेणारं भाषामाध्यम हवं... / डॉ. रझिया पटेल, सुजाता लोहकरे / ५२
- इंग्लिश - बिंग्लिश / मुक्ता दाभोलकर / ६०
- पहिलीपासून इंग्रजी : मागे वळून पाहताना / प्रा. हरी नरके / ६६
- शिक्षणाची भाषा की भाषेचं शिक्षण? / डॉ. अनिमिष चव्हाण / ७०
- भाषिक घसरणीकडे बघितलं तर.. / सुजाता महाजन / ७४
- शाळा ते महाविद्यालय यातला भाषिक पूल / विद्या पटवर्धन / ७६
- टचबाई आणि भाषा-श्टोरी / सुषमा दातार / ८२
- सर्वांसाठी भाषा / श्रीनिवास निमकर / ८६
- असत्य (कविता) / येवगेनी येवतुशेन्को, अनुवाद : गणेश विसपुते / ९१
- संतुलित द्वैभाषिकत्व / डॉ. वृषाली देहाडराय / ९२
- **बदलती परिस्थिती शिक्षकांच्या नजरेतून**
 - या इंग्रजीचं करायचं तरी काय? / भाऊ चासकर / ८६
 - इंग्रजीचा मॅनिया / नरेंद्र लांजेवार / १०१
 - भटक्या विमुक्त मुलांना शिकवताना / पूनम गुजर / १०४
 - स्मार्ट पी.टी. इंग्लिश / कृत्तिका बुरघाटे / १०७
 - आमची इंग्रजी शाळा / रंजना बाजी / १०९
- प्रेमाच्या पाच भाषा / डॉ. अनघा दूधभाते / ११२
- बदलत गेलेलं बोलणं / सुधीर गाडगीळ / ११६



शरीरात – मनात – घरात – आसमंतात मूलमाणूस वाढणं आणि त्या वाढीविकासाला आपण जीवामोलानं साथ देणं हा विषय पालकनीतीचा स्वधर्म आहे. या मूलमाणसात भद्रतेची, विचाराची, अनुभवांची, जीवनावर प्रेम करण्याची अपार क्षमता यावी, अंगी जगण्याचं बळ भरावं, आत्मविश्वासानं, आस्थेनं शक्य तेवढं तिनं-त्यानं जीवनाला सुंदर करावं ही आपली इच्छा असते. त्या इच्छेच्या मार्गानं जाऊ पाहणाऱ्यांची सतर्कता वेळोवेळी जागी ठेवण्याचं काम पालकनीती करत आलेली आहे. एका अर्थी ही पालकांनी पालकांसाठी योजलेली पालकत्वाबद्दलची शिक्षणरचना आहे, आणि परिसराची शब्दभाषा हे या शिक्षणाचं माध्यम आणि साधनही आहे.

त्याचप्रमाणे मुलामुलींच्या शिक्षणाचा आणि ते कोणत्या माध्यमभाषेत असावं हा विषय पालकनीतीच्या कक्षेत महत्त्वाचा तर खराच; त्यामुळे आजवर पालकनीतीनं तो अनेकदा हाताळला. १९८७ साली हे मासिक सुरू झाल्यावर पहिल्या वर्षातला पहिला विशेषांक शिक्षणमाध्यमावरच होता. १९९३ साली शिक्षणमाध्यमावर संपूर्ण दिवाळी अंक रचलेला होता. याशिवाय अनेकदा या विषयावरचं लेखन अंकात आलेलं आहे. पुन्हा या वर्षी हा विशेषांक शिक्षण -माध्यमाच्या विषयावर करण्याचं कारण काय?

खरं पाहता, कुठलंही मूल आपल्या आसपास बोलली जाणारी भाषा नकळत सहजपणे शिकतं, त्यामुळे त्याच भाषेत जर शिक्षणही दिलं गेलं तर ते अधिक जोमानं आणि सक्षमतेनं शिकेल, यात कुणाला काही शंका असायचं कारण काय, किंवा त्यावर मोठी चर्चा करण्याची गरज तरी काय असं वाटेल, पण याचं कारण अगदी स्पष्ट आहे.

हा अंक वाचणाऱ्यांपैकी निदान निम्मे वाचक आपल्या मुलामुलींना इंग्रजी माध्यमात घालणारे आहेत. ह्यात शिक्षणाच्या दृष्टीनं नुकसान आहे, सहज कल्पनाही करता न यावी इतकं नुकसान आहे, आणि ह्याची यातल्या काहींना जाणीवही आहे, तरीही हा इतका आततायी विचार पालक करत आहेत. कारण त्यामागे बालशिक्षणाचा, बालपणातल्या आनंद-अधिकारांचा विचार नाही, तर हे मूल मोठं होऊन जगाच्या बाजारात उभं ठाकेल, आणि मग, इंग्रजी येत नसेल तर त्याला किंमत येणार नाही ही भीती आहे. ही भीती साहजिक आहे, मराठी माध्यमात शिकलेल्यांना उत्तम इंग्रजी येऊ शकतं, हे माहीत असूनही तशी पुरेशी संधी न मिळालेले त्याचा न्यूनगंड आयुष्यभर वागवताना दिसतात. ही वेळ आपल्या मुलामुलींवर येऊ द्यायची नसेल तर आज पुढं जायला इंग्रजीशिवाय दुसरा रस्ताच आपल्याला दिसत नाही. नोकरी असो की विचारविमर्श असो; कायदा असो की शासकीय काम असो; इंग्रजी येणाराची तिथे इतकी सरशी आहे, की विचार करण्याची शक्ती देणाऱ्या मातृभाषा माध्यमाची त्यापुढे ऐशी की तैशी व्हावी यात नवल नाही.

या विचारांचा एरवीच्याही जीवनदृष्टीवर इतका परिणाम झालेला आहे की, शहरी लोकजीवनात अक्षरश: सर्वत्र इंग्रजी शब्दांचा स्पर्श नसलेलं एक वाक्य कुणी बोलत नाही. ते शब्द वापरण्याला, त्याला पर्यायी मराठी शब्द न वापरण्यालाच एक प्रतिष्ठा आलेली आहे. यातला परस्पर कार्यकारणभाव पाहू गेल्यास आजपर्यंत इंग्रजी माध्यमाची महती कशी समाजमनांमध्ये पसरत गेलेली आहे हे आपल्या लक्षात येतं.

शिवाय त्यातला प्रमाण-भाषेच्या आग्रहाला विरोध करणारा बहुजनप्रिय मुद्दा इंग्रजी माध्यमाचा निर्णय घेण्यामागचं कारण खरं म्हणजे असू शकत नसला तरी आपल्या प्रांतात मराठी माध्यमाच्या शाळेत घालण्याला विरोध करण्यापुरता आहेच. एकंदरीनं -मूल कसं चांगलं शिकेल- हा विचार बाजूलाच पडून मुद्दा राजकीय आणि वैचारिक सत्ताकारणाचा होऊन बसलेला आहे.

२००० साली पहिलीपासून इंग्रजीचा (पपाइं) निर्णय फारसा गृहपाठ न करता घेतला गेला. त्यासाठी खेळाच्या, कार्यानुभवाच्या तासिका बाळांच्या तोंडचा घास काढून न्यावा तशा इंग्रजीला गेल्या. प्राथमिक टप्प्यावर मेंदूविकासात खेळांना, हस्तनेत्र-समन्वयाला खरं म्हणजे केवढं मोठं महत्त्व, पण ते नाकारलंच गेलं. त्याउलट पपाइंला विरोध करणं म्हणजे बहुजनसमाजानं पुढे जाऊ नये यासाठीचं कारस्थान असा ग्रह करून घेतला गेला. प्रत्येक बालकाला आनंददायी बालपण, खेळायला

मुभा आणि विचार करायची क्षमता विकसित होण्याला वाव मिळायला हवा, हा प्रत्येक बालकाचा हक्कच आहे, या मुद्द्याची आठवणच राहिली नाही.

आता एप्रिल २०१० पासून देशातल्या प्रत्येक बालकाला मूलभूत प्राथमिक शिक्षण मोफत आणि निश्चितपणे मिळेलच याची सरकारी जबाबदारी अधोरेखित करणारा कायदा रुजू होतो आहे. ह्या कायद्यातही शक्यतो मातृभाषेतून हे शिक्षण असावं असं म्हटलेलं आहे. एका बाजूला हे शिक्षण गुणवत्तापूर्णच असायला हवं या मुद्याचा भरपूर ऊहापोह त्यात आहे. असं शिक्षण मातृभाषेतूनच खऱ्या अर्थानं देता येईल हेही स्पष्ट आहेत. पण वर उल्लेखलेली सगळी परिस्थिती गृहीत धरता – शक्यतो – अशी फट ठेवणं कायद्याला भाग आहे.

सध्या आपल्या देशात काय चालतं या प्रश्नाचं एका शब्दात उत्तर द्यायचं तर भ्रष्टाचार असंच द्यावं लागेल. आर्थिक आणि राजकीय भ्रष्टाचाराची अनंत उदाहरणं आपल्याला समोर थेट दिसत आहेत. बालशिक्षणामध्ये इंग्रजी माध्यमाची निवड करणं हाही एक वैचारिक भ्रष्टाचार होतो आहे. बालकांच्या स्वाभाविक क्षमतांना वाढीची जागा न देता पालकांना हवं त्याच पद्धतीनं मुलांनी वाढावं असं जेव्हा पालकांना वाटायला लागतं तेव्हा तो भ्रष्टाचारच ठरतो. त्यात फायदे आहेतच यात शंकाच नाही. कुठलाही भ्रष्टाचार हा फायद्याच्याच इच्छेनं केलेला असतो यात वेगळं सांगण्याजोगं काही नाही, पण त्याचे आपल्या मनांवर जे चरे उठतात त्यांचं काय असा आपला प्रश्न आहे. असो. परिसराची भाषा, इंग्रजी अशा सगळ्या गोष्टी बाजूला ठेवून उर्दू असं एक वेगळंच माध्यमही वापरलं जातं. तिथे तर राजकीय अस्मितेचा आणखीच वेगळा रंग या भ्रष्टाचाराला येतो.

आपलं मूल किंवा या देशातलं बालक कसं वाढवावं ह्याचा काही एक अधिकार पालकांकडे आणि शासनाकडे असतो. लिखित आणि ऐकता – पाहता येणाऱ्या माध्यमांची जबाबदारी निर्णय घेण्याची नसून समाजाला विचारात पाडण्याची असते. या अमुक निर्णयाचे तमुक परिणाम होतील, ते तसे होणं आपल्याला हवं आहे ना, याचा अंदाज घेऊन समाजघटकांना इतरांसह स्वत:साठी निर्णय घ्यायला हवेत. पण बव्हंशी तसे न घेता मळलेल्या वाटेनं जाण्याचा आपला प्रघात आहे. आजच्या काळात ही मळलेली वाट अनुभवांनी मळलेली नसून जबाबदारी नाकारण्याचा तो एक प्रकार आहे. शासकीय निर्णयात तर विचारांहून लोकानुनयाचा भाग जास्त आहे. त्यामुळे मुलाच्या विकासाचा, विचाराचा, आनंदाचा प्रश्न मनातही न आणता 'त्याला आणि तिला शाळेत शिकायच्या नोकरीला लावून टाकली की विषय संपला', असं काहीतरी अगदी विचित्र कोरडट पालक वागू लागले आहेत. अशा वेळी पालकासाठी असलेलं माध्यम या भूमिकेतून – थोडं थांबा, विचार करा आणि मग पुढे जा – एवढीच नम्र विनंती करण्यासाठी या अंकाची रचना केलेली आहे. कारण बघा, प्रश्न आपल्या सर्वांच्या प्रिय मुलामुलींचा आहे.

शिक्षण कुठल्या माध्यमात असायला हवं, या विषयात कुठल्याही निर्णयाशी पण समग्र विचारांनी पोचायचं असेल तर तो विचार सर्व बाजूंनी पाहून घेऊन पुढे उलगडत नेण्याची तयारी समाजानं मनापासून आणि आपलेपणानं स्वीकारायला लागेल.

मराठी माध्यमांच्या शाळांची परिस्थिती बरी म्हणावी अशी नाही. त्यामुळे एका बाजूला सरळसरळ न्यूनगंडानं व्यापलं जाण्याची भीती आपल्या बाळाच्या वाट्याला येऊ नाही अशी पालकांची एक आतली आणि साहजिक इच्छा आहे, पण त्यासाठी काढत असलेला उपाय 'रोग परवडला पण औषध नको' असा आहे. इंग्रजी माध्यमात शिकणाऱ्या मुलामुलींना त्यांच्या नैसर्गिक क्षमतेइतकं ना वाचायला मिळतं ना विचार करायला. शिक्षणाचा दर्जा तिथेही तितपतच आहे. मराठी माध्यमातली मुलंमुली सहज वातावरणात असल्यानं आपलंआपलं शिकत राहतात, तीही संधी इंग्रजी माध्यमातल्या मुलामुलींना मिळत नाही.

आज एवढी वर्षं आपल्या देशात आणि जगातही इंग्रजी भाषा नांदते आहे. भाषा शिक्षणाच्या सोप्या पद्धतीही विकसित झालेल्या आहेत. असं असूनही मराठी शाळांमध्ये खास प्रयत्न करून ही भाषा सहजपणे येईल असं शिकवता येणार नाही का? आपल्या भाषेतून शिकण्याची आणि दर्जेदार इंग्रजीही समजावून घेण्याची संधी मुलांना देणं अशक्य नाही आहे, हे अनेक भाषा-वैज्ञानिकांनी दाखवून दिलेलं आहे.

पालकांनी हा निर्णय घेताना या विषयाच्या सर्व बाजूंनी पाहण्याच्या या प्रयत्नात उपयोगी व्हावं म्हणून या अंकात आम्ही सर्व बाजू, त्यामागची कारणे, त्यातल्या परिणामाच्या शक्यतांचा वेध घेणारे लेख आपल्यासमोर ठेवलेले आहेत. निर्णय घेताना आपण ज्या एका बाजूला असू त्याच्या दुसऱ्या बाजूचे आपण वकील आहोत असं समजून आपलं मन आणि या वकीलाची आपल्याच मनात झुंज लावून द्यावी.

त्यानंतर जसं आपण लैंगिकतेच्या किंवा कुठल्याही नातेसंबंधाबद्दल बोलताना म्हणतो की, जबरदस्ती, फसवणूक नको आणि परिणामांची जाणीव हवी, तीच चौकट इथेही वापरता येईल. म्हणजे मग तो निर्णय आपला स्वत:चा आणि जाणीवपूर्वक घेतलेला ठरेल. समाजमताचा आपल्यावरचा परिणाम बाजूला ठेवून आपले संकल्प-स्वातंत्र्य अबाधित ठेवत आपल्या कृतीचा विचार आपण करत असू तर आपला निर्णय कुठलाही असला तरी बालकांच्या पाठीशी आपण ठामपणे उभे आहोत, एवढे तरी सुख आपल्या गाठीला राहील.

आपल्या सर्वांना दीपावली व नवीन वर्षाच्या शुभेच्छा !

स्वभाषेतुनी बालकांनी शिकावे...

वर्षा सहस्रबुद्धे



शाळेचं माध्यम स्वभाषा का असायला हवं, मुलांच्या वाढी-घडणीत त्याची नेमकी भूमिका काय असते याचा सुस्पष्ट वेध येथे घेतलेला आहे. ज्यांच्या बोलीभाषा प्रमाणभाषेपेक्षा वेगळ्या आहेत, त्यांना त्यांच्या त्यांच्या बोलीभाषेचं बोट धरून प्रमाणभाषेपर्यंत आणणं किती महत्त्वाचं आहे आणि त्यासाठी काय करायला हवं याचीही मांडणी या लेखात केलेली आहे.

आपली भाषा आणि आपली जडणघडण

शिकण्याचं माध्यम, खास करून शाळेच्या पातळीवर कोणतं असायला हवं याबाबत विचार करताना भाषा आपल्या वाढी-घडणीत काय काय करत असते हे समजून घेणं आवश्यक ठरतं.

एकीकडे भाषा आपल्या विचाराला आकार देत असते तर दुसरीकडे भाषाच आपल्याला असणाऱ्या भौतिक मर्यादांच्या पार नेते आणि प्रत्यक्ष अनुभवापलीकडच्या ज्ञानाच्या जगात, कल्पनेच्या विश्वात घेऊन जाते. जगभरातील भाषातज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ, मानववंशशास्त्रज्ञ संस्कृतीशी आणि विचाराशी असलेल्या भाषेच्या नात्याचा दीर्घकाळ शोध घेत आहेत. विचार आणि भाषा यांच्यातलं नातं अत्यंत गुंतागुंतीचं आहे. त्यांच्यातलं नेमकं नातं काय याची उकल करण्यासाठी मानसशास्त्रातील 'बोधा'चे अभ्यासक आणि भाषातज्ज्ञ धडपडताहेत, मात्र ते अजूनही पूर्ण स्पष्टपणे उलगडलेलं नाही. तरीही, जगाकडे बघण्याच्या आपल्या दृष्टिकोनावर, आपण बोलतो त्या भाषेच्या रचनेचा परिणाम होत असतो, असं आतापर्यंत झालेल्या विविध अभ्यासांवरून दिसतं.

आपल्या भाषेशी आपली नाळ जुळलेली असते. अनोळखी परभाषिक प्रदेशात आपल्या भाषेच्या लहजानं कुणीतरी उच्चारलेले, आपल्या भाषेतले शब्द कानी आले तर मनाला एक प्रकारची जवळिकीची, परिचिततेची झुळूक स्पर्शून जाते, हे ज्यांनी अनुभवलेलं आहे त्यांना हे 'नाळ जुळलेली असणं' म्हणजे नेमकं काय हे स्पष्ट करून सांगण्याची गरज नाही. घरची भाषा ही आपल्या अस्तित्वाचा असा अविभाज्य भाग असते. उच्चार, स्वरलहरी, शब्दभांडार, रचना, अर्थच्छटा, सौंदर्य यांच्यासह बालवयापासून होणारा आपल्या भाषेचा विकास आणि जगाबद्दलची आपली जाण विकसित होणं हे हातात हात घालून घडतं. पहिल्यापहिल्या संवेदना, जाणिवा, त्यांची वाढत गेलेली वलयं, त्यांचे बदलत, विस्तारत जाणारे आयाम या सगळ्याशी आपल्या भाषेचं घट्ट नातं असतं. तसं ते आपल्या भाषेशी असणं, संवेदनशील आणि विचारी माणूस म्हणून होणाऱ्या आपल्या वाढीसाठी तर उपकारक असतंच; पण त्याहूनही महत्त्वाचं म्हणजे जगाचा अर्थ लावताना, आपलं त्याच्याशी असलेलं नातं समजून घेताना, स्वत:ला समजून घेताना त्या नात्याचा आपल्याला अविचल असा आधार असतो.

आपली मातृभाषा, तिच्यात मोकळेपणानं वाढणं, एक माणूस म्हणून आपल्याला काय देतं हे इतर कोणत्याही प्रकारच्या

ಭಾಷೆ
ભાષા
ভাষা
மொழி
ഭാഷ
भाषा Language

मालमत्तेसारखं मूर्त रूपात आपल्याला दाखवता येत नाही. ती खोलवर जाणवणारी, आपापल्या अनुभवाला येणारी अतिशय तरल आणि मौल्यवान अशी गोष्ट आहे. हे मोल ज्यांना समजतं, त्यांनाच, औपचारिक शालेय शिक्षणाच्या चौकटीत मातृभाषेत मोकळेपणानं शिकायला-वावरायला न मिळालेली माणसं नेमकं काय गमावतात हे समजू शकतं.

शिकण्याचं इष्ट माध्यम : मातृभाषाच

'मूल आता शाळेत जाणार त्याला कोणत्या माध्यमात घालायचं?' असला कमालीचा विस्मयकारक वाटण्याजोगा आणि वेडा प्रश्न जिथे पडतो अशा जगातल्या फार थोड्या जागांपैकी एक म्हणजे आपल्या देशातली शहरं आणि आताशा अत्यल्प प्रमाणात काही गावंसुद्धा. मातृभाषेखेरीज निराळ्या भाषेच्या माध्यमातून लहान वयापासून शिकणं वाढी-घडणीसाठी उपकारक असतं, असं आत्तापर्यंत एकाही अभ्यासानं मांडलेलं नाही.

मातृभाषा म्हणजे प्रादेशिक भाषा नाही तर मुलांच्या घरीदारी, शेजारीपाजारी बोलली जाणारी भाषा. या भाषेचं आणि मुलांच्या रोजच्या जगण्याचं, अनुभवविश्वाचं अतूट असं नातं असतं.

मुलाच्या मातृभाषेचा जेव्हा वर्गात स्वीकार होतो, तेव्हा मुलाचा आत्मसन्मान जपला जातो, शिवाय, शिक्षक, वर्ग, शिकणं, वाचणं-लिहिणं याकडे बघण्याचा अत्यंत सकारात्मक दृष्टिकोन मुलाच्या मनात आकाराला येतो आणि याचा केवळ तात्कालिकच नव्हे तर एकंदर शिकण्यावर दीर्घकाळासाठी उत्तम परिणाम होतो. मूल जेव्हा शाळेत येतं तेव्हा आपल्या घरी बोलल्या जाणाऱ्या भाषेच्या जवळजवळ सर्व रचना लवचिकपणे आणि आत्मविश्वासानं वापरायला शिकलेलं असतं. त्या भाषेतल्या काही हजार शब्दांचं भांडार त्याच्या जिभेवर असतं. बोलल्या जाणाऱ्या भाषेशी असणारा खऱ्याखुऱ्या जगण्याचा, दैनंदिन घटनांचा संदर्भ वाचायला आणि लिहायला शिकण्याशी जोडला जाणं महत्त्वाचं असतं. यामुळे दोन गोष्टी साधतात. एक म्हणजे मुलाचे अनुभव, मुलाची जीवनदृष्टी यांना शिकण्याच्या प्रक्रियेत कळीची जागा मिळते आणि दुसरं म्हणजे, शिकण्याच्या आशयाशी नातं जोडता आल्यामुळे शिकलेलं आत्मसात करण्याची प्रक्रिया वेग घेते आणि मुलाचा शिकण्यातला रस टिकून राहतो.

कोणताही शालेय विषय शिकायचा तर मुलांनी लिहितंवाचतं व्हायला हवं. मूल वाचायला शिकतं तेव्हा नेमकं काय घडतं हे समजून घेतलं, तर घरी मूल जी भाषा बोलतं तिचा अंतर्भाव आरंभीच्या टप्प्यावर होण्याचं महत्त्व वेगळं विशद करण्याची गरज उरणार नाही.

मानवी भाषा आवाजांची बनलेली असते. बोलताना अर्थ व्यक्त करण्यासाठी आपण विशिष्ट आवाज विशिष्ट क्रमानं एकामागून एक उच्चारत जातो. बोलण्याची ही घटना काळाच्या संदर्भात घडते. आपण बोलताना काळ पुढे सरकत असतो. लिखित भाषा म्हणजे बोलण्याचंच एका अर्थानं 'गोठवलेलं' रूप. उच्चारांसाठी त्या त्या भाषेत रूढ असलेल्या आकारांच्या खुणा अर्थ व्यक्त करण्यासाठी कोणत्या ना कोणत्या पृष्ठभागावर उमटवणं म्हणजे लिहिणं. लिहिताना काळाच्या जोडीला अवकाशाचाही संदर्भ येतो. मग हा अवकाश शिळा, ताम्रपट, भूर्जपत्र, कागद, संगणकाचा वा मोबाइलचा स्क्रीन अशा कोणत्या का रूपात असेना.

वाचा-लिहायला शिकणाऱ्या मुलाच्या जीवनात मर्मदृष्टी देणारी एक महत्त्वाची घटना घडावी लागते. काळाच्या संदर्भात बोलले जाणारे शब्द, वाक्यं, उद्‌गार अवकाशाच्या

काही वर्षांपूर्वी एका बालशाळेत केलेलं हे निरीक्षण. त्या शाळेत एक वर्ग होता मराठी माध्यमाचा आणि एक वर्ग होता इंग्रजी माध्यमाचा. दोन्ही वर्गात त्या दिवशीचा विषय होता 'नारळ.' इंग्रजी माध्यमाच्या वर्गात प्रत्यक्ष नारळ दाखवून ताईंनी विचारलं, ''हे काय आहे?'' मुलांनी मराठीत उत्तर दिलं, ''नारळ''. ताईंनी 'कोकोनट्' शब्द सांगून मग ब्राऊन, हार्ड, टेंडर-कोकोनट् असे काही शब्द सांगितले आणि मुलांकडून म्हणवून घेतले. तोच नारळ मग मराठी वर्गात गेला. ताईंना विशेष काही बोलावं-सांगावंच लागलं नाही. मुलांनी उत्स्फूर्तपणे बोलायला सुरुवात केली.

''आमच्याकडे पण नारळाचं झाड आहे. खूप उंचय्'' ''त्याच्या आत खोबरं असतं.'' ''खिचडी केली ना की आजी त्याच्यावर खोबरं घालते'' ''आणि आत पाणी पण असतं, गोड लागतं'' ''मी एकदा नळीनी पाणी प्यालेवते'' ''आई असं असं करून खोबरं काढते'' ''आम्ही देवळात गेलो होतो तिथे देवाला नारळ दिलावता'' ''नारळाची बर्फी मला आवडते'' ... एक ना दोन! मुलांनी असंख्य प्रतिसाद दिले. कोणाच्याही मदतीशिवाय!

कुठे तीनचार वदवून घेतलेले शब्द आणि कुठे उत्स्फूर्त वाक्यरचनांमधल्या प्रतिसादांचा धबधबा! प्रेरक तेच पण परभाषेत मुलांना किती बिचारेपणाचा अनुभव देतं आणि मातृभाषेत बहुदिश विचाराला, मुलांच्या अनुभवविश्वाला कवेत घेत कसा दिलखुलास अनुभव देतं!


संदर्भात पृष्ठभागावर विशिष्ट आकार काढून उमटवणं म्हणजेच लिहिणं. हे त्याला उमगावं लागतं. बोलले जाणारे शब्द, वाक्यं मुलाच्या अनुभवाशी घनिष्ठ नातं असणारी आणि त्याच्या भाषेतली असतील तरच हा प्रत्यय मुलाला येण्याची शक्यता निर्माण होते आणि मर्मदृष्टी येण्यासाठी पूरक वातावरण वर्गात निर्माण होतं. ज्याच्याशी मुलांचं नातं सहज जुळणार नाही असा अपरिचित भाषेतला आशय ही मर्मदृष्टी येण्याच्या प्रक्रियेसाठी अत्यावश्यक असा भाषानुभव द्यायला अपुरा आणि निरुपयोगी ठरतो.

ही मर्मदृष्टी ज्यातून येईल असा भाषानुभव द्यायचा तर, आपल्या अनुभवाला येतं ते, आपल्याला जे वाटतं ते मांडता येतं, मांडायचं असतं, ते लिहिता येतं, लिहायचं असतं आणि लिहिलं की ते टिकून राहतं, याचा प्रत्यय मुलांना यायला हवा. यातून जे जे घडतं ते भाषिकदृष्ट्या खूप गुंतागुंतीचं पण फार महत्त्वाचं असतं. विचार आणि भाषा, आत्मप्रतिमा आणि भाषा, भाषेच्या लिखित रूपाचं मानवी जीवनातलं स्थान, आकलन आणि अभिव्यक्ती, दृष्टिकोनांची विविधता आणि अनुभवांची संपन्नता यांची जोपासना अशा विविध अंगांनी मुलाला भाषेच्या ताकदीचा प्रत्यय येत जातो. सकस भाषाशिक्षणात तर याचं महत्त्व अनन्यसाधारण आहेच, पण केवळ आरंभीच्या वाचनलेखनाच्या पातळीवर विचार केला तरी याचं महत्त्व वादातीत आहे. आणि म्हणून माध्यमाच्या मुद्याशी ते जोडलेलं आहे.

आमच्या गोष्टी : मराठी – पावरी – भिलोरी बद्दल...

ज्यांना स्वतःची लिपी नाही अशा आदिवासी बोलीभाषांमध्ये लिखित बालसाहित्याचाही अभाव आहे. शालेय शिक्षणाचे माध्यम असणाऱ्या प्रमाण मराठी भाषेपर्यंतचा प्रवास अन्य बोली भाषक मुलांसाठी सुकर आणि आनंदाचा व्हायला हवा. यासाठी या पुस्तकांची निर्मिती केलेली आहे. त्यातील रेखाटने माधुरी पुरंदरे यांची आहेत. ह्या पुस्तकांमधील काही चित्रमय पाने या लेखासमवेत दिलेली आहेत.

बाजाराला जाऊ



माध्यमभाषा : जागतिक विचार

बालशिक्षणासाठी, बालहक्कासाठी आणि भाषाविविधतेसंदर्भात काम करणाऱ्या जागतिक पातळीवरच्या संस्था आणि युनेस्को यांचं या मुद्याबाबत एकमत आहे, की औपचारिक शिक्षणाच्या निदान सुरुवातीच्या काळात मुलाच्या शिक्षणाचं माध्यम त्याची स्वत:ची भाषा हेच असायला हवं आणि त्याचं महत्त्व निर्णायक असं असतं. हे वेळोवेळी आंतरराष्ट्रीय पातळीवर नमूद केलं गेलेलं आहे. ज्या मुलांची मातृभाषा मर्यादित समूहात वापरली जाते त्यांना स्वभाषेच्या जोडीनं व्यापक समूहाची भाषा, प्रमाणभाषा शिकण्याची संधी मिळण्याची तजवीज असण्याचा मुद्दाही विविध दस्तऐवजांमध्ये आलेला आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरच्या देवघेवीसाठी आणखी एखादी भाषा शिकण्याचा मुद्दाही यात आहे, परंतु तो स्वभाषेच्या मुद्यानंतर येणारा मुद्दा आहे.

मराठी माध्यमाचा प्रश्न

दोनेक दशकांपूर्वी मी मुलांबरोबरच्या कामाला सुरुवात केली तेव्हा 'महाराष्ट्रात शालेय शिक्षणाचं माध्यम मराठी असायला हवं' अशी विचाराची स्पष्टता स्वत:ला असल्यासारखं वाटत होतं. ते तेव्हा पुरेसं स्पष्ट कसं नव्हतं,



काहीसं बाळबोध कसं होतं, हे आता जाणवतं. भाषिक निकषावर राजकीयदृष्ट्या एकत्र केलेल्या प्रदेशात भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक अंगांनी विविधता आहे म्हणजे नक्की काय, याविषयीच्या अनुभवाची डूब गेल्या काही वर्षातल्या कामाला जसजशी मिळत गेली, तसतसा मुलं, भाषा आणि शिक्षण याबद्दलच्या माझ्या विचाराला वास्तवाचा भरीव संदर्भ मिळत गेला. या विविधतेतल्या सौंदर्याचा प्रत्यय घेणं जसं रोमांचक होतं, तसंच त्यातून निर्माण होणाऱ्या गुंतागुंतीच्या जाणिवेनं, भाषाशिक्षणाच्या आणि एकंदरच शिक्षणाच्या आव्हानाच्या जाणिवेनं चक्रावून टाकणारंही होतं.

नर्मदेच्या खोऱ्यातल्या धडगावजवळच्या, सातपुडच्याच्या पायथ्यालगतच्या गावात एकाच वर्गात काही मुलं पावरी बोलणारी तर काही मुलं भिलोरी भाषा बोलणारी. तापीच्या खोऱ्यातल्या सखल भागातल्या शाळेतली मुलं कोकणी आणि भिलोरी बोलणारी. ही कोकणातली कोकणी नव्हे, आणि ही 'खालची' भिलोरी न् नर्मदेकडची 'वरची' भिलोरी यातही बराच फरक. आंध्राच्या सीमेवरच्या कोरपन्यातल्या शाळेतल्या एकाच वर्गात काही मुलं बंजारा बोलणारी, काही मुलं कोलामी बोलणारी तर काही गोंडी बोलणारी. मुंबईतल्या म.न.पा.च्या शाळेत काही मुलं हिंदी भाषक तर त्याच वर्गातली काही मुलं कानडी भाषक. कामाच्या शोधात महाराष्ट्रात येणाऱ्या स्थलांतरित कामगारांची मुलं त्या त्या प्रांताची भाषा बोलणारी. याशिवाय महाराष्ट्राच्या त्या त्या भागातली मुलं तिथल्या ठशाची मराठी बोलणारी.

प्राथमिक शिक्षण घेण्यासाठी शाळेत येणाऱ्या मुलांमध्ये शिकणारी घरातली पहिलीच पिढी असलेल्या मुलांचं प्रमाण गेल्या काही वर्षात झपाट्यानं वाढलं. या मुलांबरोबरच त्यांच्या त्यांच्या भाषा, अनुभवविश्वंही शाळेत येऊन पोहोचली. ज्या समाजाच्या भाषेला लिपी नाही आणि ज्या समाजात वर्षानुवर्षं लेखनाची परंपराच नाही, अशा समाजातली मुलं वर्गावर्गात आली. मात्र त्यांच्या भाषांची, भाषेबरोबर अपरिहार्यपणे येणाऱ्या अनुभवविश्वाची घ्यायला हवी अशी दखल आपण आपल्या व्यवस्थेमध्ये घेतली नाही. एक एक भाषा म्हणजे जगण्याकडे बघण्याची एक एक दृष्टी असते; पर्यायानं, तिलाही आपल्या व्यवस्थेत आपण अवकाश दिला नाही.

मुलं ज्या ज्या भाषा शाळेपर्यंत घेऊन आली, त्यातल्या काही भाषा मराठीशी कमीअधिक जवळीक सांगणाऱ्या, काही भाषांचं कूळ मराठीशी अजिबात नातं नसलेलं, तर काही भाषा स्वत:ची लिपी नाही अशा. या मुलांना शिकवणारे शिक्षक बऱ्याचदा त्या भूभागाशी कोणतंच नातं नसलेले, नेमणूक झाली म्हणून दूरून कुठून तरी येऊन राहिलेले. स्थानिक मुलं बोलतात त्या भाषेशी अशा शिक्षकांची तोंडओळख करून देणारी कोणतीच औपचारिक सोय सेवापूर्व किंवा सेवांतर्गत प्रशिक्षणात नाही.

पहिलीपासूनच्या पाठ्यपुस्तकांची भाषा प्रमाण मराठी. संपूर्ण महाराष्ट्रात कोणत्याही गावातल्या, शहरातल्या किंवा दुर्गम ठिकाणच्या शाळेत तीच पाठ्यपुस्तकं.

कित्येक मुलांच्या भाषांची आणि तद्नुषंगानं सोबतच येणाऱ्या त्यांच्या अनुभवविश्वाची दखल न घेताच आपण त्यांना वाचायला, लिहायला, शिकवायला घेतलं आणि तेही थेट प्रमाण मराठी भाषेत. आणि त्या भाषेतून त्यांनी इतर विषयांमधल्या संकल्पना समजून घ्याव्यात, कौशल्यं मिळवावीत अशी अपेक्षा केली.

साक्षर होण्यासाठी लिपीच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या अगणित मुलांना अडखळायला का होतं, जेमतेम उंबऱ्यापल्याड जाऊन पुढे जाण्याची कितीकजणांची इच्छा कोमेजून का जाते याचं मर्म, वास्तवाची गुंतागुंत वाढवणाऱ्या या सगळ्या घटकांमध्ये आहे. पण त्याहून जास्त, मुलांची शिकण्याची इच्छा टवटवीत रहावी, त्यांचं शिकणं आनंदाचं व्हावं यासाठी समाज म्हणून आपण नेमकं काय करायला हवं हे व्यापक पातळीवर खरोखरच शोधून काढण्याबद्दलच्या

हिला मका आवडतो.



तियी डोडू गमतलू.

She likes corn.

कमालीच्या अनास्थेमध्ये आहे. शिकण्याच्या माध्यमाबद्दलचा वरवरचा विचार हा या व्यापक अनास्थेचा एक भाग आहे.

माध्यम म्हणून प्रमाण मराठीपर्यंत सहज पोचण्यासाठी

मूल शाळेत येतं त्या सुरुवातीच्या काळात त्याला स्वभाषेच्या नजरेनं स्वभाषेच्याच खिडकीतून जगाकडे पहायला मिळण्याचा आणि स्वभाषेतूनच व्यक्त होण्याची संधी मिळण्याचा त्याच्या शिकण्यातल्या सहभागावर, शिकण्याच्या गुणवत्तेवर आणि एकंदर पल्ल्यावर निर्णायकरीत्या परिणाम होतो. सहज कल्पना करता येणार नाही एवढा हा परिणाम दूरगामी ठरतो.

आपल्या घरच्या भाषेपलीकडे जाऊन प्रमाण मराठीवर प्रभुत्व मिळवण्याचं महत्त्व वादातीत आहे. परंतु प्रमाण मराठीपर्यंत पोचण्याचा प्रवास आनंदाचा आणि सहज होणं हाही प्रत्येक मुलाचा मूलभूत अधिकार आहे.

शालेय शिक्षणाच्या आरंभीच्या टप्प्यावर मूल बोलतं त्या भाषेसाठी अवकाश निर्माण करण्याला पर्याय नाही. याचा अर्थ प्रमाणभाषेचं महत्त्व नाकारायचं किंवा या मुलांना प्रमाणभाषेपासून दूर ठेवायचं असा नाही. या मुलांना प्रमाणभाषेपासून दूर ठेवून काही संधींपासून वंचित ठेवण्याचा हेतू यामागे असल्याचा आक्षेप काही विचारवंत, राजकारणी मंडळी यावर घेऊ शकतात. इथे, मुलांची भाषा वाचन-लेखनाच्या पहिल्या टप्प्यावर वापरली जाणं का महत्त्वाचं आहे हे लक्षात घ्यायला हवं. व्यापक भौगोलिक प्रदेश आणि सांस्कृतिक - सामाजिक - भाषिक विविधता यांच्या संदर्भात एकच पाठयपुस्तक सुरुवातीपासून वापरण्यातून आपण समान संधी देतो असं मानण्यातला शैक्षणिक फोलपणा त्यासाठी समजून घ्यायला हवा. 'समान संधी'चा सखोल अर्थ, विविध पार्श्वभूमीतल्या सगळ्या मुलांना एकाच प्रकारे हाताळणं असा नव्हे तर प्रत्येकाला त्याच्या त्याच्या भाषेचा, परिस्थितीचा, गरजांचा आणि क्षमतांचा विचार करत समान उद्दिष्टांपर्यंत पोचायला मदत करणं असा होतो.

मराठीशी कमीअधिक जवळीक असणाऱ्या मराठीच्याच विविध रूपांचाही प्राथमिक शाळांमधील वर्गावर्गातून मोकळ्या मनानं स्वीकार व्हायला हवा. आणि शिक्षकानं वेळोवेळी प्रमाण मराठीतल्या रचनांचा, शब्दांचा पर्याय कुशल सहजपणानं पुरवायला हवा. जोडीला मुलांची भाषाही काही प्रमाणात तरी आत्मसात करायला हवी. अशा रीतीनं सुरुवातीच्या टप्प्यावर मुलांची घरची भाषा आणि प्रमाण मराठी या दोन्ही भाषांचं बोट धरून काही काळ मूल चाललं की मग मराठी माध्यमातून शिकणं ही यांत्रिक बाब राहणार नाही.

तसंच, माध्यमभाषा म्हणून मराठी शिकण्यासाठी मुलांना स्थानिक जीवनसंदर्भाचं चित्रण असलेलं वाचनसाहित्य मराठीत मुबलक प्रमाणात उपलब्ध असायला हवं. लिखित मजकुरात लपलेल्या अर्थाशी मुलांचं नातं जुळलं तरच वाचण्याचे क्षण अद्भुत बनतात आणि वाचणं मुलांसाठी विलक्षण आनंदाचं ठरतं. मुलांचे अनुभव, मुलांची दृष्टी, त्यांचा परिसर, त्यांचं भावविश्व यांची छोटी प्रतिबिंबं आरंभीच्या वाचनसाहित्यात उमटलेली असायला हवीत.

(तड)जोड म्हणून इंग्रजीही

इंग्रजीचा व्यावहारिक उपयोग लक्षात घेता इंग्रजीही आलं तर चांगलंच अशा भूमिकेतून मुलांनी इंग्रजी जरूर शिकावं. पण तो ज्ञान मिळवण्यासाठीचा एकमेव मार्ग असल्यासारखं वागण्याचं अजिबात कारण नाही. इंग्रजी माध्यमाच्या शाळा महाराष्ट्रात चालवणं हा त्यासाठीचा उपायही नव्हे.

मातृभाषेपेक्षा निराळ्या भाषेत, ती प्रादेशिक भाषा नसताना, लहान वयापासून शिकावं याला कोणतंही संशोधन दुजोरा देत नाही. इंग्रजी हे शालेय शिक्षणाचं माध्यम म्हणून अस्तित्वात येण्याची तीन प्रमुख कारणं दिसतात. एक म्हणजे, भारतातल्या भारतात निरनिराळ्या प्रांतात बदली होईल असं काम पालक करत असतील तर माध्यमभाषा ही प्रादेशिक भाषा असण्यातून अडचणी येऊ शकतात. परंतु अशा कुटुंबांची संख्या अत्यंत मर्यादित आहे. दुसरं, आपल्या राजकीय इतिहासामुळे इंग्रजीला असलेली प्रतिष्ठा. आणि तिसरं म्हणजे सामाजिक-आर्थिक प्रगतीसाठीचं एक साधन म्हणून इंग्रजीची होणारी गणना - अर्थार्जनासाठी किंवा अर्थार्जनासाठी प्रेरित अशा विद्यार्जनासाठी ज्या देशांकडे तात्पुरतं वा कायमचं स्थलांतर करण्याची इच्छा अनेकांच्या निर्णयप्रक्रियेवर परिणाम करत असते, त्या देशांची भाषा इंग्रजी असणं.

एक समाज म्हणून मनानं आपण या इंग्रजी-अपरिहार्यतेच्या आणि तिच्या प्रतिष्ठेच्या जाणिवेतून अजूनही बाहेर येऊ शकलेलो नाही. याचा परिणाम म्हणून

पिशवी घेऊ.



खतलू लेहू.

Let's take a bag.

मुलं ज्या भागात जी भाषा बोलतात, त्या भागात आरंभीचं वाचनसाहित्य प्रमाण मराठीत आणि स्थानिक भाषेतही निर्माण होण्याचं महत्त्व अनन्यसाधारण असं आहे. जागोजागचे शिक्षक, त्या त्या जागच्या जगण्याच्या निरीक्षणातून, सर्जनशील लेखनाचा अनुभव असणाऱ्या व्यक्तींच्या थोडया मार्गदर्शनानं आणि स्थानिक भाषा जाणणाऱ्या व्यक्तींच्या मदतीनं असं साहित्य नक्कीच निर्माण करू शकतील. ग्रामीण आणि आदिवासी भागातल्या शिक्षकांनी अशा प्रकारे माझ्या कार्यशाळांमध्ये काही सुंदर वाचनपाठ लिहिले. तिथल्या विषयांचा चेहरामोहरा जराही शहरी नाही...– 'बकरी विहिरीत पडली', 'दुकान आलं', 'बैल बुजाडला', 'बकरी बाजारात विकली', 'महूची फुलं', 'विहीर', 'चिमणीचा उजेड'... एक ना दोन. शेकडो विषय शिक्षकांनी सुचवले.

बकरी विहिरीत पडली

बकरी विहिरीच्या काठी होती.
तिचा पाय घसरला.
ती विहिरीत पडली.
बेऽऽ बेऽऽ करू लागली.
गर्दी जमली.
दोर पाण्यात सोडला.
बकरीला बाहेर काढले.
बकरीला आनंद वाटला.

दुकान आले

गावात एक दुकान आले.
आम्ही गोळा झालो.
ताईने चेंडू घेतला.
आईने बांगडया घेतल्या.
आम्ही सर्व घरी गेलो.

चकरी

बाटलीचे झाकण घेतले. त्याला दगडाने ठोकले. त्याची चकती तयार झाली. त्याला दोन छिद्रे पाडली. त्यामध्ये दोरा ओवला. दोऱ्याला पीळ दिला. दोरा ओढला. चकरी गरगर फिरू लागली. खूप मजा आली.

महूची फुले

''आई, बाबा कोठे गेले?''
''महूची फुले उचलायला.''
''मी पण जाऊ?''
''हो, बाबांना भाकर घेऊन जा.''
झाडाखाली पिवळसर फुलांचा सडा पडला होता. गोडसर वास येत होता. फुलांवर माशा गुणगुणत होत्या. पक्षी चिवचिवत होते.
''बाबा, भाकर खाऊन घ्या. मी फुलं उचलतो. बकऱ्या हाकलतो.''
''शु ऽऽ शु ऽऽ,''
बकरी हाकलली.
झटपट महूची फुले उचलली.
एकदोन फुले खाल्ली.
चव गोड लागली.



नदीवर

रविवारची सुट्टी होती.
मुले नदीवर गेली.
नदीत खूप पाणी होते.
त्यांनी कपडे धुतले.
ईश्वरचा साबण नदीत पडला.
त्याला पोहता येत नव्हते.
भिकाजीने नदीत धपकन्
उडी मारली.
पाणी उंच उडाले.
साबण काढला.
तो छोटा झाला होता.
तिघांनी अंघोळ केली.
हसतखेळत परत आले.

व्यक्तिगत पातळीवर, विचारी खाजगी शैक्षणिक संस्थांच्या पातळीवर आणि शासकीय पातळीवर इंग्रजीकडे गरजेपेक्षा जास्तच कल दिसायला लागला आहे. शिकवणाऱ्यांचीच विषयावर अपुरी पकड असताना, कितीक मुलांसाठी इंग्रजी ही तिसरी भाषा ठरणार याचं भान न ठेवता, आपण मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये इंग्रजी पहिलीपासून सुरू केलं. मुलांनी खेळावं, हातानं काम करावं यासाठी वेळापत्रकात राखीव असलेला वेळ त्यासाठी ओरबाडून घेतला ! इंग्रजी ही दुसरी किंवा तिसरी भाषा म्हणून शिकवायची तर वर्गात एका शिक्षकाला हाताळाव्या लागणाऱ्या मुलांच्या संख्येचा पुरेसा विचार त्यावेळी केला नाही. अर्थातच मुलांच्या इंग्रजीची अवस्था म्हणावी अशी सुधारली नाही. ती खरोखरच सुधारली असती तर इंग्रजी माध्यमाच्या शासकीय शाळा सुरू करण्याचा विचार कदाचित आपल्याला सुचला नसता. आता तर इंग्रजी माध्यमाच्या शासकीय शाळाही बाळसं धरताहेत. खाजगी मराठी शाळांनीही आपआपले इंग्रजी विभाग सुरू केले आहेत. मराठी तुकड्या एकेक करून बंद होत चालल्या आहेत. मराठी तुकडी बंद होऊ नये म्हणून आसपासच्या वस्त्यांमध्ये फिरून आपल्या शाळेचा प्रचार करण्याची वेळ महानगरांमधल्या ज्या मराठी शाळांमधल्या शिक्षकांवर आली आहे, अशांची संख्या हळूहळू वाढते आहे. शाळेच्या अस्तित्वावरच बेतेल असं चित्र दिसायला लागल्यामुळे काही शाळांनी फार विचार न करता तर काही शाळांनी आपल्या विचारात बसत नसतानाही अर्धइंग्रजी माध्यमाच्या तुकड्या सुरू केल्या आहेत. 'मराठी मराठी' म्हणणाऱ्या अनेकांची स्वत:ची मुलं-नातवंडं इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये शिकली आहेत, शिकताहेत.

इंग्रजी येणं विशिष्ट आर्थिक-सामाजिक वर्गाच्या 'अपवर्ड मोबिलिटीसाठी' सोयीचं आहे किंवा 'ज्ञानभाषा म्हणून' आवश्यक ठरतं असं आपलं सध्याचं वास्तव आहे असं क्षणभर मानलं, तरीही शालेय शिक्षणाचं माध्यमच मातृभाषेऐवजी किंवा प्रादेशिक भाषेऐवजी इंग्रजी असणं हा त्यावरचा उपाय खचितच नाही.



शिक्षणाचं माध्यम आणि समाज

शालेय शिक्षणाच्या माध्यमाबाबतच्या निर्णयांवर एक समाज म्हणून असलेल्या आपल्या दृष्टिकोनांचा आणि विकेंद्रित नसलेल्या शिक्षणव्यवस्थेचा मोठा प्रभाव असतो. आणि या दृष्टिकोनांवर भाषा आणि सत्ता, भाषा आणि पैसा, भाषा आणि बाजार, भाषा आणि प्रतिष्ठा, भाषा आणि संधी अशा अनेक समीकरणांविषयीच्या वास्तवाचा आणि गृहीतकांचा प्रभाव असतो. एखाद्या देशात असलेलं भाषावैविध्य म्हणजे जीवनाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनातलंही वैविध्य. ते जपलं जाण्याचं महत्त्व समाज म्हणून जिथे उमगलेलं आहे, शालेय शिक्षणाचा आणि स्थानिक भाषांच्या माध्यम म्हणून असलेल्या भूमिकेचा संबंध जिथे पुरेसा स्पष्टपणे समाजाला आणि धोरणकर्त्यांना कळलेला आहे, अशा पापुआ न्यू गिनीसारख्या देशात पूर्वप्राथमिक आणि प्राथमिक शिक्षणाच्या टप्प्यावर आजघडीला साडेतीनशे ते चारशे वेगवेगळ्या भाषामाध्यमांमधून शिकवलं जातं ! त्यासाठी स्थानिक पातळीवर समाजाचा मोठा सहभाग असतो. शाळेचं माध्यम कोणती स्थानिक भाषा असेल हा निर्णय स्थानिक पातळीवर त्या त्या ठिकाणचा समाज घेतो. पुढच्या इयत्तांमध्ये इंग्रजी शिकवलं जातं. मातृभाषेत शिकताना मिळवलेली कौशल्यं इतर भाषा शिकताना मुलं सहज वापरू शकतात असं याबाबत झालेले अभ्यास नोंदवतात. या देशात औपचारिकरीत्या नोंदल्या गेलेल्या आठशे पन्नासहून जास्त भाषा आहेत. शालेय शिक्षणाचं माध्यम म्हणून सर्वात जास्त भाषा वापरणारा देश म्हणून या देशाची गणना होते.

एकदा मी लहान गटातल्या
मुलांना गोष्ट सांगत होते.
गोष्टीत इंद्रधनुष्य आलं. त्या
निमित्तानं 'ता ना पि हि नि
पा जा' ची गंमत सांगायला
मी सुरुवात केली. ''ता
म्हणजे तांबडा, तांबडा म्हणजे
लाल...ना म्हणजे
नारिंगी...'' ''ताई, नारिंगी
म्हणजे?'' ''केशरी...''
मुलांनी एव्हाना क्लू घेतला
असणार असा अंदाज करून
मी म्हटलं ''पि म्हणजे...''
आणि प्रश्नार्थक चेहऱ्यानं
जराशी थांबले. तशी
क्षणार्धात एक चिमुकली
म्हणाली, ''पिंक!''
या आणि अशा अनेक प्रसंगानी
होणारी वास्तव परिस्थितीची
आणि त्यातल्या गुंतागुंतीची
जाणीव बेचैन करून जाते!

द्विभाषिकत्व आणि बहुभाषिकत्वाची जोपासना

आपल्या भाषेतल्या आवाजांमधले, उच्चारांमधले अगदी बारीक फरक ऐकण्याची आपली क्षमता विकसित झालेली असते. नंतर शिकलेल्या इतर भाषांच्या बाबतीत ती क्षमता उणावलेली असते. उदाहरणार्थ, मराठी शिकणाऱ्या परभाषकाला 'त' आणि 'ट', 'थ' आणि 'ठ', 'द' आणि 'ड' 'ध' आणि 'ढ' यातला फरक ऐकूच येत नाही.

मुलांच्या भाषेविषयीचे, भाषाविकासाविषयीचे निर्णय मेंदू कसे घेत जातो यावर जगात काही ठिकाणी संशोधन चालू आहे. ते अजून पूर्णत्वाला गेलेलं नाही. मात्र झालेल्या कामावरून निष्कर्षांची काहीएक दिशा दिसू लागली आहे. जगामधली कोणतीही मानवी भाषा शिकण्याची अभूतपूर्व क्षमता नव्यानं जन्माला आलेल्या बाळाच्या मेंदूत असते. वयाच्या पहिल्या वर्षाच्या अखेरीपर्यंत बाळानं आसपासच्या माणसांकडून (यंत्रातून किंवा डिजिटल उपकरणातून नव्हे) वारंवार ऐकलेल्या भाषेतल्या आवाजांच्या आधारावर, कोणते आवाज शिकण्याची क्षमता टिकवायची आणि कोणते आवाज शिकण्याची क्षमता सोडून द्यायची याचा निर्णय बाळाच्या मेंदूतल्या पेशी घेतात. आपली, वरचेवर ऐकू येणारी भाषा सोडता, इतर भाषांमधल्या आवाजांमधले बारकावे ओळखण्याची क्षमता अशा रीतीनं साधारणपणे पहिल्या वाढदिवसाच्या आधीच आपण मोठ्या प्रमाणावर गमावलेली असते.

या वयात बाळानं घरी आणि आसपास बोलल्या जाणाऱ्या विशिष्ट भाषेबरोबरच इतरही भाषा ऐकल्या असतील तर मुलाला त्या समजतात आणि मूल गरजेनुसार, तशी परिस्थिती निर्माण झाली तर त्या बोलण्यासाठी वापरूही शकतं. ऐकण्याबोलण्याच्या अनुभवाचा पाया असेल तर पुढे ती भाषा वाचायला आणि लिहायला शिकण्याची पूर्वतयारी त्यातून होत असते.

भारतासारख्या बहुभाषिक देशात घरच्या भाषेच्या जोडीला एकाहून अधिक भाषा कानावर पडणं ही बाब दुर्मिळ असायचं कारण नाही. बालशाळांमध्ये निरनिराळ्या भाषांमधली गाणी गाणं, गोष्टी ऐकणं हे आवर्जून घडायला हवं. इंग्रजीसुद्धा याच समृद्ध भाषानुभवाचा भाग म्हणून मुलांच्या कानावर पडली तर पुढे एक भाषा म्हणून ती शिकताना त्याचा निश्चितच फायदा होईल आणि माध्यम म्हणून इंग्रजीतून शिकण्याची वेळ आपल्या मुलांवर लहान वयात येणार नाही.

मराठी माध्यमात काही निवडक शिक्षणानुभव देता-घेताना शिक्षकानं उत्तम तयारी करून मराठीच्या जोडीला सहजतेनं इंग्रजी पर्याय वापरले तर मुलांचं इंग्रजीचं शब्दभांडार, रचनाज्ञान यात भर पडत राहते. मात्र अर्धी रचना मराठी, अर्धी इंग्रजी अशा धेडगुजरीपणाच्या वाटेवर हे जाता कामा नये याची खबरदारी घ्यावी लागते. मूलगामी भाषा विकास वर्गाला आमच्याकडे येणाऱ्या मुलांनी गेल्या दहा वर्षात गोष्टी, फाशांचे खेळ, पत्ते, निरीक्षणपाठ, फेरफटका, चित्रफिती पाहणं आणि गप्पा मारणं अशा कितीतरी गोष्टी द्विभाषिक भाषानुभवातून केल्या. या मुलांसाठी मराठी माध्यमाच्या शाळेतही इंग्रजी शिकणं त्यामुळे सोपं आणि आनंदाचं झालं.


एकोणीसशे सत्तरपासून शाळेत दोन भाषा शिकण्याविषयी विविध अभ्यास झाले. त्यापैकी 'मैलाचे दगड' म्हणून गणल्या जाणाऱ्या काही अभ्यासांवर एक नजर टाकणं औचित्याचं ठरेल.

मेक्सिकोमध्ये १९७३ मध्ये झालेल्या अभ्यासात असं आढळलं, की मातृभाषेत शिक्षण घेतलेल्या मुलांनी दुसरी भाषा शिकताना, एकाच, म्हणजे स्पॅनिश या परभाषेच्या माध्यमात शिकलेल्या मुलांना मागे टाकलं. नायजेरियात वाचनासंबंधीच्या अभ्यासात असं आढळलं की अगदी कमी संसाधनं वापरून कमी खर्चात स्थानिक पातळीवर स्थानिक भाषांमध्ये चांगल्यापैकी वाचनसाहित्य निर्माण करणं शक्य आहे; पंधरा भाषांमध्ये चाळीस पुस्तकं या प्रकल्पात प्रकाशित केली गेली. फिलिपिन्समध्ये झालेल्या एका अभ्यासात असं लक्षात आलं की असमाधानकारक निकालांचा संबंध मातृभाषेत शिकण्याशी आणि त्याबरोबर दुसरी भाषा शिकण्याशी नसून शिक्षकांच्या शिकवण्याबाबतच्या समजेशी आहे.

शिकण्याची सुरुवात स्वभाषेतून होणं, प्राथमिक शिक्षण प्रामुख्यानं स्वभाषेत होणं आणि व्यापक समूहाची भाषा एक विषय म्हणून शिकणं, या अनेक अभ्यासांवर आधारित अशा विचाराला जागतिक पातळीवर मान्यता मिळालेली आहे. जगभर या मताचा पुरस्कार केला जातो. मात्र अनेक देशांमध्ये, आणि भारतातही, तत्त्वत: हा विचार स्वीकारला गेला असला तरीही त्याचं वास्तवात रूपांतर झालेलं नाही.

महाराष्ट्रापुरतं बोलायचं, तर स्वभाषेत सुरुवातीचं शिक्षण होण्यासाठी, त्याला प्रमाणभाषेच्या परिचयाची हळुवार जोड

तिचं नाव लहानी.



ती नाव लहानी.

Her name is Lahani.

With Best Compliments From

Suresh Press Works

Manufacturers
of
Pressed Components & Job Works

Proprietor

D. T. Wadhokar

Plot No. 50, Block DIII. MIDC,
Chinchwad, Pune - 411 019.
Ph : 2747 3694 / 2747 1395
Fax : 020 - 27470 327

आम्ही आनंदानं राहतो.



आमू मोज्याम रोतला.

We live happily together.

मिळण्यासाठी मूलभूत असं काम होण्याची गरज आहे. हे काम नेमकं कसंकसं पुढे जायला हवं यासंदर्भात उत्तम नियोजन व्हायला हवं. त्याला पूरक असं, स्थानिक परिस्थितीशी घनिष्ठपणे जोडलेला आशय असलेलं शैक्षणिक साहित्य निर्माण व्हायला हवं. त्यासाठी जागतिक पातळीवर होणाऱ्या भाषाविषयक आणि शिक्षणविषयक संशोधनांची दखल घेत रहायला हवं. महाराष्ट्रात ठिकठिकाणी त्याबाबतचा पडताळा घेणारं, तसंच, स्वतंत्र संशोधन व्हायला हवं. स्वभाषेच्या आणि प्रादेशिक भाषेवरच्या प्रभुत्वाच्या जोडीला आंतरराष्ट्रीय भाषांवरच्या प्रभुत्वाची जोड कशी आणि कधीपासून द्यायची याबाबत 'भाषाभावनिक' न होता, आणि भाषेविषयीच्या न्यूनगंडातून तसंच दुरभिमानातून बाहेर येऊन, वस्तुनिष्ठपणे अभ्यास केले जायला हवेत. यापूर्वी भाषा आणि शालेय शिक्षण याबाबत घेतल्या गेलेल्या सार्वत्रिक निर्णयांच्या अंमलबजावणीचा लेखाजोखा मोकळ्या मनानं मांडला जायला हवा.

माध्यमाची जागा देण्यातून भाषिक विविधता जपल्यानं केवळ मुलांची सांस्कृतिक अस्मिता जपली जाईल किंवा शिक्षणाची गुणवत्ता वाढेल यापाशी हे थांबणार नाही, तर केवळ संख्येनं कमी माणसं बोलतात म्हणून जिवंत राहण्यासाठी झगडावं लागणाऱ्या, अस्तंगत होण्याच्या वाटेवर असलेल्या एकेका भाषेचा शिक्षणाच्या औपचारिक चौकटीत स्वीकार होण्यामुळे त्या त्या भाषेबरोबर येणारी जगण्याकडे पाहण्याची दृष्टीही टिकून राहील.

▼▼▼

वर्षा सहस्रबुद्धे, पुणे
माजी मुख्याध्यापिका व संस्थापक सदस्य
अक्षरनंदन शाळा, पुणे.
शहरी व ग्रामीण भागात प्राथमिक शिक्षणाच्या गुणवत्ता सुधारणेसाठी काम.
प्रशिक्षक-प्रशिक्षणे, शैक्षणिक वृत्तांत, पाहणी व कार्यक्रमांत सहभाग. मुलांसाठी पुस्तक लेखन.
मुलांच्या शिक्षणविषयक अडचणींबाबत व्यक्तिगत मार्गदर्शन.
eduvarsha@gmail.com

आवाहन

महाराष्ट्रातल्या ग्रामीण आणि आदिवासी भागातल्या मुलांसाठी त्यांच्या परिसराचे आणि अनुभवविश्वाचे प्रतिबिंब असलेले वाचनसाहित्य निर्माण करण्याचे काम मूलगामी प्रकाशनातर्फे हाती घ्यायचे आहे. यापैकी काही साहित्य मराठी आणि मुलांची घरची भाषा असे द्विभाषिक असणार आहे. या साहित्यनिर्मितीच्या आशय-विकासासाठी आणि भाषांतराच्या कामासाठी महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागातून सहभाग हवा आहे. सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांनी अवश्य संपर्क साधावा. आपले नाव, मोबाईल नंबर, पोस्टाचा पत्ता व असल्यास ईमेल पत्ता कळवावा. द्विभाषिक साहित्यासाठी मदत करणार असल्यास मराठीखेरीज कोणत्या भाषेत काम करणार हेही कळवावे.

वर्षा सहस्रबुद्धे

With best compliments from

Joshi's Museum of Miniature Railways

The only one of its kind in India

Timings:- Saturdays and Sundays - 5 p.m. to 8 p.m.

Contact - Dr. Ravi Joshi

17/1 B/2 G A Kulkarni Road, Kothrud, Pune 411029. Phone: 25435378,
Email: ravi@minirailways.com Web site : http://www.minirailways.com

भाषिक साम्राज्यशाही

डॉ. सुलभा ब्रह्मे



स्वातंत्र्यपूर्व काळातील मेकॉलेप्रणित शिक्षणापासून स्वातंत्र्योत्तर काळात आणि आत्ताच्या जागतिकीकरणाच्या काळात बदलत गेलेल्या इथल्या शिक्षण परिस्थितीची, त्यातून निर्माण झालेल्या प्रश्नांची आणि त्यावरील उपाय योजनांची मांडणी करणारा हा लेख आहे.

जगभराच्या निसर्गसंपत्तीवर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे ताबा मिळवून तिची बेफाम लूट करणे आणि बहुराष्ट्रीय उद्योगांचे जाळे जगभर पसरवून गरीब देशातील श्रमिकांचे शोषण करून शस्त्रास्त्रे, यंत्रे, रसायने, पोलाद, खते, मोटारी, संगणक, कपडे, सौंदर्यप्रसाधने, दारू आदी वस्तूंचे मोठ्या प्रमाणात उत्पादन करून त्यांच्या विक्रीसाठी जगभराच्या बाजारपेठा पादाक्रांत करणे, हा अमेरिकेसारख्या साम्राज्यशाही देशांची सरकारे व तेथील बहुराष्ट्रीय कंपन्या यांचा डाव आहे. त्यासाठी लष्करी आक्रमण (इराक), विकसनशील देशातील शासने मुठीत ठेवणे (पाकिस्तान, इजिप्त, भारत इ.), प्रसारयंत्रणेवर कब्जा, तेथील बडच्या कंपन्यांशी संगनमत, रीटेल क्षेत्रात शिरकाव, वित्तक्षेत्रात वर्चस्व, सांस्कृतिक आक्रमण आदी रणनीतींचा अवलंब ते करीत आहेत. साम्राज्य स्थापनेसाठी भाषिक आक्रमणाचे महत्त्व ओळखून लॉर्ड मेकॉले यांनी १८३५ साली ब्रिटिश पार्लमेंटमध्ये त्याबाबतची रणनीती विशद केली होती. त्यांनी मांडले होते, ''या देशात प्रचंड सधनता, उच्च नैतिक मूल्ये व कर्तृत्ववान लोक असल्याने या देशाचा आध्यामिक व सांस्कृतिक कणा मोडल्याखेरीज आपण हा देश पादाक्रांत करू शकू असे मला वाटत नाही. त्यासाठी त्यांची प्राचीन शिक्षण पद्धती व संस्कृती नामशेष केली पाहिजे. भारतीयांना असे पटले पाहिजे की जे जे परदेशी आहे, इंग्लिश आहे ते उत्कृष्ट आहे, त्यांच्या संस्कृतीपेक्षा सरस आहे, तर ते त्यांची संस्कृती, त्यांचा आत्मविश्वास गमावतील आणि आपल्या इच्छेप्रमाणे ते आपले गुलाम बनतील.''

इंग्लिशचे अधिराज्य

लॉर्ड मेकॉले यांच्या सूचनेनुसार भारतातील संस्कृत, अरबी, फारसी अभ्यासाची मदत बंद करण्यात आली. पारंपरिक शिक्षणपद्धती निकालात काढली गेली. इंग्लिश माध्यमातून पाश्चिमात्य विद्यापिठीय व शालेय शिक्षणव्यवस्था मोजक्या अभिजन वर्गासाठी सुरू झाली. पाश्चिमात्य ज्ञानविज्ञान व साहित्य, शासनपद्धती आदीने भारावून इंग्लिश राजवट ही ईश्वरीकृपा मानणारा एक वर्गही अगदी मर्यादित प्रमाणात भारतात निर्माण झाला. मिशनऱ्यांनी मोठे प्रयत्न केले तरी भारतामध्ये ख्रिश्चन धर्म अत्यल्प प्रमाणातच स्वीकारला गेला. आम जनता आंग्लीकरणाच्या प्रक्रियेत ओढली गेली नाही. इंग्लिश भाषेतून ज्यांनी पाश्चिमात्य शिक्षण घेतले, त्यापैकीही बहुतेक जण ख्रिश्चन धर्म

ಭಾಷಾ
ભાષા
ভাষা
மொழி
ഭാഷ
भाषा
Language

किंवा पाश्चिमात्य संस्कृती याकडे आकर्षिले गेले नाहीत. त्यांनी सामाजिक सुधारणा, धार्मिक सुधारणा आदी उपक्रमांद्वारा भारतीय समाज व संस्कृतीच्या चौकटीमध्येच सुधारणांचे प्रयत्न सुरू केले. जुलमी इंग्लिश राजवटीविरोधात १८५७ साली पहिला उठाव झाला. तो क्रूरपणे चिरडला गेला. पण शेतकरी, आदिवासी यांचे उठाव चालूच राहिले. स्वातंत्र्यासाठी पुढील काळात क्रमशः देशव्यापी चळवळ उभी राहिली आणि १९४७ साली भारत स्वतंत्र झाला.


इंग्लिश माध्यमातून पाश्चिमात्य शिक्षण देण्यात लॉर्ड मेकॉले यांचा हेतू होता की असा एक अभिजन वर्ग निर्माण करायचा की जो रंगाने व रक्ताने हिंदी असेल पण आचारविचार, आवडीनिवडी, मते, नीतिमूल्ये याबाबत तो इंग्लिश बनेल. असा वर्ग मोजक्या प्रमाणात निर्माणही झाला. परंतु स्वातंत्र्य मिळवण्याची ईर्षा जशी दृढमूल होत गेली तशी इंग्लिश भाषेची गुलामगिरी झुगारण्याची इच्छा आणि स्वभाषेचा अभिमान मध्यमवर्गीयांमध्ये बलवत्तर होत गेला. त्यांनी मराठी भाषेच्या विकासात व साहित्यनिर्मितीत लक्ष घालून आंग्लीकरण रोखले. इंग्लिश औपचारिक शिक्षण खेडोपाडी तर फारसे पोचलेही नव्हते. स्वदेशी भाषेतून सातवीपर्यंतचे (vernacular final) शिक्षण फारतर होई.


लॉर्ड मेकॉले यांच्या सूचनेप्रमाणे इंग्लिश राज्यकर्त्यांनी भारतीयांवर इंग्लिश भाषा लादून भारतीय संस्कृती नष्ट करण्याचा प्रयत्न केला तरी भारतीय जनतेने आपली अस्मिता गमावली नाही. आपली संस्कृती गमावली नाही. काही उच्चवर्णीय, उच्चशिक्षित वगळता इंग्लिश ते श्रेष्ठ, भारतीय ते त्याज्य असे मानणारा वर्ग निर्माण झाला नाही. हे चित्र शंभर वर्षांपूर्वीचे. १९४७ सालापर्यंत भारतीय भाषा व संस्कृती जतन करत स्वातंत्र्य मिळवण्यासाठी भारतीय जनता लढली. स्वातंत्र्य मिळाल्यावर भारतीय भाषा व संस्कृतीच्या विकासासाठी विविध प्रयत्न सुरू करण्यात आले. परंतु येथील उच्चवर्णीय, उच्चशिक्षितांनी सत्तेवरील मक्तेदारी कायम राखण्यासाठी इंग्लिश भाषा प्रभुत्वस्थानी राखली. आणि जागतिकीकरणाच्या जमान्यात तर ती डोक्यावरच बसवली आहे.

स्वातंत्र्य मिळून ६५ वर्षे झाली. आज लॉर्ड मेकॉलेच्या स्वरूपातले येथले काळे साहेब मराठी भाषा व संस्कृतीचे मारेकरी बनले आहेत. महाराष्ट्रामध्ये गेली सहा वर्षे मराठी माध्यमातील विनाअनुदानित नव्या शाळांना परवानगी देण्याचे नाकारून मराठीची गळचेपी करत आहेत आणि इंग्लिश माध्यमातील शाळांना प्रोत्साहन देण्याचे धोरण राज्यकर्ते रेटत आहेत. त्याचे शहाजोगपणे समर्थन करत आहेत की जनतेचीच तशी मागणी आहे ! खरे तर परकीय ते सर्वोत्कृष्ट, इंग्लिश भाषा जणू देववाणी आणि मराठी, कानडी, तमिळ... गावंढळ, त्याज्य असे त्यांनीच जनतेला पटवले आहे. तथाकथित लोकशाहीमध्ये निवडणुकीच्या नाट्यातून सत्ता कायम टिकवण्यासाठी जनतेला अडाणी ठेवणे या हेतूने इंग्लिश भाषेचे स्तोम माजवले जात आहे आणि इंग्लिशच्या मृगजळामागे धावत जनतेची मात्र पुरी फसगत होत आहे. जागतिकीकरणाच्या झंझावातात भारतीय राज्यकर्ते व उच्चवर्णीय व उच्चवर्गीय हे पद्धतशीरपणे इंग्लिश भाषेचा वरचष्मा वाढवून भारतीय भाषाच नव्हे तर ५००० वर्षांची प्रदीर्घ परंपरा असलेली भारतीय संस्कृतीही गाडून टाकण्याच्या साम्राज्यशाहीच्या कटात सामील झाले आहेत. परिणामी भारतीय भाषा व संस्कृती यांवर इंग्लिश भाषा, आचार, विचार आणि जीवनदृष्टीचे वेगाने अतिक्रमण होत आहे.

इंग्लिश माध्यमामागे लागलेला मध्यमवर्ग

१९९१ सालापासून जागतिकीकरण, संगणकीकरण आणि इलेक्ट्रॉनिक मीडियामुळे जग एक होण्याच्या प्रक्रियेने वेग घेतला





आणि या जमान्यात मध्यमवर्ग मोठ्या संख्येने इंग्लिश माध्यमाच्या शाळांकडे वळला. या काळात माहिती – तंत्रज्ञान, मीडिया, परकीय कंपन्या, वित्त व सट्टेबाजी व्यवहार आदी क्षेत्रातील उत्पन्नामध्ये घसघशीत वाढ झाल्याने चांगल्या गुणवत्तेच्या इंग्लिश माध्यमाच्या शाळेत प्रवेश घेणे पालकांना परवडूही लागले. क्रमशः ती 'फॅशनच' बनली आणि मराठी माध्यमाच्या शाळेत पाल्याला पाठवणारे पालक गावंढळ ठरू लागले.

स्वातंत्र्योत्तर काळात साठीच्या दशकात इंग्लंड – अमेरिकेमध्ये नोकरीसाठी उच्चशिक्षितांचे स्थलांतर वाढू लागले. नव्वदीपर्यंत अनेकांची मुले, सगेसोयरे अमेरिकेत स्थायिकही झाले असल्याने उच्चशिक्षितांची अस्मिता इंग्लिश भाषा आणि अमेरिका यांच्याशी जोडली गेली. ब्रिटिश राजवटीत मध्यम वर्ग स्वातंत्र्य लढ्यामध्ये सामील झाला होता, नेतृत्वस्थानीही होता. खाउजा पर्वातला मध्यम वर्ग मात्र अमेरिकन साम्राज्यशहांचा हस्तक बनून भाषिक व सांस्कृतिक साम्राज्यशाहीचा वाहकच बनला आहे. इंग्लिश भाषा व अमेरिकी पैसाकेंद्री चंगळवादाचा पगडा समाजमानसावर बसवण्याचे काम तो करीत आहे. आज इंग्लिश माध्यमाच्या शाळेत शिकणाऱ्या मध्यमवर्गातील बहुसंख्य मुलांना मराठी वृत्तपत्रे, पुस्तके वाचनाची गोडी नाही. मराठी नाटके, सिनेमा त्यांच्या गावीही नाहीत. वेशभूषा, आहार, विहार, व्हॅलेंटिन डे, रेव्ह पार्टी – एकूणच हे अमेरिकीकरण तरुणाईच्या जीवनाचा वेगाने कब्जा घेत आहे. अशा रीतीने जागतिकीकरणाच्या भूलभुलैयात गुरफटलेल्या मध्यमवर्गाला त्यांची वाढती श्रीमंती आणि चंगळबाजी याची प्रचंड किंमत आदिवासी, शेतकरी व अन्य श्रमिक मोजत आहेत याची जाणही नाही; इतके ते आत्ममग्न झालेत, की समाजाशी त्यांना काही देणेघेणे नाही. समाजाला मात्र त्यांचे अनुकरण करावे वाटते. मध्यमवर्गाच्या 'पॉश' राहणीच्या मोहाने भल्याबुऱ्या मार्गाने पैसा कमवून सिगरेट-दारूच्या धुंदीतल्या 'यप्पी लाईफ'च्या जाळ्यात अनेक तरुणतरुणी ओढले जात आहेत. उच्चमध्यमवर्गाच्या श्रीमंतीने, यशाने दिपून इंग्लिश माध्यम हीच 'चांगल्या' नोकरीत प्रवेशाची गुरूकिल्ली अशा भ्रमाने श्रमिक जनता इंग्लिश माध्यमाचा ध्यास धरून आहे.

खरे तर, हे लक्षात घेणे गरजेचे आहे की उच्चवर्णीयांना पारंपरिक शिक्षणाचा वारसा, घरातील बौद्धिक वातावरण, वाचनाची आवड, उत्तम दर्जाच्या शाळेत शिक्षण घेण्याची ऐपत, आर्थिक सुबत्ता व स्वास्थ्य अशा अनुकूलतेमुळे 'चांगल्या' दर्जाच्या शाळेमध्ये आठवी ते अकरावी इयत्तेपर्यंत म्हणजे फक्त चार वर्षे इंग्लिश भाषा शिकली तरी वाचनाचा सराव करत त्यावर प्रभुत्व मिळवून उच्चशिक्षण पुरे करणे सहजी जमू शकते. स्वातंत्र्यानंतर इंग्लिश भाषेचे महत्त्व क्रमशः कमी करण्याच्या दृष्टीने काही वर्षे आठवी इयत्तेपासून इंग्लिश भाषा शिकवली जात होती. गेली पन्नास वर्षे देशात / परदेशात जे मराठीभाषक अधिकारी, डॉक्टर, अभियंते, शास्त्रज्ञ, प्राध्यापक, लेखापरीक्षक आदी उच्चपदी आहेत ते बहुसंख्य मराठी माध्यमाच्या शाळेत काही वर्षे इंग्लिश भाषा शिकलेले आहेत. तीच स्थिती मध्यम श्रेणीतील पर्यवेक्षक, शिक्षक, कारकून आदींबाबत आहे. उच्च शैक्षणिक पात्रतेसाठी स्वभाषेद्वारा शिक्षण हेच पायाभूत होय. उच्चवर्गीयांना उच्च पदे मिळतात, ती उच्चशिक्षण पुरी करण्यास लागणाऱ्या आर्थिक – शैक्षणिक अनुकूलतेमुळे. त्यानंतर जरूरीप्रमाणे वशिला, देणग्या आदींचा वापर करून चांगली नोकरी मिळवणे अथवा व्यवसायात जम बसवणे त्यांना शक्य होते.

आर्थिक, शैक्षणिक परिस्थितीबाबतचे वास्तवही विचारात घ्यावयास हवे. नोकरी मिळणे हे शैक्षणिक पात्रता व गुणवत्ता आणि वशिला लावण्याची व देणग्या देण्याची क्षमता यावर अवलंबून असते. त्यामुळे कष्टकरी

वर्गातील मुलांची (राखीव जागा सोडून) दर्जेदार नोकरीत वर्णी लागणे विरळाच. पहिला अडथळा शैक्षणिक पात्रतेचा. आईवडील बांधकाम कामावर, झोपडपट्टीतील धकाधकीचे तणावग्रस्त व ओढग्रस्तीचे जिणे, वस्ती रात्री दारूच्या अमलाखाली, घरात लहान भावंडे त्यामुळे अभ्यासाला सवड आणि निवांतपणा कठीण, घरी लिखापढीचे वातावरण नाही. खेडेगावात तर शिक्षक गैरहजर किंवा दुसऱ्याच कामात अडकवलेले, शाळा दूर, मुलींवर फाटी आणणे, भावंडांना सांभाळणे अशा अनेक जबाबदाऱ्या, त्यामुळे शिक्षण अर्धवटच राहण्याचा संभव जास्त. घरातील अडचणींमुळे सातवी / आठवीतच शाळा सोडून कामाच्या रगाड्याला जोडून घ्यायची वेळ अनेक मुलांवर येते. अशी एक, दोन, शंभर नव्हे, लाखो भारतीय मुलांची परिस्थिती आहे. आज गरज आहे ती जिल्हापरिषदा, नगरपालिका व महानगरपालिका येथील शाळांमध्ये स्वभाषेतून चांगल्या पद्धतीचे शिक्षण देण्याची. आज शाळांमध्ये पहिलीपासून इंग्लिश भाषा शिकवली जाते तरी दहावीच्या विद्यार्थ्यांना गरजेइतकीसुद्धा इंग्लिश भाषा येत नाही. पहिलीपासून सर्व वर्ग इंग्लिश माध्यमामध्ये सुरू केले तर जी भाषा अपरिचित असून परिसरात वापरात नाही, ती भाषा सात-आठ वर्षांच्या विद्यार्थ्यांना आणि प्रत्येक विषयाच्या म्हणजेच हजारो शिक्षकांना चांगल्या तऱ्हेने यावयास हवी. हे तर अशक्यप्रायच !

शिकणे अर्थपूर्ण व्हावे म्हणून

शिक्षणातून व्यक्तिविकास साधावा व सुसंस्कृत, जबाबदार, समंजस, वैज्ञानिक दृष्टिकोन आत्मसात केलेला नागरिक विकसित व्हावा यासाठी आजच्या शिक्षणपद्धतीत आमूलाग्र बदल करणे गरजेचे आहे. आज माहितीचे ओझे लादणारी आणि त्यासाठी भारंभार पाठ्यपुस्तके वापरून मुलांवर अभ्यासाचे दडपण निर्माण करणारी शिक्षणपद्धती आहे. प्राथमिक शाळेच्या प्रारंभ काळातच औपचारिक पाठ्यपुस्तकी शिक्षणाच्या खोड्यात मुलांना अडकवण्याने शाळा म्हणजे ओझे वाटण्याचा धोका असतो. या प्रक्रियेत बालमनाची उत्स्फूर्तता, कुतूहल, सर्जनशीलता मारली जाण्याचीही शक्यता असते. शाळेच्या प्रारंभिक काळात क्षमता विकासावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. त्यासाठी मातृभाषा, गणित, सामान्य विज्ञान, परिसरज्ञान एवढेच विषय प्रामुख्याने चित्रमय गोष्टी, गाणी, चुटके, कोडी, मणी, बिया, पाने, दगड, ठोकळे, पुठ्ठे अशा साधनांचा वापर करून तिसरीपर्यंतचे शिक्षण हसतखेळत व्हावयास हवे. मातृभाषेच्या माध्यमातून सहजसुलभतेने आत्मसात केलेले विविध विषय - ज्ञान आकलन करण्याचे कसब जसे विकसित होईल, तसा देवनागरी लिपीमधील सोप्या पुस्तकांचा वापर करणे योग्य.

बालपणापासून सभोवतालातून स्वाभाविकपणे आत्मसात केलेली व वाढत्या वयाबरोबर शब्दसामग्री व आकलनशक्ती यामध्ये भर पडत समृद्ध झालेली भाषा जर शाळेमध्ये माध्यम म्हणून वापरली तर ती प्रक्रिया नैसर्गिक, सहजसुलभ व रसपूर्ण राहते. चीन, जपान, रशिया, फ्रान्स, जर्मनी, इटली, स्पेन या प्रत्येक देशामधली सर्व जनता स्वभाषेतून सर्व पातळीवरील शिक्षण घेते व सर्व व्यवहार स्वभाषेतून करते. हे देश विज्ञान-तंत्रज्ञान, साहित्य आदी क्षेत्रांमध्ये आघाडीवर आहेत. ते स्वभाषेतूनच प्रगती करत आहेत. अमेरिकी साम्राज्यविस्ताराबरोबर इंग्लिशचे अतिक्रमण स्वीकारून भारतातील अमेरिकेचे हस्तक बनलेले राज्यकर्ते व मध्यमवर्ग इंग्लिश भाषेचा नाहक बागुलबुवा उभा करत आहेत. इंग्लिश ही आता जगाची ज्ञानभाषा बनली आहे, त्याविना तरणोपाय नाही असा भ्रम पसरवत आहेत. खरे तर प्रत्येक देशाची स्वभाषा हीच ज्ञानभाषा होय. मराठी जनतेची ज्ञानभाषा मराठी आहे हे लक्षात घेऊन जर आपण इंग्लिशच्या कुबड्या झुगारून मराठीचा वापर, विकास आणि आत्मनिर्भरता यांवर लक्ष केंद्रित केले तर आपण भाषाविकास व ज्ञानविकास साधू शकू.

मातृभाषा ही प्रमाणित पुस्तकी भाषेहून बरीच भिन्न असेल (गोंडी, अहिराणी, भिल्ली, हळबी, कोकणी, इ.) तर क्रमशः मुलांच्या व्यवहारातील शब्दांसाठी पर्यायी प्रमाणित मराठी प्रतिशब्दांची ओळख करून देत प्राथमिक शाळेतील चौथी इयत्तेपर्यंत ही प्रक्रिया पुरी करता येईल. प्रमाणित भाषेची ओळख गाणी, गोष्टी, गप्पा अशा श्राव्य माध्यमातून नवनवे अपरिचित शब्द कानावर पडून केली तर भाषाविकास सहजी साधता येतो. चित्रावरून नव्या शब्दांचा परिचय करून देणेही परिणामकारक ठरते. अशा पद्धतीद्वारे बोलीभाषेतून प्रमाणित भाषेकडे क्रमशः स्थित्यंतर करणे, तसेच बोलीभाषेतून विविध साहित्य प्रकाशित करणे आणि प्रमाणित मराठी व बोलीभाषा या दोहोंच्या विकासासाठी देवाणघेवाणीचे संबंध वाढवणे गरजेचे आहे.

इंग्लिश माध्यमाचे वेड येते कुठून?

पहिली ते दहावी इंग्लिश शिकूनही नोकरीसाठी जरूर तसे इंग्लिश येत नाही तेव्हा इंग्लिश माध्यमाच्या शाळेकडे धाव सुरू आहे. नोकरी मिळवण्यासाठी इंग्लिश भाषाज्ञानाची जी गरज आहे ती इंग्लिश माध्यमातून शिक्षण घेतले तर भागवता येईल अशा भ्रमापोटी ही धडपड चालू आहे. त्यासाठी शाळेमध्ये मराठी बोलण्यास बंदी घालून इंग्लिशमध्ये बोलण्याचा सराव करण्याचा प्रयत्न काही शाळांमधून चालतो. परंतु घरी, शेजारी, नित्य - व्यवहारात मराठीचाच वापर असल्याने बालवयापासून कृत्रिमपणे इंग्लिशचे बांडगूळ



लावल्याने शाळेत मुले अबोल बनण्याचा, भाषा नीट न समजल्याने न्यूनगंडाने पछाडली जाण्याचा धोका असतो. इंग्लिश भाषा पूर्णतया परकी, प्रत्येक शब्द मुद्दाम शिकायला हवा, स्पेलिंग तर महाकठीण आणि ती नीटपणे आली नाही तर सर्वच विषय कच्चे राहतात. त्यामुळे केवळ घोकंपट्टीचा आधार घेतला जाऊन शिक्षण म्हणजे नुसती पोपटपंची बनते. पालकांना इंग्लिश भाषा येत नसल्याने मुलांना मदत तर करता येत नाहीच पण एकूणच मुलांच्या शैक्षणिक शोकांतिकेची नीट कल्पना येत नाही. शेतकरी, आदिवासी, मच्छिमार या सर्वांच्याच निर्वाहसाधनांवर शासन घाला घालत असल्याने मुलांनी इंग्लिश शिकावे व नोकरी मिळवावी एवढाच मार्ग त्यांना दिसतो आहे. परंतु इंग्लिश माध्यमाच्या शाळेत न जाता इंग्लिश शिकण्यासाठी दुसरा चांगला मार्ग उपलब्ध झाला तर त्यांची ताबडतोबीची निकड भागू शकेल. शिवाय इंग्लिश भाषाज्ञानाविना विविध कौशल्ये, कसबे आत्मसात करूनही चांगले उत्पन्न मिळवता येते हे पर्यायही नजरेसमोर ठेवणे महत्त्वाचे आहे.

पर्यायांचा विचार आवश्यक

पोटापाण्यासाठी आवश्यक म्हणून आपण अनेक कौशल्ये आत्मसात करतो – उदाहरणार्थ टंकलेखन, सुतारकाम, संगणकाचा वापर, विविध यंत्रे चालवणे, दुरुस्ती, इत्यादी. इंग्लिश भाषा हेही एक प्रकारचे कौशल्यच आहे. तेव्हा विविध प्रकारच्या नोकरीसाठी इंग्लिश भाषेचे ज्या पातळीवरील आकलन आवश्यक असेल (लिपी वाचन, विशिष्ट तांत्रिक शब्दसामग्री, कामचलाऊ प्रश्नोत्तरे, इंग्लिश संदर्भ साहित्यवाचन, संगणकाचा वापर) त्यानुसार नगरपालिका, जिल्हापरिषदा आदी शासकीय पातळीवरील संस्थांमार्फत व महाविद्यालयांमार्फत अत्यंत माफक शुल्क आकारून उत्तम इंग्लिश भाषाज्ञान असलेले प्रशिक्षित शिक्षक नेमून ३ ते ६ महिन्यांचे 'खास' अभ्यासक्रम उपलब्ध करून द्यावेत. भाषाशिक्षणाचे परिणामकारक अभ्यासक्रम व पद्धती आता उपलब्ध झालेल्या असल्याने अल्पकाळात आवश्यक तेवढे भाषाज्ञान मिळवणे शक्य आहे. अर्थार्जनाची संधी मिळवण्यासाठी मराठी माध्यमातून शिक्षण घेतल्यास किमान शैक्षणिक पात्रता गाठणे मातृभाषेतून शिक्षण घेतल्यामुळे शक्य होईल. आणि खास अभ्यासक्रम पुरा केल्याने गरजेपुरते इंग्लिशही आत्मसात करता येईल.

नोकरी मिळवण्याच्या नावाखाली इंग्लिश माध्यमाचे वेड पसरत आहे. मात्र त्यापायी मुलांचा भाषिक गोंधळ उडून त्यांच्या शिक्षणाचा खेळखंडोबा होत आहे; हे टाळायचे असेल तर इंग्लिश माध्यमाचे वेड टाकून दिले पाहिजे. एवढेच नव्हे तर प्राथमिक शाळेतील एक ते चार इयत्ता व माध्यमिक शाळेतील पाच-सहा इयत्तांपर्यंत इंग्लिश भाषा शिकवू नये. मराठी भाषा शिक्षण पक्के करून घ्यावे. सातवी ते दहावी या इयत्तांमध्ये इंग्लिश



शिकवण्याची चांगली व्यवस्था करावी. तोपर्यंत मुलांची आकलन शक्ती विकसित झालेली असल्यामुळे चार वर्षांमध्ये इंग्लिश भाषा वाचन, लेखन व बोलणे या सर्वांकडे लक्ष पुरवून गरजे एवढे भाषेचे कसब निश्चितपणे मिळवता येईल. दहावी उत्तीर्ण होण्यासाठी इंग्लिश भाषा परीक्षा मात्र सक्तीची नसावी. ही झाली ताबडतोबीची गरज भागवण्याच्या दृष्टीने एक प्रकारची मलमपट्टी !

आज बोलीभाषेमध्ये इंग्लिश शब्द बरेच मिसळले जातात, मुंबईमध्ये बाजारातील भाषा हिंदी बनली आहे. मीडियामध्ये तर धेडहिंदी-इंग्रजी भाषा प्रचलित होत आहे. म्हणून काही प्रमाणित मराठी भाषा - जी ललित वाङ्मय सोडून इतर सर्व साहित्यात - समाजशास्त्रे, निसर्गविज्ञान, तत्त्वज्ञान, वैद्यक, वृत्तपत्रे, साप्ताहिके, मासिके आदी लिखित साहित्यात वापरली जाते, ती बदलण्याचे कारण नाही. लिखित भाषेत नवीन शब्दांची भर सतत पडत राहते व राहिलीच पाहिजे. बोलीभाषेतूनही ती भर पडली पाहिजे. शास्त्रीय व तंत्रवैज्ञानिक परिभाषा वापरातही ही लवचिकता हवी. पण हे सर्व मराठी भाषेशी सुसंगत पद्धतीने झाले पाहिजे. इंग्लिश भाषेचे अतिक्रमण चालवता कामा नये.

मराठीची प्रतिष्ठापना

मध्यम पल्ल्याचा विचार करता इंग्लिशची मिरासदारी मोडलीच पाहिजे. त्यासाठी जनतेने पुढाकार घेणे गरजेचे आहे. मातृभाषेचा आग्रह जनतेने धरला तर उद्योग-व्यावसायिकांना त्या भाषेतच व्यवहार करावे लागतील. संगणकाचेच उदाहरण घेऊ. संगणकयुग आले आणि भारतातील उच्चभ्रूंनी इंग्लिश भाषेविना संगणकाचा वापर अशक्य आहे असा गैरसमज पसरवला. खरे तर जपान, चीन, कोरिया आदी देश त्यांची लिपी व भाषा यांचाच संगणकांत वापर करतात. सौदी अरेबियाची लोकसंख्या केवळ अडीच कोटी आहे. तेथे

आवाहन

आजचे भाषा विकासाचे धोरण जागतिकीकरणाच्या प्रारूपानुसार आखलेले असल्याने त्याला संघटित विरोध करण्यासाठी सर्वांगीण भाषिक विकासाचे सर्वसामान्यांच्या हिताचे प्रारूप जनतेपुढे ठेवणे आणि अशा सम्यक भाषिक विकासासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने शासकीय धोरणांमध्ये बदल घडवणे आणि विद्यापीठांना भाषिक प्रश्नी व्यापक जबाबदारी स्वीकारायला भाग पाडणे यासाठी पुढीलप्रमाणे प्रयत्न करणे अगत्याचे आहे.

१. विद्यापीठ - महाविद्यालयीन पातळीवर सर्व विषयांमध्ये (कायदा, समाजविज्ञाने, निसर्गविज्ञाने, अभियांत्रिकी, वैद्यकशास्त्र, व्यवस्थापनशास्त्र, इ. विषयांसकट) उत्तरपत्रिका मराठीतून लिहिण्याचा विकल्प उपलब्ध करावा. तसेच सर्व विषयांचे शिक्षण मराठीतून शक्य करण्याचा कालबद्ध कार्यक्रम आखावा. याकरता सर्व विषयांमधील क्रमिक व पूरक पुस्तकनिर्मितीसाठी साहाय्य व प्रोत्साहन योजना आखून दर्जेदार सुलभ साहित्य उपलब्ध करावे. महाविद्यालयीन पातळीवर पहिल्या वर्षापासून पदवी वर्षापर्यंत सर्व विद्याशाखांमध्ये मराठी, हिंदी इ. भारतीय भाषा हा विषय समाविष्ट करावा.

२. शासकीय पातळीवर मराठी परिभाषा निर्माण करताना क्लिष्ट, कृत्रिम शब्द वापरण्याचा अट्टहास सोडून अर्थवाही, सोपे, सुटसुटीत, सुपरिचित असे शब्द वापरावेत. यासाठी परभाषेतील रुळलेले सोपे शब्द कायम ठेवणे, बोलीभाषेतील, विविध कारागिरांच्या वापरातील शब्द, हिंदी व अन्य भारतीय भाषांमधील आणि संस्कृतोद्भव अर्थवाही शब्द स्वीकारणे असा लवचीक दृष्टिकोण स्वीकारावयास हवा. शासकीय आदेश, परिपत्रके, प्रकाशने, न्यायालये येथील कृत्रिम, बोजड भाषेच्या ऐवजी वरील पद्धतीने विकसित केलेली अर्थवाही सुबोध भाषा वापरावी.

शासनाने मागणीप्रमाणे मराठी शाळा उघडण्यास परवानगी दिली पाहिजे.

उच्च न्यायालयापर्यंतच्या सर्व न्यायालयांमध्ये दावा दाखल करणे, दावा चालवणे व निकालपत्र मराठीमधून देणे या धोरणाची अंमलबजावणी केली पाहिजे. उच्च न्यायालयातील कामकाजासाठी मराठीचा पर्याय उपलब्ध करून दिला पाहिजे.

शासकीय पातळीवर संगणकामध्ये युनिकोडचा वापर वाढवला पाहिजे. त्यासाठी प्रमाणित देवनागरी कळपट्टीचा (की-बोर्डचा) प्रसार केला पाहिजे.

भारतीय व परदेशी भाषांतील दर्जेदार साहित्याची मराठी भाषेमध्ये भाषांतरे, रूपांतरे करण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे. वाचनाची गोडी निर्माण करण्याकरता दर्जेदार बाल व किशोर साहित्य स्वस्त किंमतीत पुरवले पाहिजे.

३. प्राथमिक शाळेपासून ते महाविद्यालयीन पातळीपर्यंत कोणत्याही पायरीवर इंग्लिश भाषाशिक्षण सक्तीचे असता कामा नये. इंग्लिश हा वैकल्पिक विषय म्हणून उपलब्ध असावा. स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत इंग्लिश माध्यमाच्या शाळा सुरू करण्याचे धोरण शासनाने रद्द करावे.

४. आदिवासी बोलीभाषेतून प्राथमिक शिक्षणाचा प्रारंभ करावयास हवा. देवनागरी लिपी शिकवून क्रमशः बोलीभाषा-लेखन आणि त्याबरोबर मराठी शब्दांची सांगड घालत चौथीपर्यंत मराठी भाषेकडे स्थित्यंतर करावे.

५. प्रमाणित मराठी आणि बोलीभाषा यांच्या विकासासाठी व त्यांमध्ये सेंद्रिय संबंध प्रस्थापित करण्यासाठी संशोधन व अभ्यास हाती घेणे महत्त्वाचे आहे. विज्ञान-तंत्रज्ञानाच्या वेगाने होणाऱ्या प्रगतीबरोबर मराठीतील शास्त्रीय साहित्यामधे भर घालत राहणे अगत्याचे आहे. भाषा प्रगल्भ व समृद्ध करण्याबरोबर वाचन संस्कृती जोपासणे हे वैचारिक जिवंतपणा आणि डोळस निर्णयप्रक्रिया समाजामध्ये रुजवण्यासाठी नितांत महत्वाचे आहे. याकरताही विशेष प्रयत्न व्हायला हवेत.

डॉ. सुलभा ब्रह्मे

WITH BEST COMPLIMENTS FROM

Interior Decoraters

Abhi - Om Engineers

ADDRESS :

3C / A2 / 8, Nav Ajantha Avenue society
Paud Road, Kothrud
Pune - 411 029
Mobile - 98230 11116

संगणकात अरबी भाषा वापरात आहे. मराठी जनता तर १२ कोटी आहे. एवढी मोठी बाजारपेठ असल्याने मराठी भाषेचा आपण आग्रह धरला तर संगणक कंपन्या त्यांचे तंत्रज्ञान मराठी भाषेत द्यायला सरसावणारच. युनिकोडद्वारा ते साध्य झालेच आहे. तरीही भारतात इंग्लिशचे मांडलिकत्व का? तर राज्यकर्त्या वर्गाला सर्वसामान्य जनतेला संगणक साक्षरतेच्या मुख्य प्रवाहात आणायचेच नाही आहे. म्हणून इंग्लिशचा उदोउदो. हे कूटकारस्थान ओळखून जनतेनेच सर्व शासनव्यवहार, न्यायदान, अर्थव्यवहार, उच्चशिक्षण मराठी भाषेतून झाले पाहिजे असा आग्रह धरला तर राज्यकर्ते, उद्योगपती, प्राध्यापक, वकील आदी सर्वांना मराठी भाषेकडे वळावे लागेल आणि तीही कृत्रिम, क्लिष्ट भाषा नव्हे तर सोपी, अर्थवाही मराठी वापरावी लागेल. दूरपल्ल्याचा विचार करता मराठीचा वापर जसा सार्वत्रिक होईल तसे रशिया, फ्रान्स, चीन आदी देशांप्रमाणे महाराष्ट्रातले सर्व व्यवहार मराठी भाषेतून होतील. केवळ विशेष अभ्यासांसाठी/पेशांसाठी जरूरीप्रमाणे अन्य भाषा – जपानी, चिनी, तमिळ, इंग्लिश शिकता येतील.

परंतु आज भारतातील कोणत्याही सत्ताधारी पक्षाला हे नको आहे. काँग्रेस पक्षाने अमेरिकेचे मांडलिकत्व स्वीकारले आहे. भारतीय भाषा, संस्कृतीशी त्याला देणे घेणे नाही. हिंदू संस्कृतीच्या अभिमानाच्या वल्गना करणारा भाजपही अमेरिकेचा अनुनय करीत इंग्लिशचे वर्चस्व स्वीकारून, भारतीय भाषा व संस्कृतीच्या पिछेहाटीबाबत बेपर्वा आहे. शिवसेना व मनसे यांचा मराठीचा अभिमान इंग्लिश पाट्यांच्या विरोधापुरता! एरवी इंग्लिश भाषा-माध्यमाच्या शाळा हव्याहव्याशा. मनसे तर भारतीय भाषा – हिंदी व हिंदी भाषक यांच्यावरच हल्ला करते. राज्यकर्त्यांचे भारतीय भाषा व संस्कृती यांच्या विनाशाकडे नेणारे धोरण रोखण्यासाठी व्यापक जनआंदोलनाची गरज आहे. मातृभाषेतून दर्जेदार शिक्षण व इंग्लिश भाषेचे कसब मिळवण्यासाठी जरूर ती सुविधा उपलब्ध केल्याने अर्थार्जनासाठी जरूर ती शैक्षणिक पात्रता मिळवणे सुलभ होईल.

त्यामुळे, बालवयापासून परकी भाषा शिकून ते माध्यम म्हणून वापरण्याचे असह्य ओझे मुलांवर लादले जात आहे, त्यातून मुलांची सुटका होईल. ती मातृभाषेतून स्वाभाविकपणे शिक्षण घेऊ शकतील. आपली भाषा, संस्कृती, साहित्य यांच्याशी त्यांचे जिवंत नाते राहील. सुजलाम् सुफलाम् भारतातील बहुरंगी, बहुढंगी, विविधतापूर्ण सांस्कृतिक वारसा जतन करत आत्मनिर्भर, स्वत्वपूर्ण खरेखुरे मानवी जीवन फुलवू शकतील. जनतेची कुतरओढ थांबवून, शिक्षणाचे माध्यम मातृभाषा राखून मराठी भाषेच्या अभिवृद्धीचे आव्हान छत्रपती शिवाजी, फुले, आंबेडकर यांचे मराठी वारसदार यांनी स्वीकारून 'मराठी जोपासण्याची चळवळ' व्यापक करावयास हवी.

▼▼▼

डॉ. सुलभा ब्रह्मे, पुणे
अर्थशास्त्रात पीएच्.डी., गोखले अर्थशास्त्र संस्थेत संशोधक पदावर काम.
लोकविज्ञान संघटना, शंकर ब्रह्मे समाजविज्ञान ग्रंथालय, लोकायत यांद्वारा लोककेंद्री विज्ञान व समाज-अर्थशास्त्र यातील विविध पैलूंवर मराठीतून प्रबोधनात्मक लेखन.
देशविघातक जागतिकीकरण, एन्रॉन, जैतापूर अणुवीजप्रकल्प यांच्या विरोधी लोकचळवळीत सहभाग.

राममनोहर लोहिया यांचे इंग्रजीबाबतचे विचार

भाषांच्या संदर्भातल्या वादांमध्ये एक गाभ्याचा मुद्दा लक्षात घ्यायला हवा आहे. इंग्रजी भाषेचा वापर केल्याने शिक्षणातले 'शिकणे'च गमावले जात आहे, संशोधन शून्यावर येत आहे, अर्थव्यवस्थेतील निष्पत्ती खालावते आहे आणि प्रशासनातील कार्यक्षमता कमी होऊन भ्रष्टाचार आणि विषमता बळावते आहे.

सर्वात वाईट म्हणजे इंग्रजीमुळे भारतीयांमध्ये न्यूनत्वाची भावना वाढली आहे. इंग्रजी येत नसेल तर ते स्वतःला कोणत्याही प्रकारच्या सार्वजनिक कृतीमध्ये भाग घेण्याच्या लायक समजत नाहीत आणि माघार घेतात. जनतेची ही अशी माघार, हा मूठभरांना सत्ता गाजवता येण्याचा पाया आहे. लोकांवर स्वामित्व फक्त बंदुकीच्या नळीच्या आधारेच नव्हे. तर त्याहूनही अधिक, त्यांना न कळणाऱ्या भाषेच्या जोरावर गाजवता येते. लोकांचे राज्य येणे हे लोकांच्या भाषेशिवाय अशक्य आहे.

इंग्रजीमुळे प्रशासनातील अकार्यक्षमता आणि भ्रष्टाचार वाढण्याचे प्रमुख कारण म्हणजे सामाजिक अंकेक्षणामधला (Social Audit) सामान्य लोकांचा अत्यल्प सहभाग. लोक सहभागी होऊ शकत नाहीत, कारण ९५ टक्क्यांहून अधिक लोकांना इंग्रजी भाषा समजत नाही. अशा भाषेत तुम्ही कितीही खोटे बोलू शकता, लोकांना फसवू शकता आणि असेच कितीही काळ चालू राहू शकते. त्यामुळेच लोकशाहीमध्ये खऱ्या अर्थाने लोकांचा अर्थपूर्ण सहभाग होण्यात इंग्रजीचा वापर हा मोठा अडथळा ठरतो.

Language discourse of Lohia :
In Search of Samata and Swaraj.
पंकज पुष्कर यांच्या लेखातून, अनुवाद – अनघा लेले



स्वभाषा, परभाषा आणि शिक्षण

'डॉ. अशोक केळकर : व्यक्ती आणि विचार : आत्मपट' या अतुल पेठे दिग्दर्शित चित्रफितीमध्ये केळकर सरांनी मांडलेले काही विचार.

स्वभाषा आणि परभाषा या वेगवेगळ्या गोष्टी आहेत. ते समजून घेण्यासाठी आपल्याला साक्षरता ही कल्पना स्पष्ट व्हायला पाहिजे. साक्षरता ही दोन प्रकारची असते, एक दृश्य साक्षरता म्हणजे लेखन वगैरे आणि दुसरी श्राव्य किंवा मौखिक साक्षरता. स्वभाषेत मौखिक साक्षरता येत असते पण शाळेत जायच्या वेळी दृश्य साक्षरता शिकवावी लागते. परभाषेत दोन्ही शिकवावे लागते. पण आपल्याकडे इंग्रजी शिकवताना स्पेलींग शिकवले जाते, आणि उच्चाराकडे दुर्लक्ष होते, तसे व्हायला नको.

दुसऱ्या दृष्टीने साक्षरता ही प्राथमिक (कौशल्य) किंवा वरच्या दर्जाची (नैपुण्य) अशा दोन प्रकारची असते. उदा. नुसते शब्दाला शब्द न जोडता ते प्रभावी तऱ्हेने उच्चारायचे कसे, हे शिकवायचे.

-०-

उपयुक्तता हे भाषेचे मध्यवर्ती अंग आहे. भाषेची इतरही दोन अंगे आहेत, एक सामाजिकतेचे आणि दुसरे सांस्कृतिकतेचे. लहानपणी मुलांना भाषेची उपयुक्तता कळते आणि ते त्या भाषेवर प्रभुत्व मिळवितात. मुले भाषेशी खेळतात, बडबडगीते म्हणतात, म्हणजे शब्दरूपाशी खेळतात. ह्या शब्दांना पुष्कळदा धड अर्थही असत नाही. एवढ्याने खेळ थांबत नाहीत. काही मुले अर्थरूपाशी खेळायला लागतात. एकमेकांना कोडी घालतात किंवा त्यांना जे विनोद वाटतात ते सांगू लागतात. काही लोक मोठे झाले तरी ही भाषिक क्रीडा त्यांच्याजवळ राहते. काही शब्दक्रीडेकडे जातात, ते कवी - साहित्यिक होतात. जे अर्थक्रीडेकडे जातात, ते तत्त्वज्ञ विचारवंत होऊ शकतात आणि भाषेला एक सांस्कृतिक अंग प्राप्त होते.

परभाषा शिकविताना आणखीन काही गोष्टी कराव्या लागतात. पहिले म्हणजे रूपे हाताळण्याची सवय व्हावी लागते. शब्द आपोआप तोंडातून यायला पाहिजेत किंवा कानातून आपोआप मेंदूत शिरायला पाहिजेत यासाठी सराव लागतो. पाठांतर करायचे आणि ते स्मरणातून म्हणून दाखवायचे. याने उच्चार, रूप, त्यांचे क्रम तोंडात बसतात.

दुसरी गोष्ट म्हणज भाषा आणि बाहेरचे जग यांचा साक्षात संबंध जोडत जाणे. म्हणजे चिमणी तुमच्यासमोर आली तर आपोआप तुमच्या मनात स्पॅरो हा शब्द आला पाहिजे. पहिल्यांदा चिमणी शब्द आला मग स्पॅरो आला तर, याला काही अर्थ नाही. सरावासाठी काही वेळेला नाट्यीकरणाचा उपयोग करता येतो. उदा. एक माणूस दुसऱ्या माणसाकडून काही विकत घेतो आहे; ते तुम्ही कसे कराल? ते प्रत्यक्षात करून पहायचे.

-०-

भाषेतून शिकविणे आणि भाषा शिकविणे यात लोक घोटाळा करतात. उदा. मुलांचे इंग्रजी सुधारावे म्हणून इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घालायचे अशी कल्पना पुढे येते. पण तसे होतेच असे नाही. कारण माध्यम म्हणून शिकविताना ती भाषा अगोदर आली पाहिजे ही साधी गोष्ट लोक विसरतात आणि त्यामुळे अगदी लहानपणी मुलांना इंग्रजी माध्यमात शिकवितात. हे म्हणजे ज्या मुलाला अजून धड चालता येत नाही त्याला एकदम सायकलवर बसून जायला सांगण्यासारखे आहे आणि हे अत्यंत अन्यायाचे आहे.

दुसरा भाग असा आहे की पुढच्या अवस्थेत म्हणजे उच्चशिक्षणाच्या अवस्थेत मातृभाषेचे महत्त्व कमी होते. दुसरी भाषा (इंग्रजी, हिंदी) जर तुम्हाला तोपर्यंत व्यवस्थित यायला लागली असेल तर काही अडचण पडत नाही. उदा. मी माझ्या शिक्षणामध्ये माध्यमिक शिक्षणापर्यंत सगळे मराठीत शिकलो, पण पुढे उच्च शिक्षण इंग्रजीत झाले. पण कुठे अडचण पडली नाही कारण शाळेतून बाहेर पडताना इंग्रजी पूर्ण तयार झाले होते. त्याठिकाणी कोणता विषय कोणत्या भाषेत उपलब्ध आहे याचा विचार करावा लागतो. तुम्हाला आयुर्वेद शिकायचा असेल तर थोडे तरी संस्कृत यायला पाहिजे. जर हिंदुस्तानी संगीत शिकायचे असेल तर थोडे तरी हिंदुस्तानी यायला पाहिजे.

याप्रमाणे माध्यमाबद्दलसुद्धा अतिरेकी, एकाच टोकाचा विचार करणे बरोबर नाही. व्यावहारिक उपाय करायला पाहिजे.

चित्रफितीवरून लेखन - सुरेखा सबनीस

भाषा आणि शिक्षण

(डॉ. अशोक केळकर यांच्या लेखातील काही अंश)

शिक्षणाचे माध्यम स्वभाषा असावी का परभाषा असावी अशी एक चर्चा आपल्याकडे चालते. शिक्षणाचे माध्यम म्हणजे परीक्षेचे माध्यम आणि वर्गात बोलण्याचे माध्यम एवढाच विचार सुरवातीला होता. नंतर 'लायब्ररी लँग्वेज'ची कल्पना त्यात आली. प्राथमिक शाळेत तरी स्वभाषेला पर्याय नाही. आदिवासी मुलांना प्राथमिक शिक्षण द्यायचे तर एकदम प्रादेशिक भाषेत त्यांना डुब्या खायला लावण्यापेक्षा प्रारंभीची दोनतीन वर्षे तरी विद्यार्थ्यांची घरची भाषा आणि प्रादेशिक भाषा ह्या दोन्ही भाषा जाणणारे शिक्षक त्यांना मिळणे जरूर आहे. (अधिक चर्चेसाठी पहा: 'आदिवासींच्या प्रश्नाची भाषिक बाजू', वैखरी.)

शालेय शिक्षणात स्वभाषा हे माध्यम असावे ह्याला एक कारण आहे. त्या शैक्षणिक अवस्थेत अमूक इतके ज्ञान मुलाला द्यायचे एवढाच प्रश्न नसतो, तर ज्ञान घ्यायची ओढ मुलांमध्ये उत्पन्न करणे आणि ज्ञानग्रहण करण्याचा सराव त्याला होणे ह्याही गोष्टी साधायच्या असतात. त्या तशा साधायच्या तर मुलांच्या स्वानुभवाचे, स्वभाषेतून आकार घेणारे विश्व आणि शाळेतून मिळणाऱ्या ज्ञानाचे विश्व ह्यांचा सांधा जुळला पाहिजे. स्वभाषेतून शिक्षण देणे ह्यासाठी आवश्यक आहे. प्राथमिक शाळेतच इंग्लिश माध्यमाचा सामना करणाऱ्या सधन वर्गातील मुलाची स्थिती वर उल्लेख केलेल्या आदिवासी मुलाइतकीच दयनीय आहे.

स्वभाषेतून असा सांधा जुळल्यावर ज्ञानाची ओढ उत्पन्न होणे आणि विचारांची मांडणी करण्याची पद्धत शिकणे ह्यांचे काय? ह्या गोष्टी घडायला स्वभाषा-माध्यम उपकारक असले तरी पुरेसे मात्र नाही. आपल्या माध्यमिक शाळांमधून बाहेर पडणारी मुले विद्यापीठीय शिक्षणाला कमी पडतात याचे कारण केवळ त्यांचे इंग्लिश कच्चे असते, वर्गात काय चालले आहे किंवा इंग्लिश पुस्तकांतून काय सांगितले आहे हे त्यांना समजत नाही एवढेच नाही. ह्या अडचणी उपस्थित नसल्या तरी ती कमी पडतात. ह्याचे मुख्य कारण माध्यमिक शाळेत ज्ञानाची ओढ उत्पन्न होईल आणि विचारांची मांडणी करण्याची पद्धत उमगेल अशी तजवीज होत नाही हेच आहे. तशी तजवीज करताना इतर विषय शिकवण्याच्या पद्धतींबरोबरच भाषा शिकवण्याच्या पद्धतीदेखील सुधारायला पाहिजेत.

माध्यमिक शाळेत स्वभाषेच्या जोडीला इंग्लिश, हिंदी ह्या परभाषा शिकवल्या जातात. ह्या परभाषांवर प्राथमिक प्रभुत्व आल्यावर त्यांचा उपयोग माध्यम म्हणून स्वभाषेच्या ऐवजी जरी नव्हे तरी स्वभाषेच्या जोडीला असा केला तर? किमान पक्षी इतर शालेय विषयांवरची ह्या परभाषांतून लिहिलेली पुस्तके मुलांच्याकडून पद्धतशीरपणे वाचवून घेतली तर? असे केले तर परभाषा - प्रभुत्वाला वाढीव सरावामुळे येणारी बळकटी तर येईलच, पण इंग्लिश, हिंदी ह्यांचा उपयोग लुटुपुटीचाच नव्हे तर खरोखरीचा करायचा असतो हे मुलांच्या मनावर ठसेल. ज्या ठिकाणी वर्गाच्या चार भिंतींच्या बाहेर मुलांच्या कानांवरून किंवा नजरेखालून इंग्लिश, हिंदी ह्या भाषा जवळजवळ जातच नाहीत अशा ठिकाणी ही जाणीव मुलांना होणे अतिशय अगत्याचे आहे. आज ती तशी होताना दिसत नाही.

विद्यापीठीय शिक्षणाचे स्वरूप प्राथमिक आणि माध्यमिक शालेय शिक्षणापेक्षा आणि तांत्रिक प्रशिक्षणापेक्षा वेगळे आहे. स्वानुभव आणि ज्ञानविश्व यामध्ये बांधलेला भाषेचा पूल इथे गृहीत धरून पुढे जायचे आहे. स्वभाषा, इंग्लिश, हिंदी ह्या भाषा आवश्यक विषय म्हणून शिकवण्याची जरुरी उच्च माध्यमिक पातळीच्या नंतर खरे म्हणजे राहू नये. ह्या भाषांवर बऱ्यापैकी प्रभुत्व (केवळ प्राथमिक प्रभुत्व वा कामचलाऊ ज्ञान नव्हे) शाळेत अगोदरच प्रस्थापित झालेले असले पाहिजे. ह्या प्रस्थापित पुलावरून पुढे जायचे म्हणजे काय? ज्ञानविश्वाची क्षितिजे रुंदावायची आहेत आणि पदव्युत्तर पातळीवर तर स्वतः नवीन ज्ञान पैदा करून एकंदर मानवी ज्ञानात भर घालण्याची हिम्मत बांधायची आहे.

(वैखरी या लेखसंग्रहातून.)

वाचन आणि भाषा-विकास

डॉ. मंजिरी निमकर



मुलाच्या औपचारिक शिक्षणाच्या प्रवासात त्याला एखादी गोष्ट 'आकळते', ते त्याच्या त्याच्या विशिष्ट पद्धतीनंच. ही समजेची आणि बोधनक्षमतेची उंची आणि खोली एकाच वेळी वाढवण्याची ताकद असते 'वाचनात' ! मुलांपर्यंत भरभरून पुस्तकं पोहोचावी यासाठी प्रयत्न करणाऱ्या, वाचण्यासाठी हुरूप आणणारा माहोल निर्माण करणाऱ्या प्रगत शिक्षण संस्थेच्या प्रयत्नांबद्दल या लेखात मांडणी आहे.

आपल्याकडे अजूनही भाषा-शिक्षण हे फक्त श्रवण – संभाषण – वाचन – लेखन या चार कौशल्यांभोवतीच फिरताना दिसते आहे. क्रमिक पुस्तकांमधील विशिष्ट मूल्ये रुजवण्यासाठी, विशिष्ट शब्दांची मुद्दाम ओळख करून देण्यासाठी किंवा जातवाचक शब्दांसारखे वगैरे शब्द वगळण्यासाठी मुद्दाम संपादित केलेले किंवा लिहिलेले पाठ पुन्हा पुन्हा वाचणे, प्रश्नांची उत्तरे लिहिणे, ठरावीक विषयांवर साचेबद्ध निबंध लेखन करणे इतकाच भाषा-शिक्षणाचा संकुचित अर्थ घेतला जात आहे. मुलांना जीवनानुभव देणारे, आनंद देणारे, मौज वाढवणारे अस्सल वाङ्मय आपल्या शाळकरी मुलांच्या वाट्याला काही येत नाही. संपूर्ण महाराष्ट्रासाठी एकच पुस्तक हवे, या आग्रहापोटी कोकणापासून विदर्भापर्यंत आणि सोलापूरपासून नाशकापर्यंत पसरलेल्या महाराष्ट्राच्या विविध भागांचे प्रतिनिधित्व येण्याच्या धडपडीत आपल्या पाठ्यपुस्तकांत नीरस व माहितीपर असे लेख आढळतात. एकीकडे सर्वांना शहाणे करून सोडण्याचे व्रत आणि दुसरीकडे कुणी दुखावले जाईल की काय अशी भीती, यामुळे बहुसंख्य पाठ सपाट, अळणी व बोधप्रद होतात. कुठलीच समस्या हाताळायची नसल्याने माहितीपर पाठांवर यात भर दिलेला असतो. शिक्षण ही गंभीर बाब असल्याने पोरांना खळखळून हसावेसे वाटेल असे काही वात्रट पाठ पुस्तकात असावेत असे काही कुणाच्या मनातही येत नाही. थोडक्यात ही पाठ्यपुस्तके शाळकरी मुलांच्या जीवनानुभवापासून कोसो दूर राहून गेलेली आहेत.

केवळ संभाषण किंवा परस्परभाषणाच्या पातळीवर भाषा-शिक्षण थांबते. त्यामुळे आजकालच्या मुलांची संभाषण कौशल्ये एकमेकांशी गप्पा मारण्याशीच थबकल्यागत वाटतात. एखाद्या विषयावर चर्चा करणे, विचारविनिमय करणे, वादविवाद करणे आणि त्यासाठी तार्किक विचार करणे यासाठी जो भाषा-विकास लागतो, तो आज क्वचितच दिसतो. मुलांची, अगदी मोठ्या, वाढलेल्या मुलांचीही विचारांची भाषा तोकडी पडते. जीवनानुभवाचा विस्तारित आवाका त्यांना पेलतच नाही. ह्याचे कारण, तशा पद्धतीचे काही त्यांच्या अनुभवात नसते, वाचनातही नसते. त्यामुळे कोणत्याही प्रश्नाची आपल्या वैयक्तिक अनुभवांपलीकडे दुसरी बाजू असू शकते हेच ज्यांना गवसलेले नसते ते चौफेर विचार करणार तरी कसे?

मुलांना जर विंदा करंदीकरांच्या
'अजागळ अण्णांच्या खिशात काय,
उंदीर काढतो बाहेर पाय'ची मजा घ्यायला येत नसेल, व्यंकटेश माडगूळकरांच्या जांभळ्या फुलोऱ्याने फुलून गेलेल्या जिराइतातील

ಭಾಷೆ
ભાષા
ভাষা
மொழி
ഭാഷ
भाषा Language

बाजऱ्या आणि हिरवे हिरवे गवत खाऊन गुबगुबीत दिसणारी मेंढरे डोळ्यासमोर येत नसतील, मार्जोरी किनन रॉलिंग्जच्या ज्योडीच्या आणि पाडसाच्या ताटातुटीने जीव कासावीस होत नसेल, शिवाजी सावंतांच्या मृत्युंजयातली वृषाली कर्णाच्या चितेत सती जाताना डोळ्यांना धारा लागल्या नसतील, तर त्या मुलांचे भाषा-शिक्षण अर्धवटच राहिले असे म्हणायला हरकत नाही.

पाठ्यपुस्तकाला त्याच्या स्वतःच्या अशा अनेक मर्यादा असतात. आणि म्हणूनच पाठ्यपुस्तकाच्या पहिल्याच पानावर लिहिलेले असते की 'पाठ्यपुस्तक हे शिक्षणाचे एक साधन आहे.' त्यात अध्याहृत असणारे वाक्य म्हणजे 'उत्तम भाषा-शिक्षणासाठी तुम्ही इतर साधनांचाही शोध घ्या व वापर करा.' म्हणूनच उत्तम भाषा-शिक्षणासाठी गरजेचे आहे एक उत्तम ग्रंथालय.

मुलांच्या हातात पुस्तके केव्हा द्यावीत? तर मूल बसून पुस्तक धरू शकेल तेव्हा. म्हणजे वयाच्या दुसऱ्या वर्षापासून. म्हणूनच प्रगत शिक्षण संस्थेच्या बालवाडीत ग्रंथालय व वाचनकोपरा हा वर्गाच्या मांडणीचा एक अविभाज्य व कायमस्वरूपी भाग आहे. हवे तेव्हा मुलांना या कोपऱ्यात जाता येते, पुस्तके हाताळता येतात. 'वाचता' येते. प्रगत शिक्षण संस्थेच्या बालवाडीत येणाऱ्या बहुसंख्य मुलांच्या घरी छापील मजकूर अभावानेच आढळेल. त्यांच्या आसपास अभ्यास करणाऱ्या थोरल्या भावंडांव्यतिरिक्त ना कोणी लिहिताना, ना कोणी वाचताना आढळते. त्यामुळे पुस्तकांच्या जगात त्यांना घेऊन जाण्याचे काम असते ते शाळेचेच. अगदी शिशुगटापासून (३ वर्षे) मुलांना पुस्तकांची ओळख करून दिली जाते.

सुरुवात होते ती चित्राच्या पुस्तकांपासून. चित्रे पाहता पाहता, या चित्रात काय घडते आहे, त्यापुढच्या प्रत्येक चित्रात काय काय होते आहे आणि शेवटी काय झाले अशी सगळी गोष्ट उलगडत जाते. हे सारे शिक्षक आणि मूल यांच्या गप्पांमधून होत राहते. यासाठीच अशी चित्रांमधून पुढे सरकणारी गोष्टीची पुस्तके निवडायला हवीत. मजकूर असेलच तर तो अगदी थोडा, पानागणिक चार-सहा वाक्यांचा असावा. नॅशनल बुक ट्रस्ट, चिल्ड्रन्स बुक ट्रस्ट, सेंटर फॉर लर्निंग रिसोर्सेस, पॉप्युलर प्रकाशन, प्रथम, रूम टू रीड, तुलिका, एकलव्य, भारतीय ज्ञान - विज्ञान समुदाय अशा अनेक प्रकाशनांची अशी सुंदर सुंदर पुस्तके आज बाजारात उपलब्ध आहेत. येथे भाषेचे बंधनही असायचे कारण नाही; कारण भाषा असते फक्त चित्रांची. त्यामुळे हिंदी, इंग्रजी भाषांमधील उत्तम पुस्तके आपल्याला उपलब्ध होतात.

हळूहळू , गोष्ट ही फक्त चित्रात नसते तर बाई वाचून दाखवतात त्या अक्षरनक्षीनं लिहिलेल्या मजकुरामध्ये आहे, हे मुलांच्या लक्षात येऊ लागते. वरच्या चित्राचा खालच्या मजकुराशी असणारा संबंध मुलांच्या लक्षात येऊ लागतो. असा संबंध लक्षात आलेला पाच वर्षांचा शिवाजी एकदा ताईंकडे गेला आणि एक पुस्तक दाखवून म्हणाला, ''इथे काय लिहिलंय, माहीत आहे का? इथे इंग्रजीत 'मासा' लिहिलंय. कशावरून माहीत आहे का? कारण इथं ना माशाचं चित्र दिलंय.'' येथूनच मुलांची पुस्तकांशी मैत्री सुरू होते, आणि परिस्थितीनं साथ दिली तर ती आयुष्यभर घट्ट टिकून राहते - असा आमचा अनुभव आहे. फलटणमधल्या आमच्या शाळेत मुलांना आम्ही पुस्तके उपलब्ध करून देऊ शकतो. पण खेड्यांमधल्या वाड्या-वस्त्यांवरील शाळांमधल्या मुलांसाठी मात्र बहुतेक वेळा पाठ्यपुस्तके हेच भाषा-शिक्षणाचे एकमेव साधन असते.

आमच्या भाषा प्रकल्पांतर्गत जिल्हा परिषदेच्या शाळांना भेटी दिल्यावर आम्हाला वाटायला लागले की आपणच काहीतरी केले पाहिजे. आमची आर्थिक बाजू तोकडी पडत होती. शिवाय बाहेरून उचलून दिलेली गोष्ट रुजत नाही असाही आमचा अनुभव आहे, मग यावर तोडगा म्हणजे लोकवर्गणी! पुस्तके तर मुलांना मिळाली पाहिजेत आणि तीसुद्धा लोकवर्गणीतून. शासकीय वितरण व्यवस्थेतून कमी पडलेली पाठ्यपुस्तकेसुद्धा विकत घ्यायला कुरकुर करणारे पालक अभ्यासाव्यतिरिक्त अवांतर पुस्तके घ्यायला पैसे देतील अशी शक्यता कमीच होती. आमच्या समोर प्रश्न उभा राहिला, कसे जमवायचे?

आमच्या भाषा प्रकल्पाच्या निमित्ताने आम्ही शाळा व्यवस्थापन - समितीच्या व पालकांच्या सभा तर घेतच होतो. त्यातच थोडा बदल करायचे आम्ही ठरवले. दुसरे सत्र चालू असल्याने एव्हाना बहुसंख्य मुलांना वाचता येत होते. आम्ही त्यांना सांगितले,





''उद्याच्या सभेत तुम्ही वाचून दाखवायचे. ते ऐकायला तुम्ही आई-बाबांना घेऊन यायचे.'' सभेच्या दिवशी पहिलीची सारी मुले आपापल्या आई-बाबांना किंवा आजी-आजोबांना घेऊन हजर झाली. एका चिमुरडीने तर झोक जाणाऱ्या आपल्या दारूड्या बापालाही हात धरून व्यवस्थित आणले होते. नेहमी कामाच्या रगाड्यात उसंत न मिळाल्याने पालकसभेला येऊ न शकणारे बरेचसे पालक या सभेला मात्र आवर्जून हजर होते.

प्रास्ताविक व प्रकल्पाची थोडक्यात माहिती सांगून झाल्यावर आम्ही बरोबर आणलेला रंगीबेरंगी पुस्तकांचा गठ्ठा समोर टाकला आणि मुलांना सांगितले, ''एकेकाने पुढे यायचे आणि आवडेल ते पुस्तक घेऊन वाचून दाखवायचे.'' समोरचा खजिना हाताळायला अधीर झालेली मुले भराभरा पुढे आली. पुस्तके उलटी-पालटी करून उघडून, बघून, निवडून घेतली आणि वाचून दाखवली. पालकांच्या डोळ्यात आनंद आणि कौतुक ओसंडून वाहत होते. बावीस मुलांपैकी प्रत्येकाने थोडे तरी वाचलेच. वाचन करून झाल्यावर आम्ही ती सगळी पुस्तके पालकांना बघायला मध्ये ठेवली आणि आपल्या मुलांबरोबर पहायला वेळ दिला. दहा-पंधरा मिनिटात सगळे पुस्तकांत रमले. मघा झुलत आलेला बाप भावनाविवश होऊन म्हणाला, ''आमची आशी पयलीतच वाचतिया, आमाला न्हाय जमलं कदी.''

समारोपासाठी आम्ही पुन्हा सर्वांचे लक्ष वेधून घेतले. ''लेकराला भूक लागल्यावर तुम्ही काय करता? जेवायला वाढता. आता त्यांना वाचायला येतेय. मग पुस्तके नको का द्यायला? ही अशी छान छान पुस्तके पाहिली की वाचावीशी वाटतील. सरकार तर काही असली पुस्तके देणार नाही. पण तुम्ही जर वर्गणी करून हजार - पाचशे जमवले तर आम्ही पुस्तके आणून देऊ तुम्हाला. ती शाळेत राहतील. मुले वाचतील. कधी घरीही घेऊन जाऊ शकतील. घरची माणसेही वाचू शकतील.'' पालकांनी लगेच जवळ असलेले पैसे काढून दिले. दोन बाया एकमेकींशी काही बोलल्या. - जरा थांबा - म्हणून गेल्या. पंधरा मिनिटांत ४० रुपये घेऊन परत आल्या. बघता बघता ६०० रुपये जमले. सरपंचांनी त्यात २०० रुपये टाकले आणि ८०० रुपये आमच्या हवाली केले. अशा प्रकारे जिल्हापरिषदेच्या शाळांमध्ये आमच्या ग्रंथालयांना सुरुवात झाली. एका वर्षात फलटण तालुक्यातील भाषा प्रकल्पाच्या पंचवीस शाळांमध्ये अशी ग्रंथालये सुरू झाली.

मुलांना पुस्तकांमध्ये रस वाटावा, वाचनाची इच्छा व गोडी वाटावी यासाठी पुस्तके वाचून दाखवणे, गोष्टी सांगणे, मुलांना गोष्टी सांगायला प्रोत्साहन देणे, चित्रे काढून आपण काय काय काढले आहे त्याचे वर्णन करणे, ते वर्णन लिहिणे व नंतर वर्गात वाचून दाखवणे, एखादी गोष्ट अर्धवट सांगून पुढे काय झाले असेल असे विचारून गोष्ट पुरी करायला सांगणे अशा अनेक कृती आम्ही जिल्हापरिषदेच्या शाळेतल्या शिक्षकांना सुचवतो आणि करूनही दाखवतो. आज पुस्तके घरी जातात. मुले आई-आजीला वाचून दाखवतात. संभाषणापुरत्या सीमित असणाऱ्या भाषा-शिक्षणाला आम्ही पर्याय पुढे ठेवीत आहोत, वाचन-संस्कृतीतून जन्मणाऱ्या समृद्ध भाषा-शिक्षणाचा.

जाता जाता एक किस्सा सांगितल्याशिवाय राहवत नाही. आमचे एक स्नेही एका मीडिया कॉलेजमध्ये 'कॅमेरा' शिकवतात. एका पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या वर्गात त्यांना मुलांनी गळ घातली, ''सर हमें फिल्म बनाना सिखाइये !'' आमचे स्नेही म्हणाले, ''ठीक आहे. सांगा मला एक स्टोरी.'' ''सर, स्टोरी तो मिल जायेगी !'' ''कैसे मिलेगी? यहाँ तो तुम्ही को लिखनी पड़ेगी !'' सगळी मुले गप्प ! आमचे स्नेही विचारू लागले, ''तुम्ही वाचलेली कुठलीही गोष्ट सांगा.'' मुले गप्पच. ''अरे कॉमिक्स, चाचा चौधरी, काहीही चालेल.'' पण कुणीच काहीच वाचलेले नव्हते. इंग्रजीतून फर्ड्या गप्पा मारणारे चूप होते. शेवटी दोन मुलांनी हात वर केले. एक होता बिहारचा, भोजपुरी माध्यमातून शिकलेला आणि दुसरा पुण्याचा, मराठी माध्यमातून शिकलेला.


मातृभाषेतून शिकलेल्या मुलांनी काहीतरी अवांतर वाचलेले होते. पण इंग्रजी

माध्यमाच्या मुलांनी 'अर्थपूर्ण' म्हणावे असे काहीच वाचलेले नव्हते, असे का? त्या मुलांना काय वाचता येत नव्हते का? तसे तर निश्चित नव्हते. मग असे का बरे झाले?

वाचन म्हणजे काही केवळ एकेक शब्द वाचता येणे, त्याचा अर्थ लागणे (डी-कोडिंग) नाही. वाचनासाठी आकलनाची गरज असते. मूल जेव्हा मातृभाषेतून शिकते, तेव्हा शाळेत जाण्यापूर्वीच प्रभुत्व प्राप्त केलेल्या श्रवण व संभाषण कौशल्यांच्या पायावरच वाचन-लेखनाचा डोलारा उभारला जातो. भाषेचा अर्थपूर्ण संदर्भ मुलांना आधीच उमजत असल्याने अक्षरओळख होताच ती पुढील वाचनप्रवासास सज्ज होतात. भाषा येत असल्याने वाचलेले समजते. वाचनाचा वेग सवयीने वाढत जातो व पुस्तकात रस वाटू लागतो.

ज्यांच्या आसपास इंग्रजी बोलली जात नाही तरी इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मात्र घातलेले आहे अशा मुलांना आकलनासह वाचन येण्यास साहजिकच अधिक वेळ लागतो. इंग्रजी ही व्याकरण व सांस्कृतिक दृष्ट्याही भारतीय भाषांपेक्षा खूपच वेगळी भाषा आहे. त्यामुळे ज्या वयात व्यंकटेश माडगूळकर, पु. ल. देशपांडे, द. मा. मिरासदार, सुधा मूर्ती वाचण्याची परिपक्वता आलेली असते, त्या वयात इंग्रजीतून फक्त इनिड ब्लायटनच वाचता येते. अर्थातच मग वाचनात मन रमत नाही. आणि पुस्तकांचे बोट एकदा बालपणीच सुटले तर पुढे अभ्यास आणि परीक्षांच्या जत्रेत हरवल्यावर, पुन्हा ते पकडणे अशक्य जरी नाही तरी साऱ्यांनाच साधत नाही. तशी इच्छाही मग उरत नाही.

आजच्या काळात सर्वांना इंग्रजी चांगले बोलता यायला हवे यात शंका नाही, पण तशी सोय वेगळ्या मार्गांनी करता येणे हे मराठी माध्यमाच्या शाळांना जमावे असे प्रयत्न करण्याऐवजी सोपा पर्याय म्हणून इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घालून आपल्या पाल्याच्या जीवनातील वाचन हा एक फार मोठा आनंद आणि वैचारिक प्रगल्भता देणारा स्नेही आपण हिरावून घ्यायचा का, हा विचार पालकांनी मुलांना शाळेत घालण्यापूर्वी जरूर करायला हवा असे मला सुचवावेसे वाटते.



▼▼▼

डॉ. मंजिरी निमकर, फलटण
वैद्यकीय पदवीधर, मुलांसाठी भाषा-शिक्षणाच्या कामात विशेष रस, फलटणच्या 'प्रगत शिक्षण संस्थे'च्या संचालिका. कमला निंबकर बालभवनच्या मुख्याध्यापिका. सर्वांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा आग्रह धरणाऱ्या गटात सक्रीय सहभाग.
manjunimbkar@gmail.com

वर्गणीदारांसाठी सूचना

- आपल्या वाचकापर्यंत मासिक नक्की पोहोचावं यासाठी आमचा प्रयत्न कायमच असतो. तरीही काही अडचणींमुळे (पोस्टातील किंवा पत्त्यातील बदल इ.) काहीवेळा अंक आपणापर्यंत पोहोचत नाही. तरी आपणास अंक मिळाला नाही, तर त्याबाबत महिन्याच्या अखेरीपर्यंत आम्हाला कळवावे. तो अंक आपल्याला ५ तारखेस पुन्हा पाठवला जाईल.
दूरध्वनी : ९१८६०५९८१२६०, ०२० - २५४४१२३०

- पत्त्याच्या चिठ्ठीवर शेवटच्या ओळीत वर्गणीचा कालावधी दिलेला असतो. जो संपला असेल तर त्वरित वर्गणी भरावी. तसेच त्याबरोबर तपशीलासहित पत्ता व दूरध्वनी क्रमांक जरूर द्यावा.

- जून २०१० पासून पालकनीतीची वार्षिक वर्गणी रु. २००/- व आजीव वर्गणी रु. २५००/- झालेली आहे. ज्यांनी डिसेंबर २००० पूर्वीच आजीव वर्गणी भरलेली आहे, त्यांनी रु. २५००/- पुन्हा एकदा भरून सहकार्य करावे.

शिक्षणाच्या माध्यमाचं राजकारण

किशोर दरक



घरात परिसरात बोलली जाणारी भाषा हेच शिक्षणाचं माध्यम असावं हे खरं. पण भाषानिवड ही तटस्थ, पूर्णतः व्यक्तिगत कृती नसते, ती 'राजकीय' कृती असते. भाषेच्या राजकारणाची वीण जात, वर्ग, लिंग, धर्म अशा कंगोऱ्यांभोवती, त्यातील उतरंडीच्या आणि शोषणाच्या व्यवस्थेभोवती पूर्णतः गुंफलेली असते. त्याची चिकित्सा करणारा, त्यातले धागेदोरे उलगडून दाखवणारा हा लेख.

This is the oppressor's language yet I need it to talk to you.
- Adrienne Rich

खाण्याविषयी सल्ले देणारे, विविध खाद्यपदार्थांपासून होणारे फायदे-तोटे सांगणारे, विविध पदार्थांच्या पाककृती शिकवणारे कार्यक्रम आजकाल (विशेषतः गेली १०-१२ वर्षं) विविध माध्यमांमधून मोठ्या प्रमाणात प्रसारित होताना दिसतायत. दूरचित्रवाणी, रेडिओ किंवा वर्तमानपत्रं - मासिकं अशा माध्यमांमधून पाहायला - ऐकायला - वाचायला मिळणाऱ्या या कार्यक्रमांचा किंवा माहितीचा प्रेक्षक - श्रोता - वाचकवर्ग कोण असतो? ज्यांच्याकडं खाय-प्यायला भरपूर आहे, काय खावं किंवा खाऊ नये याची निवड करण्याची शक्यता कमी - अधिक प्रमाणात उपलब्ध आहे अशा वर्गासाठी म्हणजे मध्यम, उच्चमध्यम अन् उच्चवर्गासाठी हे कार्यक्रम असतात. शिक्षणाच्या माध्यमाची चर्चादेखील काहीशी या स्वरूपाची असते. म्हणजे मुलांना घालण्यासाठी विविध माध्यमांच्या अन् विविध दर्जाच्या शाळांच्या निवडीची शक्यता अन् हवं ते शिक्षण 'घेण्याची' ऐपत असणाऱ्या पालकांसाठी ही चर्चा मर्यादित असते. शिक्षणाच्या माध्यमाविषयी आजवर विपुल प्रमाणात लेखन झालंय, पण ते लेखन कुणासाठी केलं जातंय, चर्चेचा प्रमुख श्रोता कोण आहे याविषयी थेट उल्लेख अभावानंच आढळतात म्हणून हे स्पष्टीकरण. या वर्गातले पालक मुलांना जेव्हा मराठी माध्यमाच्या शाळेत घालतात तेव्हा जिल्हापरिषदेची मराठी शाळा किंवा महानगरपालिकेची मराठी शाळा अशा प्रकारची निवड शक्यतो केली जात नाही, हे देखील लक्षात घ्यायला हवं.

मुलं शाळेत जाण्याजोग्य वयाची झाली की (म्हणजे मध्यमवर्गीय मुलं सुमारे १-२ वर्षांची झाली की) त्यांच्या शाळेचं माध्यम काय असावं याची चर्चा सुरू होते. मुलांना कोणत्या भाषेचं आकलन नीट होतं? याचं साधं उत्तर म्हणजे त्यांच्या घरात, परिसरात बोलल्या जाणाऱ्या भाषेतून संवाद साधला तर मुलांना ते लगेच जवळजवळ सगळंच निसर्गतः समजतं. त्या भाषेत मुलं स्वतःला सहजपणे व्यक्त करू शकतात.

औपचारिक शिक्षणाची पहिली काही वर्षं शाळेतली अन् घरातली भाषा एकच असेल तर मुलांची बोधनक्षमता (cognitive ability) झपाट्यानं वाढीला लागते, असं जगभरातले तज्ज्ञ सांगतात. खरं तर हे सांगायला तज्ज्ञांची गरज लागू नये. मुलांना कोणत्या माध्यमाच्या शाळेत घालायचं या प्रश्नाचं उत्तर आपल्याला सहज मिळायला

हवं. पण प्रश्नाचा गुंता जास्त मोठा आहे.

भाषेची कामं आणि भाषेचा वापर

शाळेची भाषा किंवा जगातली कोणतीही भाषा फक्त संवाद - संप्रेषणासाठी (communication) कधीच नसते. भाषा संस्कृतींच्या बदलाचं माध्यम असते. संवाद, संप्रेषण, मनोरंजन ही भाषेची कामं असतात, पण दुय्यम महत्त्वाची. शोषण, खच्चीकरण, सांस्कृतिक आक्रमण ही भाषेची जास्त महत्त्वाची कामं असतात; विशेषतः ती भाषा शालेय शिक्षणासारख्या औपचारिक किंवा 'लोक' शिक्षणासारख्या अर्धऔपचारिक प्रकारांमधून येते तेव्हा. भाषा ही 'न्यूट्रल' (तटस्थ) नसते तर भाषेला जात, लिंग, धर्म, वर्ग, भूगोल आणि इतिहास असतात. मुलांच्या शिक्षणाच्या माध्यमाचा प्रश्न किंवा शाळेतल्या भाषेचा प्रश्न हा केवळ शैक्षणिक नव्हे तर सामाजिक, राजकीय असतो. भाषेची निवड सत्तासंबंधांच्या राजकारणाशी संबंधित असते. भाषा हे केवळ विषय शिकण्याचं माध्यम नसतं तर समाजातल्या विषमतांच्या पुनर्निर्मितीचं माध्यमदेखील असतं. म्हणून शाळेच्या भाषिक माध्यमाच्या चर्चेआधी भाषेचं प्रमाणीकरण कसं घडतं, त्यामुळं भाषेचा प्रवाह बदलतो की थांबतो, भाषेच्या वापरावर अभिजनांकडून, शासनाकडून कशी बंधनं येतात, भारतीय संस्कृतीकरणाचं राजकारण काय आहे, अशा प्रश्नांचा आवाका आपण समजावून घेऊ शकलो तर शालेय शिक्षणाच्या माध्यमाच्या प्रश्नाकडे आपण जास्त डोळसपणे पाहू शकू. शालेय माध्यमाविषयीचा निर्णय केवळ भावनेच्या आहारी जाऊन घ्यावा लागणार नाही. भाषेची समाजशास्त्रीय गुंतागुंत काही प्रमाणात समजावून घेण्याचा प्रयत्न या लेखात करण्यात आलाय. मराठी व इंग्रजी अन् काही ठिकाणी इतर भारतीय भाषांविषयीच्या उदाहरणांमधून आपण ही गुंतागुंत समजावून घेऊ.

मागणी एक, उद्देश विभिन्न

आपल्याकडची आधुनिक शिक्षणव्यवस्था ब्रिटिशांनी सुरू केल्याचं मानलं जातं. शिक्षणाची पद्धत, रचना, शिक्षकांच्या नेमणुका या सर्व गोष्टींसोबत शिक्षणाच्या माध्यमावर, भाषेवर इंग्रजी विचारांचा प्रभाव आहे, किंबहुना आजही जवळपास सगळी शैक्षणिक नोकरशाही ब्रिटिशांनी रचल्याबरहुकूम आहे. १८३५ मध्ये भारतीयांच्या शिक्षणाचा विचार मांडताना लॉर्ड मेकॉले यांनी संस्कृत किंवा फार्सी या भारतातल्या (अभिजनांच्या) भाषा नवीन ज्ञान देण्याच्या लायकीच्या नसल्याचं सांगून भारतीयांना शिक्षण देण्यासाठी इंग्रजी भाषेची निवड केली. सर्व भारतीयांना शिक्षण देणं हे त्यांचं उद्दिष्ट नव्हतं. पण आधीच्या व्यवस्थेप्रमाणे जात किंवा लिंगावर आधारित शिक्षण नाकारण्याचं धोरणही मेकॉलेंनी स्वीकारलं नाही. या बाबतीत एक महत्त्वाची गोष्ट नमूद करायला हवी. 'ईस्ट इंडिया कंपनी'चा बोलबाला सुरू झाल्यानंतर, १८१८ साली पेशवाई नष्ट झाल्यानंतर मिरज, सांगली, पुणे या भागातल्या काही ब्राह्मण पुरुषांनी कंपनी सरकारला पत्र लिहून इंग्रजी शिक्षण देण्याची मागणी केली होती. सत्तेच्या भाषेशी जवळीक साधण्याचा चाणाक्षपणा देशातल्या उच्चजातीयांनी १८३५ च्या आधीच दाखवलेला आहे. शिक्षणामध्ये माध्यम म्हणून इंग्रजी भाषेला महत्त्व मिळण्याचा इतिहास २०० वर्षे जुना आहे. इथल्या उच्चजातीयांनी जेव्हा इंग्रजी शिक्षणाची मागणी केली तेव्हा ती फक्त इंग्रजी भाषेची नव्हती तर ती त्या भाषेतून येणाऱ्या पाश्चिमात्य देशांमधल्या ज्ञानाचीदेखील होती. अशी मागणी पुढं बहुजन समाजातल्या नेतृत्वानंदेखील केली. पण दोन्ही मागण्यांचे भिन्न उद्देश हा दोन्हींमधला फरक होता. उच्चजातीय पुरुषांना मुख्यत्वेकरून सत्तेच्या भाषेच्या आधारे शोषणाधारित, विषमतामूलक समाजात स्वतःचं स्थान अबाधित ठेवायचं होतं. याउलट बहुजनांना किंवा स्त्रिया व दलितांना इंग्रजी ज्ञानातून स्वतःवर लादण्यात आलेलं पशुतुल्य जगणं नाकारायचं होतं. महात्मा जोतिबा फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई यांना बहुजनांचं आद्य



नेतृत्व मानायला हवं. सावित्रीबाईंनी त्यांच्या लेखनातून, कवितांमधून वारंवार इंग्रजी (भाषा अन् मूल्यव्यवस्था अशा दोन्ही) शिक्षणाचं महत्त्व बहुजनांना समजावून सांगितलंय. उदाहरणार्थ –

'इंग्रजी माऊली । इंग्रजी वैखरी
शूद्रांना उद्धरी । मनोभावे ।।'
किंवा
'इंग्रजी माऊली । तोडते पशुत्व
देई मनुष्यत्व । शूद्र लोका ।।'

अशा रचनांमधून सावित्रीबाईंनी इंग्रजी शिक्षणाचा संबंध शोषणविनाशाशी जोडलाय. त्याच काळात कृष्णशास्त्री चिपळूणकरांनी इंग्रजीला 'वाघिणीचं दूध' संबोधलंय, ते त्यामधून येणाऱ्या ज्ञानसागराबरोबर त्यातून टिकू शकणाऱ्या सत्तेमुळंदेखील. महाराष्ट्राचे माजी शिक्षणमंत्री व पहिलीपासून इंग्रजीचा निर्णय घेणारे दिवंगत प्रा. रामकृष्ण मोरे यांच्या म्हणण्यानुसार चिपळूणकरांना वाघिणीचं दूध हवं होतं, पण 'वाघीण' मात्र नको होती. आपल्या 'निबंधमाले'मधून चिपळूणकरांनी फुल्यांच्या मराठी लेखनावर ज्या प्रकारची टीका केलीय ती पाहता वाघिणीचं हे दूधदेखील त्यांना स्वतःसाठी वा स्वजातीयांसाठीच हवं होतं असं म्हणता येईल. शिक्षणाच्या माध्यमाचा इतिहास व भाषेसंबंधीच्या ऐतिहासिक चर्चांचा तपशील पाहिला तर शिक्षणाचं माध्यम सत्तेच्या माध्यमाशी जोडलेलं आपल्याला दिसतं.

स्वातंत्र्यपूर्व काळात इंग्रजी ही सत्तेची भाषा होती. सत्तेशी संबंधित सर्व व्यवहार याच भाषेतून व्हायचे. सत्ताधारी ब्रिटिशांशी जवळीक साधण्याचं माध्यम म्हणजे इंग्रजी भाषा. स्वातंत्र्यलढ्याच्या राष्ट्रवादी विचारसरणीच्या इतिहासलेखनात ज्या – ज्या व्यक्तींना 'राष्ट्रीय नेते' म्हणून मान्यता मिळालीय त्यातील जवळजवळ सर्वजण इंग्रजी भाषेचे उत्तम जाणकार होते. आजही जोवर एखादी बातमी इंग्रजी वर्तमानपत्रं अन् वाहिन्यांमधून झळकत नाही तोवर ती 'राष्ट्रीय' पातळीवरची – National बनत नाही. अण्णा हजारेंच्या औट घटकेच्या नेतृत्वाचा उदय अन् आता अरविंद केजरीवालवर फोकस वळल्यामुळे होऊ लागलेला अस्त यातून जर इंग्रजी भाषक माध्यमांना वजा केलं, तर हाती काय लागतं याचा विचार आपण जरूर करायला हवा.

भारतीय राज्यघटना आणि भाषा

इंग्रजीचं सत्ताभाषेचं स्थान स्वातंत्र्यानंतरदेखील अबाधित राहणं हे केवळ माध्यमांमुळं घडलंय असं मात्र नाही. आपल्या राज्यघटनेत इंग्रजी भाषेला विशेष स्थान आहे. आपली राज्यघटना इंग्रजी भाषेत लिहिली असून कोणत्याही नव्या कायद्याचा मसुदा इंग्रजीतून तयार केला जावा असा नियम आहे. उल्लेखनीय गोष्ट म्हणजे घटनेच्या आठव्या अनुसूचीत (8th Schedule) ज्या २२ भाषांचा उल्लेख आहे, त्यात इंग्रजीचा समावेश नाही. तरी देखील उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयांचं कामकाज इंग्रजीतून चालवलं जाण्याची तरतूदही घटनेत आहे. देशातल्या सर्व, विशेषतः आठव्या अनुसूचीतल्या भाषांच्या संवर्धनाविषयी घटना बोलते पण राज्यघटनेसारखा कोणताच दस्तऐवज भाषाविषयक सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक समस्यांची संपूर्ण उकल करू शकत नाही हे आपण समजावून घ्यायला हवं. भाषाविषयक समस्यांचं कायमस्वरूपी समाधान करणं हे कोणत्याही दस्तऐवजासाठी शक्य नसतं कारण भाषेच्या मूलभूत रूपाप्रमाणे तिच्याशी संबंधित समस्यादेखील प्रवाही,




परिवर्तनीय असतात.

इंग्रजीला असा 'राष्ट्र' भाषेचा दर्जा दिला जाण्यात काही ऐतिहासिक अपरिहार्यता होत्या. दक्षिणेकडच्या लोकांनी उत्तरेकडच्या भाषा लादल्या जाण्याला नाकारणं हे यामागचं एक कारण. शिवाय अचानक मिळालेल्या स्वातंत्र्यामुळं म्हणा किंवा उतरंडीची नोकरशाही व्यवस्था तशीच चालू ठेवल्यामुळं सत्ताधाऱ्यांना होऊ शकणाऱ्या संभाव्य फायद्यांमुळं म्हणा, नोकरशाहीचा गाडा तसाच ठेवून ती हाकण्याची भाषा म्हणूनदेखील इंग्रजी सर्वात वरच्या स्थानावर राहिली. हिंदीला देशाची राष्ट्रभाषा बनवण्याचा भरभक्कम प्रयत्न झाला पण जर हिंदी भाषा भारताची राष्ट्रभाषा बनती, तर भारत देश एकत्र राहू शकला नसता. आजही हिंदी जर 'राष्ट्रभाषा' बनली तर देश विघटनापर्यंत जाऊ शकतो. हिंदी ही देशाची 'राष्ट्रभाषा' असल्याचा एक मोठ्ठा गैरसमज महाराष्ट्रापासून उत्तरेकडं सार्वत्रिक स्वरूपात आढळतो. हिंदी जरी राष्ट्रभाषा होऊ शकली नाही तरी ती देशाची 'संपर्कभाषा' म्हणून प्रस्थापित करण्यात आली. हिंदीच्या संवर्धनाचे व प्रसाराचे विशेष प्रयत्न केले जावेत अशा स्वरूपाची तरतूद घटनेत करण्यात आली. घटनेचं ३५१ कलम तर 'हिंदीच्या विकासाचं मार्गदर्शक तत्त्व' म्हणून ओळखलं जातं. या कलमानुसार हिंदीच्या प्रसाराचे प्रयत्न करण्याला संघराज्याचं (Union) कर्तव्य मानण्यात आलंय. हिंदी भाषेची रूपरेषा 'हिंदुस्तानी' भाषेसारखी (हिंदुस्तानी म्हणजे आजच्या हिंदी अन् उर्दूचं मिश्रण असणारी मूळ भाषा असं ढोबळपणे म्हणता येईल) ठेवून गरज असेल तेव्हा नव्या शब्दांसाठी (vocabulary) मुख्यतः संस्कृतचा आणि दुय्यम स्वरूपात इतर भाषांचा आधार घेण्याची सूचना करण्यात आलीय. नव्या शब्दांसाठी संस्कृतचा वापर करण्याच्या तरतुदीचा गैरवापर करून आकाशवाणी, दूरदर्शन, केंद्रसरकारचे विविध विभाग या सर्वांनी 'संस्कृतप्रचुरता' हा एकमेव कार्यक्रम राबवत हिंदीच्या 'शुद्धिकरणाची' मोहिम घेतली. एन्.सी.ई.आर.टी. ही देशाच्या शालेय शिक्षणाबाबत धोरणात्मक निर्णय घेणारी संस्था आहे. या संस्थेनं १९७० च्या दशकापासून ज्या पद्धतीनं हिंदी भाषेचं संस्कृतकरण किंवा मूळच्या हिंदुस्तानीचं निर्उर्दूकरण केलंय, ते या संस्थेच्या इतिहासातलं सर्वात भयंकर प्रकरण ठरावं. शालेय पातळीवर एन्.सी.आर.टी.ई.चं अनुकरण सर्व राज्यांनी केलं. महाराष्ट्रामध्ये मराठीचं शुद्धीकरण करण्याची फारशी गरज पडली नाही, कारण पाठ्यपुस्तकांमधल्या मराठीवर म्हणजे 'प्रमाण' मराठी भाषेवर संस्कृतचा पगडा आधीपासूनच होता. संस्कृत भाषेला 'देववाणी' किंवा सर्व भाषांची 'आई' मानण्याचा वेडगळपणा करणाऱ्यांची कमतरता देशभरात कुठंही नाही अन् महाराष्ट्र त्याला अपवाद नाही. संस्कृतच काय, जगातली कोणतीही भाषा इतर 'सर्व' भाषांची 'आई' किंवा 'आज्जी / पणजी' असू शकत नाही, असं भाषाशास्त्रज्ञांनी सिद्ध केलंय.

भाषेचं प्रमाणीकरण आणि त्यातलं राजकारण

शिक्षणाच्या माध्यमाच्या संदर्भात इंग्रजी अन् मराठी भाषांचा विचार करताना मराठीच्या आजच्या स्वरूपाकडं, या भाषेच्या इतिहासाकडं जरा डोळसपणे पाहणं सयुक्तिक ठरेल. आपण जेव्हा 'मराठी' किंवा 'हिंदी' किंवा 'तेलगु' अशा कोणत्याही भाषेविषयी बोलतो तेव्हा आपण एकवचनी बोलत असतो, मात्र त्या भाषा या 'भाषासमूह' असतात. उदाहरण घेऊन आपण ही संकल्पना समजावून घेऊ. समजा आपल्याला एखाद्या गोष्टीला होकार द्यायचाय त्यासाठी कुणी 'होय' म्हणेल, कुणी 'व्हय' म्हणेल, कुणी 'हाऊ' म्हणेल किंवा कुणी 'हौ' म्हणेल. यातला 'मराठी' शब्द कोणता? खरं तर हे सगळेच मराठी शब्द आहेत. पण सर्वसाधारणतः आपण 'होय' या शब्दाला बरोबर किंवा 'शुद्ध' मराठीतला मानतो अन् बाकी शब्दांना 'अशुद्ध' मराठी किंवा फार फार तर मराठीच्या बोलीभाषेतले शब्द मानतो. प्रमाणभाषा ही संकल्पना मानणाऱ्या सर्व भाषांमध्ये 'शुद्ध' व 'अशुद्ध' किंवा 'बरोबर' व 'चूक' या संकल्पना स्वाभाविकपणे असतात. एक संकल्पना म्हणून प्रमाणीकरण (standardisation) अयोग्य किंवा चूकच असेल असं नाही. किंबहुना प्रमाणीकरणामुळं कधीकधी कामकाजात, व्यवहारात सुसूत्रता येऊ शकते. उदाहरणार्थ आपण व्यवहारात वापरत असलेली मापनाची सर्व परिमाणं (मीटर, लीटर, किलोग्रॅम, किलोमीटर, इत्यादी) प्रमाणित असतात. किंवा देशभरात प्लग पिन, मोटारींच्या स्टिअरींग व्हीलची जागा, वाहतुकीशी संबंधित चिन्हं या गोष्टी प्रमाणित असतात. त्यामुळं व्यवहारात गोंधळ होण्याची शक्यता कमी होते. प्रमाणभाषेबद्दल देखील असंच सांगितलं जातं. औद्योगिकीकरणोत्तर जगात मापन परिमाणांचं प्रमाणीकरण अन् भाषेचं प्रमाणीकरण साधारणतः समांतर पद्धतीनं जाणारं असलं तरी प्रमाणभाषेच्या माध्यमातून जसं शोषण होऊ शकतं तसं इतर वस्तूंच्या प्रमाणीकरणातून होत नाही. शुद्धाशुद्धतेबरोबरच प्रमाणभाषा दर्जाशी (status) जोडलेली असते. प्रमाणभाषा जाणणारे, बोलणारे, वापरणारे समूह वरच्या वर्गातले मानले जातात. भाषा ही मापनाच्या साधनांसारखी किंवा प्लग पिनसारख्या उपकरणांसारखी निर्जीव 'वस्तू' नाही, त्यामुळं भाषेच्या प्रमाणीकरणात सत्तासंबंधांचं राजकारण सतत कार्यरत असतं. ''माणसाचा 'सुसंस्कृतपणा' अन् 'गावंढळपणा' त्याच्या / तिच्या भाषेवरून कळतो'' या विधानात प्रमाणभाषेला सुसंस्कृत मानलेलं असतं अन् त्यामुळं प्रमाणभाषेखेरीज त्या भाषेचे सर्व प्रकार आपोआप गावंढळ बनतात.



तंत्रज्ञानाच्या इतिहासातला मुद्रणाचा शोध हा भाषेच्या प्रमाणीकरणाच्या इतिहासातला महत्त्वाचा शोध ठरलाय. भाषा जेव्हा केवळ मौखिक असते तेव्हा तिला प्रमाणित करणं, प्रमाणीकरणाच्या नियमांचं दृढीकरण करणं जवळजवळ अशक्य असतं. कोणत्याही दोन व्यक्तींच्या बोलण्यात, शब्दोच्चारात, आवाजाच्या लयीत थोडासा तरी फरक असतो अन् त्यामुळं मौखिक भाषेचं प्रमाणीकरण अवघड, अशक्यसं असतं. याउलट लिखित भाषेला तिच्या चिन्हांकनामुळं (symbolisation) प्रमाणीकरणाच्या नियमात बांधून भाषेचं प्रवाहीपण थांबवणं शक्य बनतं. मुद्रणाच्या शोधानंतर लिखित भाषेच्या नमुन्यांना अनेक प्रतींमध्ये उपलब्ध करून देणं सहज शक्य झाल्यामुळं भाषेच्या प्रमाणीकरणाची शक्यता व प्रमाण या दोन्हीत वाढ झाली. एकोणिसाव्या अन् विसाव्या शतकातल्या शिक्षणप्रसारात औपचारिक शिक्षणानं जगभर त्या – त्या ठिकाणच्या प्रमाणभाषांना म्हणजे त्या – त्या समूहातल्या अभिजनांमध्ये बोलल्या – वापरल्या जाणाऱ्या भाषांना शिक्षणाचं माध्यम बनवलं. जेव्हा आपण मराठी माध्यमातल्या शाळांचा आग्रह धरत असतो, तेव्हा खरं तर आपण (पश्चिम) महाराष्ट्रातल्या अभिजनांच्या म्हणजे ब्राह्मण पुरुषांच्या भाषेचा आग्रह धरत असतो हे विसरता कामा नये. पेशव्यांच्या काळापासून पुण्यातल्या ब्राह्मणांचा वरचष्मा प्रस्थापित झाला अन् पेशवाईच्या विनाशानंतरदेखील महाराष्ट्राच्या याच भागातल्या ब्राम्हणांची भाषा 'शुद्ध भाषा' म्हणून शाळांमध्ये घुसली. 'अक्षरवैदर्भी'चे संपादक डॉ. सुभाष सावरकर यांच्या मते, ''पेशवाई बुडाल्यानंतरच्या ब्रिटिश राजवटीत महात्मा फुले यांनी.... स्वतंत्र चिंतनाद्वारे व संलग्न चळवळीद्वारे शिक्षण व सामाजिक समताविषयक कल्पदृष्टीसुद्धा ग्रामीण – नागर लोकभाषेच्या माध्यमातून मांडली.... या त्यांच्या चळवळीदरम्यान पुण्याच्या गंगाधरशास्त्री फडके, दादोबा पांडुरंग, कृष्णशास्त्री चिपळूणकर–गोडबोले, रा. भि. गुंजीकर यांनी त्यांच्या ब्राह्मणी बोलीचे व्याकरणही सुनियोजित पद्धतीने मांडले. 'नेटिव्हां'ना शिक्षण देण्यासाठी योग्य भाषामाध्यम (म्हणून) शिक्षणखात्यातील विद्वानांनी १८५७ च्या सुमारास प्रसिद्ध झालेला मोल्सवर्थ – कँडी यांचा मराठी–इंग्रजी कोश, पुण्याच्या पंडितांनी लिहिलेली व्याकरणे व जॉर्ज ग्रिअर्सनने प्रसिद्ध केलेला भाषा अहवाल यांचा गैरफायदा घेत आपल्या स्वतःच्याच गटसमूहाची भाषा पुढे सरकवून तिचाच अभ्यासक्रम बनवून शासनास सादर केला. अशाप्रकारे खानदेशी, नेमाडी, तावडी, दखनी, हळबी, आगरी, डांगी, कोकणी, वऱ्हाडी, झाडी, नागपुरी आदि मराठीतल्या प्रचलित बोलींशी सुतराम संबंध नसलेल्या पुण्याच्या संस्कृतजड नागरबोलीने स्वतःच्याच माथ्यावर शिरपेच चढवून 'प्रमाण मराठी'चे बिरूद पटकावले. अशाप्रकारे उर्वरित मराठी जनविभागांवर ही 'परकी' बोली शिक्षणखात्यामार्फत लादली गेली ! आणि त्यातूनच मग 'मातृभाषेतून शिक्षण' या शास्त्रपूत कल्पनेचा बट्ट्याबोळ होऊन गेला!''*

थोडक्यात सांगायचं तर सध्याच्या मराठी शाळांमधली प्रमाण मराठी ही तिच्यातल्या शिक्षणयोग्यतेमुळं आली नसून ती सत्ताधाऱ्यांची भाषा असल्यामुळं शिक्षणाची माध्यमभाषा बनलीय. अर्थात् अल्पसंख्य सत्ताधारी वर्गाची भाषा बहुसंख्य सत्ताहीनांसाठी शिक्षणाची भाषा बनणं हे काही फक्त महाराष्ट्राचं वैशिष्ट्य नाही. जगभरात सर्वत्र थोड्याफार फरकानं हीच परिस्थिती आढळते. प्रमाणभाषा अप्रवाही व विशिष्ट समाजगटांची भाषा असल्यामुळं तिच्या अस्तित्वाच्या चर्चांमध्ये त्या समाजगटांची मानसिकता ठळकपणे प्रतिबिंबित होते.

प्रमाणमराठी : न्यूनगंडांची भाषा

मराठीच्या आजच्या अवस्थेबद्दल बोलायचं झालं तर जिच्या अस्तित्वाच्या नावानं गळे काढले जातायत ती मरणपंथाला लागलेली प्रमाणमराठी (की शु ऽ ऽ द्ध मराठी?) ना संवादाची भाषा आहे ना संप्रेषणाची. ही मराठी भाषा न्यूनगंडाची भाषा आहे. संपत्ती व संधींच्या केंद्रीकरणामुळं राज्य अन् देशाच्या विविध भागातल्या कष्टकऱ्यांपासून

*संदर्भ: जनभाषेच्या शोधात, डॉ. सुभाष सावरकर, मराठी जनसाहित्य परिषद प्रकाशन, अमरावती,२००५

उद्योजकांपर्यंत सर्व अमराठी भाषकांसाठी आकर्षणाचं ठिकाण ठरलेल्या मुंबई, पुणे, ठाणे, नाशिक या पश्चिम महाराष्ट्रीय शहरांमधले विशिष्ट भूभाग मराठीच्या अस्तित्वाच्या नावानं टाहो फोडत कंठशोष करताना दिसतायत. एकेकाळी या शहरांचे अनाभिषिक्त राजे असणाऱ्या मराठी अभिजनवर्गीय पुरुषांना, जागतिकीकरणोत्तर जगातल्या बदलत्या आर्थिक समीकरणांनी सत्ताहीनत्वाची जाणीव तीव्रपणे करून दिलीय. ज्या भाषेकडं जाणीवपूर्वक पाठ फिरवून, जागतिक ज्ञानाची भाषा आपल्या मुला-नातवंडांना शिकवून, पहिल्या विमानानं त्यांना अमेरिकेला धाडलं, त्या प्रमाणमराठीचं अस्तित्व टिकून राहिलं तर आमची सत्ता टिकून राहील याची जाणीव या अभिजनवर्गीय पुरुषांना जरा उशिरानं झालीय. म्हणून 'मराठी मरतेय' किंवा 'मराठी माणूस' (हा शब्द नेहमी पुरुष या एकमेव अर्थानं वापरला जातो. 'माणूस' या संज्ञेशी स्त्रीचा संबंध आपल्या समाजाला मान्य नाही.) देशोधडीला लागल्याची आवई उठवली जातेय. सत्ताहीनत्वातून आलेला पोकळपणा घालवण्यासाठी मराठी संकटात असल्याचा मुद्दा बहुजन तरुणाईच्या गळी उतरवण्यात या समाजघटकाला अल्प प्रमाणात यश मिळालंय. 'न्यूनगंड है कि मानता ही नही' अशी अवस्था जवळपास चिरस्थायी आहे. या न्यूनगंडाचे काही आविष्कार पाहणं मनोरंजक अन् उद्‌बोधक ठरेल.


'पंजाब की मशहूर कुल्फी' नावाच्या गाड्या पुणे, ठाणे, सोलापूर, नागपूर व इतर अनेक शहरांमध्ये साधारणतः २००२-०३ पासून कुल्फी विकतायत. 'मराठी पाट्यां'ची 'चळवळ'(?) सुरू झाल्यानंतर पुणे, ठाणे या शहरात या गाड्या आता 'महाराष्ट्र की मशहूर कुल्फी' नावानं कुल्फी विकतायत. सोलापूर, नागपूर इथं मात्र त्या अजूनही 'पंजाबी' आहेत. म.न.से. अर्थात महाराष्ट्र नव(नात्झी)निर्माण सेनेच्या 'खळ्ळ् फट्याक' पद्धतीच्या घटनाद्रोही विकृतीला सुसंस्कृतपणाचा, पुरोगामित्वाचा टेंभा मिरवणाऱ्या पश्चिम महाराष्ट्रीय माध्यमांनी ज्या प्रकारे मराठी मर्दानगीचा नवीनतम आविष्कार म्हणून साजरा करायला सुरू केलंय ते पाहता 'पंजाब' ऐवजी 'महाराष्ट्र'च्या नावानं कुल्फी विकण्याचा धोरणी अन् 'अस्तित्ववादी' निर्णय घेण्यात आला असेल, तर तो मराठी माणसाचा विजय नसून त्याच्या न्यूनगंडावर झालेलं शिक्कामोर्तब आहे. असेच धोरणी निर्णय हिंदी सिनेमात 'बॉम्बे'चं 'मुंबई' करून किंवा दुकानांवरच्या पाट्यांचं लिप्यंतरण करून घेण्यात आलेत. मराठीतून पाटच्या लावण्यामध्ये 'भाषा' मराठी नसून 'लिपी' मराठी (देवनागरी) आहे. उदाहरणार्थ '२४ X ७ मेडिकल स्टोअर' या नावात मराठी काय आहे? भाषा अन् लिपी यात फरक करायला अक्षम असणारे लोक मराठीच्या धुरीणत्वाची पताका खांद्यावर घेऊन फिरतायत याचं कारण 'मराठी माणूस' नामक अस्मितेला आलेला न्यूनगंड हे आहे. या न्यूनगंडांचं रूपांतर कधी अमिताभ बच्चन या हिंदी भाषक अभिनेत्यानं मराठीत तीन वाक्य बोलल्याबद्दल कौतुकाच्या चौकटी छापण्यात होतं तर कधी अमका मराठी माणूस 'नॅनो'कारचा जन्मदाता आहे अशा 'ब्रेकिंग न्यूज' मध्ये होतं. कधी मराठी संगीतकाराच्या गाण्याच्या ठेक्यावर कतरीना थिरकली म्हणून, तर कधी राणी मुखर्जीनं वरण-भात खाऊन मराठीत प्रपोजल स्वीकारलं म्हणून येणाऱ्या सर्व प्रकारच्या बातम्यांचं उगमस्थान आपल्याला प्रमाण मराठी भाषकांच्या न्यूनगंडाच्या सार्वत्रिकीकरणात सापडू शकतं.

प्रमाण मराठी भाषकांच्या न्यूनगंडाचं दुसरं रूप प्रमाण भाषकांकडून मराठीचे इतर प्रकार बोलणाऱ्या लोकांची खिल्ली उडवण्यात आपल्याला पाहायला मिळतं. प्रमाण मराठी म्हणजे रूढार्थानं 'पुणेरी' मराठी बोलणारे लोक मराठीच्या इतर प्रकारांचा म्हणजे कोल्हापुरी, विदर्भातली, मराठवाडी, सोलापुरी, खानदेशी, कोकणी वगैरे प्रकारांचा उपयोग तुच्छतापूर्ण विनोद निर्मितीसाठी करतात. ज्याला कशाला मराठी वाहिन्या म्हणतात त्या सर्व वाहिन्यांवर सार्वजनिक थिल्लरपणाच्या किळसवाण्या प्रकारच्या विनोदनिर्मितीसाठी मराठीच्या इतर प्रकारांचा उपयोग केला जातो. 'कॉमेडी एक्सप्रेस' किंवा 'फू बाई फू' किंवा तत्सम सर्जकताहीन, सुमार दर्जाच्या कार्यक्रमांमध्ये मराठीच्या इतर कोणत्याही प्रकारातले संवाद ओंगळवाणे अंगविक्षेप करणाऱ्या लोकांच्या (यांना 'कलाकार' किंवा 'सेलिब्रिटी' म्हणण्याची पद्धत आहे) तोंडी आले की लोक हसतात, त्यांनी हसावं अशी निर्मात्यांची अपेक्षा असते. ''गण्याऽऽ कुठं गेलायस?'' अशा प्रमाण मराठीतल्या प्रश्नाला ''मालक हितंच हाय. येताव, येताव.'' असं उत्तर आल्यावर यात हसण्यासारखं काय आहे? पण प्रमाण मराठीखेरीज मराठीचे इतर सर्व प्रकार केवळ हसण्याच्या लायकीचे आहेत असा समज प्रमाण मराठीला समाजावर लादणाऱ्या समाजधुरिणांनी अन् त्यांच्याच ताब्यातल्या अभ्यासक्रमांनी, पाठ्यपुस्तकांनी, सरकारी माध्यमांनी गेली शंभरेक वर्षं जाणीवपूर्वक पसरवलाय. ''आमच्या भाषेतून ज्ञाननिर्मिती होऊ शकत नाही का?'' असा प्रश्न पोटतिडकीनं विचारणारे प्रमाण मराठीभाषक मराठीच्याच इतर प्रकारांना साध्या संवादाच्या लायकसुद्धा समजत नाहीत. स्वातंत्र्यपूर्व काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसह काही दलित नेत्यांनी स्वातंत्र्य चळवळीतल्या उच्चजातीय (म्हणजे जवळपास सगळ्या) नेत्यांसमोर एक प्रश्न उपस्थित केला होता, ''ब्रिटिशांपासून ज्या स्वातंत्र्यासाठी तुम्ही लढा उभारताय, ते स्वातंत्र्य तुम्ही आम्हाला (दलितांना) देणार का?'' त्याच धर्तीवर मराठीचे इतर प्रकार बोलणाऱ्यांनी प्रमाण मराठीभाषकांना काही प्रश्न विचारायला हवेत - ''समजा तुम्ही म्हणताय त्याप्रमाणं

सर्व शाळा मराठी माध्यमाच्या झाल्या तर त्या प्रमाण मराठीतच चालतील. अशा वेळी 'आमच्या' मराठी भाषेचं स्थान काय असणार? स्वतःच्या भाषेला 'ज्ञानभाषा' बनवताना आमच्या भाषांना संवादयोग्यही न समजण्याचं कारण काय?'' जेव्हा असे प्रश्न विचारात घेऊन शाळेच्या माध्यमभाषेचा विचार होईल तेव्हा परकी भाषा म्हणून विरोध फक्त इंग्रजीलाच नव्हे तर ब्राह्मणी प्रमाण मराठीलादेखील करावा लागेल. प्रमाण भाषेद्वारे उर्वरित महाराष्ट्रावर लादल्या जाणाऱ्या पुणेपुरस्कृत पश्चिम महाराष्ट्रीय सांस्कृतिक दहशतवादाची नोंद घेतल्याशिवाय, पश्चिम महाराष्ट्राकडून केल्या जाणाऱ्या उर्वरित महाराष्ट्राच्या वासाहतिकीकरणाची चर्चा केल्याशिवाय शाळेच्या माध्यमभाषांची चर्चा अपुरी ठरते. मराठी माध्यमाच्या शाळा असं म्हणून जर महाराष्ट्रातल्या बहुसंख्य मुलांवर सध्याची संस्कृतप्रचुर प्रमाण मराठीच लादली जाणार असेल तर 'इंग्रजी काय वाईट' असं म्हटलं जातं, ते अगदीच चूक ठरवता येत नाही.

भाषेला महत्त्व शिक्षणामुळे

एखादी भाषा जेव्हा शिक्षणाचं माध्यम बनते तेव्हा ती भाषा शिक्षणात येते त्या स्वरूपात, तिथल्या संस्कृतीचा भाग अन् नवीन संस्कृतीच्या निर्मितीचं साधन बनते. त्यामुळं शिक्षणाचं माध्यम न बनलेल्या भाषा नामशेष होण्याचा धोका असतो. महाराष्ट्रात मातृभाषेतून शिक्षणाचा धोशा लावताना मातृभाषा म्हणजे मराठी अन् मराठी म्हणजे प्रमाण मराठी असं गृहीतक आहे. त्यामुळं मराठीच्या विविध प्रकारांसोबतच पावरी, गोंडी, भिली, अहिराणी, माडिया, ठाकरी, वारली इत्यादी भाषांना ना राज्यमान्यता आहे ना शिक्षणमान्यता. आदिवासी समाजांच्या अनेक भाषा आजवर भाषाविषयक चुकीच्या धोरणांमुळं संपूर्णपणे नामशेष झाल्यात. आजही मातृभाषेतून शिक्षणाचा कार्यक्रम महाराष्ट्रात मराठीपुरता मर्यादित असल्यामुळं आदिवासी मुलांच्या शिक्षणाचा आपल्याला पुरता विसर पडल्याचं मान्य करावं लागतं. म्हणूनच जर 'मातृभाषेतून शिक्षण हा मुलांचा मूलभूत अधिकार आहे' असं आपण मानत असू तर ज्यांच्या मातृभाषांना शिक्षणक्षेत्राच्या परिघाच्याही बाहेर ठेवण्यात आलंय त्या आदिवासी, भटक्या, दलित मुलांच्या अधिकाराबद्दल आपलं काय म्हणणं आहे, की मूलभूत अधिकारांच्या बाबतीतही आपण मुलांमध्ये जन्माधारित भेदभाव करणार आहोत या प्रश्नांची उत्तरं आपल्याला शोधावी लागतील. राज्याची भाषा सर्व मुलांना शिकायला भाग पाडण्यापेक्षा ज्यांची मातृभाषा मराठीपेक्षा पूर्णतः भिन्न आहे त्यांना आपण थेट सत्तेची भाषा म्हणजे इंग्रजीच का शिकवू नये? एवीतेवी सर्व अमराठी भाषकांसाठी मराठी ही सुद्धा परकीय भाषाच आहे.



विशिष्ट भाषा म्हणजे विशिष्ट मूल्यव्यवस्था

शिक्षणातून आपण फक्त विशिष्ट भाषाच सक्तीची करत नाही तर विशिष्ट मूल्यव्यवस्था शिकवत असतो. निबंधाच्या विषयांपासून गणितांच्या निवडीपर्यंत सर्वत्र समाजधुरिणकेंद्री मूल्यव्यवस्था कार्यरत असल्याचं आढळतं. एकाच अभ्यासक्रमावर अनेक पाठ्यपुस्तकं बनवता येऊ शकतात. पण आपण समाजातल्या विषमतांची पुनर्निर्मिती करणाऱ्या पाठ्यांशावर भर देतो अन् सत्तासंबंधांना हादरे देणाऱ्या विचारांना शिक्षणापासून लांब ठेवतो. उदाहरणार्थ, समजा एखाद्या वर्गात भाषा विषयात 'भुजंगप्रयात' अलंकार शिकवायचा. त्यासाठी रामदास स्वामींनी लिहिलेल्या,

'प्रभाते मनी राम चिंतीत जावा।
पुढे वैखरी राम आधी वदावा ।।'

किंवा

'मना सज्जना भक्ती पंथेचि जावे,
तरी श्रीहरी पाविजे तो स्वभावे ।'

अशा 'मनाच्या श्लोकां'चा वापर वर्षानुवर्षं केला जातोय. त्याऐवजी सावित्रीबाई फुल्यांनी लिहिलेल्या,

''पुढे पेशवाई तिचे राज्य आले,
अनाचार देखी अती शूद्र भ्याले ।
स्वथुंकी थुंकाया गळी गाडगे ते,
खुणा नाशया ढुंगणी झाप होते ।।'

असं त्याच अलंकाराचं उदाहरण का शिकवलं जात नाही? खरं तर अशा उदाहरणांमुळं दलितांच्या यातना, त्यांचा झालेला छळ मुलांपर्यंत पोचवता येऊ शकतो. पण अशा आशयातून सत्ताधाऱ्यांची सत्ता उलथवली जाण्याची शक्यता निर्माण होत असते. म्हणून शिक्षणाचा आशय निःसत्व, गुळगुळीत, कणाहीन निवडायचा अन् त्याला साजेशी नीरस, अप्रवाही, उच्चवर्गप्रभावी प्रमाणभाषा माध्यम म्हणून निवडायची. या दोन गोष्टी एकत्रितपणे साधल्या की शोषणमुक्तीची स्वप्नं फारशी कुणी पाहत नाही अन् ती पाहिली तरी शालेय पातळीवरच अशा स्वप्नांना चिरडणं शक्य होतं. पाठ्यपुस्तकांमधली सगळी महत्त्वाची पात्रं प्रमाणमराठी बोलतात अन् ग्रामीण, गावंढळ, गरीब, दलित, भटके, अडाणी अशा लोकांच्या तोंडी तथाकथित 'ग्रामीण' मराठी असते. चौथीच्या इतिहासाच्या पाठ्यपुस्तकात तर 'ऐतिहासिक' संवादाच्या नावाखाली वसंत कानेटकरांनी लिहिलेल्या ब्राह्मणी वाक्यांना थेट शिवाजी महाराजांच्या तोंडी घातलं जातं. जी भाषा शिवकाळात अस्तित्वातदेखील नव्हती ती आजची प्रमाणमराठी महाराजांच्या तोंडून ऐकवण्यामागं भाषेतला वर्गभेद स्पष्ट आहे. आज ज्या भाषेला 'ग्रामीण बोली' मानलं जातं ती जर महाराजांच्या तोंडी आली तर चालणार नाही का? कदाचित ऐतिहासिकदृष्ट्या ते जास्त योग्य ठरेल, पण 'कोणत्याही काळात सत्तेची भाषा म्हणजे प्रमाणभाषा' अशा विचारसरणीमुळं शिक्षणात 'ऐतिहासिक' घोडचुका केल्या जातात.

बोले तैसा न चाले

शिक्षणाच्या माध्यमाचा विचार करताना देशी भाषांच्या तुलनेत इंग्रजीला होणाऱ्या विरोधाचं एक कारण धार्मिकदेखील आहे. इंग्रजी ही ख्रिस्ती धर्म मानणाऱ्या देशामधून आपल्याकडं आलेली असल्यामुळं तिला 'ख्रिश्चन' भाषा मानण्याचा प्रकार अनेकदा केला जातो. गेल्या वर्षी गोव्यातल्या सरकारनं कोकणी व मराठीसोबत इंग्रजी माध्यमाच्या सरकारी शाळा काढण्याचा निर्णय जाहीर केल्यावर तिथल्या अभिजनांनी तीव्र निदर्शनं केली. निदर्शकांमध्ये अनेक लोक हिंदुत्ववादी संघटनांशी संबंधित होते अन् सरकारनं इंग्रजीवर पैसे खर्च करण्याला त्यांचा विरोध होता कारण त्यांच्या मते इंग्रजी ही ख्रिश्चनांची भाषा आहे. इंग्रजी माध्यमांवर सरकारी खर्चाला विरोध करणारे बहुतांश अभिजन स्वतःच्या मुला-नातवंडांना इंग्रजी माध्यमात शिकवतात अन् त्यांची प्रमाणभाषा बहुजनांनी स्वीकारावी असा आग्रह धरतात.

''मातृभाषेतून मुलं सर्वात चांगलं शिकू शकतात'' असं संशोधनांनी सिद्ध झाल्याचं बहुजन समाजाला जेव्हा सांगितलं जातं तेव्हा त्यांना काही प्रश्न नक्की पडतात. ज्या संशोधनाविषयी सांगितलं जातंय ते संशोधन सांगणाऱ्यांना (म्हणजे बहुधा अभिजनांना) कोणत्या भाषेच्या ज्ञानामुळं समजलं? त्यांची मुलं लहानपणी जेव्हा इंग्रजी शाळेत गेली तेव्हा शिकवलेल्या गोष्टींचा फारसा बोध होत नसूनही आज त्यांचं समाजातलं स्थान काय आहे? ज्याला कुणाला 'यशस्वी' म्हटलं जातं त्याला / तिला लहानपणी शाळेत किती समजत होतं यापेक्षा त्याला / तिला कोणत्या माध्यमाची शाळा मिळाली हे जास्त महत्त्वाचं आहे हे न समजण्याइतका बहुजन समाज दूधखुळा नाही. जर अभिजनांच्या मुलांना शाळेच्या माध्यमभाषेमुळं 'यश' मिळालं असेल तर बहुजनही इंग्रजी माध्यमाकडंच वळणार. समजा जर आपण म्हणालो की अभिजनांची मुलं इंग्रजी माध्यमात शिकत असताना समजून - उमजून शिकत होती तर मग, 'आमची मुलं तसं का शिकू शिकणार नाहीत?' असा रोखठोक सवाल बहुजन समाज विचारेल अन् माध्यमभाषा म्हणून इंग्रजीचाच आग्रह धरेल. म्हणूनच आज वाढत चाललेल्या इंग्रजी शाळांच्या मागणीला नुस्तं 'फॅड' म्हणून चालणार नाही, या मागणीमागच्या यशापयशाविषयक कल्पनेच्या गुंत्याला नीट समजावून घ्यावं लागेल.

इंग्रजीचा प्रभाव

भारतापुरतं बोलायचं झालं तर इंग्रजी माध्यमामुळं मिळणारी सर्वात मोठी गोष्ट म्हणजे आत्मविश्वास ! ज्याला कशाला आज आपण मराठीतलं ज्ञान किंवा ज्ञानाचं माध्यम म्हणून ओळखतो, त्या जवळपास सर्व गोष्टींचं उगमस्थान इंग्रजी भाषेत अन् संस्कृतीत आहे.

बाळशास्त्री जांभेकरांचं पहिलं मराठी वर्तमानपत्र 'दर्पण' असो की 'मराठी विश्वकोश', सर्वांचं उगमस्थान इंग्रजी भाषेच्या ज्ञानामुळं आहे. 'दर्पण' तर केवळ मराठी वर्तमानपत्र नव्हतंच, ते मराठी अन् इंग्रजी अशा दोन भाषांमध्ये छापलं जात असे. पाश्चिमात्य देशांमधलं, इंग्रजीतलं ज्ञान मराठी वाचकांपर्यंत पोचवणं हे 'दर्पण'चं मुख्य उद्दिष्ट होतं. मराठी 'विश्वकोशा'च्या वेबसाईटवर म्हटल्याप्रमाणं 'एनसायक्लोपेडिया ब्रिटानिका'च्या धर्तीवर मराठीत ज्ञानकोश तयार करणं हे 'विश्वकोश'चं मुख्य उद्दिष्ट आहे. दलित, ग्रामीण, आदिवासी साहित्याखेरीज मराठी साहित्याची प्रेरणादेखील इंग्रजी भाषा अन् इंग्रजी साहित्यच आहे. गोवा विद्यापीठाच्या इंग्रजी विभागाचे माजी प्रमुख प्रा. आनंद पाटील यांनी तर 'मराठी नाटकांवरील इंग्रजी प्रभाव' या आपल्या पुस्तकात मराठी नाटकांचं मूळ कसं इंग्रजी नाटकांच्या, भाषेच्या ज्ञानात आहे हे सप्रमाण सिद्ध केलंय. मराठीच्या 'शुद्ध' लेखनात ज्या विरामचिन्हांचा काटेकोर आग्रह धरून बहुसंख्य बहुजनांना नामोहरम केलं जातं, ती विरामचिन्हं देखील विल्यम कॅरे या स्कॉटिश मिशनरी व्यक्तीमुळं एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला मराठीत आलीयत. आधुनिक ज्ञानाची निर्मिती ज्या संस्कृतीत फारशी झाली नाही व आता तर ती शक्यता जास्त मंदावलीय अशा संस्कृतीची भाषा केवळ संस्कृतप्रचुर (अनाकलनीय) पारिभाषिक शब्दांच्या जोरावर ज्ञानभाषा बनू शकेल का, याचा विचार आपण सर्वांनी सविस्तरपणे करायला हवा.

कोणाच्या मातृभाषेतून शिक्षण?

देशभरात सर्वत्र सरकारच्या वतीनं चालवल्या जाणाऱ्या, केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या पाल्यांच्या कल्याणासाठी कटिबद्ध असणाऱ्या 'केंद्रीय विद्यालयां'च्या शैक्षणिक गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह उभं केलं जात नाही. या शाळा इंग्रजी अन् काही ठिकाणी हिंदी माध्यमाच्या आहेत. शाळेतले विद्यार्थी विविध प्रांतातले असल्यानं त्यांच्या 'मातृभाषां'मध्ये बरीच विविधता असते. कधी कधी चारशे पटसंख्या असणाऱ्या शाळेत चौदापेक्षा जास्त भाषा बोलणारी मुलं आढळतात. अशा सर्व भाषा असणारी मुलं, 'इंग्रजीतून कशी काय नीट शिकू शकतील?' असा प्रश्न सहसा उपस्थित केला जात नाही. हा प्रश्न नेहमीच खालच्या जात – वर्गाच्या मुलांबद्दल उपस्थित होत असतो. जेव्हा दोन भिन्न भाषांमधून संवादाचा प्रश्न येतो तेव्हा 'श्रेष्ठ' भाषा वरच्या जात – वर्गाची किंवा पुरुषांची असते तर 'कनिष्ठ' भाषा खालच्या जात – वर्गाची किंवा स्त्रियांची असते या गृहीतकावर समाजातले व्यवहार अन् शिक्षणासारख्या व्यवस्था चालतात. शारीरिक श्रम करणारे लोक तर साहित्यापासून शिक्षणापर्यंत कोणत्याच ठिकाणी प्रमाणभाषा बोलत नसतात. कल्पनेतदेखील एखादी खेडूत व्यक्ती किंवा शहरातली श्रमजीवी व्यक्ती अथवा एखादी मुस्लीम व्यक्ती अस्खलित प्रमाण मराठी बोलू शकत नाही. वस्तुस्थितीत मात्र अनेक खेडूत, श्रमजीवी वा मुस्लीम लोक उत्तम प्रमाणभाषा बोलू शकत असूनदेखील पाठ्यपुस्तकापासून कथा – कादंबऱ्यांपर्यंत सर्वांनी त्यांना अनुक्रमे 'ग्रामीण' मराठी अन् 'हिंदीसदृश उर्दू' भाषेपुरतं मर्यादित ठेवलंय, याचं कारण मुख्यतः लिहिणाऱ्या व्यक्तिच्या मनातल्या पूर्वग्रहांमध्ये दडलेलं आहे. त्यातही लिहिणारी व्यक्ती पुण्या – मुंबईसारख्या 'सांस्कृतिक' वातावरणात वावरणारी असली तर हे पूर्वग्रह अगदीच ठळकपणे दिसतात. २०१० मध्ये प्रकाशित झालेलं अन् मराठी व्याकरणासाठीचं सर्वोत्तम पुस्तक म्हणून लोकप्रिय ठरू लागलेलं 'लिहावे नेटके' हे अतिशय आकर्षक चित्रांनी सजलेलं पुस्तकदेखील भाषिक वर्गभेदाची ही परंपरा तशीच पुढं चालवताना दिसतं.

शाळांच्या भाषामाध्यमाच्या संदर्भात भाषेच्या सामाजिक इतिहासाचा अन् समकालीन राजकारणाचा विचार केला तर प्रश्न फक्त मराठी अस्मिता विरुद्ध इंग्रजी अस्मिता असा नाही हे आपल्या लक्षात येतं. 'मराठी अस्मिता' ही एकजिनसी (homogeneous) संज्ञा नसून तिथं अनेक अस्मितांची गुंतागुंत झालेली दिसते. संप्रेषणाची भाषाच शोषणाची देखील असल्यामुळं 'मराठी' या एकाच भाषेच्या अंतर्गत असणारी प्रमाण व अप्रमाण अशी उच्च-नीचता विचारात घेतल्याशिवाय शाळांच्या माध्यमाचा प्रश्न सुटणं कठीण आहे. मुलांचं सुरुवातीचं शिक्षण जर त्यांच्या परिचयाच्या भाषेतून झालं तर पुढचं शिक्षण सुकर होतं, मुलं शिक्षणाशी मानसिकरित्या जास्त एकरूप होऊ शकतात. पण ही परिचयाची भाषा म्हणजे निव्वळ लिहिण्या-बोलण्यासाठी वापरतो ती भाषा नसून शाळांच्या एकूण व्यवहाराची, तिथल्या उठण्या – बसण्या – वागण्याच्या पद्धतींची भाषादेखील आहे. इंग्रजी पद्धतीचं आचरण जसं 'मराठी' पद्धतीच्या लोकांना परकं वाटतं, तसचं शहरी, ब्राह्मणी, प्रमाण मराठीजन्य आचारण महाराष्ट्रातल्या बहुसंख्य बहुजन मुलांना अगदी परकं, अपरिचित वाटतं, याचं भान सोडून मराठी माध्यमांच्या शाळांची मागणी आत्मघातकी ठरेल.

'मातृभाषेतून शिक्षण' हा हक्क आपण मानत असू तर जितक्या भाषा बोलणारी मुलं तितक्या माध्यमांच्या शाळा ही गोष्ट आपल्याला मान्य करावी लागेल. त्यामुळं 'आपली' मुलं इंग्रजी शाळांमध्ये जात असताना 'त्यांच्या' मुलांनी मराठीत जावं, हे म्हणणं अगदी कावेबाजपणाचं ठरेल. आपली मुलं मराठी माध्यमाच्या शाळेत जातात, म्हणून त्यांच्या मुलांनी पण मराठीत जावं, हे देखील दरवेळी बरोबर असेलच असं नाही. कारण या ठिकाणी 'ते' जर अमराठी भाषक, दलित, आदिवासी असतील तर पुन्हा त्यांच्या मुलांवर परकी भाषा लादली

जाण्याचाच धोका असतो.

लॉर्ड मेकॉलेच्या आगमनामुळं अन् त्यांनी घेतलेल्या 'उदारमतवादी' धोरणामुळं देशातल्या दलितांना शिक्षण मिळू शकलं असं मानणारे अनेक विचारवंत आज देशात आहेत. प्रा. चंद्रभान प्रसादांसारखे विचारवंत तर दरवर्षी 'मेकॉले जयंती' साजरी करतात. अशा सर्व विचारवंतांनी अनेक वेळा दलित – आदिवासींसाठी इंग्रजी माध्यमाच्या शाळांची मागणी केलीय. ''शिक्षण जर परक्या भाषेतूनच घ्यायचं असेल तर ते उच्चजातीय प्रमाणभाषांमधून का घ्यावं, इंग्रजीतूनच का नको?'' असा महत्त्वाचा प्रश्न हे लोक विचारतात याचा आपण विचार करायला हवा. उत्तरप्रदेशातल्या लखीमपुरी इंथ बनलेलं 'अंग्रेजी मैय्या'चं देऊळ हा इंग्रजीच्या 'फॅड'चा भाग नसून सर्व उत्तरभारतीय समाजांना एक गठ्ठा हिंदी भाषक म्हणण्याच्या राजकारणाला झालेला हा विरोध आहे, हे समजावून घेतलं तर शिक्षणाच्या माध्यमावर विचार करू शकण्याची शक्यता निर्माण होईल.

शाळेच्या भाषेचा विचार मुलांच्या दृष्टीनं करायचा झाला तर प्रत्येक मुलाला / मुलीला त्याच्या / तिचा हक्क म्हणून परिचयाच्या भाषेत शिक्षण मिळायला हवं. पण हा विचार मुलांच्या बाजूनं फारसा होत नाही तर तो भाषिक अस्मितांशी संबंधित असतो. म्हणून, जर हा विचार भाषिक अस्मितेच्या व संबंधित संस्कृतीच्या चिरस्थायीकरणाच्या दृष्टीनंच करायचा असेल अन् अमराठी भाषक मुलांना जर त्यांच्या भाषेत सुरुवातीचं शिक्षण देणं शक्य नसेल तर त्यांना इंग्रजी – मराठी अशा मिश्र माध्यमाच्या किंवा इंग्रजी माध्यमाच्या पण केंद्रीय विद्यालयांच्या धर्तीवरच्या शाळा उपलब्ध करून द्याव्यात. आणि सर्व उच्चजातीय, मध्यम – उच्चमध्यमवर्गीय प्रमाण मराठी भाषक पालकांनी आपापल्या मुलांना मराठी माध्यमांच्या शाळेत घालावं.

औद्योगिकीकरण झालेल्या समाजात उर्ध्वगमनशीलतेसाठी (upward mobility) समाजातल्या विविध स्तरातले लोक वरच्यांचं अनुकरण करू पाहतात. जर मराठी भाषा सामाजिक उपयुक्ततेच्या दृष्टीनं 'वरचढ' ठरली तर कालांतरानं अमराठीभाषक, दलित – आदिवासीदेखील त्यांच्या मुलांना मराठी माध्यमात शिकवण्याचा विचार करू शकतील. मात्र तूरतास अशा सर्वांसाठी मराठी माध्यमाची सक्ती म्हणजे परिचित भाषेतून शिक्षणाचा त्यांचा हक्क हिरावून घेतल्यासारखा आहे.

पण जर असं करणं जमणार नसेल तर मरणपंथाला लागलेल्या 'आपल्या' भाषेला 'त्यांनी' वाचवावं असा आग्रह आपण का धरतोय याची परखड चिकित्सा करावी. भाषेच्या माध्यमातून होणाऱ्या शोषणाच्या राजकारणाचा विचार टाळून शालेय भाषा माध्यमाचा विचार आपण करू शकत नाही, कारण माध्यमाची निवड ही देखील एक राजकीय कृती (political act) असते.

▼▼▼

किशोर दरक, पुणे
शिक्षणशास्त्राचे अभ्यासक.
शिक्षणधोरण, शालेय अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तकं, त्यातील बदलाची प्रक्रिया या सर्वांची समाजशास्त्रीय अंगानं केलेली चिकित्सा हे विशेष आवडीचे विषय.
शिक्षक-शिक्षणाचं काम. मराठी, इंग्रजी नियतकालिकं, वृत्तपत्रं यांमधून लेखन.
kishore_darak@yahoo.com

Best Wishes From

CONCEPT ELECTRONIC ENGINEERING SOLUTIONS PVT. LTD.

Plot No. 54, Chinmay, Mayur Colony,
Kothrud, Pune - 411 038, Maharashtra
PH : 020 2545 9232, 2545 9233
Mobile: 098500 47898 Email : sanjaypataskar@ceespl.com

With best compliments from



Diligent Solutions Technology Services Pvt. Ltd.

A. N. Bapat
Director

7, Chintamani Apts. Plot No.16,
Chintamani Society, S. No. 25/4,
Karvenagar, Pune 411052.
Telefax : +91-20-25454446
Mobile : 9822450104, 9730200711
E-mail : dstspune@yahoo.co.in

मुलं –
आपल्या आईसोबत आहेत
शेतावर राबत

मुलं –
आपल्या वडलांसोबत आहेत
चामडं रंगवत

मुलं –
रेल्वेच्या डब्यात आहेत
उघडीवाघडी झाडपूस करत


मुलं –
वीटभट्टीवर आहेत
या जन्मापासून
त्या जन्मापर्यंत
विटा थापत

मुलं –
लाल सिग्नलवर आहेत
ऐन धोक्याच्या मधोमध
गाड्या चमकवत

मुलं –
ढाब्यांवर आहेत
सगळ्यांपुढे ताटं ठेवत, भांडी घासत
त्यांना भूक छळत नाही
रात्री उशीरपर्यंत

मुलं –
झोपू शकत नाहीत
मुलं स्वप्नं पाहू शकत नाहीत
स्वप्नं पाहायला बंदी आहे
त्यांच्यासाठी

मुलांना कोण सांगेल
शिक्षणाचा नवा कायदा आला आहे
त्यांच्यासाठी.



रेवतीरमण शर्मा

अनुवाद : गणेश विसपुते

ज्ञानभाषा मराठी

अनुराधा मोहनी



भाषेची घडण कशी होते, बोलीभाषा, प्रमाणभाषा, ज्ञानभाषा यात काय फरक आहे हे स्पष्ट करत ज्ञानभाषेची घडण कशी होते याचं मर्म या लेखात उलगडून दाखवलेलं आहे. शिक्षणमाध्यम आणि ज्ञानभाषा यांचं नातं, मराठी ही ज्ञानभाषा होण्याची गरज, त्यासाठी झालेले प्रयत्न, त्याबाबतची उदासीनता याचा लेखाजोखा मांडणारा हा विचारप्रवर्तक लेख.

ज्ञानभाषा म्हणून मराठीचा विचार करताना प्रथम बोलीभाषा आणि प्रमाणभाषा यांतील फरक समजून घ्यावा लागेल. बोली ही मुख्यतः बोलण्यासाठी असते. घरीदारी बोलली जाते. लहानशा किंवा मर्यादित प्रदेशामध्ये ती बोलली जाते. साध्यासुध्या दैनंदिन गरजांसाठी, तात्कालिक भावनांसाठी तिचा प्रयोग केला जातो. प्रमाणभाषा ही मुख्यतः लेखनासाठी असते. ती अधिक व्यापक प्रदेशात बोलली जाते, किंवा वेगवेगळ्या प्रदेशातील लोकांनी परस्परांशी बोलण्यासाठी तिचा वापर केला जातो. प्रमाणभाषा ही लिहिण्याची भाषा असल्यामुळे आणि चिन्हांवरून समजून घ्यायची असल्यामुळे तिचे व्याकरण काटेकोरपणे रचावे लागते. तिची शब्दसंपत्ती जास्त असते. टिकाऊ विचारांची नोंद करून ठेवण्यासाठी, नियम वा कायदे लिहिण्यासाठी, अक्षर वाङ्मयाची निर्मिती करण्यासाठी ती वापरली जाते, त्यामुळे ती स्थलकालनिरपेक्ष आणि निश्चितार्थक असावी लागते. बोलीभाषेप्रमाणे दर बारा कोसांवर ती बदलत नाही.

भाषा आणि परिभाषा

ही प्रमाणभाषा वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये शिरकाव करते तेव्हा ती देखील वेगवेगळी रूपे धारण करते. जसे की, राजकीय डावपेच लढवताना वापरावयाची भाषा वेगळी, प्रशासनिक कारभाराची भाषा निराळी, क्रीडामैदानावरील भाषा निराळी, (ही बहुधा खुणांची भाषा असते, परंतु खेळ पाहू न शकणाऱ्यांना त्या खेळाचा वा सामन्याचा आस्वाद घेता यावा यासाठी देखील एक वेगळी भाषा वापरली जाते). न्यायालयात वा न्यायिक कारभारात वापरायची भाषा निराळी, याप्रमाणे. ह्या सर्व भाषा म्हणजे एकाच प्रमाण भाषेची वेगवेगळी रूपे आहेत असे जे वर म्हटले आहे, त्याचे आता स्पष्टीकरण करू. मराठी भाषेच्या संदर्भात बोलताना ते असे करता येईल की वरील सर्व भाषांमध्ये एकाच प्रकारची रचना, समान क्रियापदे व त्यांची समान रूपे वापरली जातात. मात्र प्रत्येक ठिकाणी वापरले जाणारे शब्द वा वाक्प्रयोग निराळे असतात. षट्कार ठोकणे, त्रिफळा उडणे, धावचीत होणे हे क्रिकेटमधले तर पाटी बसणे हा हुतुतूमधील वाक्प्रयोग. खटला भरणे, दावा दाखल करणे, नुकसानभरपाई मागणे, आपसमेळ घालणे, दोन्ही शिक्षा एका वेळेस भोगणे, नगरपालिका घटित करणे, विधिग्राह्य असणे, साक्षीपुरावा देणे हे न्याययंत्रणेतील, तर टिप्पणी लिहिणे, पदोन्नती देणे, रजा टाकणे (मागणे), शिस्तभंगाची कारवाई करणे, बडतर्फ करणे हे प्रशासनिक भाषेमधील वाक्प्रयोग होत.

वरील सर्व उदाहरणांमध्ये करणे, होणे, देणे, घेणे ही सर्व क्रियापदेच असली, तरी त्यांच्या अगोदर आलेले शब्द मात्र भिन्न आहेत. ह्यांनाच त्या-त्या विषयांतील पारिभाषिक शब्द किंवा पारिभाषिक संज्ञा असे म्हणतात. हे शब्द म्हणजे प्रत्येक विषयातील मूलभूत वा प्रगत संकल्पनांना दिलेली नामे असून ते जाणीवपूर्वक घडवलेले आणि निश्चितार्थवाचक असतात. हे पारिभाषिक शब्द म्हणजे प्रमाणभाषेतील महत्त्वाचे घटक होत.

आदिम समाजामध्ये निसर्गातून ऐकलेल्या ध्वनींच्या आधारावर वस्तूंना नावे दिली गेली. हळूहळू त्यात इतरही संज्ञांची भर पडली. आपल्या इच्छा, मागण्या, निरोप इत्यादीसाठी जुजबी भाषा व क्रियापदेही तयार झाली. उदा. करणे हे क्रियापद कर (हात) वरून आले. कारण भाषेच्या सुरुवातीच्या काळात बहुतेक क्रिया हातानेच केल्या जात. नंतर जसजशी समाजाची व्यामिश्रता व व्यवहारांची गुंतागुंत वाढत गेली, तसतशी अधिक परिष्कृत भाषेची गरज भासली असणार. त्यातून प्रथम एक प्रमाणभाषा तयार होऊन त्यात नवनवीन शब्दांची भर पडत गेली. त्याच्याही पुढे नवीन संकल्पनांची भर पडून त्यांना मुद्दाम तयार केलेल्या संज्ञा देण्यात आल्या. अशा रीतीने एका प्रमाणभाषेत विभिन्न क्षेत्रांत वापरावयाच्या विभिन्न परिभाषा तयार झाल्या.

भाषा आणि ज्ञानभाषा

ज्ञानभाषा हा प्रमाणभाषेचा आणखी उन्नत असा आविष्कार आहे. ज्ञानभाषा म्हणजे शास्त्रांची भाषा. ही ज्ञानभाषा कशी तयार होते, ते आता बघू. कुठल्याही शास्त्राचा, म्हणजे मानवी जीवनाशी संबंधित अशा कुठल्याही अंगाचा विचार हा अर्थात भाषेमधूनच केला जातो. मग ती भाषा इंग्रजी असो, फ्रेंच असो, संस्कृत असो वा चिनी. त्या भाषेत प्रथम त्या विषयाची व्याख्या करून कोणत्या अंगाचा अभ्यास करावयाचा, हे निश्चित केले जाते. उदा. एकमेकांशी सामाजिक संबंध ठेवणाऱ्या वा असणाऱ्या व्यक्तींच्या समूहाला समाज असे म्हणतात आणि त्यासंबंधीच्या शास्त्राला समाजशास्त्र. मानव व अन्य प्राण्यांच्या वर्तनाच्या शास्त्राला मानसशास्त्र असे म्हणतात. तर अशी व्याख्या केल्यानंतर, ज्यांच्या मदतीने तो विचार पुढे न्यायचा असेल, त्या संकल्पना निश्चित करून त्यांना काही नवी नावे दिली जातात. ही झाली त्या शास्त्राची परिभाषा. त्यानंतर विविध प्रकारचे प्रयोग करणे, सर्वेक्षणे घेणे, त्यांच्या परिणामांवर प्रक्रिया करणे, निष्कर्ष काढणे, सिद्धांत मांडणे, विभिन्न कसोट्यांवर ते पडताळून पाहणे, चुकीचे ठरल्यास पुन्हा नव्याने मांडणे, पुन्हा तपासून पाहणे यामधून त्या शास्त्राची प्रगती होत जाते. ही वाट खाचखळग्यांची, चढउतारांची असते. अनेक मुद्यांचे खंडन-मंडन होते. अभ्यासकांचे वाद झडतात. 'वादे वादे जायते तत्त्वबोधः।' अशा रीतीने अपार कष्ट घेतल्यावर, बराच काळ उलटल्यानंतर एखाद्या शास्त्राचा डोलारा उभा राहतो.

ह्यामध्ये विचारांचे व अभिव्यक्तीचेही साधन असते भाषा. शास्त्रनिर्मितीच्या प्रत्येक टप्प्यावर भाषेची अपार गरज भासते. विविध अर्थच्छटांनी संपन्न असलेले विशाल शब्दभांडार तर त्याला लागतेच, परंतु भाषेला दिलेले एखादे विशिष्ट वळण किंवा शैली ह्यांचीही गरज भासते. एखाद्या शास्त्राची भाषा जेवढी सुघड किंवा बांधेसूद असेल, तेवढी त्यातील ज्ञानरचना पक्की, चिरेबंदी होते. वरील विवेचनावरून हे स्पष्ट होईल की स्वतंत्रपणे विचार करणाऱ्यांना व भाषेचा नावीन्यपूर्ण वापर करणाऱ्यांनाच ज्ञानाची रचना करता येते. असे करणाऱ्या समाजांमध्ये नवनवीन शास्त्रांचा उदय होतो. नवनवीन शोध लागतात.

ही ज्ञानाची रचना ज्या भाषेत केली जाते, तिला ज्ञानभाषा असे म्हणतात.





ज्ञानाची रचना ही ती करणाऱ्या व्यक्तीच्या स्वतःच्या भाषेत – जर ती भाषा पुरेशी समृद्ध असेल तरच – केली जाते हे आपण पाहिले. उदा. आयुर्वेदिक उपचारपद्धती आणि औषधनिर्मितीचे शास्त्र संस्कृतात रचले गेले. मुद्रणाचे शास्त्र गटेनबर्गच्या जर्मनमध्ये तर विमाने उडविण्याचे राइट बंधूंच्या इंग्लिशमध्ये. मद्यनिर्मितीचे कदाचित फ्रेंचमध्ये रचले गेले असेल. ही आहेत उपयोजित शास्त्रे. मूलभूत शास्त्रांचा विचार केला तर आज आपल्याला आवश्यक वाटणारी सर्वच शास्त्रे, मग ती विज्ञानातील असो वा मानविकीतील, ती पाश्चात्य देशांमध्ये विकसित झाली आणि इंग्लिश भाषेत आपल्याकडे आली. इतकेच काय, शास्त्रांची रचना करण्याची पद्धत, प्रयोगातून जास्तीत जास्त अचूक निष्कर्ष काढण्याची पद्धत, इतिहासाची साधने जतन करण्याची पद्धत, शब्दकोश तयार करण्याची, वेगवेगळ्या प्रकारच्या अचूक नोंदी ठेवण्याची अशा अनेक पद्धतीही, युरोप वा त्यातूनही मुख्यतः इंग्लंडमधूनच आपल्याकडे आल्या.

इंग्रजी वैश्विक भाषा?

हे ज्ञान ग्रहण कसे केले जाते, ते आता बघू. भारताच्या संदर्भात बोलायचे झाले तर वरील उदाहरणांतील व अन्यथाही बहुतांश शास्त्रे, तंत्रे व कला इंग्रजीतूनच शिकण्याचा प्रयत्न आपण करीत आलो आहोत. त्यांना भारतीय संदर्भांची जोड न देता, आपल्या समाजाच्या पायाभूत रचनेचा विचार न करता, आपल्या गरजांची वा संसाधनांची जाणीव न बाळगता आपण ती शास्त्रे जशीच्या तशी उचलण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी आपण इंग्रजीला वैश्विक भाषेचे बिरुद दिले आणि ज्यांच्या कानावर कधी चांगली इंग्रजी पडली नसेल अशा किंवा ज्यांच्या घरी अभ्यास घेऊ शकणारे पालक नाहीत, अशा बिगर शहरी, निम्नवर्गीय मुलांच्याही माथी इंग्रजी-माध्यम मारले.

गेल्या पंचवीस वर्षात इंग्रजी माध्यमाचे स्तोम एवढे वाढवूनसुद्धा आपल्या देशातील पाच ते सात टक्के लोकसंख्याच इंग्रजी जाणणारी आहे ह्यावरून इंग्रजी शिकण्याचे व शिकवण्याचे प्रयत्न कसे फोल गेले आहेत ह्याची कल्पना येईल. ज्ञान ज्या भाषेत रचले गेले, तीमधूनच ते ग्रहण केले पाहिजे हा एक अतार्किक आग्रह आहे. ह्या आग्रहामुळे ज्ञानाचा दर्जा खालावून तो माहितीच्या स्तरावर आला. न समजता घोकंपट्टी करण्याची पद्धत सुरू झाली आणि ज्ञानार्जनाला पोपटपंचीचे स्वरूप आले.

वास्तविक आपल्या भाषेत स्वतंत्रपणे विचार करणे, आपल्याला उपयुक्त ठरेल अशा, आपल्या सामाजिक, भौगोलिक परिस्थितीशी सुसंगत अशा ज्ञानाची आपल्या भाषेत रचना करणे आणि आपल्याच भाषेतून ते ग्रहण करणे हा ज्ञानार्जनाचा सर्वोत्कृष्ट मार्ग होय. ह्या ईप्सितापासून आपण अद्याप बरेच दूर आहोत. मातृभाषेतून शिक्षण ही घोषणा आपल्याकडेही दिली जाते, परंतु ह्या बाबतीतली आपली मजल अनुवादित विषय-साहित्य आणि इंग्रजीतून मराठीत आणलेली परिभाषा येथपर्यंतच मर्यादित आहे. अर्थात इंग्रजीतून घोकंपट्टी करण्यापेक्षा हे पुष्कळच चांगले आहे. काही वेळा असेच करावेही लागते, पण ते तरी आपण नीट साध्य केले का?

मराठीतील परिभाषा निर्मितीचे कार्य

एक मे एकोणीसशे साठ साली महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. त्यानंतर लगोलग जुलै महिन्यात भाषा संचालनालयाची स्थापना करण्यात आली. राज्यकारभारासाठी आवश्यक असलेली मराठी भाषा तेथे घडविण्यात आली. मराठीला ज्ञानभाषेचा दर्जा देण्यासाठी उपयुक्त अशी साधने म्हणून चौतीस परिभाषा कोश व अकरा इतर पुस्तके अशी एकूण ४५ प्रकाशने करण्यात आली. त्यांमध्ये वैद्यकशास्त्रावरचे पाच (Anatomy, Physiology, Medicine, Forensic Medicine, Pharmacy), अभियांत्रिकीचे तीन (Civil, Mechanical, Electrical), मानविकी शास्त्रांचे (मानसशास्त्र, समाजशास्त्र, तत्त्वज्ञान, राज्यशास्त्र इ.) सुमारे दहा व अन्य कोश ह्यांचा समावेश आहे. ह्या कोशांनी मराठीला केवळ शब्दसंपदाच नव्हे तर शब्द घडविण्याची शैलीसुद्धा बहाल केली. ह्या

कोशसंपदेचा मेरुमणी शोभणाऱ्या शासन व्यवहार कोशाने तर नव्या मनूतील मराठी युगाची पायाभरणीच केली आहे. महाराष्ट्र शासनाने भाषा सल्लागार मंडळ नावाचा उच्चस्तरीय गट नियुक्त करून व त्याच्या अंतर्गत विभिन्न विषयांच्या उपसमित्या तयार करून हे संपूर्ण कोशवाङ्मय सिद्ध केले.



मराठीतील आद्य कोशकार य. रा. दाते ह्यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. वि. भि. कोलते, प्रा. गं. बा. सरदार, मोहन शहाणे इत्यादी भाषाकोविदांकडून ही परिभाषा निर्मिती करून घेतली.

Pattern - आकृतिबंध
Patriarch - कुलपिता
Compassion - अनुकंपा
Co-parcener - सहदायाद
Plaster - पटलेप
Indemnity - शिक्षामोचन
Per se - स्वयमेव
Racket - कूटचक्र

इत्यादी पर्यायवाची शब्द त्या परिभाषेच्या अर्थवत्तेची, नेमक्या सुटसुटीतपणाची ग्वाही देतील.

ज्ञानभाषा मराठीची सद्यस्थिती

मात्र इतके थोर कार्य करूनही, ते लोकांपर्यंत पोहोचविण्यात सरकारला दारुण अपयश आले आहे. इतर तरी कोण हे करू शकणार होते? परिभाषा निर्मितीची जबाबदारी भाषा संचालनालयावर असली, तरी परिभाषेच्या प्रचार-प्रसाराची जबाबदारी कुठल्याच मंडळाकडे नेमून देण्यात आली नाही. परिभाषा कोशांची जाहिरात करण्यात आली नाही. ते फक्त शासकीय ग्रंथागारांमध्येच विक्रीला ठेवण्यात आले, जेथील विक्रीबाबतची अनास्था आणि कामाच्या गैरसोयीच्या वेळा ह्यांच्यामुळे इच्छुक वा माहीतगार माणसालाही ते सहजगत्या खरेदी करता येत नाहीत. आता हे कोश www.bhasha.maharashtra.gov.in ह्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले असले तरी संगणक-निरक्षर, ग्रामीण, बहुजनसमाजातील शिक्षण घेणारी पहिली पिढी इत्यादींना ते अजून दुष्प्राप्यच आहेत. कहर म्हणजे पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ (बाल भारती) आणि विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ (जेव्हा अस्तित्वात होते तेव्हा) ह्यांच्यावर शासकीय परिभाषा वापरण्याचे बंधन होते किंवा कसे ह्याबद्दल कोणताही निर्देश आढळत नाही. मुद्रणबाह्य परिभाषा कोश पुन्हा छापून घेण्याचे काम भाषा संचालनालयातून अत्यंत मंदगतीने सुरू आहे. त्याच्यावर कोणाचाच वचक नाही. परिभाषा-कोशांच्या अद्ययावतीकरणाचे घोडेही असेच पेंड खाते आहे. ह्या कोशामध्ये नवीन शब्दांची भर घालण्याचा अधिकार ज्या भाषा सल्लागार समितीचा असतो, ती मध्ये कित्येक वर्षे अस्तित्वात नव्हती. त्यामुळे नवीन परिभाषा निर्मितीचे काम ठप्प होते. नवीन विषयांचे काम हाती घेणे तर दूरच, विद्यमान कोशांचे अद्ययावतीकरणही होत नव्हते. दि. २२ जून २०१० रोजी न्या. नरेंद्र चपळगावकर ह्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती घटित करण्यात आली, त्यासंबंधीच्या शासन निर्णयामध्ये सांगितलेली उद्दिष्टये पुढील प्रमाणे होती.

- भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या अनेक कोशांमध्ये नवीन प्रचलित शब्दांची भर घालून कोश अद्ययावत करणे,
- नवीन कोशांची निर्मिती करणे,
- परिभाषा कोशांचे पुनर्मुद्रण,
- परिभाषेतील अत्यावश्यक परिष्करणे,
- शब्दव्युत्पत्ती,
- मराठी पारिभाषिक संज्ञांच्या समस्या सोडविणे
- महाराष्ट्र राज्याचे साधारणपणे पुढील पंचवीस वर्षांचे मराठी भाषेचे धोरण ठरविणे,
- भाषा अभिवृद्धीसाठी नवनवे उपाय व कार्यक्रम सुचविणे आणि त्या अनुषंगाने शासनाला मार्गदर्शन करणे.

परंतु तीन बैठका घेतल्यानंतरच न्या. चपळगावकरांनी अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. पैकी दि. २६ नोव्हेंबर २०१० रोजी औरंगाबाद येथे झालेल्या बैठकीत भाषा सल्लागार समितीच्या अधीनस्त काम करणाऱ्या म्हणून पुढील आठ उपसमित्यांची रचना करण्यात आली होती.

१. मराठी भाषेतील व्यवहार आणि संगणकविषयक उपसमिती
२. शालेय व विद्यापीठ अभ्यासक्रमात मराठी प्रथम व द्वितीय भाषा आणि माध्यमविषयक उपसमिती
३. मराठी भाषेच्या बोली आणि आदिवासी बोलींचे शब्दकोश, विशेष पाठ्यपुस्तके तयार करण्याची गरजविषयक उपसमिती
४. अनुवाद केंद्र संकल्पना आणि तयारीविषयक उपसमिती
५. शासनाने तयार केलेल्या विविध शब्दकोशांचे अद्ययावतीकरणविषयक

उपसमिती

६. शासकीय विभाग, कार्यालये, सार्वजनिक उपक्रम तसेच न्यायसंस्था यांत मराठीचा वापर – अडचणी जाणून घेणे व उपाय सुचविणेविषयक उपसमिती
७. परप्रांतात राहिलेल्या, सीमा भागातील व इतर भागांत राहात असलेल्या मराठी भाषिकांच्या भाषेचे संरक्षण व संवर्धन त्यासाठीची उपाययोजनाविषयक उपसमिती
८. मराठी भाषेची प्रयोगशाळा व संग्रहालय संकल्पना आणि तयारीविषयक उपसमिती

ह्यांपैकी शब्दकोशांचे अद्ययावतीकरण विषयक उपसमितीमध्ये संयोजक म्हणून विलास खोले ह्यांचे तर सदस्य म्हणून रामदास डांगे, बाळ फोंडके आणि नीलिमा गुंडी ह्यांची नावे घातलेली आहेत. इतर तीन स्थाने रिक्त असून त्यातील नावे नंतर निश्चित करण्यात येतील असे नमूद केले आहे. त्यानंतर एप्रिल २०१२ मध्ये अध्यक्षपदी नागनाथ कोतापल्ले ह्यांची नियुक्ती करण्यात आली, परंतु कामास काही चैतन्य वा गती प्राप्त झालेली नाही. महिन्यातून एक बैठक व्हावी असे अपेक्षित असताना आजवर समितीच्या तीन बैठका झाल्या आहेत. उपरोक्त उपसमित्या आता अस्तित्वात वा कार्यरत आहेत किंवा कसे हे सांगता येत नाही. समितीत बावीस अशासकीय आणि पाच शासकीय असे एकूण सत्तावीस सदस्य आहेत. त्यांच्यापैकी बरेच नामांकित साहित्यकार असले, तरी भाषातज्ज्ञ वा कोशकार नाहीत. थोडक्यात, ही भाषा सल्लागार समिती आजही असून नसल्यागत आहे. भाषा संचालनालयाच्या एकूण ३३ परिभाषा-कोशांपैकी बहुतेक ऐंशीच्या दशकात आणि इतर काही १९९५ ते ९७ ह्या काळात प्रकाशित वा पुनर्मुद्रित झाले आहेत.



ह्या जुन्या कोशांचे गठ्ठे शासकीय गोदामांचे धन बनून राहिले आहेत. इंग्रजी न जाणणाऱ्या ज्या सामान्य माणसाला ज्ञान मिळावे म्हणून एवढी उठाठेव केली, त्याच्यापर्यंत परिभाषा पोचलीच नाही.

मातृभाषा ज्ञानभाषा परस्परसंबंध

शिक्षण माध्यमाच्या बाबतीत ज्ञानभाषेचा प्रश्न हा अतिशय जिव्हाळ्याचा आहे. कारण ज्ञानभाषा म्हणून पद्धतशीरपणे विकसित झाल्याशिवाय कोणत्याही भाषेचा शिक्षण-माध्यम म्हणून उपयोग करता येत नाही. मराठीला जर आपण मनातून व व्यवहारातून ज्ञानभाषेचा दर्जा देणार असलो, तरच आपले मराठी माध्यम सार्थकी लागेल. अन्यथा इंग्रजी माध्यम दुसरीपासून द्यायचे, पहिलीपासून की बालवर्गापासून एवढा फक्त तपशीलाचा भागच सोडवायचा शिल्लक राहील. कारण, मराठी माध्यम कितव्या वर्गापर्यंत साथ देऊ शकणार? मग उद्या जे द्यावयाचे, ते आजच का नको? असा पालकवर्गाचा सवाल आहे. इंग्रजी माध्यमाच्या बाजूने जनमताचा जबरदस्त रेटा आहे. दुसरीकडे, न समजणाऱ्या भाषेतून शिकण्याचे बालकांवर प्रचंड दडपण आहे. त्याने त्यांचा शिकण्यातील आनंद हिरावून घेतला आहे. घोकंपट्टीच्या ह्या काळात स्वतंत्र विचार आणि ज्ञानरचना ह्यांची वानवा आहे. उदा. मोसमी हवामानाच्या आणि कोरडवाहू शेतीच्या ह्या देशात ढगांचे वहन वा लागवड करून हुकमी पाऊस कसा पाडता येईल ह्याबाबत काहीच शास्त्रीय अभ्यास होत नाही. दरिद्री, भुकेकंगालांच्या देशासाठी महागड्या निवडणूक पद्धतीला किंवा न्यायदानाच्या लांबलचक प्रक्रियेला काय पर्याय असू शकेल यावर प्रामाणिक, तात्त्विक वाद झडत नाही. कुठे काही थोडी साधक-बाधक चर्चा झालीच, तर तिला जातीयतेचा वा तसाच कुठलातरी रंग फासून सर्वांना चिडीचूप करून टाकले जाते. वास्तविक मूलगामी विचार आणि मातृभाषा ह्यांचे नाते फार जवळचे आहे, पण आपण दोहोंकडे पाठ फिरवून बसलो आहोत. ह्या सर्वांच्या परिणामी इंग्रजीला पर्याय नसल्याची भावना बोकाळत आहे, आणि इंग्रजी न येणारी मुले झपाट्याने शिक्षण प्रक्रियेच्या बाहेर फेकली जात आहेत. भाषा आणि समाज ह्यांचा विचार करता असे आढळून येते की मराठीतील अभिव्यक्ती मंदावल्यामुळे ती भाषा दिवसेंदिवस दुर्बल व क्षीण होत आहे. स्वतःच्या भाषेस पारखा झालेला मराठी समाज संस्कृतीसही पारखा होत होत आपले स्वत्व गमावण्याच्या टप्प्यावर येत आहे.

.....परिभाषा निर्मितीचे काम जरी झाले असले, तरी मुख्य प्रश्न स्वतंत्र विचारांचा आणि नवीन ज्ञानरचनेचा आहे.....

▼▼▼

अनुराधा मोहनी, शिरपूर, धुळे
मराठी, संस्कृत, जनव्यवस्थापन विषयात एम.ए., हिंदी राष्ट्रभाषा पंडित. भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य येथून साहाय्यक संचालकाच्या पदावरून स्वेच्छानिवृत्ती. 'आजचा सुधारक' ह्या विवेकवादी चिंतनाला वाहिलेल्या मासिकाच्या कार्यकारी संपादक, संपादकीय साहाय्य गट (मराठी) राष्ट्रीय अनुवाद मिशनच्या सदस्य.
anumohoni@gmail.com

इंग्रजी जाणणाऱ्यांचे वर्चस्व

२००१ च्या जनगणनेनुसार भारतामध्ये फक्त २.३ लाख भारतीयांनी आपली प्रथम भाषा इंग्रजी असल्याचे नमूद केले. म्हणजेच भारतातील फक्त ०.०२ टक्के लोकांची मातृभाषा इंग्रजी आहे. आपली द्वितीय भाषा इंग्रजी सांगणाऱ्यांची संख्या ८.६ कोटी. तर तृतीय भाषा इंग्रजी असल्याचे सांगणाऱ्यांची संख्या ३.९ कोटी होती. यापैकी किती जणांना खरेच चांगल्या प्रकारे इंग्रजी वाचता - लिहिता - बोलता येते याबाबत शंकाच आहे. तरीही हे आकडे खरे असल्याचे मानले तर इंग्रजी येणाऱ्यांची संख्या होते १२-१३ टक्के. बाकी ७८ टक्के लोकांना इंग्रजी येत नाही. आणि देशावर राज्य करणारे, देशाची धोरणे ठरवण्याचे काम करणारे लोक हे मूठभर इंग्रजी येणारे लोक असतात. प्रशासनाचे उच्चस्तरीय काम इंग्रजीमधून होते. उच्च न्यायालये आणि सर्वोच्च न्यायालयांचे काम इंग्रजीमध्ये असते. अशा परिस्थितीमध्ये प्रशासन आणि सामान्य माणूस यांच्यामध्ये मोठी दरी राहते. सरकारी यंत्रणेच्या मनमानीवर लोकांचा अंकुश राहूच शकत नाही. जनतेची भागीदारी, जनतेचे सशक्तीकरण, पारदर्शिता या सगळ्या संज्ञा अशा परिस्थितीत पोकळच राहतात.

जनगणना, विश्वासघात व दोहरा विभाजन, भारत की भाषाई विडंबना और उसका मुकाबला,
लेखक - सुनील, अनुवाद - अनघा लेले

With Best Compliments From

Anand & Rashmi Sabale

Anand Sabale
Nikash Lawns, Building A1/4,
S. No. - 140/3, Sus Road,
Pashan, Pune - 411021

Best Wishes From

MANAS ENGINEERING CORPORATION

Manufacturer of Precision Cutters

Datta G. Gholba

Mobile : 9822881939

4/5/6, Parvati Towers, 82, Parvati, Pune - 411 009
Tel./Fax : 020 24440379,
Email : dattagholba@vsnl.net

MIDAS REMEDY

EXPERIENCE LEARN ENLIGHTEN

100 % freedom from stress & hypertension,
hormonal imbalance, migraine, problems related obesity
& Digestion, weight management, sleeplessness,
body aches & pains, gynac problems and many more.....

Venue: Gandhi Bhavan, kothrud, pune

By Accupressure,magnetotheropy,yoga
and correct information about what food not to eat

LIFE WITHOUT MEDICINE

CALL US 9689 301818/9822 301818
from 10.00am to 4.00pm
Sessions on sat./sun. from 10.00am - 4.00pm

EMAIL - varsha@midasremedy.com
VISIT US AT www.midasremedy.com

‘इल्म’कडे नेणारं भाषामाध्यम हवं...





शिक्षणाच्या भाषामाध्यमाचा विचार करताना उर्दू माध्यमाची चिकित्सा होणं आवश्यक ठरतं. समाजाच्या एका समूहाची – मुस्लीम समाजाची भाषा म्हणून उर्दूला ‘ओळख’ दिली गेली आहे. या विषयाच्या अनुषंगानं मुस्लीम सामाजिक कार्यकर्त्या– अभ्यासक डॉ. रझिया पटेल आणि उर्दू शासकीय डी.एड. महाविद्यालयाच्या प्राचार्या सुजाता लोहकरे यांची चर्चा झाली. ह्या चर्चेतून हा व्यामिश्र प्रश्न समजावून घ्यायला मदत होते.

सुजाता : उर्दू माध्यमाच्या डी.एड. महाविद्यालयाची प्राचार्य म्हणून काम करत असताना पहिल्यांदा माझी मुस्लीम मुलींशी जवळून ओळख झाली. त्यांच्याशी, शिक्षकांशी होणाऱ्या गप्पांमधून, चर्चांमधून मला उर्दू माध्यमाच्या शाळांविषयी अधिक काही जाणून घ्यावं असं वाटू लागलं. मुळात मुद्दा असा आहे की, उर्दू माध्यमाच्या शाळांमध्ये जाणाऱ्या मुलांमुलींची उर्दू ही काही मातृभाषा नाही, बोलीभाषा नाही की परिसरभाषाही नाही, कारण ती त्यांना घरात किंवा इतरत्र विशेष ऐकायलाही मिळत नाही. अगदी इंग्रजीसारखे, उद्या जगात लागेल म्हणून आजच त्या माध्यमात घालावं, असं जे आजकाल अनेक पालकांना वाटतं, तसं नोकरीच्या पुढच्या संधी किंवा पैसा देणारंही हे माध्यम नाही. मग असं असताना या उर्दू-माध्यमाचं प्रयोजनच काय आहे? शिवाय या शाळांमध्ये बहुसंख्येनं मुली आहेत, असंही दिसतं. असं का, असा मला प्रश्न पडलेला आहे.

रझिया : उर्दू माध्यमाच्या शाळांमध्ये फक्त मुलीच असतात असं नाही, थोडे मुलगेही असतात, पण मुली तुलनेनं बऱ्याच जास्त प्रमाणात असतात, हे खरंच आहे. उर्दू शाळा ह्या सरकारी आहेत, खासगी नाहीत. त्यामुळे इथे श्रीमंत वर्गातली मुलंमुली जवळजवळ नसतातच, ती साधारणत: इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये पाठवली जातात. जवळपास फक्त जिल्हा परिषदेचीच शाळा उपलब्ध असेल तर अशा वेळी नाईलाजानं पालक उर्दू शाळांमध्ये मुलांना घालतात. त्यातही ज्यांना परवडतं ते पालक महाग पडलं तरी शक्यतो मुलग्यांना इंग्रजीतून शिक्षण देतात आणि स्वस्त शिक्षण (उर्दू माध्यमांतून) मुलींना देतात. ज्यांना इंग्रजीतून परवडतच नाही ते मात्र मुलगा-मुलगी दोघांनाही उर्दू शाळेतच घालतात.

सुजाता : तशाही परिस्थितीत पुढे जाणाऱ्या मुलींबद्दल ऐकलं, कधी गुणवत्ता यादीमध्ये येणाऱ्या मुस्लीम मुलींचे फोटो वर्तमानपत्रात बघितले की या मुलींचं मला भारी कौतुक वाटतं. पण त्या पुढे कुठे हरवतात की काय असा प्रश्न पडतो. त्यांच्या ह्या हरवून जाण्यात त्यांच्या शिक्षण-माध्यमाचा वाटा किती, उर्दूत शिकून या मुलींना नक्की काय मिळतं, त्यांच्या आयुष्याची दारं उघडली जाताहेत का बंद होताहेत, असे प्रश्न माझ्या मनात आहेत.

ਭਾਸ਼ਾ
ভাষা
ಭಾಷೆ
மொழி
ഭാഷ
भाषा Language

उर्दूमध्ये ज्ञानाला किती सुंदर शब्द आहे इल्म! ते 'इल्म' देणारं हे शिक्षण आहे का...असाच माझा खरा प्रश्न आहे.

रझिया : 'इल्म'ची गोष्ट म्हणशील तर ते आजची शिक्षणव्यवस्था कुणालाच देत नाहीये. किंबहुना ही शिक्षणव्यवस्था ज्ञानाची खरी दारं उघडतच नाही.

सुजाता : पण वाचा-लिहायला शिकल्यावर निदान बाहेरचं जग खुलं होतं; आपली आपल्याला पुढं चालायची वाट सापडते !

रझिया : लिहिण्या-वाचण्याची कौशल्यं आत्मसात होणं, हा वेगळा भाग झाला. पण ज्ञान किती मिळतं, संधी किती मिळते हा विचार करण्यासारखा मुद्दा आहे. पुन्हा या कौशल्यांचा पुढे किती उपयोग करता येतोय ते लग्न, सासरचं वातावरण काय वाट्याला येतं इत्यादींवर अवलंबून राहणार. जिथे पुस्तकसुद्धा मिळत नाही, तिथे या कौशल्यांचा काय उपयोग होणार?

सुजाता : ते खरंय. पण तरीही विचारांची मोकळीक मिळण्याची शक्यता एरवीच्या शिकण्यातून जरा तरी असते आणि हे वाचन म्हणजे केवळ कौशल्य पातळीवरचं वाचन नव्हे तर वाचनातून समज निर्माण होण्याच्या प्रक्रियेविषयी मी म्हणत होते.

रझिया : खरं तर तशी समज विकसित व्हावी यासाठी इतरही काही गोष्टींची आवश्यकता असते, असं मला वाटतं. स्वत: शिक्षक, शिक्षकाचा विद्यार्थ्यांशी असणारा संवाद, पाठ्यपुस्तकं आणि शाळेची संस्कृती यावर ती समज किंवा ते आकलन अवलंबून असतं. हे सगळं शाळांमध्ये आहे की नाही हे तपासायला हवं.

...आणि भाषेविषयी म्हणशील तर आपण जी भाषा शिकतो, ती आपण किती वापरतो यावर तिच्यातून होणारा विकास अवलंबून असतो. आजची स्थिती अशी आहे, की भाषा बदलत चाललीय. भाषेचं राजकारण, संगणकाचं वाढतं प्रस्थ अशा गोष्टींचाही भाषेवर विपरीत परिणाम होताना दिसतोय. पण या बदललेल्या भाषेची आणि स्थानिक भाषांमधील विविधतांची पाठ्यपुस्तकांनी कितपत दखल घेतलीय हेही बघायला हवं.

तू जी विचारांची मोकळीक म्हणतेयस त्या बाबतीतही मला असं वाटतं की, प्रत्येक माणूस विचार करूच शकतो, तो शाळेत गेलेला असो किंवा नसो. 'का' हा प्रश्न त्याला पडतोच ! त्याच्या सभोवती काय वातावरण आहे, यावर त्याचे विचार पुढे पोसले जातात. प्रश्न फक्त अभिव्यक्तीच्या संधीचा असतो. आणि शाळेत ती किती मिळते हे महत्त्वाचे आहे.

सुजाता : हे बरोबर आहे, फक्त भाषेमुळेच विचार करता येतो असं नाही. पण तरी भाषेनं विचारांना, मनात घडणाऱ्या प्रक्रियेला नेमकेपणा येतो. विचारांना दृश्य आणि अदृश्य असं रूप भाषेनं मिळतं. त्यामुळेच मला मातृभाषेपेक्षा वेगळ्या भाषेत शिकणाऱ्या आणि आपल्या उर्दू शाळांमधून शिकणाऱ्या सगळ्याच मुलांच्या बाबतीत ही विचारांची जागा कशी शोधली जात असेल, असा प्रश्न पडतो.



रझिया : माझ्या मते विचार न करता येण्याचं मुख्य कारण आहे साचेबद्धता. 'गप्प बस', 'मुलीच्या जातीनं प्रश्न विचारू नयेत' असं घरी मुलींना सांगितलं जातं, हा समाजाचा साचेबद्धपणा आहे. आणि शाळेमध्ये शिक्षक सांगतात, 'हाताची घडी, तोंडावर बोट', ही शिक्षणपद्धतीची साचेबद्धता आहे. विचार करण्याचा संबंध कुठल्याही माध्यमापेक्षा परिस्थितीला प्रश्न विचारण्याशी जास्त आहे. हे पान का हललं? हे असंच का? माझ्याच बाबतीत का? माझ्या आईनं पुरुषाइतकंच काम केलं तरी तिला कमी मजुरी का? असे प्रश्न पडणं आणि ते विचारणं, हा खरा विचारांचा पाया आहे. असे प्रश्न विचारण्यासाठी लागणारं धाडस निर्माण होण्यात समाजाच्या आणि शिक्षणपद्धतीच्या साचेबद्धपणामुळे निश्चितच अडथळा निर्माण होतो.

सुजाता : प्रश्न पडण्याच्या बाबतीतला माझा एक अनुभव इथे सांगते. मुलींच्या मनात काय काय चाललंय हे समजून घेण्यासाठी, आमच्या शाळेत आम्ही एक प्रश्नपेटी ठेवली होती. मुलींनी त्यांना हवे ते प्रश्न लिहून त्यात टाकावेत असं सांगितलं होतं. इतके वेगवेगळ्या प्रकारचे प्रश्न आले! खुदाने ये दुनिया क्यू बनायी?; कैसे बनायी?; हमारे स्कूलमे दो दो युनिफॉर्म क्यूं नहीं हैं?; हमे पढनेके लिये कहानी की किताबें क्यू नहीं हैं? असे अनेक प्रश्न मुलींच्या मनात होते. म्हणजे त्यांच्याजवळ प्रश्न विचारण्याची क्षमता आहे, धाडस आहे. असंच म्हणावं लागेल ना?

रझिया : हो, पण हा उपक्रम तुमच्याकडे तुम्ही राबवलात, तशी मोकळीक, तसा अवकाश किती ठिकाणी शिक्षक देतात? साचेबद्धतेला आव्हान देणारी कोणती कृती आपण डोळसपणे आणि जाणीवपूर्वक करतो आहोत, हे त्यामुळेच फार महत्त्वाचं ठरतं.

एकदा आम्ही मुलींची सहल खेड-शिवापूरच्या दर्ग्यामध्ये नेली होती. तिथे बायकांना / मुलींना आत प्रवेश नसतो. तेव्हा एका मुलीनं विचारलं, ''अल्लाहतालाने तो सबको बनाया । मर्दको और औरतको, फिर सिर्फ औरतोंको क्यूं नही अंदर जाने देते?'' मी तिला म्हटलं की अपनी आपासे (ताईंना : शिक्षिकेला) पूछो, तर ती म्हणते, ''डर लगता है.'' खरं म्हणजे ही नुसतीच भीती नाही. मुलींना प्रश्न पडतात, त्यांची उत्तरं जाणून घ्यायची उत्सुकता त्यांना असते. पण शिक्षिकेशी जर त्यांचं संवादाचं नातं नसेल तर त्या प्रश्न विचारायला घाबरतात. तसंच शिक्षिका स्वत:च स्वत:ला काही प्रश्न विचारत नाहीत, आहे ती परिस्थिती स्वीकारत ती बिचारी निमूटपणे बाहेर बसून राहिली आहे. अशा वेळी मुलींना शिक्षिकेविषयी कसा विश्वास वाटणार? अनेकदा मुलांना धड्याबाहेरच्या प्रश्नांसाठी अवकाश तरी दिला जातो का? तर सहसा नाही. 'मुलांना अवकाश देणं' आवश्यक आहे हेच आधी एकंदरीनंच आपल्या शिक्षणपद्धतीमध्ये किती आहे? शिवाय, यात शिक्षिकांचं स्थान काय? त्या सामाजिक व्यवस्थेत स्त्री तर शासकीय व्यवस्थेत नोकरदार. त्यांच्याकडून मुलांना मूलभूत असं कितपत मिळणार? तुला सांगते, शिक्षकप्रशिक्षणामध्येही ह्या मुद्याचा विचार केला जातो, असं मला फारसं दिसून आलं नाही.

आम्ही जेव्हा शिक्षकांची अनौपचारिक प्रशिक्षणं घेतली, तेव्हाचा एक प्रसंग सांगते. ''गांधीजींनी म्हटलं आहे की, शिक्षकानं मातृहृदयी असलं पाहिजे, म्हणजेच मुलानं न सांगता जशा आईला गरजा कळतात, त्याप्रमाणे शिक्षकांनाही कळल्या पाहिजेत.'' असं आम्ही म्हटल्यावर, 'लेकिन हमको कोई कहा माँ का दर्जा देता है? हम तो प्रशासन के नोकर है' असं एक शिक्षिका उद्गारली. हेही खरंच आहे. त्यांना ठरवूनच दिलंय, हे तुम्ही करायचंय, एवढं करायचंय, अशा पद्धतीनं करायचंय आणि इतक्या वेळात करायचं, आम्ही इथे छडी घेऊन थांबलेलो आहोत बघायला. आपल्याकडे प्रयोगशीलतेला जागा आहे का?

सुजाता : प्रयोगशीलता सोडाच पण आपल्याकडच्या सगळ्याच शाळांमध्ये मुलांनी ऐकायचं असेल तर शिक्षकानं हातात छडी घेतलीच पाहिजे, अशी भावना सार्वात्रिकरित्या दिसून येते. अशा पद्धतीनं छडीनं, छडीच्या धाकानं शिक्षक एखादा प्रश्न तात्पुरता सोडवतात, पण त्यातून सगळे प्रश्न असे 'मारून' सोडवायचे असतात, असा संदेश मुलांना मिळतो, त्याचं काय !

रझिया : खरंय, शिक्षकांकडून मुलांना मिळणारी वागणूक हा प्रश्न तर सगळ्याच शाळांमध्ये आहे, 'अभय अभियान'च्या सर्वेक्षणातून मुलांना शाळेत दिल्या जाणाऱ्या शिक्षांबाबत किती भयानक गोष्टी समोर आल्या होत्या - शिक्षकांनी मुलाचं डोकं भिंतीवर, किंवा बाकावर आपटणं वगैरे. शिवाय मुलांसाठी वापरली जाणारी, मनावर चरे उमटवणारी अपमानकारक भाषा ! आपण एकीकडे पाठ्यपुस्तकांमधल्या भाषेविषयी बोलतोय, की काय हवं, कसं हवं... त्याच प्रकारे, शिक्षकांची भाषा नको का बघायला? संवादाची भाषा हे पण एक माध्यमच आहे ना ! अर्थात या बाबतीत मला असं जाणवलं की मुलाच्या आणि शिक्षकाच्या आर्थिक स्तरातला फरक, जातीतली उतरंड या सगळ्याचा तो एकत्रित परिणाम आहे.

दुसरं असं की, शिक्षक प्रशिक्षणामध्येही मुलाच्या परिस्थितीकडे बघायचं असतं असं कुठे सांगितलं जातं? मूल कुठल्या परिस्थितीतून आलंय, त्याच्या घरी त्याला काय ताण आहेत, या सगळ्याला शिक्षकांच्या लेखी काहीच जागा नसते. ताराबाई मोडकांसारखी एखादीच मुलांच्या डोक्यातल्या उवा काढण्यापासून सुरुवात करून आदिवासींच्या मुलांना शिक्षणात आणते, मुलांची आई होते. आपल्याकडे शिक्षक असा 'आई' होत नाही ना..!

आणखीन एक मुद्दा मला शिक्षकांच्या आणि मुलांच्या नात्यासंदर्भात महत्त्वाचा वाटतो, तो म्हणजे मुलांना अनेकदा असलेली स्पर्शाची ओढ. त्यांना शिक्षकाच्या हाताला हात लावायचा असतो, पदराला हात लावायचा असतो, स्पर्श करायचा असतो. ह्या गोष्टींसाठी सर्वच शिक्षक तयार असतात का? ही पण एक भाषाच आहे ना...?

सामाजिक वातावरणात स्त्रीला मिळणारी दुय्यमत्वाची वागणूक, शिक्षकांकडे बघण्याचा समाजाचा / शासनाचा दृष्टिकोन, वरच्या अधिकाऱ्यांकडून मिळणारी हीनत्वाची वागणूक, घरातले - बाहेरचे काबाडकष्ट अशा सगळ्याचा एकत्रित परिणाम शिक्षकांवर, विशेषतः स्त्री शिक्षकांवर पडणाऱ्या ओझ्यात दिसून येतो.

म्हणजेच शिक्षण-माध्यमाचा विचार करताना पाठ्यपुस्तकांची, शिक्षकांची शिक्षक-प्रशिक्षणाची आणि शिक्षक-विद्यार्थी यांच्यातल्या संवादाची भाषा अशा सगळ्या भाषा काय आहेत, याचा सगळ्याच पातळ्यांवर विचार केला पाहिजे.

सुजाता : हो, भाषा म्हणजे केवळ चिन्हांकित भाषा इतका संकुचित अर्थ आपण घ्यायला नको. शिक्षकाचा मुलांशी असणारा संवाद ज्या वेगवेगळ्या माध्यमांमधून होतो, त्याकडे लक्ष द्यायला हवंय.

उर्दू शाळेतल्या मुलींबरोबर काम करताना मला आणखी एका गोष्टीची उणीव जाणवते, ती म्हणजे त्यांच्यासाठी उपलब्ध नसलेलं वाचनसाहित्य. खरं म्हणजे उर्दूमध्ये अतिशय समृद्ध असं साहित्य उपलब्ध आहे आणि शाळांमधून सातवी-आठवीच्या पुढे त्याचा काही प्रमाणात उपयोगही होतो, पण लहान मुलांसाठी मात्र उर्दू भाषेतली चांगली पुस्तकं बाजारात उपलब्धच नाहीत. असं का? उर्दूत

लहान मुलांसाठी तितकंसं साहित्य निर्माणच झालेलं नाही का?

रझिया : आपल्याकडे महाराष्ट्रात तरी असं दिसतं की, उर्दूमध्ये लहान मुलांसाठी खूपच कमी साहित्य उपलब्ध आहे. धार्मिक-पोथीसारखी काही पुस्तकं आहेत, पण ज्यातून मनाचं आणि विचारांचं पोषण होईल, मनोरंजन होईल, अशी पुस्तकं कमी आहेत. 'खिलौना' नावाचं मुलांसाठीचं एक मासिक पूर्वी निघायचं. पण आता तेही बंद झालं आहे. नवनीत आणि पाठ्यपुस्तकं सोडून मुलांना विशेष काही वाचायला मिळत नाही, ही गोष्ट अगदी खरी आहे. नाही म्हणायला नुकतीच 'प्रथम बुक्स' या दिल्लीच्या संस्थेनं काही पुस्तकं प्रकाशित केलेली आहेत, त्यात त्यांनी विविध भाषा-लिपी वापरल्या आहेत. म्हणजे मराठी - इंग्रजी - हिंदी - उर्दू एकत्र. त्याचा आम्ही भरपूर वापर करतो. पण तरीसुद्धा हा प्रश्न उरतो की उर्दू कितीही आलं तरी त्यातून शिकण्याचा पुढे उपयोग काय? ते काही या देशात सरकारदरबारी वापरलं जात नाही, मित्रांशी बोलायला ते उपयोगाचं नाही, शिवाय ती मातृभाषा आहे असंही फारसं दिसत नाही. म्हणजे ती एक सुंदर भाषा आहे, म्हणून ती जरूरच शिकावी, पण शिक्षणमाध्यम म्हणून वापरताना ते व्यवहार्य असायला पाहिजे, तसं ते नाही.

आम्ही अशी सूचना केली होती की सगळ्या शाळांमध्ये, अगदी मराठी शाळांमध्येसुद्धा, 'उर्दू भाषा' हा एक विषय म्हणून ठेवा. कारण पर्शियन आणि इथल्या काही भाषा मिळून तयार झालेली ती एक अत्यंत उत्कृष्ट आणि अभिमान वाटावा अशीच भाषा आहे. त्यामुळे ती जिवंत राहिली पाहिजे असं कुणीही म्हणेल.

पण इथे, उर्दू टिकवण्यासाठी नाही तर तिचा वापर अस्मितेच्या राजकारणामध्ये करण्यासाठी या शाळांमध्ये ते माध्यम वापरलं जातं आहे. एकीकडे असं आहे की अल्पसंख्याकांना त्यांची भाषा, लिपी जपण्यासाठी, वाढवण्यासाठी त्यांच्या शिक्षणसंस्था काढण्याचा, त्या जतन करण्याचा अधिकार घटनेच्या कलम २९-३० नुसार आहे. संविधान असंही म्हणतं की, प्रत्येकाला आपल्या मातृभाषेत शिक्षण मिळालं पाहिजे.

पण उर्दू ही मातृभाषा कुणाची आहे, तर केवळ ५ टक्के मुस्लिमांची, 'एलिट क्लास'ची, लखनवी नवाबांची, राज्यकर्त्यांची. ब्राह्मणी मराठी जशी प्रमाणभाषा म्हणून आली, तशी तिथेही नवाबाची भाषा प्रमाण म्हणून स्वीकारलेली दिसते. पण सर्वसामान्य मुसलमानांच्या भाषा वेगवेगळ्या आहेत - दखनी, मुसलमानी वगैरे. पण शिक्षणाच्या भाषा माध्यमाला अस्मितेच्या राजकारणाचा मुद्दा बनवला गेला आणि उर्दू ही माध्यमभाषा

'फोडा आणि झोडा'मध्ये भाषेचा वापर

ऐतिहासिक दृष्ट्या विचार करता, हिंदी, उर्दू आणि हिंदुस्तानी या भाषांमध्ये अंतर पडण्याची सुरुवात ४ मे, १८०० रोजी कलकत्त्यामध्ये फोर्ट विल्यम कॉलेजच्या स्थापनेपासून झाली असे म्हणता येते. हे कॉलेज लॉर्ड वेलस्ली याने स्थापन केले आणि जेम्स गिलख्रिस्ट हे तेथे उर्दूचे पहिले प्रोफेसर होते. गिलख्रिस्ट यांनी हिंदी आणि उर्दूला हिंदुस्तानीचे दोन पूर्ण वेगळ्या स्वरूपातले प्रकार म्हणून स्थापित करण्यासाठी शक्य ते सारे प्रयत्न केले. हिंदू भारत आणि मुस्लिम पाकिस्तान संकल्पनेमध्ये देवनागरी लिपीमध्ये लिहिली जाणारी हिंदी ही भारताची आणि पर्सो-अरेबिक लिपीमध्ये लिहिली जाणारी उर्दू ती पाकिस्तानची हे रुजवले गेले. कॉलेजने दोन वेगवेगळ्या लिप्यांमध्ये पुस्तके प्रकाशित करण्याचे काम केले. म्हणजे दोन्ही भाषांची स्वतंत्र ओळख निर्माण होईल आणि दोन्हीमध्ये असलेल्या सारखेपणापेक्षा त्यातील किरकोळ फरक अधिक मोठे दिसू लागतील. दूरवरच्या प्रदेशांमधील लेखकांना बोलावून खडी बोलीमधील पुस्तके दोन वेगळ्या लिपींमध्ये लिहून घेण्यात आली. हिंदीसाठी हिंदू लेखक आणि उर्दूसाठी उर्दू लेखक. हिंदीमध्ये संस्कृत मूळ असलेल्या शब्दांचा अधिक वापर होईल तर उर्दूमध्ये पर्शियन-अरबी शब्दाचा, याला प्रोत्साहन दिले गेले.

इंग्रजांनी सुरू केलेल्या या प्रयत्नांना यश येऊन हिंदी आणि उर्दू यांना एकमेकांपासून वेगळे करण्यामध्ये भारतीय अहमहमिकेने सामील झाले.

नागरीसारिणी सभा, बनारस आणि हिंदी साहित्य संमेलन, अलाहाबाद या संस्था स्थापन झाल्या, या हिंदीकरिता देवनागिरी लिपी आणि अधिक संस्कृत शब्द यांचा वापर करण्याचा प्रसार करू लागल्या. त्याच धर्तीवर उर्दूसाठी तरक्की-ए-उर्दू स्थापन झाली. त्याचबरोबर अलिगढ मुस्लिम विद्यापीठ आणि बनारस हिंदू विद्यापीठ यांची निर्मिती केली गेली.

हिंदू आणि मुस्लिम यांना एकमेकांपासून वेगळे करण्याच्या प्रयत्नांमध्ये ब्रिटिशांनी भाषेचा असा प्रभावीपणे वापर केला.

हिंदी-उर्दू विभाजन, Language Policy and Language Politics : The role of English

अनुवाद - अनघा लेले

बनली.

खरं तर, धर्माधारित वेगवेगळ्या शाळाच असू नयेत असंच आम्ही सतत म्हणत आहोत. कारण माणसं बोलतात ती काही एखाद्या धर्माची भाषा नसते. ज्या भागात ते राहतात, त्या परिसराची भाषा ते बोलतात. केरळचा मुसलमान मल्याळम बोलतो, कर्नाटकातला कन्नड बोलेल, उत्तर प्रदेशातसुद्धा सगळे उर्दूत बोलतात असं नाही.. भोजपुरी, अवधी, मैथिली, ब्रजभाषा अशा वेगवेगळ्या भाषांमधून लोक बोलतात. श्रमिक वर्ग हा नेहमी स्थानिक भाषेतच बोलताना दिसतो. त्यामुळे 'उर्दू' ही फक्त मुसलमानांची भाषा आहे, हा गैरसमज आधी काढला पाहिजे.

याहीपेक्षा अधिक महत्त्वाचा मुद्दा हा आहे की, शाळा हे शिक्षणाचं केंद्र असेल की संस्कृती आणि धर्म यांच्या रक्षणाचं? आणि जर शिक्षणामधून संस्कृती जतन करायची असेल तर विविधतेचा आदर करणारी, एकमेकांबरोबर राहणारी जी 'भारतीय' संस्कृती आहे, तिला आणा. भारतात नेहमीच वैविध्यपूर्णतेला, सहकार्याला, प्रेमाला जागा मिळत आलेली आहे. कायम एकमेकांबरोबर भांडत बसणारी माणसं एकत्र राहू शकत नाहीत. भारतीय मुसलमान हे एक वेगळं वैशिष्ट्य आहे. सर्व प्रकारच्या विविधतेचा स्पर्श त्याला झाला आहे. या देशातला पारशी, ख्रिश्चन सगळे धर्मीय हे तसेच घडले आहेत. त्यांची व्यक्तिमत्वं 'भारतीय' म्हणून वेगळी घडली आहेत. हा भाग शिक्षणपद्धतीत आला पाहिजे.

सुजाता : त्या अनुषंगानं या मुद्द्याचं प्रतिबिंब पाठ्यपुस्तकातून दिसलं पाहिजे. मराठी, उर्दू पाठ्यपुस्तकं तपासून बघितली तर आपल्याकडे त्याचा एक साचा ठरून गेलाय असं दिसतं. त्यात यातलं थोडं टाका, त्यातलं थोडं टाका, अशी भेसळ असते, पण आत्मा नसतो. उदा. आज आमच्याकडे ईद आहे, जॉन तू पण ये, गणेश तू पण ये... अशा प्रकारचं राष्ट्रीय एकात्मतेचं ! एक विचित्र मिश्रण बनलंय. सर्वधर्मसमभावाचं प्रदर्शन या नावाखाली सगळं ठोकळेबाज पद्धतीनं चाललंय.

अजून एक मुद्दा

ज्ञान हे प्रत्येक भाषेत असतं. पण हातानं काम करणाऱ्यांच्याकडे एक पारंपरिक शहाणपण, ज्ञानाची पुंजी असते. त्याचबरोबर त्यांची शब्दसंपदा पण वाढलेली असते. पण त्यांचं हे ज्ञान पाठ्यपुस्तकांमधून कधी दिसतच नाही. त्यामुळे मुलांना पाठ्यपुस्तकातली भाषाही दूरची वाटते.

रझिया : पण याविषयीची जाण पालकांमध्ये, विशेषतः आयांमध्ये असल्याचं मला पालकसभांमध्ये जाणवतं. 'आगे जानेवाली भाषामें पढाना' असं पालक नेहमी बोलून दाखवतात.

सुजाता : तरीसुद्धा शिक्षणासाठी उर्दू माध्यमामध्ये मुलांना कशाला घालतात?

रझिया : इथे घरातले निर्णय बायकांच्या हातात नाहीत, हेही लक्षात घ्यायला हवं. त्यांना आज पर्याय नाही असं वाटून त्या विचारतात, ''ऐसा नहीं कर सकते क्या, की हिंदीमे पढाएँ?'' अजून एका बाईनं पालकसभेमध्ये म्हटलं, ''कॉम्प्यूटर सिखा रहे है, वह ठीक है, लेकिन हमारे बच्चोंको हार्डवेअरभी सिखाइए.'' दुसरीनं म्हटलं, ''साईकिल सिखाइये ना बच्चीयोंको.'' म्हणजे मुलांच्या भविष्याकडे आयांचं किती लक्ष आहे बघा. भाषेच्या बाबतीतही 'मुलांना काय उपयोगी पडेल' याचं जाणतेपण पालकांकडे आहे. त्यामुळेच भाषेची धोरणं ठरवताना महिला पालकांचा विचार घेतला तर किती फायदा होईल मुलांचा !

'तुम्ही मुलींना शाळेत का पाठवता?' असा प्रश्न एकदा विचारला होता, तेव्हा एका अशिक्षित आईनं दिलेलं उत्तर म्हणजे जागतिक मानवी तत्त्वज्ञानाचा आणि शिक्षणाचा गाभा काय असावा याचा नमुना आहे, असं मला वाटतं.

ती उत्तरली, ''हम उनको स्कूलमें भेजते हैं, इल्म पानेके लिये । इन्सान बूढा हो जाता है, इल्म कभी बूढा नहीं होता । इन्सान मर जाता है, लेकिन इल्म कभी नहीं मरता. तो बताईये, ऐसा कभी न मरनेवाला इल्म आपके स्कूल मे मिलता हैं क्या?

''नहीं, सातवी पढी-लिखी बच्ची खत नहीं लिख सकती, तो क्या यह इल्म है? इम्तहान होनेके बाद तो बच्चे सब भूल जाते हैं, उनको कुछ याद नहीं रहता ।''

म्हणजेच शिक्षण किती अल्पजीवी आहे, हे तिनं दाखवून दिलं. पुढे म्हणाली,

''एक बार सातवी पढ़ी बच्चीको हमने कहा, की जाओ, कंट्रोलरसाब को एक बात पूछके आओ । तो बोली, डर लगता है । अगर सातवी पढी बच्चीको डर लगता है, तो क्या फायदा?''

''तो फिर आपको तालीम कैसी चाहिये?'' आम्ही विचारलं.

''तालीम तो ऐसी चाहिये जो हुनर, हिसाब और हिम्मत दें ।''

गांधीजींनी मन, मनगट आणि मेंदू असं सांगितलं होतं. पण या बाईनं आणखी एक शब्द जोडला आणि तोही मुलींच्या शिक्षणाच्या संदर्भात. 'हिम्मत' हा शब्द वापरून शिक्षणव्यवस्थेचं मूल्यमापनच जणू तिनं करून दिलं !

मुलगे शाळा लवकर सोडतात आणि मुली थोड्या पुढचं शिकतात असं दिसतं. त्याविषयी विचारलं तेव्हा एका आईनं उत्तर दिलं ''वो क्या है, लडकी जरा पढ़ लेगी, शादी होनेतक, सातवीतक, तो अच्छा रहेगा।''

पण मग मुलग्यांना का पुढे शिकू देत नाही, याचं कारण तिनं सांगितलं.

अब तो उसको हिसाब आ गया, सातवी पढ़ लिया, तो अब कमाने लग जायेगा । उसको होटल में भेजेंगे, गॅरेज मे भेजेंगे । इधर



स्कूलमें क्या सिखाते है, गुडिया बनाओ, सिलाई वगैरा । अगर आपको लडकोंको स्कूलमे लाना है, तो उनके लिये एक पुराना स्कूटर लाके रखो । बच्चे खोलेंगे, किसीसे सिखेंगे ।''

म्हणजे कौशल्य शिकण्याचं माध्यम हे तंत्रज्ञानही असू शकतं, हेच जणू तिनं सांगितलं.

'मुलांनी हे सगळं का शिकावं' याचं एक बोलकं उत्तर मिळालं होतं, ''इज्जत की रोटी मिलें ।'' माझ्या मुलानं चोरी करून, लांडी-लबाडी करून नाही, तर कष्टानं - मानानं कमवावं ही तिची अपेक्षा आहे. शिक्षण माध्यमं निवडताना या बायकांचं जे जाणतेपण आहे ते फार व्यवहारी आहे ! हे बायकांचं आयुष्याचं तत्त्वज्ञान आपल्या धोरणांमध्ये कधी उतरणार?

सुजाता : खरंय, माझाही अनुभव असाच आहे. शाळा व्यवस्थापन समितीमध्ये असणाऱ्या बायकाही अतिशय महत्त्वाच्या सूचना देत असतात.

माझ्याकडे डी.एड.ला येणाऱ्या मुलींकडे बघून मला अजून एक प्रश्न पडतो, तो म्हणजे त्यांच्या उच्चशिक्षणाचा. दहावीपर्यंत शाळेत हुशार, भरपूर मार्क पडणाऱ्या मुली सायन्सला जातात. मग इंग्रजी माध्यमातून शिकतात. अर्थात हे फक्त हुशार किंवा उच्च-मध्यमवर्गीय घरातल्या मुलींच्याच बाबतीत. पण त्यातल्याच काहीजणी मात्र केवळ आई-वडिलांनी सांगितलं, म्हणून डी.एड. किंवा बी.एड.ला आमच्याकडे ॲडमिशन घेतात. त्यांना वेगळं काही करायचं असतं, इंजिनिअर-डॉक्टर व्हायचं असतं, पुढे शिकायचं असतं, पण शिक्षिका हा पेशा मुलींसाठी उत्तम आहे, अशी पालकांची मानसिकता असते. उर्दू माध्यमात शिकलेल्या बहुसंख्य मुलींसाठी नोकरीची संधी उर्दू शाळांमध्ये नोकऱ्या करणं एवढीच उरते. आज उर्दू ही ज्ञानभाषा म्हणून उच्चशिक्षणासाठीही उपलब्ध आहे का?

रझिया : हो, तशी उर्दूतून पुढे शिकण्यासाठी काही मोजकी महाविद्यालयं दिल्लीला / उत्तर प्रदेशात आहेत. पण त्यातून काय साध्य होतं, तर ते म्हणजे मुसलमानांनी फारफार तर विद्यापीठापर्यंत नोकरी करावी. दुसऱ्या क्षेत्रात जाण्याचा प्रश्नच नाही. शिवाय याबाबतीत सरकारचं काय धोरण आहे, काय दूरदृष्टी आहे हाही एक प्रश्नच आहे.

म्हणूनच माझ्या मते भाषामाध्यम सर्व अर्थानं सबळ करणारं असलं पाहिजे. इथे उर्दू माध्यमातून शिकून त्यांचा काही फायदा होत नाही, कारण वाचायला साहित्य उपलब्ध नाही, ती भाषा कुठेच वापरली जात नाही, संवादासाठी तिचा फायदा नाही, सरकार दरबारी तिला महत्त्व नाही.

सुजाता : कधी कधी मला असं वाटतं की जागरूक पालकांनीच उर्दू माध्यमाचा आग्रह सोडायला हवा आहे का?

रझिया : इथे अस्मितेच्या राजकारणाचा फार मोठा संबंध येतो. या राजकारणाची दोन महत्त्वाची हत्यारं आहेत - एक म्हणजे मुस्लीम व्यक्तिगत कायदा आणि दुसरी उर्दू भाषा. मुसलमानांचं नेतृत्व कुठून येतं अभिजन - वर्गातून ! त्यांच्याकडून काय सांगितलं जातं की उर्दू भाषा म्हणजे आपली अस्मिता आहे, ती टिकली पाहिजे. पण एकीकडे याच वर्गातल्या लोकांनी आपली मुलं इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये घालायची आणि गरिबांच्या मुलांनी उर्दू शाळांमध्ये जायचं. अस्मिता अभिजन वर्गाची आणि टिकवायची गरिबांनी, त्यातही मुलींनी.

गेल्या वीस एक वर्षांत मुस्लीम समाजामध्ये जाणवण्यासारखे बदल झालेत. भारतात हिंदू-मुस्लीम संबंधामध्ये दरी निर्माण करण्याचा प्रयत्न धर्माचं राजकारण करणारे अनेक लोक करत आहेत. १९९२ नंतर भारतभर झालेल्या दंगली - गुजरात दंगल या सगळ्या गोष्टींचा परिणाम जाणवतो आहे आणि आम्ही काम करत होतो तेव्हाच्या आणि आत्ताच्या पालकसभांमध्ये फरक पडलाय. मुस्लीम महिला मोठ्या प्रमाणात पुन्हा बुरखा वापरताना दिसताहेत. इतक्या प्रमाणात त्या कधीच बुरख्यात येत नव्हत्या. हिंदू-मुस्लीम दोन्ही समाजांमध्ये मूलतत्त्ववादी संघटना वाढल्या आहेत. पुरुषांचं नको तेवढं वर्चस्व पुन्हा एकदा दोन्ही समाजात वाढताना दिसतंय.

संपूर्ण मुस्लीम समाजच आता एका विशेष दबावाखाली जगतोय असं वाटतं. गोध्रानंतर आणि गुजरात दंगलीनंतर ही असुरक्षितता वाढत गेलेली दिसते. सगळ्या मुस्लीम समाजाला अस्मितेचा प्रश्न फार जपावासा वाटू लागलाय. मी गरीब आहे, मला इभ्रत नाही, आणि मुसलमान म्हणून इतरांच्या नजरेत माझ्याविषयी तिरस्कार आहे. अशा वेळी मी आधाराला काय पकडून उभं राहू? लोकशाही प्रक्रियेत ज्यांना मी निवडून दिलं तेही माझे नाहीत, माझ्या शेजारी राहणारा बहुसंख्य समाज माझी नफरत करतो, माझ्याकडे शिक्षण नाही,

रोजगार नाही, माझं स्थानही दुय्यम आहे, त्यामुळे माझा धर्म हाच माझा एकमेव आधार आहे, मग तीच माझी अस्मिता ठरतेय.

शिवाय असा आवाज उठवण्यासाठी लोकशाही पद्धतीचं एखादं व्यासपीठही नाही. त्यामुळे मुसलमानांचं स्थलांतरही मोठ्या प्रमाणावर होतंय. एकमेकांबरोबर राहणाऱ्या कित्येक हिंदू-मुसलमान मंडळींची फारकत झालेली मी माझ्या डोळ्यांनी पाहिलीय.

या बाबतीत सरकारचा दृष्टिकोन तर उदासीनतेचा आहे. काही मूलतत्त्ववादी संघटनांवर जरब बसवण्याची कृती नाही. शिवाय शिक्षक पालक संघटना काय करतात हाही प्रश्न आहे. शिक्षणात भरीव, विकासात्मक काही घडावं या दृष्टीनं ते काय करतात? उदा. उर्दू शाळांचा पालक संघ आहे 'तंमिले वालरैन'. त्याची रचना पाहिली तर स्त्री पालकांचं प्रतिनिधित्व त्यात दिसत नाही. त्यात पुढारी आणि फक्त पुरुषच आहेत. त्यांचा एक कलमी कार्यक्रम आहे, नवीन उर्दू शाळा काढणं. पूर्वी पुण्यात १० उर्दू शाळा होत्या, आज ३० उर्दू शाळा निघाल्या आहेत.

सुजाता : पण मुळात सरकारनं कशासाठी या गोष्टींना प्रोत्साहन द्यायचं? समाजाला कुठल्या दिशेनं न्यायचंय याचा विचार करायला नको का?

रझिया : सरकारवर म्हणजे शासकीय व्यवस्थेवर घटनेतील तरतुदीनुसार येणाऱ्या धोरणांच्या अंमलबजावणीचं बंधन असतं. उदा. कलम २९ ब नुसार अल्प संख्याकांना असणारा शिक्षणसंस्था काढण्याचा अधिकार सरकार डावलू शकत नाही. पण त्याचा उपयोगितेच्या दृष्टीनं विचार करून धोरणं आखली पाहिजेत.

मुळात उर्दू ही इथल्या सर्वच मुलामुलींची मातृभाषा नसताना उर्दू माध्यमातल्या शाळा आहेत, तशा इंग्रजी, मराठी आणि हिंदी माध्यमाच्याही शाळा आहेत. पण बाजारव्यवस्थेत गरजा निर्माण केल्या जातात, एक वातावरण निर्माण केलं जातं आणि बऱ्याचदा उपयोगी नसलेलंही फार उपयोगी असल्याचा आभास निर्माण करून खपवलं जातं. खाजगीकरण हे बाजार व्यवस्थेचा भाग आहे. शिक्षणाचं खाजगीकरण हा त्या राजकारणाचा भाग आहे. आणि सर्वसामान्य माणसाला 'तुमच्या मुलांना इंग्रजी आलं नाही तर भवितव्य नाही' असं सांगून भिववलं जातंय हे एकीकडे तर दुसरीकडे उर्दू भाषेचं माध्यम आणि त्याचं अस्मितेचं राजकारण दिसतंय. आपल्या मुलांना शिकण्यासाठी कशा प्रकारच्या शाळा हव्यात याचा निर्णय घेण्याची, उपलब्ध असलेल्या पर्यायातून योग्यच पर्याय निवडण्याची जबाबदारी पालकांची, हे जरी मानलं तरी त्याप्रमाणे समाजाला ते भान आलं पाहिजे आणि देश म्हणून धोरणात उतरलं पाहिजे, यासाठी सर्व बाजूंनी जोर लावणं आवश्यक आहे. ही जबाबदारी संपूर्ण समाजाच्या भल्याचा विचार करणाऱ्यांची आहे. एका अर्थानं ती एकमेकांसोबत जगणाऱ्या तुम्हा आम्हा, सर्वांचीच आहे.

▼▼▼

संकलन – प्रियंवदा बारभाई

डॉ. रझिया पटेल, पुणे
सामाजिक कार्यकर्त्या, भारतीय शिक्षण संस्थेत साहाय्यक प्राध्यापक, भारतातील मुसलमानांच्या शिक्षणाचे राजकारण आणि त्याचा महाराष्ट्रातील मुस्लीम जनतेवरील परिणाम या विषयावर पीएचडी., मुस्लीम समाजाच्या विशेषतः स्त्रियांच्या आणि शिक्षणाच्या प्रश्नांवर विपुल संशोधन, लेखन आणि व्याख्याने.
raziap@gmail.com

सुजाता लोहकरे, पुणे
उर्दू माध्यमाच्या शासकीय डी.एड. महाविद्यालयाच्या प्राचार्य, संवेदनशील शिक्षिका, कवयित्री, पालकनीती गट सदस्य.
sujata.saloni@gmail.com

With best compliments from

Sham B. Bhattad

1, Balaji Housing Society,
Bibwewadi, Pune - 411 037.

With Best Compliments from

Nirmiti Engg. Works

Rajendra Sitaram Konde

Sr. No. 34, Shop No. 4
Ingale Vasti, Narhe
Pune.

With Best Compliments from

Kumbhar Sudhir Dinkar

'Rutugandh'
Samata Nagar,
Sr. No. 23/2/4 Ambegaon Bk.,
Pune - 411 046

इंग्लिश - बिंग्लिश

मुक्ता दाभोलकर



मुलासाठी शाळेचं माध्यम निवडणं, शाळा निवडणं या काही केवळ शैक्षणिक निकषांवर आधारित केलेल्या कृती नसतात. त्यामागच्या समजुती, प्रेरणा त्याहून खूप वेगळ्या असतात. काय असतात या प्रेरणा, त्या कशाप्रकारे काम करत असतात, सूक्ष्मपातळीवर होणाऱ्या बदलाच्या या प्रक्रियेचा तरल संवदेनशीलपणे घेतलेला वेध.

सामाजिक बदलाचा व्यक्तिगत जीवनातील प्रत्यय, हा जंगलात वाघ दिसण्यासारखा थरारक असतो. समाजात घडणाऱ्या बदलांची कल्पना देणारा एखादा घटनाक्रम जेव्हा आपल्या डोळ्यासमोर उलगडतो, तेव्हा आपण हा थरार अनुभवतो. उदाहरणार्थ, माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात काही मुला-मुलींना मिळणाऱ्या मोठ्या आकड्याच्या पगाराविषयी आपण वाचत असतो; पण आपल्या भाचीला किंवा पुतणीला, जेव्हा इंजिनिअरींगच्या शेवटच्या वर्षी वर्षाला १६ लाख रुपये पगार देणारी नोकरी मिळते, तेव्हा सामाजिक बदलाच्या उंबरठ्याशी स्वतः उभे असण्याची भावना आपण थेट अनुभवतो. असाच एक अनुभव मला काही दिवसांपूर्वी मराठी शाळांच्या सद्यस्थितीबाबत आला. मराठी शाळांच्या दुरवस्थेबद्दल बरेच बघितलेले- ऐकलेले- वाचलेले असूनही, अगदी डोळ्यांसमोर उलगडल्यामुळे हा अनुभव माझ्या मनाला भिडला.

माझी दोन मुले घराजवळच्या, खाजगी अनुदानित मराठी शाळेत शिकतात. त्या दोघांमध्ये आठ वर्षांचे अंतर आहे. धाकट्याच्या निमित्ताने मी पुन्हा त्या शाळेच्या बालवर्गात जायला लागले तेव्हा मला जाणवले की आठ वर्षांच्या काळात, त्या शाळेत येणारा आर्थिक व सामाजिक वर्ग पूर्णपणे बदललेला आहे. तथाकथित उच्चवर्णीय, आर्थिकदृष्ट्या स्थिर अशा मध्यमवर्गीय पालकांची मुले शाळेमध्ये अभावानेच दिसत आहेत. आठ वर्षांत एका संस्थेचा सामाजिक चेहरामोहरा बदलण्याइतक्या वेगाने, लहान गावातील मध्यमवर्ग व कनिष्ठ मध्यमवर्ग यांतील लोक मराठी शाळांपासून दूर जात आहेत.

चांगली शाळा – चांगली भाषा – चांगली मुले इत्यादी इत्यादी

प्रत्येक मूल हे विशिष्ट असे सांस्कृतिक संचित घेऊन शाळेत येते. शिक्षणाची पार्श्वभूमी असलेल्या कुटुंबातून आलेली मुले आपल्या बरोबर असे सांस्कृतिक संचित घेऊन शाळेत येतात, ज्याला आपल्या शिक्षणव्यवस्थेत महत्त्व देण्यात आलेले आहे. त्यामुळे अशी मुले शाळेमध्ये 'यशस्वी' ठरण्याची शक्यता अधिक असते. अशी मुले ज्या शाळांत शिकतात त्या शाळादेखील यशस्वी मानल्या जातात. जेव्हा आर्थिक व सामाजिक स्तरांनुसार शाळा वेगवेगळ्या होतात तेव्हा ज्या शाळेतील बहुसंख्य मुले ही वंचित वर्गातील असतात, त्या शाळादेखील यशाच्या रूढ मापदंडानुसार अयशस्वी ठरत जातात. ज्यांना इतर शाळांत जाणे परवडते,

ಭಾಷೆ
भाषा
ભાષા
மொழி
ഭാഷ
ভাষা
Language


ते सर्वजणच मग अशा शाळांमधून बाहेर पडतात. आज आपल्या आजूबाजूला हे फार मोठ्या प्रमाणात घडत आहे. टाय लावून तालुक्याच्या गावच्या इंग्रजी शाळेत जाण्यासाठी बसथांब्यावर उभी असणारी फिक्कुटलेली मुले आणि त्यांच्या कृश आया हे आपल्याला परिचित असे दृश्य आहे.

अलीकडील काही वर्षांत पंचक्रोशीतील मोठ्या गावांत इंग्रजी शाळा निघालेल्या आहेत. या शाळांना सरकारी अनुदान मिळत नाही, शिक्षकांना पुरेसा पगार देणे त्यांना परवडत नाही; त्यामुळे या शाळांमधील शिक्षक प्रशिक्षित असत नाहीत, असलेले शिक्षक फार काळ टिकत नाहीत. काही गरजू स्त्रिया व घर सांभाळून काहीतरी करायची इच्छा असलेल्या पण काय करावे हे कळत नसलेल्या मध्यमवर्गीय स्त्रिया (त्यांची मुले मोठी झाली की) अशा शाळांमध्ये काही वर्षे नोकरी करताना दिसतात. असे असूनही या शाळांना विद्यार्थी मिळतात. या शाळा इंग्रजी माध्यमाच्या असल्याने पालक त्यांच्याकडे वळत आहेत व जिल्हा परिषदेच्या शाळांकडे पाठ फिरवत आहेत असे वाटून गावोगावच्या जिल्हापरिषदेच्या शाळा पहिलीपासून सेमी इंग्लिश करण्याची मोठी लाट आता महाराष्ट्रात आलेली आहे.

इंग्रजी माध्यमाच्या आक्रमणाला तोंड देण्यासाठी, मराठी माध्यमाच्या खाजगी अनुदानित माध्यमिक शाळा, गेली १५-२० वर्षे, आठवीपासून काही तुकड्यांना विज्ञान व गणित हे विषय इंग्रजीतून उपलब्ध करून देत आहेत. या शाळांची सद्यस्थिती काय आहे? आज या शाळांमध्ये पूर्वी असलेल्या समाजगटातील विद्यार्थी टिकून आहेत का? इंग्रजीचा अभ्यासक्रम उच्चस्तरीय करण्यात आला, शाळा सेमी इंग्लिश केल्या तरीही तथाकथित उच्चवर्णीय, उच्चवर्गीय मुले या शाळांमधून मोठ्या संख्येने बाहेर पडलेली आहेत. मध्यंतरी माझ्या शाळेच्या १० वी अ च्या तुकडीचे पुनर्भेट संमेलन होते. तेव्हा माझ्या लक्षात आले की खाजगी अनुदानित मराठी शाळेत शिकलेल्या त्यांच्यापैकी एकाचेही मूल मराठी शाळेत शिकत नव्हते. 'शाळा आता आपल्या वेळेसारखी राहिलेली नाही' असे एकच पालुपद बोलण्यात येत होते. आत्ताच्या काळात मराठी माध्यमाच्या शाळेत येणाऱ्या मुलांमुळे आपली मुले 'चांगल्या' संगतीत राहणार नाहीत आणि आरक्षणामुळे सरकारी शाळांमध्ये आलेले शिक्षक 'शुद्ध' मराठी बोलत नाहीत त्यामुळे ते आपल्या मुलांना काय शिकवणार - या दोन भावना सार्वत्रिक होत्या.

मी राहते त्या तालुक्याच्या गावी, मुस्लीमबहुल असलेली, इंग्रजी माध्यमाची एक शाळा गेली ३० वर्षे चालवली जाते. दहा वर्षांपूर्वीपर्यंत गावात इंग्रजी माध्यमाची ही एकमेव शाळा होती. असे असूनही, इंग्रजी माध्यमातून मुलांना शिकवावे असे वाटणारे सगळे हिंदू पालक आपल्या मुलांसाठी या शाळेची निवड करत नसत. कोकणातले मुसलमान मराठी वेगळ्या ढंगाने बोलतात, त्याचा उल्लेख करून पालक आपापसात बोलत की 'इंग्रजी शाळेत जायची आणि मराठी 'आयलूस गैलूस' असं बोलायला लागायची'. (म्हणजे रूढ मराठीत जसे एखादी व्यक्ती 'आनी-पानी' बोलते म्हटले जाते तसे)

ग्रामीण भागाचे उदाहरण घेतले असले तरी ही एक सार्वत्रिक अशी प्रक्रिया आहे. 'Branded' बालशाळांमध्ये मुलांची ने आण करणाऱ्या आधुनिक पेहरावातील आया (आईचे अनेकवचन या अर्थी) मुंबईच्या उपनगरी गाड्यांमध्येही दिसतात. मध्यंतरी माझी एक मुंबईत राहणारी मैत्रीण मला म्हणाली की तिच्या मुलीला इंग्रजी माध्यमाच्या एका शाळेतून काढून इंग्रजी माध्यमाच्या दुसऱ्या एका अधिक चकचकीत शाळेत घालायची तिची इच्छा होती; कारण दोन्ही शाळेतील मुलांच्या इंग्रजीच्या 'फ्लेवर'मध्ये फरक होता. सर्वसामान्यांपासून स्वतःला वेगळे करण्याचे निर्देशक अभिजनवर्ग तयार करत असतोच. त्यामुळे नुसते इंग्रजी येऊन भागत नाही तर विशिष्ट प्रकारचे इंग्रजी यावे लागते. अभिजनवर्गाची भाषिक निवड आणि वैशिष्ट्ये जेव्हा बहुजनवर्ग गाठतो तेव्हा अभिजनवर्गाने आपले निर्देशक असलेले भाषिक वैशिष्ट्य बदललेले असते. या प्रक्रियेचे एक उदाहरण मला वाटतं मम्मी - पप्पा या



शब्दांच्या बाबतीतले देता येईल. आई – बाबा याला पर्यायी असे हे शब्द इंग्रजाळलेल्या अभिजनवर्गाकडूनच आले. ते बहुजनवर्गाने आपलेसे केले तेव्हा इंग्रजी शाळेत जाणारी, अभिजनवर्गातली मुले चुकूनही मम्मी – पप्पा म्हणेनाशी झाली. एकतर ती ममा – डॅड वगैरे म्हणतात किंवा आई – बाबा असे म्हणतात.



माध्यमाची निवड – सामाजिक वर्गाची निवड

जिल्हापरिषदेच्या शाळेतील शिक्षकांच्या तोंडी जेव्हा मी गावातील मुलांसंबंधी, पहिल्यांदा ऐकले होते की, 'ही मुले आमच्या शाळेत येतात तेव्हा साधी पेन्सिलपण दप्तरात नसते पण इंग्रजी शाळेत जातात तेव्हा कशी व्यवस्थित जातात !', तेव्हा मला हे विधान भावनाशून्य वाटले होते; पण आता लक्षात येते आहे की या विधानाचा संदर्भ एका सामाजिक प्रक्रियेशी आहे. आपल्याला स्वतःचा वर्ग बदलायचा असेल तर आपले वागणे, बोलणे, उठणे, बसणे असे सगळे असणेच बदलावे लागते. ग्रामीण भागात नव्याने निघणाऱ्या इंग्रजी माध्यमाच्या खाजगी शाळांत जे पालक आपल्या मुलांना घालतात ते गावातच राहत असले तरी आर्थिकदृष्ट्या अधिक सुस्थिर असतात किंवा थोडे अधिक शिकलेले असतात. त्यामुळे सामाजिक स्तर बदलण्यासाठी ते अधिक धडपडत असतात. असे वर्गाचे निर्देशक बदलण्याचे आणि आपल्या मुलाला वरच्या वर्गाचे निर्देशक देणे हे आपण शाळांचे काम मानलेले आहे.

त्यामुळे खरे तर, पालक जेव्हा शिक्षणाच्या माध्यमाची निवड करतात, तेव्हा ते आपल्या मुलांसाठी समाजगटाची निवड करत असतात. विवक्षित अशा सामाजिक व आर्थिक वर्गात आपल्या मुलाला स्थिर करण्याचा मार्ग लहान वयातील सामाजिकीकरणातून जातो ही जाणिवेच्या किंवा नेणिवेच्या पातळीवर असलेली समजूत ही शाळेच्या निवडीमागील महत्त्वाची प्रेरणा असते. इंग्रजी माध्यमाच्या शाळेचे शुल्क, तिचे शहरातील भौगोलिक स्थान, पालकांकडून व मुलांकडून शाळेच्या असलेल्या अपेक्षांविषयी समाजात पसरलेला संदेश या सगळ्या गोष्टींमुळे शाळेची विशिष्ट सामाजिक रचना टिकवून ठेवली जाते. शिक्षणाचे माध्यम हा मुद्दा शाळेची निवड करताना नीट सांभाळला तर हव्या त्या समाजगटापुरता आपल्या मुलाचा वावर मर्यादित ठेवता येण्याची शक्यता मोठी असते. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या किंवा खाजगी अनुदानित मराठी शाळा जरी सेमी इंग्लिश झाल्या तरीही त्या शाळेत येणाऱ्या आर्थिक व सामाजिक वर्गातील मुलांमध्ये आपली मुले मिसळू नयेत ही या एका सामाजिक वर्गाची भावना असते, ती कशी लोप पावणार?

लहान मुलांनी काय करावे?

शिक्षणाच्या माध्यमातील बदलाविषयी विचार करताना वाटते की बालपण याविषयीची आपल्या समाजाची पारंपरिक समजूत एका स्थित्यंतरातून जात असावी. मध्यंतरी एका कार्यक्रमात, अंगणवाडी सेविकांशी मी 'लिंगभाव' याविषयी बोलत होते. तेव्हा मी म्हटले की मुलग्यांनादेखील लहानपणापासून घरातल्या सगळ्या कामांमध्ये सहभागी करून घेतले पाहिजे. एक स्थानिक शिक्षणसम्राट व एका इंग्रजी शाळेचे प्रवर्तक माझ्यानंतर बोलले. ते आपल्या भाषणात माझ्या या वक्तव्याबद्दलच बराच वेळ बोलले. ते म्हणाले, ''आम्हाला आमच्या मुलांना आणि मुलींना भांडी घासणारे बनवायचे नाहीये. मुलांनी कामात मदत करायची गरज हल्लीच्या आयांना वाटते, कारण त्यांना सासू-सुनांच्या मालिका बघायला हव्यात, कामं करायला नकोत.''

आपल्या समाजाच्या आर्थिक व सामाजिक रचनेचा विचार केला तर असे लक्षात येते की, घराच्या आणि शेतीच्या कामातला मुलांचा सहभाग समाजाने कायम गृहीत धरलेला आहे. कोकणात अगदी काही वर्षांपूर्वीपर्यंत भातलावणीसाठी शाळेला १० दिवसांची सुट्टी असायची. आता शिक्षणखाते कदाचित असे मानत असेल की पालक शिक्षणाबाबत इतके जागृत झालेले आहेत की ते लावणीच्या दिवसात कितीही काम असले तरी मुलांना शाळेत पाठवतीलच. शेतीच्या कामामध्ये आपापल्या कष्टाचा वाटा उचलण्यापासून मुलांना दूर ठेवण्याच्या प्रक्रियेमध्ये समाज मोठ्या मानसिक स्थित्यंतरातून गेलेला असणार आहे. 'मुलांना

समाजाचा एक घटक म्हणून वाढवणे' आणि 'बालपण हा एक प्रौढपणापेक्षा वेगळा, स्वतंत्र अस्तित्व असलेला कालखंड आहे' अशा दृष्टिकोनातून बालपणाकडे बघणे, हे दोन वेगवेगळे दृष्टिकोन आहेत. या भिन्न दृष्टिकोनांमुळे मुलांना मिळणारी दैनंदिन वागणूक, त्यांच्या दिवसभरातील कृतींची जडणघडण या गोष्टींच्या तपशिलांमध्ये फरक पडतो. बालपणाकडे वेगळ्या दृष्टीने पाहण्याच्या प्रक्रियेचा शैक्षणिक परिणाम एकूणातच शाळेच्या निवडीवरदेखील होत असणार. मुलांनी फक्त अभ्यास, शाळा, शाळेसाठीच्या वेगवेगळ्या शिकवण्या सांभाळाव्यात; घरातील, शेतातील कामात मदत करण्याची अपेक्षा मुलांकडून बाळगणे चूक आहे अशी धारणा असणे हे जबाबदार पालक असण्याचे सामाजिक लक्षण बनले आहे. या अपेक्षेला धरून मुलांच्या शिक्षणाचा विचार करण्यामध्ये इंग्रजी माध्यमाचा अलगद प्रवेश होऊ शकतो.

भाषाशास्त्रीय विचार काय सांगतो?

भाषाशास्त्रीयदृष्ट्या विचार केला तर असे दिसते की तीन वर्षे वयापर्यंत मुलांच्या वातावरणात ज्या भाषा असतात त्या त्यांना अक्षरशः आपोआप येतात. भरपूर प्रमाणात कानावर पडणारी भाषा आपोआप आत्मसात करण्याची मेंदूची क्षमता यानंतरही काही वर्षांपर्यंत तल्लख असते. या वयात मूल जर दुसरी भाषा शिकले तर त्या भाषेचे व्याकरण त्याला / तिला आपोआप आत्मसात होते. परंतु मानवी मेंदूच्या या नैसर्गिक क्षमतेचा फायदा भाषाशिक्षणात होण्यासाठी परिसर भाषा जितक्या प्रमाणात आजूबाजूला भरून राहिलेली असते, तेवढ्या प्रमाणात दुसऱ्या भाषेशी मुलाचा संपर्क येणे आवश्यक असते. एखादी परकीय भाषा अशाप्रकारे दैनंदिन सामाजिक व्यवहाराचा भाग बनणे जवळपास अशक्य आहे. आई-वडील दोघेही इंग्रजी उत्तम बोलतात अशी काही घरे मुलाला इंग्रजी भाषा आपोआप यावी यासाठी मुलाशी जन्मापासून इंग्रजी बोलण्याचा निर्णय घेतात. (प्रत्येक वैयक्तिक निर्णयाला सामाजिक पार्श्वभूमी असते व त्याचे सामाजिक परिणामही असतात, त्यामुळे घरात मुलांशी इंग्रजी भाषेत बोलण्याच्या निर्णयाचेही सामाजिक विश्लेषण होणे गरजेचे आहेच;) परंतु अशा प्रकारे आपल्या मुलांना इंग्रजी शिकवण्याची शक्यता फारच कमी जणांच्या बाबतीत उपलब्ध आहे. उरलेली सर्व मुले ही द्वितीय भाषा शिकल्यासारखीच इंग्रजी शिकतात हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

शिक्षण ही आकलनाची प्रक्रिया असते आणि जग समजून घेण्याचे काम मुले सततच करत असतात; शाळेत, घरी, खेळताना, भांडताना, झोपताना मुलाचा समजून घेण्याचा प्रयत्न चालूच असतो. जग समजून घेण्याचा मुलांचा हा प्रयत्न शाळेतील शिक्षणाने बहुआयामी होणे अपेक्षित असते. विषयांचा तपशील माहीत होण्याबरोबरच, विज्ञान, गणित, इतिहास, भूगोल अशा प्रत्येक विषयाची, जग समजून घेण्याची व ज्ञानाची मांडणी करण्याची पद्धत मुलांना समजणेदेखील तितकेच महत्त्वाचे असते. शाळेतील शिक्षण हे अशा प्रकारे मुलाच्या आयुष्याशी जोडलेले असावे, मुलाच्या अनुभवाशी शालेय अभ्यासविषयांची सांगड घालून शाळेने मुलाला ज्ञाननिर्मितीसाठी मदत करावी असे जर आपण मानत असू तर मातृभाषा किंवा परिसर भाषेशिवायची दुसरी भाषा त्यामध्ये अडथळा निर्माण करणार हे उघड आहे.

वर्गखोलीत काय घडते?

इंग्रजी शिकण्याच्यासंदर्भात प्रत्यक्ष वर्गखोलीत काय घडते याचा विचार करताना हे लक्षात येते की, इंग्रजी शिकवण्याच्या पद्धती (आणि इंग्रजीचे विषयज्ञान) हे प्रत्येक शिक्षकापर्यंत परिणामकारकरित्या पोहोचवण्यात आपली शिक्षणव्यवस्था सातत्याने कमी पडत आहे. इंग्रजी शिकवण्याचे अपुरे व केविलवाणे प्रयत्न ही बऱ्याच शाळांची सद्यस्थिती आहे. इंग्रजी शिकवण्यासाठी जिल्हा पातळीवर नावाजलेल्या एका शिक्षकांच्या वर्गात उपस्थित राहण्याची संधी मला मिळाली. तास सुरू होताना एका गुरुजींनी सांगितले, की त्यांच्या वर्गातील मुले चाळीस प्रश्नांची इंग्रजीत उत्तरे देऊ शकतात. नवीन पद्धतीनुसार आता व्यवहारातील इंग्रजी पाहिजे म्हणून ती त्यांनी मुलांकडून पाठच करवून घेतलेली होती. अत्यंत गेय पद्धतीने मुले ती प्रश्नोत्तरे म्हणत होती. मला तो सगळा प्रसंग अत्यंत हृदयद्रावक वाटला. नक्की कोण कोणाला खूष करत होते आणि कोण कोणाला फसवत होते हे कळेनासे झाले. व्याकरणाच्या अंगाने भाषा शिकवू नये, भाषेच्या परिचयातून ती शिकवावी असे शासनाचे विषयशास्त्रीयदृष्ट्या योग्य असे धोरण होते. सगळ्या मुलांना इंग्रजीची क्षमता प्राप्त झाली पाहिजे अशी न्याय्य अपेक्षा होती. घरातील शिकणारी पहिलीच पिढी असणाऱ्या, या आधी फारसे इंग्रजी शिकवले न गेलेल्या वातावरणात अजिबात इंग्रजी न येणाऱ्या ३० मुलांना याप्रमाणे इंग्रजी शिकवण्याचा एक मार्ग गुरुजींनी शोधला होता. त्यांचे काम तपासायला जेव्हा वरिष्ठ येतील तेव्हा प्रत्येक मुलाला काही दाखवता येईल अशी क्षमता प्राप्त झालेली असणे त्यांच्या दृष्टीने आवश्यक होते. पण ज्याला ते सगळे मिळून – 'इंग्रजीचे शिक्षण' असे म्हणत होते, ते तसे नाही हे बहुधा प्रत्येकालाच माहीत असावे. असे असले तरीही इंग्रजी शिक्षणाचा एक चांगला प्रयोग म्हणून हा प्रयोग इतरांपर्यंत पोहोचवला जात होता.

शिक्षणाचा हेतू काय?

जिल्हापरिषदेच्या काही शाळांमधील मुलांना शेतीसाठी मसाला – माती तयार करायला

शिकवण्याचे काम करणारा एक कार्यकर्ता सांगत होता, की गेली काही वर्षे शेतीच्या या उपक्रमास शिक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळत होता. परंतु येत्या वर्षीपासून या शाळा सेमी इंग्लिश होण्याचा विचार करत आहेत, त्यामुळे आता शिक्षकांचे सगळे लक्ष हे इंग्रजीवर केंद्रित झालेले आहे. वर्ग खोलीतील शिक्षण जीवनाशी जोडण्याचा संदेश एकीकडे शिक्षकांना देण्यात येत आहे आणि दुसरीकडे आकलन व अर्थनिर्मितीच्या प्रक्रियेमध्ये अत्यंत कळीच्या असलेल्या मातृभाषेतून शिक्षण यापासून सरकारी शाळादेखील पाठ फिरवत आहेत.

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्यामध्ये असे म्हटलेले आहे की मुलांना जीवनाचा अर्थ उमगणे, त्यांच्या उपजत क्षमतांचा विकास होणे, जगण्याचा हेतू निश्चित करून त्याचा पाठपुरावा करणे आणि इतरांनाही हा अधिकार असतो हे मान्य करणे हे शिक्षणाचे आस्थेचे विषय असतात. गरज कशाची असते तर माणसाने आपले परस्परावलंबित्व स्वीकारण्याची; टागोर म्हणतात त्याप्रमाणे, 'जेव्हा आपण इतरांमधून स्वतःला प्राप्त करत असतो तेव्हाचा आनंद सर्वश्रेष्ठ असतो' हे ओळखण्याची ! मुलांचे सामाजिक जग हे एका आर्थिक-सामाजिक वर्गापुरते मर्यादित केले गेले व परिसर-भाषेपेक्षा वेगळ्या भाषेत मुलांचे शालेय शिक्षण झाले तर शिक्षणाच्या या साध्यापासून मुले दूर राहण्याची शक्यता अधिक आहे.

समाजाच्या वर्तमान गरजा आणि तातडीच्या समस्या यांबरोबरच चिरंतन मूल्ये आणि व्यापक मानवी आदर्श यांचे प्रतिबिंब शिक्षणाच्या उद्दिष्टांमध्ये उमटावे असे आपण मानत असू तर शिक्षणाचे माध्यम आणि शाळा यांच्या निवडीचा आपल्याला पुनर्विचार करावा लागेल.

▼▼▼

मुक्ता दाभोलकर, दापोली, जि. रत्नागिरी
'प्राथमिक शिक्षण' या विषयात एम.ए. गेली १७ वर्षे कोकणात 'पंचायत राज' या विषयाच्या वेगवेगळ्या पैलूंसंदर्भात काम. ग्राम शिक्षण समिती या विषयात विशेष रस. कौटुंबिक हिंसाचार विरोधी काम करणाऱ्या महिला संघटनेच्या संस्थापक-सदस्य.
muktadabholkar@gmail.com

शैक्षणिक संदर्भ द्वैमासिक
शिक्षण व विज्ञान यात रुची असणाऱ्यांसाठी

वार्षिक वर्गणी रु. २००/-

मराठीतून विज्ञानविषयक चांगले साहित्य
आपल्या घरामध्ये,
आपल्या वर्गामध्ये
वापरण्यासाठी पालकनीतीचे प्रकाशन !

द्वारा, समुचित एन्व्हायरोटेक प्रा. लि.
६, एकता पार्क सोसायटी, निर्मिती शोरूममागे,
अभिनव शाळेशेजारी, लॉ कॉलेज रोड, पुणे - ४११ ००४.

With Best Compliments From
Aarti Industries
K. D. Paygude
Ph. : 020-24394829, Mob.: 9822029565, aarti.industries1995@gmail.com
Engineering & Fabrication Precision Job Works,
Sr. No. 36/1/1, Sinhagad Road, Near Lokmat, Opp. Mixing Concrete Plant,
Beside Maruti Services Station, Wadgaon Kh., Pune-41.

With Best Compliments From

Divakar B. Shidhaye
9822282456

Genau Engineers

(Committed to Accuracy)

Job work of Precision Components
on CNC Turning Lathe

Works : Sr. No. 36/1/1, Sinhagad Road,
Near Hotel Green Field,
Wadgaon (Khurd), Pune - 411 041.
Phone - 020 - 2439 4987.
Email : genauengineers@gmail.com

पहिलीपासून इंग्रजी : मागे वळून पाहताना

प्रा. हरी नरके



पहिलीपासून इंग्रजी सुरू करण्याचा निर्णय झाला, त्यावेळी अनेक भाषातज्ज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, अभ्यासक, विचारवंत यांनी त्याच्या बाजूने आणि विरोधी अशा दोन्ही भूमिका हिरिरीने मांडल्या. या निर्णयाचे जोरदार समर्थन करणाऱ्यांपैकी एक प्रा. हरी नरके हे होत. ही भूमिका अनेक गुंतागुंतीच्या, व्यामिश्र अशा सामाजिक मुद्द्यांशी जोडलेली आहे. त्यासाठी सामाजिक लेखाजोखाच मांडण्याची गरज ते मांडतात. पण वेळेअभावी त्यांना इथे तशा प्रकारे, सविस्तर विवेचन करणे शक्य झालेले नाही. या निमित्ताने चर्चा व्हावी, प्रश्न उपस्थित केले जावेत, संवाद सुरू व्हावा असे आवाहन त्यांनी वाचकांना केले आहे.

देशाचे भवितव्य शाळेच्या वर्गखोल्यांमध्ये घडविले जात असते...
जे.पी.नाईक

महाराष्ट्र सरकारने मराठी माध्यमांच्या शाळांमध्ये, पहिलीपासून इंग्रजी २००० साली लागू केली.त्याला आता १२ वर्षे झाली आहेत. कोणत्याही मोठ्या निर्णयाचे पुनरावलोकन करण्यासाठी इतका कमी काळ पुरेसा असतो का असा मला पडलेला प्रश्न आहे. शिवाय मी या निर्णयाचा कट्टर समर्थक असल्याने मी हे मूल्यमापन तटस्थ राहून कितपत करू शकेन ते सांगणे अवघड आहे. प्रा. रामकृष्ण मोरे शिक्षणमंत्री असताना त्यांनी हा निर्णय अचानक घेतला. तेव्हा त्यांच्यावर खूप हिंसक, बोचरी टीका झाली.

विरोध कशासाठी?

या निर्णयाला विरोध करणाऱ्यांचे (पहिलीपासून इंग्रजीचे विरोधक म्हणजे पपाइं – विरोधकांचे) प्रामुख्याने ३ गटात विभाजन करता येईल.

१. काही शिक्षणतज्ज्ञांचा विरोध प्रामाणिक होता. मातृभाषेतूनच उत्तम शिक्षण होते. इंग्रजीमुळे मुलांचे शैक्षणिक नुकसान होईल, अशी त्यांची मनापासूनची धारणा होती. आजही आहे.

२. काहींचा विरोध दूषित पूर्वग्रह, हितसंबंध किंवा अहं दुखावल्याने होता. सरकारने त्यांना आधी विचारलेच नाही यामुळे त्यांचा अहं दुखावला गेला होता. 'आम्हाला न विचारता, आमची मान्यता न घेता हा निर्णय घेणारे मोरे कोण लागून गेले?' असे प्रश्न विचारीत ते चवताळले होते. ज्यांच्या हितसंबंधांना या निर्णयामुळे बाधा पोचणार होती असा मोठा वर्ग या निर्णयाच्या विरोधात होता. अनेक उच्चवर्णीय पालक इंग्रजीला परमेश्वराचा अकरावा अवतार मानीत असत. अपवाद वगळता सगळे उच्चवर्णीय आपापल्या मुलांना इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये घालून इतरांना मात्र इंग्रजी अजिबात नको असे उपदेशाचे डोस पाजीत असत. अनेकांच्या शाळांमध्ये ते पहिलीपासून काय बालवर्गापासून इंग्रजी शिकवित असत. पण त्याची वेगळी फी आकारीत असत. शासनाने हा निर्णय घेतल्याने या पपाइंविरोधकांचे दुहेरी नुकसान होणार होते. ही फी बुडणार होती आणि सगळ्याच शाळांमध्ये पहिलीपासून इंग्रजी लागू झाल्याने त्यांची ऐट संपणार होती. शिवाय त्यांना स्पर्धक वाढल्याने त्यांच्या मुलांची संधी कमी होणार होती. या निर्णयामुळे शैक्षणिक वर्णव्यवस्था दुबळी होणार असल्याने

ಭಾಷೆ
भाषा
ভাষা
மொழி
ഭാഷ
ભાષા
Language

सगळ्या वर्णवाद्यांचे धाबे दणाणले होते. तेही या पपाइं – विरोधकांना रसद पुरवीत होते.

३. इंग्रजीच्या आक्रमणाने वाकलेली मराठी भाषा यामुळे मरेल असे वाटणारे आणि अनेक कारणांनी इंग्रजीची नफरत असणारेही वर्ग यात होते. जागतिकीकरणाच्या रेट्यामुळे हा निर्णय घेतला जात असून त्याला विरोध करणे हे आपले पवित्र कर्तव्य आहे असेही मानणारे अनेक पपाइं – विरोधक होते.

जर्मनी, फ्रान्स, जपान, चीन अशा अनेक देशात इंग्रजीवाचून काही अडत नाही मग भारतात इंग्रजी कशाला शिकवायची असेही विचारले जाई. भारतात गेली २५० वर्षे इंग्रजी ही सत्ताधारीवर्ग, प्रशासन, न्यायव्यवस्था, उद्योग आणि व्यापार यांची अधिकृत भाषा आहे. देशाच्या ३५ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना जोडणारी ही एकमेव भाषा आहे. महाराष्ट्राची तुलना स्वतंत्र देशांशी करून असला प्रश्न विचारणे हा भंपकपणा होता, पण ज्ञानीलोक तो करीत होते. 'उच्चवर्णीयांची गोष्ट वेगळी आहे पण बहुजन समाजाचा बुद्ध्यांक कमी असतो, त्यांना इंग्रजी कशी झेपणार?' अशीही काळजी काही पपाइं – विरोधकांना पडली होती. 'एकूण सगळेच शिक्षण कुचकामी आहे. सरकारी शिक्षण तर अगदीच वाईट. अशा वेळेला इंग्रजी सोडा , दलित, आदिवासी, ओबीसी, भटकेविमुक्त यांना शिक्षणच द्यायची काय गरज' असाही मौलिक सवाल एका प्रज्ञावंताने उपस्थित केला होता.

इंग्रजीची दहशत

मी टेल्को कंपनीत नोकरी करीत असताना इंग्रजीवाचून मराठी मुलांचे कसे अडते नि नुकसान होते ते पाहत होतो. इंग्रजीची दहशत किती भयंकर आहे याचा आम्ही नित्यनेमाने अनुभव घेत असू. आमच्यापेक्षा सर्व बाबतीत गुणवत्तेत हिणकस असणारे केवळ फर्ड्या इंग्रजीच्या जोरावर कसे बाजी मारून जातात ते आम्ही पाहत होतो. 'संस्कृतायझेशनमुळे' मोलकरणी, हमाल, कामगार, शेतकरी, शेतमजूर आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घालण्यासाठी किती आटापिटा करतात ते आम्ही पाहत होतो. लोंढा वाढत होता. इंग्रजी बोलणे प्रतिष्ठेचे आणि मराठी बोलणे म्हणजे मागासलेपणाचे लक्षण असे मानणारा वर्ग समाजात वेगाने वाढत होता. हा साथीचा रोग आटोक्यात येणे अशक्य बनले होते. इंग्रजी शिक्षणाने रोजगाराच्या उत्तम संधी उपलब्ध होतात असे त्यांना वाटत होते. आधुनिकीकरणाच्या या भाषिक रेट्याने अनेकजण परेशान होते. यातून मार्ग, किमान सुवर्णमध्य कसा काढायचा हा पेच होता.

महाराष्ट्रात तेव्हा पाचवीपासून इंग्रजी शिकवले जाई. पूर्वी तर आठवीपासून ते शिकवले जाई. मुलांची नवीन भाषा शिकण्याची क्षमता ज्या वयात संपते तेव्हाच इंग्रजी शिकवायला प्रारंभ करायचा, म्हणजे ती मुले कायम कच्ची राहतात हा सद्हेतूही यामागे असू शकेल.



पपाइं विरोधक हे विसरतात की पपाइंमुळे शिक्षणाचे माध्यम बदलत नाही, फक्त पाच वर्षांनंतर सुरू होणारा इंग्रजी हा विषय पाच वर्षे आधी सुरू होतो. त्यामुळे इंग्रजीची भिती कमी व्हायला मदत होते. त्यामुळे शिक्षणाचे माध्यम बदलल्यामुळे होणारे दुष्परिणाम ही टीका इथे गरलागू ठरते. मुख्य मुद्दा मराठीचे प्रेम यत्कींचितही कमी न होता इंग्रजीवर प्रभुत्व मिळविणे हा आहे हे नीट समजून घेतले पाहिजे. आज आपण पर्यावरण, गणित, विज्ञान आदी विषय लवकरच्या टप्प्यावर सुरू केलेले आहेत. इंग्रजीलाही तोच निकष लावला गेला पाहिजे. आधुनिकीकरणाच्या रेटयात संधी आणि विकासाची दारे उघडायला त्यामुळे मदत होते हे नाकारून कसे चालेल?

निर्णयाचे परिणाम – काही निरीक्षणे

आज राज्यात ७२ हजाराहून जास्त प्राथमिक शाळा आहेत. विद्यार्थीसंख्या १ कोटी १० लाख आहे. माध्यमिक शाळा २१ हजार असून विद्यार्थी संख्या १ कोटी ७ लाख आहे. यातील मराठी माध्यमाच्या शाळांमधील मुलांमुलींवर पहिलीपासून इंग्रजी शिकविण्याचे नेमके काय परिणाम झाले त्याचा शास्त्रीय अभ्यास करण्याची गरज आहे. माझा कयास आणि माझी काही ठळक निरीक्षणे पुढे मांडीत आहे. आज राज्यात दररोज तीन मराठी शाळा बंद पडतात. १२ वर्षांपूर्वी जर पहिलीपासून इंग्रजी सुरू केले नसते तर मराठी शाळांना कुलपे लावण्याचे हे प्रमाण आज किमान पंचवीसपटीने वाढलेले दिसले असते, हा मुद्दा पपाइं – विरोधकांनी लक्षात घेतलेला बरा. लहान वयात इंग्रजीची ओळख झाल्यामुळे आज या पिढीत इंग्रजी

वर्णव्यवस्थेचा डोलारा उभा होता तोच मुळी शूद्र-अतिशूद्र आणि स्त्रिया यांच्या शिक्षणबंदीवर ! महात्मा फुले आणि सावित्रीबाई यांनी सर्वांना शिक्षण द्यायला सुरुवात केली. फुले दांपत्य त्यांच्या शाळांमध्ये पहिलीपासून इंग्रजी शिकवीत असल्याचे लेखी पुरावे मी शोधून काढून समग्र वाङ्मयात छापलेले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बहुतेक लेखन इंग्रजीत होते म्हणून भारतभर नि जगभर पोचले. फुले मराठीत लिहीत, तर आम्ही त्यांच्या ग्रंथांचे इंग्रजी भाषांतर करीपर्यंत तब्बल १०० वर्षे ते महाराष्ट्राबाहेर जाऊच शकले नाही. मौनाचे आणि उदात्तीकरणाचे हे पपाइंविरोधकांचे कटकारस्थान उघडे पाडणे भागच होते.

बोलण्याचा आत्मविश्वास काही प्रमाणात वाढलेला दिसतोय. 'इंग्लिश फ्रेंडली' वातावरण तयार होतेय. पूर्वी इंग्रजी विषयात नापास होणाऱ्यांचे प्रमाण खूप जास्त होते. पपाइंमुळे यात नेमका किती टक्के फरक पडला त्याची निश्चित आकडेवारी हाती आल्यावरच त्यावर अधिक बोलणे योग्य होईल. तथापि यात बराच फरक पडल्याचे मला सांगितले गेले आहे. जागतिकीकरणाच्या नावाने कितीही बोटे मोडली तरी ते रोखणे आता आवाक्याबाहेर गेलेले आहे. अशावेळी इंग्रजीचे वाढते माहात्म्य लक्षात घेता इंग्रजीवर मांड मिळवण्यासाठी या निर्णयाचा फायदा झाला की तोटा यावर चर्चा झाली पाहिजे. आज सर्व मराठी वर्तमानपत्रांच्या स्थानिक पुरवण्यांची नावे बघा - टुडे - हॅलो हे कशाचे लक्षण आहे? अनेक मराठी वृत्तपत्रे काही पाने इंग्रजीत छापलेला मजकूर देतात. सोशल मिडिया आता सगळे जगणे व्यापून दशांगुळे उरलाय. मोबाईल ९३ कोटी भारतीयांचे सहावे बोट झालाय. आयपॉड, किंडल, ई बुक्स, हे वास्तव रुळून गेलेय. कोणत्याही उच्चभ्रू घरात मुलांशी फक्त मराठीत बोललेले भागत नाही. त्यांना मराठी समजत नाही. सगळीकडे इंग्रजी मुबलक पाणी भरतेय.

नव्या वर्णव्यवस्थेला बढावा

जगभरात लिंगभाव आणि वर्गव्यवस्था ही शोषणाची दोन मुख्य केंद्रे आहेत. भारतात त्यात श्रेणीबद्ध विषमतेवर आधारलेल्या जातिव्यवस्थेची भर पडलेली आहे. भारतीय समाजाने किमान २००० वर्षे शिक्षण फक्त त्रैवर्णिक पुरुषांपुरते मर्यादित ठेवून ही समाजव्यवस्था नियंत्रित केली होती. बहुजन समाज आणि स्त्रिया यांचा शिक्षणाचा अनुशेष फार मोठा आहे. प्रमाण भाषा आणि इंग्रजी भाषेच्या दहशतीने हे घटक बाधित आहेत. आज शिक्षणातून पुन्हा एकदा नवी वर्णव्यवस्था जन्माला घातली जात असल्याचा जाणकारांचा कयास आहे. डून स्कूल्स, इंटरनॅशनल स्कूल्स, कॉन्वेंट स्कूल्समधून शिकणारे हे उद्याचे ब्राह्मण असणार. उत्तम खाजगी शाळांमधून शिकणारे क्षत्रिय, शहरी मनपा नि जिल्हापरिषद शाळांवाले वैश्य आणि आश्रमशाळांवाले शूद्र अशी ही नवी श्रेणीबद्ध व्यवस्था आहे. पपाइंमुळे ही व्यवस्था मोडेल असा माझा दावा नाही पण या व्यवस्थेला एक शिडी किंवा जिना तरी किमान तयार होईल असे मला वाटते. हे प्रयत्न खूप तोकडे आहेत याची मला जाणीव आहे.

पहिलीपासून इंग्रजी सुरू झाले आणि पुढे २०१० साली शिक्षणहक्क कायदा आला. फुल्यांनी तो १८८२ सालीच हंटर सायबापुढे मागितला होता. सक्तीच्या, मोफत आणि सार्वत्रिक शिक्षणाची आशिया खंडातील ही पहिली मागणी होती. पुढे ती २८ वर्षांनी ज्यांनी उचलून धरली त्या ना. गोपाळराव गोखले यांना पंतप्रधानांनी त्याचे श्रेय दिले पण फुलेंचा साधा नामोल्लेखही त्यांनी केला नाही. असो.

पपाइं सुरू करताना जेवढे यश अपेक्षित होते तेवढे यश राजकीय इच्छाशक्तीअभावी आज प्राप्त झालेले नाही हे प्रांजळपणाने कबूल केलेच पाहिजे. मात्र या धोरणामुळे नुकसान झालेले नाही हेही तेवढेच खरे.

▼▼▼

प्रा. हरी नरके, पुणे
उपाध्यक्ष, भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था,
प्राध्यापक, महात्मा फुले अध्यासन,
पुणे विद्यापीठ. महाराष्ट्र राज्य मागासवर्ग
आयोगाचे सदस्य. अनेक लेख,
पुस्तके प्रकाशित
harinarke@gmail.com

With Best Compliments From

DEVAL UTENSILS FACTORY

15/5, Karve Road, Pune - 411 004. Tel.: 25430091, 25468337. Fax : 25468337
E-mail - deval@giaspn01.vsnl.net.in Visit us :http://www.devalsilver.com

Best wishes from

SANTOOL
Solution Engineers

211 / 4, Navi Peth, Pune 411 030
Ph. : +91-20-24336764 , 2433 5867
email. santool@vsnl.com

शिक्षणाची भाषा की भाषेचं शिक्षण?

डॉ. अनिमिष चव्हाण



काळाच्या ओघात शिक्षणाचा अर्थ बदलत गेला. भाषेकडे, शिक्षणमाध्यमाकडे बघण्याच्या दृष्टिकोनात झालेल्या बदलाचे, बदलत्या परिस्थितीचे पडसाद समाजातल्या वेगवेगळ्या स्तरांमध्ये, वेगवेगळ्या सामाजिक संस्थांमध्ये उमटत गेले, त्याचा हा डोळस वेध.

मुलं शाळेत जातात आणि पालक कामाला. जणू हा निसर्गनियम बनलाय. याखेरीज कुठे काही वेगळंसुद्धा घडतं. तेव्हा आपण सतर्क होतो. काही चुकतंय का पाहू लागतो. शाळेत न जाणाऱ्या मुलांना शालेय शिक्षणाची संधी का नाकारली जातेय पाहतो. अशा मुलांना शाळेत रस वाटायला हवा असं ठरवतो. कामावर न जाणारे पालक व्यसनी, बेजबाबदार किंवा आजारी असतील असं समजतो. अशा काळात आणि अशा वातावरणात शाळा या शिक्षणाहून इतरच काही बाबींसाठी महत्त्वाच्या ठरतात. आणि पालक हे पालकत्वाहून अधिक काही बाबींसाठी जबाबदार ठरतात.

शाळांमधून शिक्षणासोबत विशिष्ट संस्कृतींचा अंगीकार केला जातो. त्याचप्रमाणे मान-सन्मान, उच्चतर सामाजिक स्थान, स्पर्धात्मकता, आर्थिक सुबत्तेसाठी सक्षमता यांसारख्या मूल्यांचं रोपण केलं जातं. बहुतेक वेळा ही शिक्षणेतर मूल्यं ऐतिहासिक-सामाजिक आकलन, वैज्ञानिक दृष्टिकोन, संवादक्षमता, परिसर-आकलन, तार्किक विचार, कल्पकता, शारीरिक समायोजन यांसारख्या शैक्षणिक मूल्यांवर कुरघोडी करतात. इतकी की, शिक्षणाचा अर्थच पालटावा. 'जीवनातील समस्या पेलण्याची, सोडविण्याची क्षमता म्हणजे शिक्षण'. हा अर्थ पालटून 'जीवनातील समस्या नाकारण्याची, टाळण्याची वा त्यांपासून कृत्रिम सुरक्षितता शोधण्याची सोय म्हणजे शिक्षण' असा शिक्षणाचा अर्थ झाला आहे.आणि शिक्षणाचा हा अर्थ समाजमान्य झाला आहे. त्यामुळेच पालकांचं कामाला जाणं हे जणू मुलांच्या शाळेला जाण्याचंच मोठ्या वयातील स्वरूप बनलं आहे. म्हणजे, सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक सुरक्षितता प्राप्त करण्यासाठी मिळालेलं शिक्षण, मोठेपणी त्याच कामी आणण्याकरिता चालू राहणारी धडपड हाच बहुतांश माणसांच्या काम करण्याचा अन्वयार्थ होतो आणि केवळ ही धडपड अखंड चालू राहण्यासाठीच पालक आपल्या मुलांच्या शिक्षणाचा विचार करीत आहेत !

सृष्टीचा आणि जीवनाचा अर्थ समजून घेण्यासाठी मानवी समाजाला निसर्गाच्या साथीनं प्रगतिशील, कृतिशील करणारं शिक्षण काळाच्या ओघात मागं पडलं आहे. त्याऐवजी सृष्टीचं आणि जीवनाचं व्यवस्थापन करणारं शिक्षण उदयाला आलं आहे. हे सामाजिक बदलाचं प्रतिबिंब आहे. हा बदल मागील

शतकभरात झालेला आहे. मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळांत घालावं या विचारामागं समाजाच्या धारणेतील हा प्रदीर्घ बदल कारणरूपाने आहे. या प्रदीर्घ प्रक्रियेमुळे या बदलाची मानसिकता केवळ आत्ताच्या पालकांच्यापुरती सीमित नाही. या मानसिकतेच्या पाठीमागे एक मोठा इतिहास दिसल्यावाचून राहत नाही.

यासंदर्भात काही चित्रं मला इथे मांडावीशी वाटतात.

चित्र क्रमांक एक – १० ते १२ वर्षांपूर्वीचा प्रसंग. माझ्या दवाखान्यात एक तरुण जोडपं उपचारांसाठी आलेलं. नवरा-बायको दोघंही अशिक्षित मजूर. त्यांच्यासोबत ३ ते ५ वर्ष वयाची त्यांची दोन मुलं इकडं-तिकडं बागडत असलेली. अधून-मधून आपल्या आई-बापाला मम्मी-पप्पा म्हणून हाका मारत होती. या इंग्रजी उच्चारांमुळं माझ्या नजरेत अस्पष्ट आश्चर्य तर त्या जोडप्याच्या चेहेऱ्यावर स्पष्ट आनंद!

चित्र क्रमांक दोन-काळ साधारण तोच. कुटुंब खेड्यातलं पण उच्चभ्रू आणि मोठं. छोट्या मुलांचे आई-वडील बऱ्यापैकी शिकलेले -म्हणजे ग्रॅज्युएट वगैरे.पुरुष मंडळी शेती, शेतीशी निगडीत काही व्यवसाय व स्थानिक पातळीवर पुढारीपण करणारी. स्त्रिया मिळून घरातील व्यवहार, परंपरा, पाहुणचार वगैरे सांभाळणाऱ्या. त्यांच्यासाठी एक नवी जबाबदारी कुटुंबानं सोपवलेली. घरातल्या छोट्या मुलांना घेऊन जवळच्या शहरात आळीपाळीनं रहायचं. मुलं तिथल्या इंग्रजी माध्यमाच्या शाळांत शिकणार. त्यांची जेवणं, डबे, क्लासेस, इतर हवं-नको ते पहायचं आणि जमल्यास आपापल्या कुवतीनुसार त्यांचा अभ्यासही घ्यायचा. पुरुषमंडळी आपापल्या सवडीनुसार थोड्या वेळाकरिता फ़्लॅटवर डोकावणार पण त्यांचं मुख्य काम रसद पुरवण्याचं आणि ट्रान्सपोर्टेशनचं. बायकोला किंवा भावजयीला बदली कामगारासारखं ३-४ महिन्यांनंतर गावी नेऊन सोडायचं आणि दुसरीला फ्लॅटवर. मुलांना सुट्टयांनुसार घरी घेऊन जायचं, पुन्हा माघारी आणून सोडायचं. अशा अनेक हंगामी कुटुंबांपैकी एक कुटुंब आमचं शेजारी. शिकणारी मुलं आमच्या मुलांचे सवंगडी. या मुलांना केवळ त्यांच्या शिक्षणाच्या अनुरोधानं कौटुंबिक पातळीवर झालेलं हे मोठं परिवर्तन जाणवत असावंच पण उमगत



असेल असं कोणतंच चिन्ह उमटत नव्हतं. ना भावविश्वात ना अभ्यासात !

चित्र क्रमांक तीन – समुपदेशनासाठी गेल्या ५-१० वर्षांत परीक्षांच्या मोसमात हमखास येणारी, खरं तर आणली जाणारी मुलं. काही मातृभाषेतून शिकणारी, काही इंग्रजी माध्यमातून शिकणारी तर काही मिश्र (सेमी-इंग्लिश) माध्यमातून. कुणी चांगल्या शैक्षणिक क्षमतांची, कुणी मध्यम तर कुणी शैक्षणिकदृष्ट्या गतिमंद. परीक्षा, अभ्यास, अभ्यासूवृत्ती (पालकांना अपेक्षित अशी) नसणं, आळस, ताण असे संदर्भ या साऱ्या मुलांबाबतीत समान म्हणावेत असे. मात्र, त्यांच्याशी संवाद करताना शैक्षणिक माध्यम म्हणून असलेल्या भाषेचा संदर्भ फारच क्वचित येतो. मुलांच्या स्वत:च्या तसंच पालकांच्या अपेक्षा आणि मुलांच्या क्षमता यांतील तफावत, मुलांचा नैसर्गिक कल आणि शैक्षणिक अपेक्षा यांतील तफावत, स्वयंप्रेरणांचा अभाव, मुलांना स्वत:चं भावविश्व हाताळण्यात असणाऱ्या अडचणी यांसारखे घटक हेच शैक्षणिक अडी-अडचणींमध्ये मोठ्या प्रमाणात जबाबदार असावेत असं दिसतं.

चित्र क्रमांक चार – पाच वर्षांपूर्वी सातवी इयत्तेत इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकणारा एक मुलगा पालकांसोबत दवाखान्यात आलेला. अभ्यासात मागास मात्र इतर अनेक बाबतीत चलाख म्हणावा असा. म्हणजे मित्र-मंडळींत स्मार्ट, खेळ, सांस्कृतिक कार्यक्रमांत उत्साही. त्याच्याशी बोलल्यानंतर असं जाणवलं की त्याला अभ्यासाच्या प्रक्रियेची समज आणि गोडी निर्माणच झालेली नाही. त्याच्याकरिता अभ्यास म्हणजे केवळ एक अनाकलनीय, क्लिष्ट असं घोकंपट्टीचं ओझं झालेलं आहे. त्याला सुचवून पाहिलं की, इंग्रजी माध्यमाची शाळा बदलून मराठी माध्यमाच्या शाळेत पुढील इयत्तांकरिता प्रवेश घेतला तर त्याला अभ्यास करणं तुलनेनं सोपं जाईल. पण ही कल्पना त्याला मान्य होईना. ही गोष्ट अपमानजनक असल्याची त्याची समजूत होती. इंग्रजी जमत नाही म्हणून मराठी माध्यम म्हणजे त्याच्या दृष्टीनं अध:पतन तर होतंच शिवाय मराठी माध्यमाच्या शाळा म्हणजे गावंढळ मुलांच्या शाळा ही त्याची पक्की समजूत होती ! कदाचित त्याच्या पालकांनी आणि इतर संबंधितांनीच ही समजूत रुजवली असावी.

चित्र क्रमांक पाच-गोष्ट वरच्याप्रमाणेच पण किंचित जुनी. इंग्रजी माध्यमाच्या शाळेत न रुजलेला दुसरा एक मुलगा. मात्र, या मुलाच्या बाबतीत इंग्रजी माध्यमाची शाळा सोडून मराठी माध्यमाच्या शाळेत प्रवेश घेण्याची सूचना फारशी मानापमानाची बनली नव्हती. थोड्याशा धाकधुकीनं का होईना पण मुलानं आणि त्याच्या पालकांनी शाळा बदलण्याचा निर्णय घेतला.त्याकरिता येणाऱ्या तांत्रिक समस्या सर्व संबंधितांनी समजूतदारपणानं सोडविल्या. आनंदाची बाब म्हणजे, मुलाची शैक्षणिक कारकीर्द लक्षणीयरित्या सुधारली !

चित्र क्रमांक सहा – इंजिनियरींगला प्रवेश घेतलेला ग्रामीण भागातला एक मुलगा. नव्यानंच शहरात, होस्टेलवर राहू लागलेला. वर्षभरात आत्मविश्वास गमावून, निराश मनानं गावी परतला. खूप प्रयत्नांनी बोलायला तयार झाला. तेव्हा त्याची आत्मप्रतिमा खूप ढासळलेली दिसत होती. शहरातील मुला-मुलींचं फाड – फाड इंग्लिश बोलणं, त्यांचे आधुनिक पेहराव आणि विविध फॅशन्स् यांमुळे तो बिचारा सुरुवातीपासूनच बिचकून गेला होता. त्यांचे मॅनर्स त्याला परग्रहावरचे वाटत होते. आपण या जगात सामावले जाऊ शकणार नाही हे त्याच्या मनानं पक्कं गृहीतच धरलं होतं !

चित्र क्रमांक सात – मराठी माध्यमाची एक नामांकित शाळा. या शाळेत पाचवीच्या वर्गापासून काही तुकड्या सेमी-इंग्रजी माध्यमातील आहेत. या वर्गात प्रवेश कुणाला हवा असतो? एखाद – दुसरा अपवाद वगळता साऱ्यांनाच. मग शाळा व्यवस्थापन काय करतं? तर चौथीच्या वर्गात मिळणारे गुण आणि त्याच्या जोडीला एका प्रवेश-परीक्षेतील गुण यांनुसार प्राधान्यक्रम ठरवतं. या परीक्षा नेमके काय जोखतात? मुलांच्या भाषाविषयक क्षमता, नवीन भाषा शिकण्याची आवड की केवळ मुलांनी भविष्यात सायन्स शाखेचं शिक्षण घेण्याची शक्यता?

चित्र क्रमांक आठ – अनेक घरांघरांत दिसणारं. कोणत्याही माध्यमाच्या शाळांत शिकणारी मुलं इंग्रजी कार्टून्स, हिंदी किंवा इंग्रजी सिनेमे वा टी.व्ही. वरील काही कार्यक्रम आवडीनं पाहतात. मोबाईल्स, कंप्यूटर्स इ. वापरताना लागणाऱ्या इंग्रजी सूचना त्यांना सहज समजतात अथवा त्या सूचना मुलं अंदाजानं चटकन समजून घेतात. म्हणजेच आवड असेल तर मुलं भाषेकरता अडून राहत नाहीत. भाषा म्हणजे संवादाचं साधन. मुलांचा परस्परात किंवा अशा आवडीच्या गोष्टींशी चालू असलेला हा संवादच नव्हे का?

चित्र क्रमांक नऊ – कोणत्याही माध्यमाच्या शाळांत शिकणारी १०वी –

नवनिर्मिती आणि सॉयर स्मारक ट्रस्ट, पुणे.

शिक्षक, पालक व बालकांसाठी सक्रिय जनगणित, दिवसाउजेडीचे खगोलशास्त्र, शिक्षण हक्क सुसंगता कार्यशाळा

संपर्क – 'गुणवत्ता', उमेद, ५६४ ब/२ शनिवार पेठ, रमणबाग चौक, पुणे – ४११०३०

फोन – ०२०-२४४७१०४० / ९८५०३०३३९६, navnirmitipune@gmail.com

१२वी पर्यंतच्या कोणत्याही वर्गांतील मुलं. त्यांच्याबाबतीत भाषाविषयक संकल्पना (व्याकरण, भाषेच्या वापरातील बहुविधता इ., भाषाविषयक प्रयोगशीलता, कुतूहल, वाचनाची गोडी, स्वयंप्रेरणेनं लिहिण्याची आवड आदि बाबी फारच कमी प्रमाणात आढळतात. मात्र, त्यांना भाषेच्या परीक्षेत चांगले गुण मिळालेले असू शकतात. आपल्याला मुलांकडून भाषाविषयक नेमक्या कोणत्या गोष्टी अपेक्षित आहेत? या बाबत बोलताना साताऱ्यातील प्रयोगशील शिक्षण-विस्तार अधिकारी श्रीमती भराडे म्हणाल्या होत्या की, मुलांनी एखादी भाषा ही भाषा म्हणून शिकणं आणि त्यांनी एखादा शालेय विषय शिकण्यासाठी ती विशिष्ट भाषा अवगत करणं या दोन पूर्णत: भिन्न बाबी आहेत !

चित्र क्रमांक दहा - अनेक बालमानसशास्त्रज्ञ असं प्रतिपादन करतात की, आपण पालक म्हणून मुलांच्या अंगभूत क्षमतांना विनाकारण कमी लेखतो. पुरेशा पोषक, स्वतंत्र आणि भावनिकदृष्ट्या सुरक्षित वातावरणात मुलांच्या नैसर्गिक क्षमतांचा विस्मयकारक विकास होऊ शकतो. भाषांचं आकलनदेखील मुलांना मोठ्या व्यक्तींच्या तुलनेत भरभर होऊ शकतं. त्यामुळे मुलांना अधिकाधिक भाषा आत्मसात करणं बऱ्याच अंशी शक्य होतं. पण, म्हणून सरसकटच सर्व मुलांना अधिकाधिक भाषा शिकायला लावाव्यात का? या प्रश्नाचं उत्तर ठरविताना आणखी काही शास्त्रीय माहिती विचारात घ्यायला हवी. ती अशी १) बुद्धी ही अनेकांगी असते. भाषाक्षमता हे बुद्धीच्या अनेकांपैकी एक अंग आहे. हुशार असूनही सर्वांनाच बुद्धीच्या सर्वच अंगांचा विकास साध्य करता येईल असं नाही. २) ज्या मुलांची भाषा-निगडीत बुद्धिमत्ता तुलनेनं मागास असते अशा मुलांना भाषेचं अंग कमी वापरून अन्य क्षमतांच्या साहाय्यानं ज्ञानसंपादन करण्याची संधी मिळाल्यास ती इतर मुलांप्रमाणेच सक्षम होऊ शकतात. तसंच भाषाविषयक किमान कौशल्यदेखील आत्मविश्वासानं संपादन करू शकतात. ३) ज्ञानसंपादनामध्ये मुलांचा आत्मसंवाद महत्त्वाचा आहे. त्यासाठीदेखील भाषा हे नैसर्गिक साधन आहे. मातृभाषेतून स्वाभाविकपणे मोठं शब्दभांडार मुलांपाशी जन्मापासूनच जमा होत असतं. आत्मसंवादामध्ये हे भांडारच जास्तीत जास्त उपयोगी ठरतं. ४) इतरांशी संवाद हेही आत्मसंवादाप्रमाणंच ज्ञानसाधन आहे. मुलांना भाषेबद्दल अवडंबरयुक्त भीती असेल तर त्यांचा इतरांशी सहज संवाद खुरटू शकतो.

ही दहा चित्रं एकत्र करून मी पाहतो तेव्हा मला काय दिसतं? भाषाशिक्षण ही एक नैसर्गिक स्वाभाविक प्रक्रिया आहे. तिचा विकास सामाजिक, भौगोलिक घटक करत असतात. प्रत्येकजण आपापल्या गरजा आणि क्षमतांनुसार भाषा हे स्वत:च्या बुद्धीचं अंग जीवनात वापरू शकतो. ही प्रक्रिया सहजपणे घडली नाही, तर भाषा हा काहीजणांच्या शिक्षणात आणि पर्यायानं जीवनात अडसर आणणारा घटक ठरू शकतो. शिक्षणाची भाषा आणि भाषेचं शिक्षण या पूर्णत: भिन्न बाबी आहेत. म्हणून शिक्षणात भाषा हे साधन आहे की साध्य याचा विवेक प्रत्येक मुलानुसार स्वतंत्रपणे केला पाहिजे. आज शालेय शिक्षणामध्ये हा विवेक बाळगला जाईल असे खात्रीलायकरित्या सांगता येत नाही. कारण, शिक्षणामध्ये मुलांचा नैसर्गिक विकास हे तत्त्व पुरेशा गांभीर्यानं जपलं जात नाही; तर विकासाच्या विशिष्ट संकुचित चित्रामध्ये मुलांना बसविण्याकरिता नैसर्गिक विकासाचा बळी जातो आहे. अगदी थोडक्यात विधान करायचं तर मी असं म्हणेन की, कोणतीही भाषा मुलांच्या शिक्षणात तेव्हाच पोषक ठरेल जेव्हा तिचा केवळ साध्य म्हणून नव्हे तर साधन म्हणून नैसर्गिक अंगीकार केला जाईल. आणि कोणतंही शिक्षण कोणत्याही भाषेत तेव्हाच साकार होईल जेव्हा शिक्षणाचा विचार जीवनाचं व्यवस्थापन करण्याचं साधन म्हणून न होता जीवन समजून घेण्याचं साधन असा होईल !



▼▼▼

डॉ. अनिमिष चव्हाण, सातारा मैत्र क्लिनिक, सातारा येथे मानसोपचार तज्ज्ञ. जानेवारी २०११ पासून 'सार्थ-सन्मान' या नावाने मानसोपचारातून बदलासाठी केंद्र. मे २०१२ पासून 'ब्रेन अँड माइंड जिम' हा बोधात्मक व भावनिक विकासासाठीचा प्रकल्प. व्यसनमुक्ती आणि मानसिक आरोग्यावरील अनेक लेख व पुस्तके प्रसिद्ध.
animish.chavan7@gmail.com

With best compliments from

Marline Financial & Management Consultants Pvt. Ltd.

5, Sukhshanti Appts., Mrutyunjay Colony, Pune - 411 029, Phone - 25435395

भाषिक घसरणीकडे बघितलं तर..

सुजाता महाजन



आमच्या शेजारी एक आजी राहत होत्या. सर्वजण त्यांना 'आक्का' म्हणायचे. आक्का मिस्कील, हजरजबाबी आणि संभाषणचतुर होत्या. आम्हा मुलांना त्या खूप प्रश्न विचारायच्या आणि आम्ही उत्तर दिलं की, 'उंच वाढला एरंड, तरी होईना इक्षुदंड' अशासारखी एखादी म्हण त्यांच्या तोंडून सहज बाहेर पडायची.

आता आक्का हयात नाहीत. त्यांच्याबरोबर त्यांच्या म्हणीपण गेल्या. आता खूप हळहळ वाटते. आपण आपल्या कळत्या वयात आक्कांच्या सहवासात आलो असतो तर किती जुन्या म्हणी माहीत झाल्या असत्या आणि त्या म्हणींमधून त्या काळातल्या समाजाचा, त्यातल्या उभ्या-आडव्या वैचारिक धाग्यांचा पट उलगडला असता ! दुर्दैवानं हे घडलं नाही. आक्का आणि त्यांच्यासारखे अनेकजण भाषेच्या अंतरंगात खोल खोल दडलेली रत्नं घेऊन नाहीसे झाले.

या लेखात त्या हरवलेल्या रत्नांबद्दल खंत मांडायची नाही आहे. फक्त या काळाच्या टप्प्यावर भाषेची परिस्थिती काय आहे याविषयीचं चिंतन मांडायचं आहे. लेखाला कुठलेही शास्त्रीय आधार नाहीत किंवा हा लेख व्याकरणावरचाही नाही. लेखक म्हणून, कवी म्हणून भाषा या मूलद्रव्याविषयीचं चिंतन फक्त मांडायचं आहे.

मातृभाषा हीच शिक्षणाचं माध्यम असली पाहिजे असं अनेक शिक्षणतज्ज्ञांनी उच्चरवानं वारंवार सांगितलं तरी इंग्रजीचा वाढता प्रभाव आणि जगाच्या, विशेषत: ब्रिटिश वसाहती जिथे होत्या त्या देशांच्या शिक्षणव्यवस्थेत, अर्थकारणात इंग्रजीचं महत्त्व कधीच कमी होऊ शकलं नाही. विविधतेचं वरदान लाभलेल्या या सुंदर देशात विविधरूपिणी असंख्य भाषा, बोली (इंग्रजीसह) असूनही त्या विविधतेचा आनंद कसा घ्यायचा हे आपल्याला कळलंच नाही. भाषा ही चवीचवीनं घ्यायची, बोलायची, शिकायची गोष्ट आहे हे कधी आपल्या शिक्षणात प्रतिबिंबित झालं का? भाषा हा 'विषय' शिकवणारे शिक्षक सुंदर, हिरव्या कुरणातून, निळ्या सावळ्या झऱ्याकडे आजूबाजूची रानफुलं दाखवत मुलांना नेतात का या भाषेच्या वाटेनं? पहिलीपासून दहावीपर्यंतच्या शिक्षणात भाषेचा पूर्ण पट उलगडून दाखवला जातो का? इतिहासाच्या टप्प्यावर भाषा कुठे उभी आहे, भौगोलिक स्तरावर कुठे कुठे कशी बदलते आहे? कसे दोन भाषांचे प्रवाह एकमेकात मिसळून सुंदर, नवं मिश्रण तयार होतंय? कसा विणलेला असतो संस्कृतीच्या धाग्यांचा गोफ शब्दांभोवती? केवढा मोठा असतो भाषेचा आवाका ! आपण दाखवू शकतो का तो मुलांना?

लहानपणापासून उभ्या - आडव्या पसरलेल्या ऐतिहासिक आणि समकालीन अभ्यासाची गोडी मुलांना लावणं हे आपण आजवर करू शकलेलो नाही. पण अजूनही करता येऊ शकेल. अर्थात यासाठी अनेकांचे हात लागून खूप खूप काम होणं आवश्यक आहे. सध्यातरी नकारात्मक गोष्टींमध्ये आपला एवढा वेळ जातो की, विधायक कामं करण्यासाठी वेळ आणि उमेद शिल्लक राहत नाही. भाषाशिक्षण योग्य तऱ्हेनं देण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षित करणं आवश्यक आहे. त्यासाठी खूप मोठं संदर्भसाहित्य तयार करणं आवश्यक आहे. इतिहासाच्या मागच्या पानावर आपल्याला जाता येत नसतं पण भाषेच्या अगदी सुरुवातीच्या काळापासूनचे शब्द, वाक्यरचना, म्हणी, वाक्प्रचार या सगळ्यांचा संग्रह व्हायला हवा आणि त्यांचा अभ्यास भाषेच्या या प्रयोगशाळेत व्हायला

भाषा
ಭಾಷೆ
மொழி
भाषा Language

हवा. पूर्वी नसलेल्या कोणत्या वाक्यरचना आता भाषेत आहेत, त्या कुठून आल्या? इतर भाषांच्या प्रभावातून आपण काय काय घेतलं? या सगळ्या गोष्टींच्या नोंदी हव्यात. भाषेत बदल होतो तेव्हा परभाषेच्या प्रभावाचा रेटा कारणीभूत असतो की सुलभीकरणाची प्रवृत्ती की आळस की आणखी काही – हे आपल्याला टिपता यायला हवं. साधं उदाहरण घ्या. मराठीत अनेक भाषांमधले उपसर्ग, प्रत्यय जोडून अनेक शब्द तयार करता येतात. उदाहरणार्थ, फारसी बे + संस्कृत सूर = बेसूर. फारसी ना + इंग्रजी पास = नापास. मराठीचा पदविचार अतिशय लवचीक असल्यानं आपल्याला हे करता येतं.

अगदी सहजपणे आपल्या हे लक्षात येईल की गेल्या दोन दशकांत मोठ्या शहरांमध्ये मोठमोठे जाहिरातबाजी करणारे फलक लावण्याची प्रवृत्ती खूप वाढली आहे. (त्या फलकांमुळे शहर विद्रूप दिसतंय याचं भान जाहिरातबाजी करणाऱ्या मंडळींना अजिबातच नाही.) यांतून समाज जास्त बहिर्मुख व्हायला लागलाय हे स्पष्ट होतं. त्यामुळे अगदी छोट्या छोट्या घटनांनाही अवास्तव महत्त्व देऊन आपलं नाव सतत झळकत ठेवण्याचा प्रयत्न हिरिरीनं केलाही जातोय आणि याच प्रवृत्तीचं एक प्रतिबिंब दिसतंय, महानायक, महाआरती, महाप्रसाद, महाचित्रपट... आणि त्याहून गंमतीशीर अशा महाएपिसोड, महासिनेमा यांसारख्या शब्दांत. आपण या शब्दांची दखल घेतली आहे का? हे फलक किंवा टी.व्ही.वरच्या जाहिराती आपल्याला दोन गोष्टी स्पष्टपणे सांगतायत – एक म्हणजे एखाद्या गोष्टीचं महत्त्व वाढवणं – ही समकालीन गोष्ट आणि याचा परिणाम म्हणून कालांतरानं 'महा'सारख्या प्रचंड व्याप्ती असलेल्या उपसर्गाच्या अर्थाचा संकोच होणार आहे – ही भविष्यकालीन गोष्ट. अशा प्रकारे एकाच वेळी भाषेच्या भूत – वर्तमान – भविष्याकडे आपल्या शिक्षणातून लक्ष वेधलं जातंय का? या गोष्टींकडे पाहताना चांगला वाईट असा कुठलाच ग्रह ठेवण्याची आवश्यकता नाही, आपल्या शिक्षणातून फक्त त्या नोंदी झिरपल्या पाहिजेत आणि अशा प्रकारे भाषेचा भूत – वर्तमान – भविष्य असा काळाच्या बाह्यरेषेवर आणि खोल खोल आत असा आंतररेषेवर अभ्यास आपल्याला करता यायला हवा.

मराठी संज्ञा हळूहळू नष्ट होतायत, सफरचंद, केळं यांची जागा ॲपल, बनाना घेतायत, चेंडू, बशी, ताटली यांची जागा डिश, प्लेट घेतायत. 'तू मला मदत कर' ऐवजी 'तू माझी मदत कर' ऐकायला मिळतंय. सामान्यरूप हा तर मराठीचा प्राणच, पण ते टाळण्याकडे कल होतोय उदा बँकमध्ये, कपाटमध्ये इ. प्रत्ययांचंच बघा, --ला भेटायचं असतं, --शी बोलायचं असतं. पण आता, 'मी त्याला बोललो की...'.

भाषिक कृतींसाठी आपण '-शी' हा प्रत्यय वापरतो. भांडणे, वाद घालणे, तसेच खेळणे, मारामारी करणे. मारामारी ही क्रिया दुहेरी आहे तर मारणे एकेरी आहे, म्हणून --शी मारणे नाही तर --ला मारणे. खरं तर किती अर्थपूर्ण आहेत हे प्रत्यय ! भाषा कशीही वापरताना आपण त्यांची दखल घेतो का ? नामं कधी या प्रत्ययाबरोबर फिरतात कधी त्या. पण प्रत्यय आपल्या जागी स्थिर राहतात आणि नामांना दिशा दाखवतात. 'ट' सारखे छोटे प्रत्यय शब्दाला वेगळा अर्थ देतात. घनता दाट किंवा पातळ करतात. 'खारट' म्हटलं की खाऱ्याचा खारेपणा वाढला. 'उभट' म्हटलं की उभ्यासारखा हा भाव आला. 'खारा' आणि 'खारट', 'उभा' आणि 'उभट' मधला फरक भाषेचं सौंदर्य दाखवणारा. म्हणून 'ट' प्रत्यय आणि इतर असंख्य प्रत्यय अर्थसौंदर्य खुलवतात.

या सगळ्यासाठी भाषा ही खूप खूप महत्त्वाची गोष्ट आहे हे आधी आपल्या मनावर बिंबलं पाहिजे. या क्षेत्रात आपल्यासाठी पावलोपावली आव्हानं आहेत. आयुष्यात फक्त पैसे मिळवण्यासाठी, पोटापाण्यासाठीच कामं करायची नसतात. भाषा आणि संस्कृती वाढवण्यासाठीसुद्धा काही कामं करायची असतात. भरपूर वेगवेगळ्या प्रकारचं संदर्भसाहित्य आणि कोश तयार करणं, भाषेच्या इतिहासातील वेगवेगळ्या टप्प्यांच्या नोंदी करणं, भाषेवर पडणारा इतर भाषांचा प्रभाव नोंदवून ठेवणं, भाषेत होणारे बदल नोंदवून ठेवणं, भाषेचं सौंदर्य, तिची प्रचंड सर्जनशीलता आणि तिच्याद्वारे होणारं संस्कृतीचं अभिसरण पुढच्या पिढ्यांपर्यंत पोचवण्यासाठी भाषेचे उत्तम प्रशिक्षक तयार करणं...

किती आव्हानं, किती काम आणि किती जबाबदारी !

अजूनही आपण या गोष्टी शिक्षणात निर्माण करू शकतो, वाढवू शकतो. आपल्यापैकी बऱ्याच जणांना काहीतरी चांगलं करायचं असतं पण काय ते कळत नाही. त्यांनी हळूहळू भाषेकडे जागरूकतेनं पाहणं (हे चांगलं ते वाईट असे ग्रह बाजूला ठेवून) आणि भाषेच्या सर्व शक्यतांचा पुरेपूर वापर करणं एवढंच केलं आणि अभ्यासकांनी या सगळ्या वापरांच्या नोंदी केल्या, त्या समाजापुढे वेळोवेळी ठेवल्या तरी भाषेचं खूप चांगलं दस्तऐवजीकरण होऊ शकेल.

या लेखाचा हेतू समाजात भाषेविषयी जागरूकता निर्माण करणं आणि नोंदीकरणाची चक्रं कुठेतरी सुरू करून देणं एवढाच आहे.

▼▼▼

सुजाता महाजन, पुणे
लेखिका व कवयित्री, अनेक कवितासंग्रह,
लघुकादंबऱ्या, बालकथा,
कथामालिका, लेख प्रकाशित.
sujanmaha@gmail.com

शाळा ते महाविद्यालय यातला भाषिक पूल



अक्षरनंदन ही पुण्यातली मराठी माध्यमाची, प्रयोगशील शाळा. शाळेतलं मराठी माध्यम आणि महाविद्यालयातलं इंग्रजी माध्यम यांना जोडणारा दुवा म्हणून अक्षरनंदनमध्ये एक 'ब्रिज कोर्स' घेतला जातो. याविषयी आणि शाळेच्या भाषाविषयक धोरणाविषयी शाळेच्या माजी संचालिका विद्याताई पटवर्धन यांच्याशी झालेल्या चर्चेतील मुद्यांचे संकलन.

भूमिका

स्वभाषेच्या माध्यमातून आणि आजूबाजूच्या पर्यावरणातून मूल शिकतं, तेव्हाच शिक्षण सहजपणे घडतं. जे शिकलं ते व्यक्तिमत्त्वाचा अविभाज्य भाग बनतं. म्हणून अक्षरनंदननं मुलांच्या शिक्षणाचं भाषा माध्यम हे मराठीच असेल अशी ठाम भूमिका घेतली.

शाळेचं भाषिक धोरण ठरवताना भाषातज्ज्ञ डॉ. अशोक केळकर ह्यांच्याशी झालेल्या चर्चेतून भाषा शिक्षणाचं सूत्र हाती लागलं. 'सहा-सात वर्षांचं होईपर्यंत कानावर कितीही भाषा पडल्या तरी कोणताही गोंधळ न होता मूल त्यातील शब्द, वाक्यरचना, उच्चार अशा त्या त्या भाषेच्या धाटणीसह त्या भाषा सहज उचलू शकतं. सभोवताली ती भाषा बोलण्यासाठी स्वाभाविक अशी परिस्थिती लाभल्यास मूल त्या भाषा बोलूही शकतं.

मात्र ज्या टप्प्यावर मूल वाचन - लेखन औपचारिकरित्या शिकतं तेव्हा एका वेळेस एकच भाषा शिकणं उचित ठरतं. शालेय शिक्षणाचं माध्यम म्हणून ज्या सामाजिक, सांस्कृतिक परिवेशात मूल वाढत असतं ती परिसर भाषाच निवडणं योग्य ठरतं.'

त्यानुसार शाळेत राष्ट्रभाषा हिंदी आणि 'जगाची खिडकी' असलेली इंग्रजी या भाषांची ओळख गाणी - गोष्टी - चित्रांच्या माध्यमातून बालगटापासूनच होते. परंतु या भाषांचे औपचारिक शिक्षण मात्र मराठीचा पाया स्थिर झाल्यावरच दिलं जातं. साधारणत: इयत्ता दुसरीपर्यंत बहुसंख्य मुलं मराठीच्या वाचन - लेखनात स्थिरता मिळवतात. त्यानंतर तिसरीपासून इंग्रजीचं शिक्षण औपचारिकरित्या सुरू होतं. हिंदीसारखी सांस्कृतिकदृष्ट्या जवळची भाषा, लिपीही सारखी असल्यानं मुलं अधिक सहजी शिकतात असंही आढळतं.

त्या त्या भाषेच्या तासाला शिक्षक मुलांशी त्या भाषेतूनच बोलण्याचा प्रयत्न करतात. मुलांच्या अनुभवातून आलेल्या त्या भाषेतल्या शब्दांपासून सुरुवात करून हळूहळू भाषेच्या रचनेपर्यंत आणि सौंदर्यापर्यंत मुलांना नेण्याचा प्रयत्न असतो.

भाषाशिक्षणासंदर्भात एक अतिशय महत्त्वाचा मुद्दा लक्षात घ्यायला हवा. मुलाच्या मनात सकसपणे भाषा रुजायची असेल तर त्या भाषेतील साहित्याशी त्यांचा संपर्क यायला हवा. साहित्याच्या माध्यमातून त्या भाषेत विकसित झालेल्या संस्कृतीचा परिचय होतो आणि त्यामुळेच खऱ्या अर्थानं त्या भाषेत रुजणं शक्य होतं. चांगलं भाषाशिक्षण हे ती भाषा बोलली जाणाऱ्या सामाजिक, सांस्कृतिक परिसराशी जोडणारं असतं.

ಭಾಷಾ
भाषा
ಭಾಷೆ
மொழி
ભાષા Language

एखाद्या भाषेमध्ये रुजणं जेवढं महत्त्वाचं आहे तेवढंच रुतलेलं नसणंही महत्त्वाचं आहे. मराठीचं समीकरण जेव्हा संकुचित अस्मितेशी घातलं जातं तेव्हा भाषेबरोबरच दृष्टिकोनही संकुचित होतात. असं 'रुतलेलं असणं' विकासाच्या दृष्टीनं बाधक आहे. त्यामुळे खऱ्या अर्थानं वैश्विकतेची जाणीव जोपासणारी मनं जर तयार व्हायची असतील तर त्यांची पाळंमुळं इथल्या मातीत रुजायला हवीत.

त्याचबरोबर इंग्रजीसंदर्भात आपली भूमिका काय आहे हेही तपासून बघायला हवं. नव्वदच्या दशकानंतर 'इंग्रजी' ही उच्चशिक्षण, व्यवसाय आणि यातून मिळणाऱ्या आर्थिक सुबत्तेवर आधारलेली जीवनशैली यासाठीचा जणू काही 'पासपोर्ट' बनली आहे. इंग्रजी शिकणं अनिवार्य आहे हे जरी मानलं तरी कोणत्या वृत्तीतून आपण इंग्रजी शिकतो आहोत हे महत्त्वाचं आहे.

जुलै २००३ च्या लोकवाङ्मय वृत्तमध्ये समाजशास्त्रज्ञ पार्थ चटर्जी यांनी म्हटलं होतं, ''तेराव्या शतकात आपल्याकडे ज्ञानेश्वरी लिहिली गेली. त्यावेळी जर्मन भाषेची परिस्थिती काय होती? आज जर्मन भाषेला एक आधुनिक भाषा म्हणून मान्यता मिळाली आहे, पण मराठीला मात्र नाही. असं का झालं असेल? याचं कारण स्वातंत्र्यपूर्व काळातल्या समाजधुरिणांनी 'वाघिणीचं दूध' म्हणून इंग्रजी शिकून मराठी ज्ञानभाषा म्हणून विकसित करण्यावर भर दिला, तरी प्रत्यक्षात मात्र मराठी बुद्धिजीवी पांढरपेशा, मध्यमवर्गानं संपूर्ण शरणागती पत्करत इंग्रजीचा ज्ञानभाषा म्हणून स्वीकार केला आहे. मराठीला ज्ञानभाषा बनवण्याची जबाबदारी मात्र घेतली नाही.''

या वृत्तीमुळेच एक समाज म्हणून आपण सर्वजण भाषिक दुबळेपण अनुभवतो आहोत. सर्वत्र इंग्रजी भाषेचा स्वीकार वैश्विक सारखेपणाचा आभास निर्माण करतो. प्रत्यक्षात हा मोठ्या प्रमाणातला इतर भाषांना निष्प्रभ ठरवणारा एक तवंग आहे. इंग्रजीच्या स्वीकाराबरोबरच आपण स्वतःच्या भाषा, संस्कृती पर्यायानं स्वतःविषयीच्या न्यूनगंडानं पछाडले गेलो आहोत. हे आधुनिकीकरण नव्हे, हे सरळसरळ अंधानुकरण आहे. खऱ्या अर्थानं लोकशाहीचं यश हे ज्ञानाची कवाडं सर्वांसाठी खुली असण्यावर अवलंबून आहे. जर स्वभाषेतून शिक्षण मिळालं तरच हे शक्य आहे. खरं तर भारतासारख्या स्वतंत्र देशात विद्यापीठ पातळीपर्यंत शिक्षण मातृभाषेत पूर्ण करण्याची सुविधा असायला हवी. परंतु वास्तव तसं नाही. व्यवहारभाषा आणि ज्ञानभाषा म्हणून इंग्रजीवर प्रभुत्व असण्याला सध्या तरी पर्याय नाही. त्यामुळे आता एक समृद्ध भाषा म्हणून ताकदीनं इंग्रजीचं शिक्षण मुलांना मिळायला हवं. या भूमिकेतून शाळेमध्ये विविध उपक्रम घेतले जातात. 'ब्रिज कोर्स' हा त्यातलाच एक महत्त्वाचा उपक्रम !

> ''आपल्या तरुण-तरुणींनी इंग्रजी आणि इतर जागतिक भाषा हव्या तितक्या शिकाव्यात; त्याचा लाभ भारताला व जगालाही करून द्यावा... मात्र एकाही भारतीयाने आपली मातृभाषा विसरणे, तिची उपेक्षा करणे, तिच्याविषयी शरम बाळगणे, किंवा प्रगल्भ विचार आपल्या मातृभाषेत मांडता येत नाहीत असे समजणे योग्य नाही.''
>
> **गांधीजी**

ब्रिज कोर्स

मुलांच्या दहावीच्या परीक्षेनंतरच्या मे महिन्याच्या सुट्ट्यांमध्ये २००४ आणि २०१२ मध्ये हा कोर्स घेतला गेला. मराठी शाळेतून बाहेर पडल्यानंतर लगेचच्या काळात इंग्रजीतून बोली व्यवहार करण्याबाबतचा किमान मोकळेपणा आणि आत्मविश्वास मुलांमध्ये यावा, महाविद्यालयाच्या वातावरणात शिकण्याच्या दृष्टीनं समरसून जाण्याच्या वाटेवरील दुव्याचं काम या इंग्रजीच्या कार्यशाळेच्या माध्यमातून व्हावं असा या कोर्सचा हेतू आहे.

२००४ मधल्या ब्रिज कोर्ससाठी वर्षा सहस्रबुद्धे आणि हेमा होनवाड यांनी मार्गदर्शन केलं होतं. २०१२ मधला ब्रिज कोर्स संगीता खेडकर आणि हेमा होनवाड यांनी घेतला होता. साधारणतः दोन आठवडे तीन ते साडेतीन तासांच्या वर्गाची आखणी केली होती. या दरम्यान मुलांना इंग्रजी ऐकण्या, बोलण्याची, वाचनाची भरपूर संधी मिळावी यासाठी प्रयत्न केले होते. मुलांना आवडतील अशी उत्तम इंग्रजी गाणी, उतारे, पुस्तके, सिनेमा, प्रश्नावल्या अशी भक्कम पूर्वतयारी होती.

कोर्सच्या सुरुवातीला मुलांसमोर मी शाळेची भूमिका मांडली, ''नदी, समुद्र अथवा भरधाव रहदारीचा रस्ता ओलांडणं शक्य होत नाही, अशावेळी तिथं पूल बांधला जातो. हा कोर्स हाही एक पूल आहे. शाळेच्या, घराच्या, एका अर्थानं छोट्या पण सुरक्षित जगातून आता तुम्ही अधिक मोठ्या महाविद्यालयीन जगात प्रवेश करणार आहात. हे अंतर ओलांडण्यासाठी हा पूल तुम्हाला मदत करेल अशी आशा आहे. मजबूत पूल तयार होण्यासाठी त्याचा दोन्ही बाजूंचा पाया भक्कम असणं फार आवश्यक आहे. शाळेच्या जगातला मराठी भाषेचा तुमचा पाया मजबूत आहेच. तुम्ही सगळे अगदी बालवयापासून मराठीतच वाढलात, रुजलात, चांगल्या साहित्याची तुम्हाला ओळख झाली आहे, या शिदोरीकडे आता अधिक डोळसपणे तुम्ही

२००४ मधील ब्रिज कोर्सच्या सुरुवातीला श्री. वसंतराव पळशीकर यांनी इंग्रजीतून केलेल्या भाषणाचे संक्षिप्त रूपांतर

''मुलांनो, तुम्ही आता आयुष्यातला एक टप्पा पूर्ण केला आहे. मूल असताना तुम्हाला 'मी कोण आहे' असा प्रश्न काही पडला नसेल ! माझी ओळख काय, ह्या प्रश्नाला लहानपणी तोंड द्यावं लागत नाही. पण मोठं झाल्यावर कधीना कधी हा प्रश्न समोर उभा रहातोच !

आपल्याला आपली ओळख कशातून मिळते? आपल्या ओळखीचा एक भाग म्हणजे आपलं नाव. आपल्याला आपल्या आई - वडिलांनी नाव दिलेलं असतं. तेव्हा आपले नातेवाईक शेजारीपाजारी, मित्रमंडळी असे सगळे हजर असतात. हा सगळा गोतावळा आपल्याला नाव देतो. हे नाव जर नसेल तर आपल्या मनाची काय अवस्था होईल? विचार करा. आपल्याला शरीर आहे, मन आहे पण त्याला नाव नाही ! आपलं माणूसपण ही आपल्याला आपल्या समाजानं दिलेली देणगी आहे. यातूनच आपल्याला आपली ओळख, आपलं व्यक्तित्व मिळतं. ते एकमेवाद्वितीय असतं. ही स्वतःची ओळख मिळण्यात भाषेचा मोठा वाटा असतो. आत्ता मला या ब्रिज कोर्समध्ये इंग्रजीत बोलायला सांगितलं तेव्हा मला वाटलं, 'बापरे! इंग्रजीत बोलायचं?' 'बापरे!' हे शब्द तुमच्या मनाची अवस्था सांगतात. ते नुसते शब्द नाहीत. ते तुमच्या भावना व्यक्त करतात. त्यातले पदर-छटा त्या भाषेत वाढलेल्यालाच बरोबर समजतात. 'बापरे'चं भाषांतर काय होईल? तो नुसता एक निर्जीव शब्द होऊन बसेल! आपल्यासाठी मराठीत त्या शब्दाला जीव असतो. आधीच्या अनेक घटनांशी तिचं जोडलेपण असतं, शब्द उच्चारताक्षणी ते त्या भाषेत वाढलेल्या लोकांना समजतं. प्रत्येक भाषेतच असे शब्द असतात. ती ती मातृभाषा असणाऱ्यांना ते समजतात. पण इतर भाषकांना ते त्याच पद्धतीनं भिडत नाहीत. कारण आपण त्या त्या भाषेत वाढलेले असतो. ज्या वस्तीत, गल्लीत, मोहल्ल्यात आपण वाढतो, ज्या समाजात वाढतो, त्यातूनच आपण 'माणूस' बनतो. थोडक्यात काय तर आपल्याला आपलं माणूसपण, आपली ओळख मिळण्यात आपल्या परिसरभाषेची भूमिका महत्त्वाची आहे. आपली भाषा म्हणजे आपण शाळेतल्या वर्गात शिकतो ती, तेवढीच भाषा नव्हे. नैसर्गिकपणे ज्या भाषेत आपण वाढतो, घरी-दारी कानावर पडणारी भाषा. मातृभाषेबद्दलचा विश्वास म्हणजे स्वतःवरील विश्वास. आपली भाषा आपल्याला जन्मानं मिळाली आहे. जसे आई-वडील मिळाले तशी! ती काही आपली निवड नसते. तुम्ही त्यांना सोडून दूर गेलात तरी ते तुमचे आई-वडीलच असतात. असंच मातृभाषेचंही असतं. ती तुम्हाला भावना देते, जाणिवा देते, स्वप्न देते.

गांधीजी म्हणतात, ''तुम्हाला हवी तितकी इंग्रजी शिका, पण ते शिकताना जर तुम्ही तुमच्या भाषेला टाळू लागलात, कमी लेखू लागलात तर तुम्ही तुमची ओळखच काही अंशी हरवता. तुमच्या मनाचा गोंधळ उडतो, कारण तुम्ही स्वभाषेच्या स्थिर पायावर उभे नसता.''

तुम्ही इंग्रजी अगदी आत्मविश्वासपूर्वक बोलू शकाल. पण, त्या भाषेत तुम्ही वाढलेला नाहीत, ती तुमच्या समाजाची भाषा नाही. त्यामुळे इंग्रजी ही आपल्यासाठी 'साधन' आहे. पण मराठी केवळ साधन नाही. ती तुम्हाला तुमची ओळख, अस्मिता, व्यक्तिमत्व देणारी भाषा आहे, जीवनभाषा आहे. तुम्ही दोन गोष्टी लक्षात ठेवा, पहिलं म्हणजे इंग्रज़ी केवळ फाडफाड बोलण्यापुरतं शिकू नका. त्यातलं साहित्य वाचा. त्यातून एक नवी दुनिया भेटीला येईल. तुम्हाला त्यांच्या संस्कृतीची ओळख होईल. विविधता जग अधिक सुंदर बनवते. मात्र दुसरी बाजूही तितकीच महत्त्वाची आहे. आपल्या भाषेवर आपलं प्रभुत्व असायला हवं. जगातल्या इतर कुठल्याही भाषेइतकीच तीही तोलामोलाची आहे असं भान जागं असायला हवं.''

बघू शकाल.

आता या पुलाची दुसरी बाजू – इंग्रजी माध्यमाची ! ही बाजू मजबूत नसेल तर हा पूल डगमगेल. शाळेत इंग्रजीचा पाया घातला आहेच. यापुढे तो अधिक भक्कम करण्याचं काम तुम्हाला करायचं आहे. इंग्रजी भाषेचा पाया पक्का करण्यासाठी तुम्हाला मदत व्हावी यासाठी या ब्रिज कोर्सची आखणी केली आहे.''

यानंतर कोर्सच्या मार्गदर्शिका संगीता खेडकर यांनी या कोर्सच्या स्वरूपाचे पॉवर पॉईंट सादरीकरण मुलांसमोर केले. त्यावेळी अक्षरनंदनच्या मुलांचे इंग्रजीचे आकलन चांगले आहे, हे त्यांच्या लक्षात आले. त्यामुळे त्यांनी या कोर्समध्ये माहिती मिळवणं आणि त्या अनुषंगानं संवाद साधणं याच्या अधिकाधिक संधी मुलांना मिळाव्यात यावर भर दिला.

रोज सुरुवातीला परिपाठ असायचा. एखादी वृत्तपत्रातली बातमी वाचून दाखवणे, प्रार्थना, गाणं, thought for the day, असा गटा-गटानं एखादा विषय घेऊन सर्वांसमोर त्याची मांडणी करायची. त्यासाठी वर्गात बॅनर, चित्रं, पोस्टर्स तयार करत. गटातल्या मुलांच्या कलागुणांनुसार झकास सादरीकरणं व्हायची. यामुळे त्यांना लोकांच्या समूहासमोर इंग्रजीतून बोलायचा सराव मिळाला. अशी संधी मुलांना शाळेत मिळत असे याचा फायदा मुलांना जाणवत होता. कोर्सच्या सुरुवातीला दिलेल्या माहितीवर त्यांनी भरपूर प्रश्न काढावेत यावर भर दिला. प्रश्न विचारता आले तर त्यांना बाहेरच्या जगात माहिती मिळवणं सोपं जाईल, यासाठी ही योजना होती. प्रश्न तयार करण्याचा, विचारण्याचा पुरेसा सराव झाल्यानंतर त्याचं प्रतिबिंब 'रोल प्ले'च्या माध्यमातून मुलांनी गटासमोर मांडायचं होतं. त्यांना वेगवेगळे प्रसंग दिले होते. उदाहरणार्थ कॅन्टीनमधील संभाषण, प्राध्यापकांच्या ऑफिसमध्ये जाऊन माहिती विचारणं इ.



याबरोबरच दररोज व्याकरण आणि शब्दसंपत्ती वाढवण्यासाठी काम होत असे.

ब्रिज कोर्सचा आणखी एक भाग म्हणजे पहिल्या ब्रिज कोर्समध्ये सहभागी झालेल्या माजी विद्यार्थ्यांनी कोर्समधल्या मुलांशी संवाद साधणं, अनुभव मांडणं. त्यांनी दिलेला कानमंत्र मुलांसाठी फारच महत्त्वाचा ठरला – ''काही घाबरायचं कारण नाही. आम्हाला कॉलेजमध्ये इंग्रजी माध्यमातून शिकताना सुरुवातीला जरा बिचकल्यासारखं व्हायचं पण नंतर बिनधास्त बोलायला लागलो.'' तेव्हा 'Be shameless, घाबरू नका, लाजू नका.' हे जणू घोषवाक्यच झालं होतं त्या गटाचं !

मुलांची विश्लेषणाची क्षमता विकसित व्हावी यासाठी पर्यावरणाचे रक्षण यासारख्या विषयांवर वाद-विवादाचा उपक्रम योजला होता. मुलांच्या भावविश्वाशी जवळीक साधेल असा 'School of rocks' हा सिनेमा बघितला. एका अतिशय कडक शिस्तीच्या शाळेत, काही गफलतीनं शिक्षक म्हणून बदलून आलेल्या एका rock संगीतकारानं उडवलेली धमाल असणारा हा सिनेमा मुलांना खूप आवडला. त्याविषयी इंग्रजीत गप्पा झाल्या.

या कोर्सचा एक भाग मुलांनी पुढे जाऊन कुठलं क्षेत्र निवडायचं या मार्गदर्शनाचा होता. या व्यक्तींची निवड करताना मुळात मराठी भाषेमध्ये रुजलेल्या परंतु अतिशय आत्मविश्वासानं इंग्रजीचा वापर करू शकणाऱ्या व्यक्तींची निवड केली होती. या वर्षी फर्ग्युसनचे उपप्राचार्य डॉ. सचिन खेडकर यांना पाहुणे म्हणून बोलावले होते. मुलांनी त्यांची मुलाखत घेतली. 'मुलाखत कशी घ्यायची' याची आधी पूर्वतयारी केली होती. पाहुण्यांची ओळख, त्यांचे आभार यासाठीचा विशेष शब्दसंग्रह आणि रचना यांवर बोलणं झालं होतं. मुलांनी धीटपणे त्या-त्या कोर्ससाठी आवश्यक गुण, प्रवेशपद्धत, कॅपिटेशन फी याबद्दल प्रश्न विचारले. विविध अभ्यास शाखांची ओळख व्हावी या उद्देशाने विज्ञान, कला आणि हॉटेल मॅनेजमेंट ह्या विषयातील अनुभवी व्यक्तींच्या व्याख्यानांचं आयोजन केलं होतं.

मुलं खूप रमून गेली होती, अशी आणखी एक गोष्ट म्हणजे पॉवर पॉईंट सादरीकरण. संदर्भशोधन करून इंग्रजीतून मुलांना त्यांचे विचार मांडता यावेत असा उद्देश होता. मुलांनी

आपापल्या आवडीनुसार विषय घेतले होते. ब्रिज कोर्सच्या शेवटच्या दिवशी त्यांनी या विषयांचे सादरीकरण केले. ते पहायला मुद्दाम पाहुणे बोलावले होते. आम्हाला वाटलं होतं की मुलांनी हातातल्या टिपणांचा संदर्भ न घेता बोलावं पण तेवढी त्यांची तयारी होऊ शकली नाही. सुरुवातीला अजिबात बोलायला तयार नसणारी काही मुलं मात्र शेवटच्या सादरीकरणात छान बोलली. एका गटानं 'The land of culture - Bengal' असा विषय घेतला होता तर दुसऱ्या गटानं स्टीव्ह जॉब्ज हा भरपूर माहिती उपलब्ध असलेला विषय निवडला. तिसऱ्या गटानं 'The Unforgettable Journey - Aksharnandan' हा विषय घेतला होता. यासाठी शाळेचे पत्रक, फोटो, शिक्षकांची मुलाखत वापरली. इतक्या वर्षात त्यांना जे समजलंय ते त्यांनी सहजपणे व्यक्त केलं. खूप हृद्य झालं त्याचं सादरीकरण !

प्रतिसाद

या कोर्समागचा आमचा हेतू चांगल्या प्रकारे साध्य झाला, हे मुलांच्या प्रतिसादांतून समजलं. एकजात सर्व मुलांनी सांगितलं की या प्रक्रियेमधून त्यांचा आत्मविश्वास निश्चितपणे वाढला. मुलांना इंग्रजीची भीती तर कधी नव्हतीच पण त्यांची इंग्रजीशी थोडी अधिक मैत्री झाली, सहजता वाढली.

या ब्रिज कोर्समध्ये सहभागी झालेल्या मल्हार अत्रे या विद्यार्थ्याची सकाळमध्ये आलेल्या लेखामधली प्रतिक्रिया प्रातिनिधिक आणि बोलकी आहे. ''सुट्टी एन्जॉय करायच्या मूडमध्ये असतानाच शाळेकडून 'ब्रिज कोर्स'ची सूचना मिळाली. आम्हा मित्र-मैत्रिणींना वाटलं, आता नव्यानं कसला तरी अभ्यास करावा लागणार बहुधा. पण या कोर्सची एकेक सत्रं जशी सुरू झाली, तसंतसं आम्ही त्यात पूर्णपणे रंगून गेलो. गुरफटून गेलो आणि शेवटीशेवटी तर तो संपूच नये, असंही वाटलं.

सुरुवातीला शब्दांची जुळवाजुळव करताना, सलग वाक्य बोलताना बहुतेकांची त्रेधातिरपीट उडायची पण, हळूहळू इतक्या लवकर आम्ही त्यातून बाहेर पडलो, की आमचं आम्हालाच आश्चर्य वाटू लागलं.


अगदी फाडफाड नाही, पण दहा दिवसांनंतर आम्ही आत्मविश्वासानं इंग्रजीत संभाषण करू लागलो. ई-मेलवरून सहजपणे इंग्रजीतून संपर्क साधू लागलो. मुळात शाळेतच भाषेची गोडी निर्माण करण्याचं काम झालं होतं, त्यामुळे पुढचं फार कठीण गेलं नाही.''

आमच्या पातळीवरही काही स्पष्टता आली. मुलांची शब्दसंपदा कमी पडत होती. वाक्यं बनवताना ती थोडं अडखळत होती. पारिभाषिक शब्दांची ओळख, ग्रंथालयाची भाषा म्हणून इंग्रजी हाताळण्याची संधी या गोष्टींवर शाळेत भर द्यायला हवा असं जाणवलं. एकंदरीतच इंग्रजीकडे जे कामापुरतं म्हणजे interview देण्याकरता किंवा व्यवहारापुरतं पाहिलं जातं, तसं न होता इंग्रजी भाषा समजावून घेताना त्या भाषेच्या संस्कृतीसह समजावून घ्यायला हवी. अर्थात फक्त शालेय शिक्षणाच्या शेवटी ब्रिज कोर्स घेण्यानं प्रश्न सुटणार नाहीयेत. पण शालेय शिक्षणातूनच या पुलाची ताकद वाढवत न्यायला हवी. मुख्य म्हणजे आपल्या भाषेसंदर्भात लोकांच्या मनात जी न्यूनत्वाची भावना आहे ती जाऊन तिची जागा आत्मविश्वासानं घ्यायला हवी.

विरोध इंग्रजी भाषेला नाही, त्याच्या वर्चस्वाला आहे. इंग्रजी येणं हा व्यक्तीची पात्रता ठरवणारा एकमेव निकष बनत चालला आहे. आज इंग्रजीनं आपली मानगुट पकडली आहे, आपल्याला जर इंग्रजीची मानगुट पकडायची असेल तर आपली मनगटं बळकट करायला हवीत. ▼▼▼

विद्या पटवर्धन, पुणे
नारळकर फाऊंडेशन या संस्थेच्या कार्यवाह. सर्जनशील शिक्षणात रस असणाऱ्या समविचारी व्यक्तींना एकत्र जमवून 'अक्षरनंदन' ही शाळा सुरू करण्यात आणि पुढे नेण्यात महत्त्वाचा वाटा. 'परिसर' या पर्यावरणविषयक काम करणाऱ्या गटात सहभागी.
aksharvidya@gmail.com

सहजशिक्षणाची प्रयोगशाळा



आनंदनिकेतन या नाशिकच्या प्रयोगशील शाळेने आपल्या १५ वर्षांच्या वाटचालीनंतर आपल्या सर्जनशील शिक्षण प्रयोगांचा वानोळा 'सहजशिक्षणाची प्रयोगशाळा' या नावाने पुस्तकरूपाने महाराष्ट्रातील शिक्षक व पालकांसमोर ठेवला आहे. शिक्षकांनी पाठ्यपुस्तकाची कैद सोडली व थोडा दृष्टिकोन बदलला तर शिक्षण सहजपणे आनंददायी व अर्थपूर्ण होऊ शकते हे या पुस्तकातील लेख वाचून स्पष्ट होते. या पुस्तकामुळे पालकांचीही स्पर्धेच्या भूतबाधेतून सुटका होऊ शकेल व परिणामी बहुसंख्य मुलांचे शालेय जीवन आनंदमय होऊ शकेल. शिक्षणातील अनेक मूलभूत प्रश्नांची चर्चा यात आहे. त्याशिवाय शाळेच्या वाटचालीतील वळणे व हिसके यांचा इतिहास मनोरंजकपणे कथन केलेला आहे. हे पुस्तक महाराष्ट्रातील सर्व पुस्तकांच्या दुकानात उपलब्ध आहे.

प्रकाशक-आनंदनिकेतन, नाशिक, ९४२१५०७७८२, वितरक-युनिक बुक्स, पुणे. किंमत-रु. २००/-

With Best Compliments From



KALPAK INSTRUMENTS & CONTROLS
Technical Solution Provider

Industrial Estate, Hingane Khurd, Vlthalwadi, Pune - 411 051 INDIA
Tel : +91 20 2434 6363, 2434 6802 Fax : + 91 20 2434 6363

टचबाई आणि भाषा-हटोरी

सुषमा दातार

''वॉव मिल्क शेक और भजिया !! क्या वास आ रहा है !! ग्रेट, मस्त भूक लागलीये. आई आज तुझा खुशदिवस दिसतोय. काय कॉलेजात कुणी चांगला इंटेलिजन्ट प्रश्न विचारणारे स्टुडंट भेटले वाटतं?'' आहा !! 'खुशदिवस' !! आवडलं हे. त्यामुळे सुनीताला लेकाच्या धेडगुजरी भाषेबद्दल नेहमीप्रमाणे काही म्हणावं असं वाटलंच नाही. शिवाय खरंच तो खुशदिवस होता. उन्हाळ्याच्या सुट्टीपूर्वीचा कामाचा शेवटचा दिवस. तो म्हणाला तसे शिकायला उत्सुक चार विद्यार्थी-विद्यार्थिनी ''पुढच्या वर्षी आम्ही तुमच्या विषयाला असणार मॅडम'', असं सांगून गेले होते तिला. शिवाय मध्यमवर्गीय वर्किंग वुमनला स्वर्गीय देणगी वाटेल अशी गोष्ट त्या दिवशी सकाळी घडली होती. वेळेचं महत्त्व वाटणारी 'मेड' उर्फ कामवाली बाई उर्फ घरकामगार उर्फ मदतनीस घरी चालत आली होती. मराठी बोलताना 'वर्किंग वुमन' हा इंग्रजी शब्द वापरायची मुभा सुनीतानं स्वतःला दिलेली होती. कारण 'कामवालीबाई' हा शब्दशः योग्य असलेला शब्द वापरला तर सामाजिक आणि बौध्दिक स्तरांचा गोंधळ उडतो असं तिला वाटायचं आणि तसा गोंधळ उडतो याची खंतही तिच्या पुरोगामी मनाला वाटायची. असो.

सुनीताला बाई मिळाल्या म्हणण्यापेक्षा बाईंना सुनीताचं घर मिळालं असं म्हणणं जास्त रास्त किंवा बाईंच्या भाषेत 'करेक्ट' होईल. सुनीतानं त्यांना पूर्वानुभव विचारायच्या ऐवजी त्यांनीच हिला बरंच काही ऐकवलं. आपल्याला मालकीणबाईपणाचा अनुभवच



नाही हे सुनीताला त्यादिवशीच कळलं 'वीणा'च्या टणत्कारी भाषणातून. म्हणजे आधी तिला फक्त 'कॉर्नर, बेश्ट, फ्यामिली, झंजट, डिलेव्हरी, रिटायर, पेमेंट' एवढेच शब्द कळले. एरवी भाषेचा लहेजा ओळखणं ही आपली खासियत मानणाऱ्या सुनीताला या वीणेच्या बोलाचे सूर-ताल समजावून घ्यायला जाम कान टवकारावे लागले, चक्क विचार करावा लागला. मग उलगडलं थोडं काही, तेही वीणेनं दम (म्हणजे पॉज हो) घेतला म्हणून. ''मी वीणाबाई, मला त्या कॉर्नरवरच्या सुरेश भाजीवाल्यानं तुमच्याकडे पाठवलंय. तुम्हाला मेड पाहिजेलेय म्हणालतात नाऽऽऽ. काय काय काम आहे आणि घरात कोण कोण आहे ते पण सांगितलं त्यानं. एकदम बेश्ट फ्यामिली आहे म्हणाला. काही झंजट-झिगझिग नाही. पोराच्या डिलेव्हरी नंतर लागलेल्या सरूबाई म्हाताऱ्या होऊनच रिटायर झाल्यात त्यांच्याकडून. असं सांगत होता तो.''

ट्यूब पेटल्यावर लक्षात आलं वीणेनं कोणता राग आळवला ते. तो 'कौतुक' राग असल्यानं आपल्याला वीणाबाईंची 'भाषा' न कळल्याबद्दल कमीपणाची भावना न आणता ती निमूट ऐकू लागली. (ही छापील स्टोरी असल्यानं वीणाबाईंची भाषा प्रमाणभाषा आहे असं वाटण्याची शक्यता आहे. पण त्यातल्या अनुनासिक किंवा हेलाबरोबर नको इतके लांबणाऱ्या किंवा जिभेच्या वळणात गडप होणाऱ्या शब्दांची गंमत नाही ऐकवता येणार. सॉरी फॉर दॅट.) ''कॉर्नरवरचा झेरॉक्सवाला गणेश पण सांगत होता. सगळे एज्युकेटेड आणि जॉबला जाणारे लोक. सगळ्याऽऽऽऽनी शिकावं म्हणणारे. सरूबाईची पोरं पोरी यांच्यामुळेच शिकली म्हणला, पुन्हा उपकाराची भाषा नाही असं पण म्हणला. आपल्याला अश्शीच फ्यामिली पायजेल होती. मी चवथी पास असले तरीऽऽऽऽ माझ्या तिन्ही पोरी शाळा-कॉलेजात जातात बरं का मॅडम. नोट करून ठेवा.''

परिसरातल्या भाजीवाल्याला आणि झेरॉक्सवाल्याला आपली इतकी माहिती!! आपण स्थानिक नाकखुपसू-यंत्रणेच्या नजर-क्षेत्रात असल्याचं कळल्यानं ती जरा अस्वस्थ झाली. पण वीणाबाईंचं 'स्पीच' टिपेला पोचल्यानं अस्वस्थता फार वेळ टिकणं शक्यच नव्हतं. ''तुम्ही आजीबाऽऽऽऽत काळजी करू नका मॅडम. माझं काम अगदी टाईमशीर असतं. बरोबर आठ वाजता टच होईन. लेट होणार असेन तर मोबाईलवर मिस्ड कॉल देईन. म्हणजे आपलं तुम्हाला तसं रेडी रहायला बरं. आपलं काम एकदम टिपटॉप. आपली हजेरी एकदम चोख. कंम्लेंटला जागाच नाही ठेवणार. मग दोन हजार पेमेंट तुम्हाला जादा नाही वाटणार. तुमच्या नंतर १० ते ६ मी ऑफिसच्या ड्यूटीला जाणार. तिथले सर पण पेंमेटला बेश्ट आहेत. आपलं कामच तसं आहे खणखणीत. पुन्हा तेच 'मॅडम, टाईमशीर, टच, मोबाईल, मिस्ड कॉल, रेडी, टिपटॉप, हजेरी, कम्प्लेंट, सर, पेमेंट, ऑफिस, ड्यूटी, बेश्ट' तिला एवढेच शब्द प्रथमऐकणी कळले होते. (प्रथमदर्शनीला हाच पर्यायी शब्द सुचला बुवा. असे शब्द तयार करण्याची सवय लेकानं बोलायला लागल्यापासूनच लावलीय सुनीताला. तेव्हा हा शब्द योग्यच ठरतो या ष्टोरीत..... कंसांचा त्रास होतोय? होऊ द्या. गोष्ट कळतेय ना, ते महत्त्वाचं. तर पुढे....)

यांचं मराठी नक्की कोणत्या भागातलं? यांच्या बोलीभाषेची ही सुरेल पण अगम्य धाटणी तरी कुठली? इतके इंग्रजी शब्द कसे यांच्या तोंडात? आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वासारखाच खणखणीत 'ण' असलेलं हे वीणा नाव त्यांना कोणी दिलं असेल? असे अनेक प्रश्न सुनिताच्या डोक्यात टाकून या सुरेल आणि सदैव झंकारणाऱ्या वीणाबाई विनय, सुनिता आणि ऋतुराजच्या फ्यामिलीत दाखल झाल्या. एरवी सर्व वर्किंग वुमनांच्या घरात असते तशी त्यांच्याशी संवाद साधण्याची, त्यांना ट्रेन करण्याची जबाबदारी फक्त सुनीतावर पडली कारण तिलाच त्यांच्या भाषिक पावभाजीतले मराठी शब्द हळू हळू सवयीनं सुटे सुटे आणि सलग कळू लागले. वीणाबाई ऑफिसगोइंग असल्यानं त्यांची रविवारी रजा. त्यामुळे आणि विनय सात ते सात घरातच नसल्यानं तो या कामातनं आपोआपच सुटला. सरूआजी रिटायर झाल्यामुळे ऋतूचा हाऊसकीपिंगच्या प्रांतातला इंटरेस्ट फक्त आईनं सांगितल्यावर मदत करणं एवढाच राहिला होता. सरूआजीची जागा दुसऱ्या कुणी घेतलेलीही त्याला मान्य करणं अवघड होतं. तरी वीणाबाईंच्या माघारी वापरण्यासाठी ऋतूनं त्याच्या सवयीनं ताबडतोब त्यांचं नामकरण 'टचबाई' असं करून टाकलं. कारण त्यांनी पहिल्याच दिवशी बाबाबरोबर त्यालाही 'सर' करून टाकलं होतं (मनात भलते विचार आणायची बात नस्से. वीणाबाई ऑफिसात काम करत असल्यानं सगळ्या बाया 'मॅडम' आणि सगळे पुरुष 'सर' ही संबोधनं त्यांच्या तोंडात बसलेली, एवढाच त्याचा अर्थ). काही दिवसातच ही मंडळी बेडरूम्समधे नाही तर 'केबिन' मधे झोपू लागली. नशीबच त्यांचं की त्यांना आणि त्यांच्या गेश्टना हॉलच्या ऐवजी 'वेटिंग रूम' मधे बसायला, टीव्ही बघायला लागलं नाही आणि किचन डायनिंग ऐवजी 'कँटीन' मधे जेवायला नाही लागलं ते.

प्राध्यापकांना मिळणाऱ्या उन्हाळ्याच्या सुट्टीचा फायदा सुनीताला फारच जाणवला. ही सुट्टी नसती तर कामाला जायच्या घाईत तिला वीणाबाईंचं हे भाषा-फ्यूजन आणि ॲक्सेंट-फ्यूजन समजावून घेणं आणि त्यांना आपल्या घराच्या कामाची पध्दत समजावून देणं अवघडच गेलं असतं. पहिल्या काही दिवसांतच तिला कळून चुकलं. या टचबाई दुसऱ्याकडून कामाची पध्दत शिकून घेण्याबाबत टची आहेत. त्यांची कार्यतत्परता,

कुशलता हवी असेल तर त्यांची कौतुक करून घ्यायची गरज आणि शहाजोगपणा अंगवळणी पाडून घ्यावा लागेल. (सध्या अनेकांच्या अंगवळणी पडलेल्या सवयीप्रमाणे यात प्रांतवाचक अर्थ कादू नयेत. शहा आणि जोग यांच्याशी या शब्दाचा अर्थाअर्थीही संबंध नाही. टचबाईंच्या व्यक्तिचित्रणाच्या संदर्भातून याचा शब्दार्थ समजून घ्यावा ही विनंती.)

तर वीणागमनानंतरचा दुसरा दिवस. विनय कामाला गेला होता. ऋतुराज जायच्या तयारीत होता. सुनीता तिच्या नेहमीच्या सवयीप्रमाणे डायनिंग टेबलाशी बसून, मोठ्ठा मग भरून वाफाळती कॉफी पिताना आपल्या लॅपटॉपवर लिहायचा प्रयत्न करत होती. दिवाळीच्या सुट्टीत लिहायला घातलेल्या, सरूबाईंच्या जीवनावर विनोदी अंगानं बेतलेल्या कथेला नावच सापडत नव्हतं. कथा पूर्ण व्हायचंही नाव घेत नव्हती. सकाळी आठची वेळ. बेल वाजली. ऋतुराजनं दार उघडताच टचबाईंनी हसऱ्या चेहऱ्यानं धीट सलामी दिली. ''गूऽऽऽड मॉर्निंग धाकटे सर.'' सुनीता दचकलीच आणि कीबोर्डवरचा हात सटकल्यानं समोरच्या शिळ्या कथेतल्या सरूबाईंचं मरूबाई झालं. ते सुधारते ना सुधारते तोच... ''काय मॅडम, तुमची हॉट काफी कोल्ड झाली की. आणा मी मायक्रोला लावते.'' असं म्हणत मगाला हात घातला. ऑफिसला जायला निघालेल्या ऋतूनं दार ओढून घेता घेता तिच्याकडे बघून डोळे मिचकावत म्हटलं ''मॉम हॅव अ नाईस इअरफुल टाईम.''

सुनिताचा हात झटकन कानाशी गेला. ऋतुराज ही गोष्ट लिहीत असता तर इथे त्यानं एक विंकींग स्मायली टाकली असती. ''कैसा फसाया'' म्हणणारी. परंतु आमच्या कथा अजून तरी मासिकांचे संपादक स्वीकारत असल्यानं आम्ही आमचा कथा-ब्लॉग सुरू केलेला नाही. त्यामुळे नाइलाजानं पारंपरिक अक्षर-भाषाच वापरावी लागते आहे. अर्थवृध्दीसाठी त्यात अजून तरी आयकॉन्स किंवा चित्रसंकेत टाकायची मुभा आम्हाला दिलेली नाही. तर असो....) सुनीता कानावरचा हात खाली घेते ना घेते तोच टचबाईंनी मायक्रोवेव्हच्या टचपॅडचा ताबा घेऊन बटणं दाबायला सुरवात केली. दहा बारा वर्षं विनादुरुस्ती निगुतीनं वापरलेल्या मायक्रोवेव्हचं आता काय होणार अशी काळजी तिच्या चेहऱ्यावर स्पष्ट उमटली पण कॉफीचा मग गरम होऊन सुखरूप बाहेर आलेला पाहून तिनं सायलेंट हुश्श केलं.

बाईंनी आधीच आटोपशीर, नीटनेटक्या असलेल्या साडीचा पदर खोचून घेतला. उन्हातून चालत येणं, चाळिशी आणि तीन बाळंतपणानंतरही तुकतुकीत काळा वर्ण रापला नव्हता. डौलदार हालचालीही मंदावल्या नव्हत्या. एकदम फिट असलेल्या टचबाईंचा मॅजिक टच तत्परतेनं स्वयंपाकघराला उजळवू लागला. काहीही सूचना द्यायला न लागता त्यांनी कादून ठेवलेला कोबी चिरायला घेतला. फूड प्रोसेसर काय करील असा नाजूक एकसारखा चिरलेला कोबी विळीच्या पात्यावरून ताटात पडू लागला. सुनीतानं प्रतिक्षिप्त क्रियेनं त्यांच्याकडे पाहून कौतुकाचं स्मित केलं..... आणि पस्तावली. तिचं स्मित पकडून वीणा झंकार सुरू झाला. ''हां आस्सं. असं कामाचं कौतुक झालं म्हणजे कसं बरंऽऽऽ वाटतं. मग एकदम ग्यारंटीच काम चांगलं होणार. आमच्या आण्णांच्या पारशी मालकीणबाईनं मला आणि आईला वसवस न करता असं शिस्तीऽऽऽत काम करायला शिकवलंन.'' आधीच लॅपटॉपमधे अडलेल्या कथेला आता काही काळ लाल सिग्नल हे सुनीतानं ओळखलं. पुढे 'मालकिणींचे वर्क कल्चर' या विषयावरचं त्यांचं पीपीटी (म्हणजे पुन्हा पुन्हा तेच, पॉवर पॉईंट नव्हे.) चालू झालं. कोबीचा कांदा संपवून कोशिंबिरीचा कांदा-टोमॅटो खसाखस चिरला जाईपर्यंत ते चाललं. मग नारळ खरवडताना स्वतःच्या नावाची जन्मकहाणी सुरू झाली.

''तुम्ही विचारलं नाही पण तुमच्या मनात आलंच असंल ना या काळ्या बेंद्ऱ्या बाईचं असं माडर्न नाव वीणा कसं म्हणूऽऽऽन!! इंटरेस्टिंग ष्टोरी आहे त्याची.'' पुन्हा तेच माडर्न, इंटरेस्टिंग ष्टोरी यांच्यात लपलेले मराठी शब्द कानात पकडण्याचा प्रयत्न करत सुनीता चक्क इंटरेश्टनी ऐकू लागली. ''आमची माहेरची फ्यामिली मूळ बेळगावकडची. पण आमचे आजा-आजी कोल्हापुरात आले. शहराबाहेरच्या एका बंगल्यात माळीकाम करून बंगल्याची देखभाल करणारं जोडपं हवंवतं. तिथे ऱ्हायले ते. माझे आण्णा आणि एक मुलगी झाली त्यांना. मऽऽऽग आण्णांचं म्यारेज झाल्यावर ते साताऱ्याला एका पारशाच्या बंगल्याच्या आऊटहौसात ऱ्हायला आले. मऽऽऽग माझ्यावेळी आई बाळंतपणाला माहेरी गेली तिकडं मध्यप्रदेशात. महू गाव म्हायताय का तिथं.'' इथपर्यंत मधे पॉज घेऊन, पोळ्यांची चौकशी होऊन, कणीक भिजवून झाली त्यांची, चिमूटभरही कणीक न सांडता. सुनीताला ऐकू का बघू असं झालं. ''माझ्या आईचे वडील मिल्टरीच्या जवळ ऱ्हायचे. आधी मिल्ट्रीत शिपाई होते. आईची आई घरकाम करायची. एक कर्नल का कोण होते सुब्रमण्यम म्हणून त्यांच्याकडे. सगळं घर काहीबाही गाणाऽऽऽऽर नाहीतर वाजवणाऽऽऽऽर. त्यांच्या बायकोचं आणि माझ्या आजीचं जाम गूळपीठ. आजी त्यांना कसली कसली गौराईची गाणी म्हणून दाखवायची. त्या प्रेमाऽऽऽऽनं ऐकणार. त्यांना दोन मुलगे. मुलगी नव्हती नाऽऽऽऽ म्हणून त्यांनी हौसेनं माझं नाव वीणा ठेवलं. अशी भारी ष्टोरी आहे.''

ष्टोरी संपेपर्यंत काम संपवून सगळा ओटा पुसूनही झाला होता त्यांचा. आता या केलेल्या तयारीचं स्वयंपाकात रूपांतर करताना आपण नक्की ही ष्टोरी पुन्हा मनात रिवाईंड करून

ऐकणार याची सुनीताला खात्रीच वाटली. शिवाय या ष्टोरीतून टचबाईंच्या बोलण्याला लाभलेले विविध भाषिक-टचही जाणवले. तिला लेकाच्या बारश्याच्या वेळची आपली नाराजीही आठवली या नावाच्या ष्टोरी मुळे. विनय आणि त्याच्या आईवडलांनी ऋतुराज हे नाव जणू ठरवूनच टाकलं होतं. पण आपल्या मनात जोडाक्षर विरहित 'अजय' होतं. हाक मारायला सोपं, अपभ्रंश होणार नाही आणि मुलाला बोलायला येऊ लागल्या लागल्या सांगता येईल असं. पण 'हटके' नाव ठेवायची फॅशन असल्यानं त्यांना तेच हवं होतं. तीन विरुध्द एक मतांनी 'ऋतुराज' पार्टी विजयी झाली आणि तो नामधारी बोलू लागताच विजयी टीमला पराजयाला सामोरं जावं लागलं. ऋतुराज असं भारदस्त नाव असलेल्याला तीन वर्षांपर्यंत 'र' म्हणताच न आल्यानं 'लुतुलाज' पार्टीला लाज वाटण्याची वेळ येत असे परंतु ते सगळे सुजाण असल्यानं तसं त्याला दाखवत नसत. आणि आपला चॉईस चुकला हे सुनीताकडे कबूलही करत नसत. सरुबाईंनीही आपल्या नामकरण स्वातंत्र्याचा वापर करून आपल्यापरीनं चुकलेल्या चॉइसातून मार्ग काढला होता त्याला 'बाबू' बनवून. टचबाईंनीही कदाचित त्याच कारणासाठी त्याला 'धाकटे सर' केलं असणार.

या धाकट्या सरांशी टचबाईंचा एनकौंटर झाला पुढच्याच काही दिवसात. त्यांना येऊन पाचसहा दिवस झाले असावेत. अनेक वर्षं काम करत असल्यासारख्या त्या रुळल्या होत्या. त्या दिवशी थोड्या वेळेआधीच येऊन कामाला लागल्या होत्या. सुनीता अभ्यासाचं काही वाचत बसली होती. त्यामुळे वीणावादन बंद होतं. ऋतुराज ऑफिसच्या गडबडीत. तो खाली गेला आणि तसाच परत वर आला संतापून. ''आई तू त्या शेजारच्या काकूंना सांग. ये नही चलेगा. हे सातव्यांदा झालंय. त्यांच्याकडे सारखे येणारे पाहुणे कुठेही कशाही गाड्या लावतात. नाऊ आय कांट मूव्ह माय बाईक.'' सुनीताला कसल्याही प्रकारची 'भाषिक' टीका करायचा चान्स न देता चिरायला घेतलेली शेवग्याची शेंग ऋतूकडे रोखत टचबाई म्हणाल्या, ''धाकटे सर तुम्ही बायबल वाचलंय का? त्यात सांगितलंय, शेजाऱ्यावर प्रेम करावं. बेल वाजवून सांगा की जावा गोडीनं.'' ऋतुराज फ्रीजच झाला. टु बी देअर ऑर नॉट टु बी देअर अशी अवस्था झाली त्याची. गालात हसणाऱ्या आईकडे बघत तो बाहेर पडला आणि शेजाऱ्यांची बेल वाजवली. सुनीतानं आपलं हसू दाबायला पुन्हा पुस्तकात मान घातली.

पण टचबाईंनी हा ब्रेक इन सायलेन्सचा चान्स घेतलाच. ''तुम्ही विचारलं नाहीऽऽऽत पण तुम्हाला वाटलं असणार, चवथी शिकलेल्या बाईला बायबलमधलं कसं काऽऽऽऽय माहीत? त्याचीपण ष्टोरी आहे. आमच्या पारशी मालकांची मुलं जायची ना कानव्हेंट शाळेत तेव्हा कानावर पडलं होतं हे नाव. तसं इंग्रजी कानावर पडून पडून ओळखीचं झालं होतंच. पण ही वेगळी ष्टोरी आहे. मी सोळाची झाले तेव्हा गावाकडच्या चांगल्या माहितीतल्या फ्यामिलीतलं स्थळ आलं म्हणून आण्णांनी लग्न करून दिलं. आमचे मालक पुण्यात ऑफिसात प्यून होते. भवानी पेठेतल्या जुन्या वाड्यात भाड्याची जागा घेऊन दिली सासऱ्यानं. दुसरी पोरगी झाल्यावर त्यांचं पिणं सुरू झालं.'' कधी नव्हे ते त्यांनी बोलताना चिरणं थांबवलं. सुनीताच्या चेहऱ्यावरचं अम्यूज्ड हसू पुसलं गेलं. ''मी कामं धरली. पारशिणीकडचं कसब कामाला आलं. तिसरी पोर झाल्यावर तर पिऊन पडायला लागले ते. एकदा असे पडले ते उठलेच नाहीत. मग मी धाकटीला आई-आण्णांकडं ठेवली आणि मोठ्या दोघी पोरींना त्या चर्चच्या रहिवाशी मराठी शाळेत घातलं. आणि फुल्ल टाईम कामं धरली. एकटी बाई म्हणून कुणी त्रासबीस द्यायला जागाच ठेवली नाही. शनवार रविवार पोरींना भेटायची. तेव्हा बायबलातल्या गोष्टी सांगताना कानावर पडल्या. म्हटलं कृष्णाच्या-रामाच्या काय नाहीतर येशूच्या काऽऽऽऽय गोष्टी कुठल्या का असेना, शहाणपणाच्या आहेत, ऐकून घ्याव्यात म्हणून मीपण ऐकायला बसायची. अशी ष्टोरी आहे.'' पुन्हा शेवग्याची शेंग हातात घेऊन तीन तीन इंचाचे अचूक तुकडे करून पाण्यात टाकत टचबाई समेवर आल्या. ''थोडा लिहा-वाचायचा प्रयत्न चालू ठेवलावता. कानडी, मारवाडी, गुजराती सगळ्या शेजाऱ्यांना गोडीनं सांभाळून घेतलं म्हणून त्यांनीपण मला ते सपोर्ट का काय म्हणतात ते दिलं. त्याशिवाय का आज ऑफिसात लागलेय कामाला !!! कसलीऽऽऽ पण भाषा बोला कळेल न कळेल, गोडीची-मायेची भाषा नक्कीऽऽऽ कळते माणसानला.''

सुनीता दचकलीच पण क्षणभर. डोक्यात विचार चमकला. तिनं लॅपटॉप पुढे ओढला. भराभर बोटं चालवत अडलेल्या कथेचं पान उघडलं आणि छानसा घाटदार फॉन्ट शोधून कथेचं टायटल लिहिलं. ''सरूबाई अ वर्किंग वुमन''.

▼▼▼

(या श्टोरीतल्या पात्रांचं कुणाला आपापल्या घरातल्या बायाबाप्यांशी, मुलाबाळांशी, पेड-अनपेड वर्किंग वुमनांशी स्वतंत्र किंवा कॉम्बिनेशन करून साम्य सापडल्यास ते इंन्टेन्शनल समजावं. या कथेसाठी अशाच भाषेची गरज असल्यानं 'भाषा अशुध्दी' बद्दल क्षमस्व. कथेवरचा आपला बरा वाईट प्रतिसाद बोली किंवा लिखित भाषेत, मनात किंवा जनात दिल्यास आम्ही स्वागतच करू.)

सुषमा दातार, पुणे
मास-कम्युनिकेशन या विषयाच्या
प्राध्यापक-अभ्यासक. चित्रपटविषयक लेखन.
मोठ्यांसाठी आणि मुलांसाठी लेखन.
साथसाथ विवाह अभ्यास मंडळाच्या अध्यक्षा.
sushamadatar@gmail.com

सर्वांसाठी भाषा

श्रीनिवास निमकर



भाषांमधली सरमिसळ, शालेय पातळीवर भाषा विषयाकडे होणारे दुर्लक्ष, भाषेचे प्रमाणीकरण, संगणकाच्या वापराने घडणारे बदल अशासारख्या मुद्यांवरची निरीक्षणे या लेखात नोंदवली आहेत.

परवाच माझा शाळकरी मुलगा त्याच्या मित्राला फोनवरून अभ्यासाचा काही भाग समजावून सांगत होता. त्यातल्या एका वाक्याची माझ्या नकळत मेंदूने नोंद घेतली ''...सहावा चॅप्टर अगदी झेपलेस् आहे हं, नीट लक्ष देऊन वाच.''

त्यानं फोन ठेवल्यानंतर मी विचारले, ''मघाशी कोणता शब्द वापरलास तू? 'झेपलेस'?''

''हो'' तो सहजपणे म्हणाला, ''अवघड आहे धडा तो - झेपत नाही ते झेपलेस्!''

इतक्या सहजपणे त्याने दोन भाषा मिसळून नवा (तरीही सुटसुटीत, सोपा आणि अर्थवाही) शब्द बनवलेला पाहून माझ्या विचारचक्राला चालना मिळाली

जगातील मुख्य भाषांपैकी प्रत्येकीतच कदाचित अशी सरमिसळ कमीजास्त प्रमाणात चालू असावी. नवतंत्रज्ञानाच्या जोरदार प्रसारामुळे तर अशी भाषिक देवघेव विलक्षण वेगाने वाढलेली आहे, त्याचप्रमाणे, गेल्या दोन दशकात, (प्रादेशिकपासून जागतिकपर्यंतच्या) विविध समाजगटांमधले सांस्कृतिक अभिसरण देखील बहरलेले आहे. कामानिमित्त लोक वेगळ्या ठिकाणी राहायला जातात हे तर आपण दररोज पाहतोच ! तरुणाईची भाषा नेहमीच प्रयोगशीलतेने आणि प्रस्थापित व्यवस्था नाकारण्याच्या अत्यावश्यक अंतर्भावनेतून उत्पन्न झालेली असल्याने तिच्यात तर ही सरमिसळ सामान्यत: अधिकांशाने आढळते. शब्दाचे वा शब्दप्रयोगाचे लघुरूप सर्रास वापरात येते किंवा (वर म्हटल्याप्रमाणे) दोन वेगळ्या भाषांतले शब्द जोडून नवाच शब्द बनवला जातो. भाषाव्यवहारात होत असलेल्या या बदलांच्या पार्श्वभूमीवरच शिक्षणाच्या माध्यमाचा विचार आता आपल्याला करावा लागणार आहे. इथे मी शिक्षण-माध्यम कोणते असावे ह्या मुद्याबाबत फारसे लिहिणार नाही. कोणत्याही विषयाचे शिक्षण शक्यतो मातृभाषेतून सुरू करावे असे शिक्षणशास्त्राने स्पष्टपणे म्हटलेले आहे, आणि ते योग्यच आहे, त्यात शंका नाही, परंतु ह्याच्या काही व्यावहारिक उपांगांचीही जाणीव आपण ठेवली पाहिजे ह्या कल्पनेने त्यांची मांडणी इथे केलेली आहे.

मुळात आपल्याकडे भाषा ह्या विषयाबद्दल 'प्रेम' निर्माण व्हावे अशी एकंदर शैक्षणिक आणि व्यावहारिक परिस्थितीच नाही ! बऱ्याच लोकांना तर वाटते... भाषेचा विशेष अभ्यास करायचाच कशाला? भाषा विषयाच्या जास्त खोलात शिरायचे कारणच काय ! साधारण बोलता आले, समोरच्याला अर्थ समजला की झाले ! हां, विज्ञानाचे एकवेळ ठीक आहे तिथे आपण खोलवर शिरून संकल्पना

ಭಾಷೆ
ભાષા
மொழி
ഭാഷ
भाषा Language

समजावून घ्याव्या लागतात, वगैरे. खरे तर आपल्या मनातील विचार अधिक सुसूत्रपणे, नेमकेपणाने आणि (फक्त आत्मविश्वासाने नव्हे तर) परिणामकारकपणे तसेच आकर्षकतेने सादर करण्यासाठी त्या त्या भाषेतले विविध चपखल शब्द अवगत असणे अत्यावश्यक असते. पण तसे करण्यामागे आपल्या मनातील हेतू नेमका काय आहे, यावरून आपला त्या भाषेकडे पाहण्याचा एकंदर दृष्टिकोण दिसून येतो. अगदी इंग्रजीचे उदाहरण घ्या. आपल्याला सफाईने इंग्लिश बोलता यावे असे अंतर्मनातून बऱ्याचजणांना वाटते. परंतु ही आस कशासाठी असते? समोरच्याला आपला मुद्दा पोचवण्यासाठी नाही, तर त्यास आपण हुशार वाटावे यासाठी; हे सगळे भाषेच्या प्रेमापोटी तर मुळीच नसते. (नाही तर फक्त काही व्यावहारिक वाक्ये आत्मविश्वासाने बोलण्यासाठी कुणी 'स्पोकन इंग्लिश'च्या शिकवण्या लावल्या नसत्या!) वास्तविक भाषेकडे असे दुर्लक्षाने वा लाभहानीच्या हिशोबीपणे बघणे विचित्रच आहे.



भाषा हा कुठल्याही माणसाच्या जीवनातला अत्यंत महत्त्वाचा भाग असतो. मूल जन्मल्यापासून भाषा आणि तीमधले विविध शब्द शिकत आणि वापरतच तर वाढत असते. घरीदारी आणि नंतर शाळेत कानावर पडणारी भाषेची रूपे, शब्द आणि त्यांमधून व्यक्त होणारा थेट वा छुपा अर्थ ते समजून घेत असते. बहुभाषिक शेजार असलेल्या मुलामुलींना बरेचदा मातृभाषेप्रमाणेच त्या वेगळ्या भाषांमधलेही वाक्प्रचार इ. अवगत असतात असे आपण पाहतो. प्राथमिक शालेय शिक्षण पूर्ण होईपर्यंत सहजसुलभतेने होणारी भाषा टिपण्याची आणि शिकण्याची क्रिया सुरू राहते. अनेकदा ही क्रिया नंतर थांबते, ती आपल्याकडील शिक्षणपद्धती पद्धतशीरपणे मारून टाकते म्हणूनच !

सध्याच्या शिक्षणाचे चित्र एकंदरीने पाहता असे म्हणता येईल की भाषा-विषयांचा अभ्यास केल्याने (गणित, शास्त्रे इ. शिकून इंजिनिअर होण्याच्या तुलनेने) भरपूर पैसा कमावता येत नाही, म्हणजेच आजच्या समाजदृष्टीने आयुष्यात 'यशस्वी' होता येत नाही. तसे यशस्वी व्हायचे असेल तर उपयोगी पडते ते 'स्पोकन' इंग्लिश आणि त्यानंतर मिळणारी मॉल किंवा कॉलसेंटरमधली नोकरी! भाषेच्या रसास्वादाने जीवनात पैशांनी कधीही न मोजता येणारा आनंद येऊ शकतो, याची माहितीच नसलेल्यांना तो मिळणार तरी कसा?

भाषेबाबतच्या ह्या दुष्काळाचे दुष्परिणाम वेगवेगळ्या पातळ्यांवर होतात. अगदी वैयक्तिक स्तरावर बघू गेले तरी दिसते की शास्त्रशाखेच्या द्विपदवीधरांना देखील आपले संबंधित विषयातील ज्ञान व्यक्त करण्यासाठी ओघवत्या भाषेत एक-दोन परिच्छेदही लिहिता येत नाहीत. (टोकाच्या परिस्थितीमध्ये तर पूर्वी शिकलेले शब्दप्रयोगही त्यांना आठवत नाहीत!) जे काही लिहिले जाते त्यामध्ये शब्दांची पुनरावृत्ती (कारण शब्दभांडार मर्यादित!) होत राहते. त्यामुळे ते एकसुरी आणि परिणामी अनाकर्षक भासते. एखाद्या कवितेचा वा कथेचा रसास्वाद अनेकांना घेता येत नाही. कारण समृद्ध शब्दसंग्रहाअभावी, वाचनाअभावी साहित्यातील कित्येक प्रतिमा त्यांना समजतच नाहीत ! (पाय टाकूनी जळात बसला असला औदुंबर... वाचून मनात जे काही होते ते होण्यासाठी, औदुंबराच्या मनात शिरण्यासाठी, त्याच्यासोबतीनं जळात उतरण्यासाठी वनस्पतिशास्त्र माहीत असण्याची गरज नाही, हवी ती फक्त भाषा आणि भाषिक संवेदनशीलता !)

भाषासमृद्धीकडे शैक्षणिक स्तरावर केले जाणारे अशा प्रकारचे दुर्लक्ष आणि पालकांच्या मानेवरील मार्कांचे भूत वाढतच जात असल्यामुळे शिक्षणाच्या प्रत्येक अंगामध्येच एक हिशेबीपणा घुसला आहे. मारुती मोटारीच्या इंधनक्षमतेबद्दलच्या जाहिरातीतला माणूस जसा जागतिक विक्रमासाठी वापरलेल्या वाहनाबाबतही, निर्विकारपणे 'ॲव्हरेज कितना देती है?' असे विचारतो त्याप्रमाणे भाषा विषयातल्या गुणांना विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशामध्ये काही किंमतच नसल्याने व्यावहारिक पातळीवर भाषेकडे कुणाचे फारसे लक्षच नसते; आणि हे आपले काही चुकते आहे अशी शंकाही कुणाच्या मनात येताना दिसत नाही. भाषा विषयांत फक्त बरेसे पास झाले की बस, न्हायले घोडे गंगेत. मेहनत घ्यायची ती शास्त्र आणि गणितावर... परिणामी प्रादेशिक भाषांबद्दल सार्वत्रिक आणि सर्वसमावेशक

नावड दिसून येते, उरते ती फार तर परस्परांपर्यंत तांत्रिक निरोप पोचवण्याची गरज किंवा गर्विष्ठ हटवादीपणा..

निरोप पोचवण्याच्या गरजेपुरते म्हणाल तर आज ती भाषा आपल्याला सगळीकडे दिसतेच आहे. उदा. *मला अंकलनी पिकअप करून मॅकवर ड्रॉप केलं आणि माझ्या फ्रेंडला मेसेज दिला की तू बर्थडे सेलेब्रेट करण्यासाठी डायरेक्ट तिकडेच ये,* असली वाक्ये कानावर पडण्याला आता वेळकाळ आणि ताळमेळ दोन्हीही उरलेला नाही. ह्या बोलण्याला मराठी किंवा इंग्लिश येणे म्हणत नाहीत तर हे कोणत्याही भाषेचा मान न राखता तिला उठवळपणे निव्वळ कामापुरते वापरणे आहे. सुग्रास जेवण मनापासून न जेवता कुणी जर मोदकात वांग्याचे भरीत कालवून खाल्ले तर आपल्याला जसे कळमळेल ना अगदी तसेच असले बोलणे ऐकताना मला वाटते.

एका बाजूला हे असले धेडगुजरी बोलणे तर दुसरीकडे सरकारी (म्हणजे सरकारच्याच भाषेत 'शासकीय') कागदपत्रांमधून दिसणारी भाषा. त्यातील क्लिष्ट, संस्कृतप्रचुर आणि एकंदरीने शक्यतो काय लिहिलेले आहे ते कुणाला कळू नये अशा पद्धतीने येणाऱ्या वाक्यांनी आपल्याला पदोपदी अडखळायला होते. माझ्या माहितीप्रमाणे आता अति-क्लिष्टता टाळण्यासाठी, केंद्र सरकारने सरकारी अधिकृत संवाद व पत्रव्यवहार इ.मध्ये देखील काही मर्यादेपर्यंत 'हिंग्लिश' (हिंदी + इंग्लिश) ला परवानगी दिली आहे, विशेषतः तांत्रिक शब्दांबाबत. त्यामुळे 'पाण्डु लिपि' (ओरिजिनल मूळ लेख वा कागदपत्र) सारखे शब्द व शब्दप्रयोग बदलून 'कीबोर्ड', 'कंप्युटर' अशा रुळलेल्या व सामान्यपणे रूढ झालेल्या संज्ञा वापरायला आता मान्यता मिळाली आहे, याचा आपल्याला आनंदही वाटतो. म्हणजे आपल्याला नक्की काय हवे आहे तेच आपले आपल्याला कळेनासे व्हावे अशी परिस्थिती आता मराठी भाषेबद्दल प्रेम आणि काळजी असणाऱ्यांची झालेली आहे.

विशेष ज्ञानशाखेमध्ये वापरल्या जाणाऱ्या क्लिष्ट शब्दांना खरे म्हणजे घाबरण्याचे कारण नसते. अनेक विज्ञानविषयांत किंवा विधिज्ञानाच्या अभ्यासात म्हणा अशी क्लिष्ट वाटणारी भाषा वापरली जात असली तरी दररोज तीच वापरणाऱ्यांना ती कालांतराने अंगवळणी पडते. उदा. विशिष्ट खात्यातील कर्मचाऱ्यांना त्यांच्या विषयाशी संबंधित, अगदी कठीण म्हणावेत असे शब्द, विस्मय वाटावा इतके सहजपणे सुचतात. विशेषतः अभियांत्रिकी आणि प्रशासकीय बाबींमध्येही आपल्यापैकी अनेकांनी हा अनुभव घेतलेला असेल. अर्थात ह्याचा अर्थ संबंधित कर्मचाऱ्याला एकंदरीनं ती भाषा फार उच्च दर्जाची येत असते असा होत नाही... त्याला त्या शब्दप्रयोगापुरता अर्थ सवयीने समजत जातो असे फार तर म्हणता येईल. त्यामुळे या शब्दांचाही व्हावा तेवढा प्रसार होत नाही.

क्लिष्ट शब्दांचा प्रश्न आणखी थोडा तपासायचा तर, आपल्या मातृभाषेच्याही काही व्यावहारिक मर्यादा आहेत असे मला अनेकदा वाटते. उदा. काही नव्याने विकसित होणाऱ्या क्षेत्रातल्या इंग्रजी शब्दांना पर्यायी शब्द मुळात उपलब्धच नाहीत, मग त्यासाठी नव्या शब्दांची निर्मिती होते. हे शब्द अनेकदा इतके भयंकर वाटतात की त्यापेक्षा मूळ इंग्रजी शब्दच बरा म्हणायची वेळ यावी. अशा वेळी आपल्या मनात एक अगम्य कुंठितावस्था (म्हणजे 'डेडलॉक') उत्पन्न होते. हे शब्द क्लिष्ट असल्याने ते पुढेही फारसे वापरले जात नाहीत आणि वापरात नसल्यामुळे ते अधिकच अपरिचित व अवघड भासू लागतात. अशा परिस्थितीत हे अडथळे ओलांडून जाणारी एखादी जागतिक भाषा सक्षमतेने शिकण्याची वेळ आता आपल्यासाठी आलेली आहे का याचा निर्णय आपण आता घ्यायला हवा.

अर्थात मातृभाषा चांगली अवगत असणे हे अतोनात महत्त्वाचेच आहे. जागतिकीकरणाचा अविभाज्य भाग म्हणून ओढवलेले सांस्कृतिक सपाटीकरण (म्हणजेच अमेरिकीकरण का?) रोखण्यासाठी देखील आपल्या भाषेवर आपले प्रेम असण्याची गरज असते. आपल्या वंशाचे – भाषेचे – संस्कृतीचे वेगळेपण जपण्याची एक सहजप्रवृत्ती माणसात आढळते. जगभर एकच जीवनशैली आणण्याच्या काही घटकांच्या प्रयत्नांमुळे अनेक प्रादेशिक वैशिष्ट्ये (अन्नपदार्थांपासून भाषांपर्यंत) आता नष्ट झाली आहेत किंवा होण्याच्या मार्गावर आहेत. हा प्रादेशिक भाषावादाचा प्रश्न फक्त आपल्या भारतापुरताच मर्यादित नाही, जगभर हेच चालते. पण आपली परिस्थिती इतरांहून वेगळीही आहे. आपल्याकडे नुसत्या प्रादेशिक भाषांची संख्याच बघावी तर केवढी तरी मोठी आहे. शिवाय कुठलीही भाषा दर पन्नास-शंभर मैलावर बदलते, तसे आपल्याकडच्या प्रत्येक भाषेचेही अनंत प्रकार गावागावातून बघायला मिळतात. ह्यातल्या प्रत्येक प्रकाराला स्वतःची अशी चव आहे, वेगळे सौंदर्य आहे, आणि या वैविध्यातून ते उतू जाताना बघणे आपल्याला अक्षरशः समृद्ध करून सोडणारे आहे.

अर्थात त्यातही काही प्रश्न असतातच. भाषिक आणि सांस्कृतिक वैशिष्ट्ये तर टिकवायची आणि तरीही सर्वांना एकाच पद्धतीने एकाच पाठ्यपुस्तकाच्या आधारे एकेरी प्रमाणभाषेचे शिक्षण द्यायचे ह्या दोन तलवारी एका म्यानात बसत नाहीत. एका शिक्षक मित्राने याबद्दलची कैफियत मांडली होती. ह्या शिक्षकाची बदली पूर्व महाराष्ट्रातील चंद्रपूर जिल्ह्याच्या अंतर्भागातल्या एका शाळेत झाली. तिथल्या गोंड, माडीया या भाषा आणि शिक्षकाचे पश्चिम महाराष्ट्रीय शहरी पद्धतीचे मराठी यांचा संगम काही केल्या होईना! त्यानंतर अनेक दिवस तो काय म्हणतो ते विद्यार्थ्यांना आणि

विद्यार्थ्यांचे म्हणणे याला अजिबात न समजताच तेथील शिक्षण सुरू होते !!

आपल्याला येणारी आपली एक भाषा आणि नवी भाषा आत्मसात करणे यातला नेमका संबंध कुणा भाषाविदांनी आपल्याला उलगडून सांगायला हवा. मी त्या विषयाचा अभ्यासक नाही, पण तरीही मला एक गोष्ट जाणवते की नव्या भाषेतल्या शब्दांचे अर्थ समजण्यासाठी भाषांतर करण्यासाठी ही भाषा हवी, इतका हा मर्यादित अर्थ नाही. भाषेचा स्वत:चा एक लहजा असतो, भाषेचीही विचार करायची एक पद्धत असते. ती ती भाषा बोलणारी माणसे त्या पद्धतीने विचार करू लागतात असे जाणवते. एखाद्याची एखाद्या विशिष्ट भाषेत विकसित झालेली विचारसरणी, त्यानेच वेगळ्याच भाषेतून व्यक्त करताना, 'मूळ भाषा, विचार आणि दुसरी भाषा यांचा जो त्रिगुणी संकर होतो' त्याकडे बघताना मला 'नवी भाषा शिकताना मातृभाषा उत्तम येत असायला हवी' असे भाषाशास्त्रात म्हटले जाते, ते जरा अधिक खोलवर समजावून घेण्याची गरज असल्याचे जाणवले आहे. अगदी साधेसे उदाहरण द्यायचे तर इंग्रजी भाषेला खूप गुंतागुंतीची वाक्यरचना अगदी सहज पेलते, तशी मराठीला पेलत नाही असे मला स्वत:ला वाटते. खरे तर पेलायला हरकत नाही, पण आपण सामान्यपणे जसे मराठी वापरतो त्यात अशी गुंतागुंत आली की आपल्याला आपली मायबोली असूनही ती क्लिष्ट वाटायला लागते, असा सामान्यपणे अनुभव आहे. अगदी साध्या पद्धतीने आली तर मराठी अधिक साजरी दिसते, आवडीची वाटते. गंमत म्हणजे असे वाटणारे आणि इंग्रजीही बरे येणारे लोक अतिशय गुंतागुंतीची वैचारिक देवघेव इंग्रजीतून सहजपणे करतात तेव्हा प्रश्न पडतो की, हा सगळा प्रकार त्या त्या माणसाच्या वैचारिक क्षमतेशीच फक्त संबंधित आहे की भाषेचाही त्यात काही वाटा आहे? शब्दार्थ समजून घ्यायला मातृभाषा हवी कारण नाहीतर वाचलेल्या वाक्याचा अर्थच कळणार नाही, हे वाटते तेवढे सार्वत्रिक सत्य नाही. इंग्रजी पुस्तके वाचताना नव्यानेच समोर आलेला शब्द डिक्शनरी न बघताही कधीकधी समजू शकतो, इतकेच नाही तर त्याच्या ध्वनिरूपाचे आणि अर्थाचे एक विलोभनीय रूप आपल्या मनात उभे करतो हे तुम्ही कधी अनुभवले आहे का?

आजच्या काळात अनेक भाषा येणे हीसुद्धा एक अटळ म्हणावी इतकी अत्यावश्यक बाब बनलेली आहे. पण प्रत्यक्षात बहुभाषक बनणे



याचा अर्थ 'पहिली गोष्ट मातृभाषेपासून फारकत घेणे' असा मानला जात असल्याने अनेक प्रश्न उद्भवतात, ह्याची आपल्याला जाणीव आहे, आणि सहज आजूबाजूला बघितले तरी माझे म्हणणे आपल्या लक्षात येईल असे मी खात्रीने म्हणेन. ह्या संदर्भातला एक प्रसंग वाचल्याचे आठवते. आपल्या परराष्ट्र खात्यातील एका अधिकाऱ्याला एका अनौपचारिक भोजनसमारंभात एक जुनी हस्तलिखित पोथी कुणीतरी दाखवली व त्यातल्या मजकुराचा अर्थ विचारला. ती पोथी संबंधित अधिकाऱ्याच्या मातृभाषेतलीच असली तरी त्याला ती भाषा फक्त बोलता येत होती, लिहिता-वाचता येतच नव्हती ! गंमतीचा भाग असा की हे घडले ते वाईट तर खरेच पण जास्त वाईट असे की हे तिथे सर्वांना कळले.

भाषेकडे आपण सगळेच किती गंभीरपणे पाहतो, (किंवा पाहतच नाही) याची अनेक उदाहरणे वर्तमानपत्र, दूरचित्रवाणी वगैरे माध्यमांमधून आपल्याला पहायला मिळतात. माध्यमांचा वापर वाचक वा प्रेक्षकापर्यंत काही मजकूर पोचवण्यासाठी असतो, आणि हा भाषिक व्यवहार आजच्या काळातल्या इतर व्यवहारांप्रमाणेच ग्राहकांच्या अपेक्षेबरहुकूमही आहे. मी व्यावसायिक भाषांतरकार आहे. माझ्या एका ग्राहकाला एकाच मूळ इंग्रजी मजकुराचे हिंदीमधले भाषांतर तीन वेगळ्या राज्यांत वापरायसाठी करून हवे होते. मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश आणि बिहार ह्या तीन राज्यांत हिंदीच्याच वेगवेगळ्या रूपांमधून व्यवहार चालतो, हे आपल्याला माहीत असेल

(शिवाय दिल्लीचे सरकारी हिंदी निराळेच!) यासाठी त्याने मला सल्ला दिला की, फार शुद्ध हिंदी वापरण्याच्या भरीस पडू नका, अगदी पाठ्यपुस्तकाइतकेदेखील नको ! मी त्याचे पालन केल्याने त्यांचे आणि पर्यायाने माझेही आयुष्य सुकर झाले !

अशा वेळी मला पुनः तोच निरुत्तर करणारा प्रश्न पडतो, भाषांची प्रादेशिक वैशिष्ट्ये सांभाळूनही समोरच्या भिन्न-भाषक व्यक्तीशी सुसंवाद साधता येईल की साधारणपणे सर्वांना येणारी अशी जी काय एखादी भाषा असेल तीच सर्वांनी वापरून विषय संपवावा?

या प्रश्नाचे उत्तर मला अजूनही सापडलेले नाही. मी प्रश्नाचे विविध कानेकोपरे धुंडाळून पाहतो आहे, त्यातलाच एक आहे संगणकाच्या संदर्भातून येणारा.

संगणक आणि संगणकीय सुविधांचा प्रसार आता विलक्षण चक्रावणाऱ्या वेगाने होतो आहे. गेल्या दहा वर्षांमध्ये खुद्द संगणकाचे रूपच नव्हे, तर संगणकीय प्रणालींच्या वापरामुळे आपली दैनंदिन जीवनशैलीदेखील किती बदलली आहे, ह्याची जाणीव अगदी खेड्यापाड्यांतील जनतेलाही आहे. संगणकीय कामांमध्ये मुख्यत: इंग्रजी भाषेचा वापर आहे, तरी आता प्रमुख प्रादेशिक भाषांमध्ये काम करता येणे सुलभ होत चालले आहे. या सुलभीकरण आणि प्रमाणीकरण करण्यामध्ये मोठा अडथळा आहे तो प्रादेशिक भाषांतील असंख्य प्रचलित अक्षरवळणांचा ! आपण वापरत असलेल्या विविध अक्षरवळणांचे ('टाइप्स' किंवा 'फॉन्ट्स') संगणकीय आज्ञांमध्ये रूपांतर करण्याचे किचकट काम अद्याप सुरूच असल्याने एका संगणकावरचे काम एकेकदा दुसऱ्याकडे उघडतच नाही, हे दोन संगणक परस्परांशी 'बोलू' शकत नाहीत असे आपण अनुभवतो. अशा रीतीने फॉन्ट्सच्या विविधतेतून तांत्रिकदृष्ट्या 'एकता' प्रस्थापित करणे काहीसे अवघड ठरते आहे.

संगणकीय आणि महाजालासारख्या सुविधांच्या प्रभावी आणि सर्वदूर वापरामधून येत्या काळात प्रादेशिक भाषांना कदाचित जागतिक पातळीवर मैदान मिळू शकेल ! अशा वेळी आपापल्या भाषेत केले गेलेले काम संगणकीय क्षमतेने सहजपणे दुसऱ्या भाषेत पालटवता यायला हवे. (याचा अर्थ आज काही संगणकीय प्रणालींनी करता येते तसे एखाद्या मसुद्याचे संपूर्णपणे अर्थहीन रूपांतर मला अजिबात म्हणायचे नाही.) तसे झाले तर अनेकांना स्वत:च्या भाषेत आणि त्यामुळे सर्वोत्तम क्षमतेनं कामही करता येईल. आणि तरीही जगाच्या दुसऱ्या टोकाला पोचण्यामध्ये तो अडथळा ठरणार नाही.

आजच्या काळात सर्वांना येणारी अशी एखादी भाषा असणे अतिशय गरजेचे झालेले आहे. स्वत:ची मातृभाषा म्हणून वा मातृभाषेशिवायही सर्वांनी ती शिकायलाच हवी अशी भाषा म्हणून इंग्रजीशिवाय दुसऱ्या कुणाचाच विचार करता येणार नाही. या कल्पनेने साहजिकपणे आपल्यापैकी अनेकांना व्यापले आहे. त्यासाठी बालवयापासून इंग्रजी माध्यमात घालणे, तऱ्हेतऱ्हेच्या शिकवण्या, लेख, पुस्तके, ध्वनिफिती, महाजालावर त्यासाठीचे अनेक कार्यक्रम, इतकेच नव्हे तर आता इंग्रजी शिकू पाहण्यावर चक्क एक चित्रपटही निघालेला आहे, असे अनंत प्रयत्न लोक करत असतात. तो आता समाजसंवादाचा एक महत्त्वाचा विषय झालेला आहे.

या विषयाला, त्यातल्या प्रश्नाला पुढच्या काळात एखादं तंत्रवैज्ञानिक उत्तर निघेल अशी माझी अटकळ आहे. भाषा न येताही संगणकीय साहाय्याने त्या भाषेत उतरून आपले म्हणणे दुसऱ्या माणसापर्यंत अगदी व्यवस्थित पोचवता येईल. मग कदाचित तंत्रज्ञानाने गेल्या काळात केलेल्या अनेक गोष्टींप्रमाणे इंग्रजी शिकण्याचा हव्यास हा विषय कालबाह्यच ठरू शकेल की काय न कळे. बहुधा असे फारसे होणार नाही, निदान तांत्रिक बाबींबाबत हे करणे साधले तरी भाषेचा खरा आनंद देणारे वाङ्मयाचे सुयोग्य भाषांतरण करणे ही गोष्ट अजिबात सोपी नाही, ती संगणकांच्या खापरपणतवंडांनाही जमायची शक्यता नाही, त्यासाठी मानवी मेंदूच हवा !

▼▼▼

श्रीनिवास निमकर, पुणे
मुद्रण व जाहिरात व्यवसाय.
व्यावसायिक भाषांतरकार.
विज्ञान, चित्रपट, पर्यटन इ. विषयांवर लेखन.
shrinivasnimkar@gmail.com

With Best Compliments From

ANSHUMAN Tech. Pvt. Ltd.

Microprocessor Trainers & Allied Trainers / Accessories, Power Supply
Test & Measuring Equipment, Oscilloscope, Function Generator

Plot No. 13, Sthairya, Next to Navasahyadri society, Near Tol Hospital, Karve Nagar,
Pune 411052. Ph.:25460892, Fax : 25463052, Email - anshumanelectronics@vsnl.com

असत्य

मुलांशी खोटं बोलणं चूक आहे.
त्यांना खऱ्याचं खोटं सिद्ध करून दाखवणं चूक आहे
त्यांना सांगणं–की ईश्वर स्वर्गात असतो
आणि पृथ्वीवर सगळं मंगल आहे–चूक आहे
मुलांना कळतो तुमचा हेतू.
मुलं माणसंच असतात.
त्यांना सांगा की अडचणी मोजता येत नसतात
आणि पुढे काय होणार आहे हे त्यांना दाखवा, एवढंच नाही
तर स्पष्टपणे दाखवा आपला वर्तमानकाळही.
सांगा की अडथळे येतील, त्यांचा सामना करावा लागेल,
दुःख होत असतं, वाईट दिवस येतात,
पर्वा नको,
ज्यानं आनंदाचं मोल जाणलं नाही
तो कधी आनंदी नाही होऊ शकणार.
जर दिसलीच तर एकही चूक माफ करू नका
ती पुन्हा होईल, पुन्हा–पुन्हा होईल
आणि भविष्यात आपली मुलं
आपल्याला कधी माफ करणार नाहीत, जे आपण करत राहिलो होतो.



येवगेनी येवतुशेन्को

(१९३३ साली सायबेरियात जन्मलेले प्रसिद्ध रशियन कवी.)

अनुवाद : गणेश विसपुते

संतुलित द्वैभाषिकत्व

डॉ. वृषाली देहाडराय



ज्यावेळी मातृभाषेव्यतिरिक्त अजून एक भाषा व्यक्ती समजू शकते, बोलू शकते, वाचू शकते, लिहू शकते त्यावेळी ती व्यक्ती द्वैभाषिक बनते. द्वैभाषिकत्वाची पातळी दोन्ही भाषांतील नैपुण्यानुसार वेगवेगळी असू शकते. या द्वैभाषिकत्वाचा लाभ होईल की त्यापासून हानी होईल हे अनेक घटकावर अवलंबून असते.

एकविसाव्या शतकाचे वर्णन करण्यासाठी 'जागतिकीकरण' यापेक्षा चपखल विशेषण सापडणे अवघड आहे. जागतिकीकरणाच्या रेट्याने केवळ सीमा आकुंचित होऊन जग हे एक विशाल खेडे बनले आहे असे नाही, तर देशादेशांमधल्या सीमा पारदर्शक बनल्या आहेत. मानवी इतिहासात माहिती, वस्तू, सेवा, पैसे आणि व्यक्ती यांचे एवढ्या व्यापक प्रमाणावर आदानप्रदान होण्याची ही पहिलीच वेळ आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचे परिणाम हे व्यापार व औद्योगिक जगत यापुरते सीमित न राहता, त्यांनी जीवनाची इतर क्षेत्रेही व्यापली आहेत. 'भाषा' ही याला अपवाद नाही. या बदलत्या चित्रामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या भाषांना अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त होऊन त्यांच्या अध्ययनाला भारतासहित जगातल्या इतर देशांमध्ये मोठी मागणी निर्माण झाली आहे.

भारतापुरता विचार करायचा झाल्यास, अनेक वर्षांपासून इंग्रजीची सांगड आर्थिक व सामाजिक स्तरांशी घातली गेल्याने आर्थिक संधी, सुबत्तेने परिपूर्ण अशी अलिबाबाची गुहा उघडण्यासाठी इंग्रजी माध्यमाचे शिक्षण 'तिळा दार उघड'चे काम करू शकेल असा विश्वास प्रत्येक पालकाला वाटू लागला. परिणामी इंग्रजी माध्यमाच्या शाळांकडे विद्यार्थ्यांचा ओघ वाढू लागला व भारतीय भाषा माध्यमांच्या शाळा ओस पडू लागल्या. भारतात इंग्रजी भाषेला असलेले महत्त्व केवळ जागतिकीकरणामुळे आले नसून त्याची मुळे दीडशे वर्षांच्या ब्रिटिश – वसाहतवादामध्ये रुजली आहेत. देशात औपचारिक शिक्षणाचा पाया घालताना ख्रिश्चन मिशनऱ्यांनी स्थानिक जनतेची नाळ मातृभाषेपासून तोडली नाही. पण मेकॉलेप्रणीत शिक्षणव्यवस्थेत मात्र पाश्चिमात्य ज्ञान हे पाश्चिमात्य भाषेतून देण्यावर भर दिला गेला. वसाहतवादामुळे भारतात पूर्वीपासूनच असलेले इंग्रजीचे महत्त्व जागतिकीकरणामुळे अधिकच वाढले यात काहीच शंका नाही.

जगभरातील शिक्षणतज्ज्ञांनी मातृभाषेत शिक्षण घेण्याचे महत्त्व वारंवार विशद केले

आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील १९०२ सालच्या शैक्षणिक आयोगापासून ते २००९ च्या शिक्षणहक्क कायद्यापर्यंत सर्व शासकीय धोरणांमध्येही मातृभाषेतून शालेय शिक्षण दिले जावे असे मत मांडले गेले. असे असूनही इंग्रजी माध्यमाचा ओढा दिवसेंदिवस वाढत आहे हे वास्तव आहे.

लँबर्ट या भाषातज्ज्ञाने 'बेरजेचे द्वैभाषिकत्व' (Additive Bilingualism) व 'वजाबाकीचे द्वैभाषिकत्व' (Subtractive Bilingualism) अशा दोन संकल्पना मांडल्या आहेत. बालक दुसरी भाषा शिकायला लागल्यावर ज्यावेळी बालकांच्या मातृभाषेतील नैपुण्य कमी होऊन मातृभाषेची जागा दुसरी भाषा घेते, तेव्हा त्याला वजाबाकीचे द्वैभाषिकत्व म्हटले जाते. जसजसे दुसऱ्या भाषेतले नैपुण्य वाढत जाते तसे मातृभाषेतील नैपुण्य कमी होत जाते. अनेक देशांमध्ये अल्पसंख्यांक समाजातील बालकांच्या बाबतीत या प्रकारचे वजाबाकीचे द्वैभाषिकत्त्व घडून येते. कारण बहुसख्याकांकडून अल्पसंख्याक समाजाची भाषा कमी दर्जाची समजली जाते. त्यांच्या मातृभाषेचा शैक्षणिक उपयोग शून्य आहे असे मानले जाते. याउलट मातृभाषा व दुसरी भाषा यांच्यामध्ये बेरजेचे द्वैभाषिकत्व विकसित होण्यासाठी बालकाची मातृभाषा व दुसरी भाषा यांच्यातील परस्परसंबंध सौहार्दाचे व पूरक असणे आवश्यक आहे, समाजामध्ये दोन्हीही भाषांना सारखेच महत्त्व, आदर दिला गेल्यास, मातृभाषेतील नैपुण्यावर कोणताही अनिष्ट परिणाम न होता दुसऱ्या भाषेत नैपुण्य अवगत केले जाते. बहुसंख्यांक समाजाची मातृभाषा ज्यावेळी आपले भाषा प्रभुत्व टिकवून असते, त्यावेळी दुसरी भाषा शिकण्याचे कोणतेही हानिकारक परिणाम होत नाहीत.

बेरजेच्या व वजाबाकीच्या द्वैभाषिकत्वाबाबतचा सिद्धांत मांडणारे आणखी एक महत्त्वाचे भाषातज्ज्ञ म्हणजे जिम कमिन्स. भाषेबाबतचा 'मर्यादा सिद्धांत' (Threshold Hypothesis) त्यांनी मांडला. त्यात ते म्हणतात की बोधनक्षमता वाढण्यासाठी द्वैभाषिकत्वाचा उपयोग होऊ शकतो. बोधनिक हानी टाळायची झाल्यास मातृभाषा व दुसरी भाषा या दोन्हीबाबत बालकाने एक किमान मर्यादा पातळी गाठणे आवश्यक आहे. मातृभाषेव्यतिरिक्त दुसऱ्या भाषेतून शिक्षण घेण्याचा फायदा होईल की तोटा हे बालकाच्या मातृभाषेतील नैपुण्य पातळीवर अवलंबून असते. बालकाची मातृभाषा पूर्णपणे विकसित व्हायच्या आधीच त्याला दुसऱ्या भाषेतून शिक्षण घेण्यास भाग पाडल्यास ही मर्यादा पातळी गाठली जात नाही. अशा परिस्थितीत दोन्ही भाषांच्या बाबतीत बालक कमकुवत राहते. या परिस्थितीत बालकाच्या भोवतालचे भाषिक वातावरण, बालकाच्या मातृभाषेला समाजात दिला जाणारा दर्जा या घटकांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. या घटकांचे महत्त्व विशद करणारा अजून एक सिद्धांत मर्यादा सिद्धांताचा पुढचा टप्पा म्हणून कमिन्स यांनी मांडला आहे. 'परस्परावलंबी वैकासिक सिद्धांत' (Developmental Interdependence Hypothesis), त्यात ते म्हणतात, ''मातृभाषा व दुसरी भाषा यांचा विकास हा एकमेकांवर तसेच आजूबाजूच्या भाषिक वातावरणावर अवलंबून असतो. ज्यावेळी बालक दुसरी भाषा शिकण्यास सुरुवात करते त्यावेळी मातृभाषेतील त्याच्या पारंगततेचे स्वरूप महत्त्वाचे असते. शाळेच्या बाहेरील वातावरणात मातृभाषेचा वापर, शब्दभांडार संपन्न करणे, संकल्पनांचे आकलन यांना प्रोत्साहन दिले गेल्यास मातृभाषेतील नैपुण्य – विकासाची कोणतीही हानी न होता दुसऱ्या भाषेतील संपादनावर अनुकूल परिणाम होतो. याचाच अर्थ असा होतो की जी बालके मातृभाषेव्यतिरिक्त दुसऱ्या भाषेतून शिक्षण घेत असतील त्यांना जितके म्हणून त्यांच्या मूळच्या भाषिक वातावरणात ठेवले जाईल तितका त्यांना त्याचा लाभ मिळेल. औपचारिक शिक्षणाच्या प्रारंभीच्या काळात जी कौशल्ये आत्मसात केली जातात ती मातृभाषेतून शिकणे जेवढे सहज शक्य असते तेवढे दुसऱ्या भाषेतून नाही. मात्र बालकाभोवती योग्य भाषिक वातावरण हेतूतः निर्माण केल्यास दुसऱ्या भाषेतून शिक्षण घेण्याने होणारे दूरगामी अनिष्ट परिणाम टाळणे शक्य आहे.''

भारतात एखाद्या व्यक्तीचे द्वैभाषिकत्व किंवा बहुभाषिकत्व ही विशेष लक्षात राहण्याजोगी बाब मानली जात नाही. कारण द्वैभाषिकत्व किंवा बहुभाषिकत्व हा भारतीय संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना बेरजेच्या द्वैभाषिकत्वाचे अधिकाधिक फायदे कसे देता येतील याकडे लक्ष केंद्रित केले जावे, असे मला वाटते.

▼▼▼

डॉ. वृषाली देहाडराय, पुणे
भारतीय शिक्षण संस्था, पुणे येथे व्याख्याती. बालशिक्षण व प्राथमिक शिक्षण या क्षेत्रांत विशेष रस व संशोधन.
vrushali_roy@yahoo.com

Season Greetings to You!!

KarwaK

Karwak Group of Companies
A Pune based Company presents…….

Karwak Eco Matters
Range of office & home use products
Ecofriendly gifts, bags, folders, Seminar kits
With Branding.

Karwak Exhibition Solutions
Foldable, portable, light weight &
Easy to install

Karwak Marketing & Consultancy Services
Sales & CRM Training Workshop, Marketing Audit, Marketing Research,
Strategic Marketing & Business development, CRM Consultancy, Customer Service Workshop.

Karwak Group of Companies
61, Sheelavihar Colony
1-2 Heramb Apt, Karve Road, Pune-411038

Tele: (020) 25461627/9922929417
Email: sales.karwak@gmail.com
www.karwak.com

TÜV SÜD now ISO 22000: 2005 Certified

Works : H-22 Old M.I.D.C., By Sangamnagar M.I.D.C. Road,
Satara - 415 004. PHONES : 02162 - 247300, 247500
e-mail : shreetrading@dataone.in

.....REDIFINING SERVICE

C & F AGENT FOR BRITANNIA INDUSTRIES LTD.
BRITANNIA DAIRY PVT. LTD.

BRITANNIA Eat Healthy, Think Better

Shri TRADING CORPORATION

e-mail : tgasso@rediffmail.com
.....the Serving Nerve between.....Company & Distributors.....

T.G.Associates

509 B, Camp Powai Naka, Koregaon Road, Satara.
☎ : (02162) 247400, 233007, 9226612345, 9225811158

SUPER STOCKIST & DISTRIBUTOR SERVICES

Haldiram's NAGPUR TASTE OF TRADITION | Kellogg's | Cadbury | TATA indicom | PEPSI | Vadafone Essar Cellular Limited

बदलती परिस्थिती शिक्षकांच्या नजरेतून

पहिलीपासून इंग्रजी सुरू करण्याचा आदेश असो, क्रमिक पुस्तकांमधल्या बदलानुसार नवे पाठ शिकवणं असो, शिक्षणहक्क कायद्यानुसार शालाबाह्य मुलांना शाळेशी जोडणं असो की, सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची जबाबदारी असो. ठरवणारे कुणीही असले तरी अंमलबजावणीचं काम शिक्षकच करतात. शिक्षणव्यवस्थेत घडणाऱ्या प्रत्यक्ष बदलांचे पडसाद शिक्षकांच्या जबाबदाऱ्यांवर उमटतात. त्यामुळेच त्यांच्या अनुभवांना एक सच्चा आवाज असतो, तो महत्त्वाचा असतो.

पालकनीती गटाशी जोडलेल्या शिक्षकांनी या दिवाळी अंकासाठी लिहावं असं आवाहन आम्ही केलं होतं. त्याला प्रतिसाद देणारे लेख महाराष्ट्राच्या विविध भागातून आले. शहरीच नाही तर निम–शहरी, ग्रामीण भागातलेही बहुसंख्य पालक आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये घालण्यासाठी धावत आहेत. आणि मराठी माध्यमाच्या शाळा ओस पडत आहेत ही परिस्थिती जवळजवळ सगळ्यांनी नोंदवली आहे.



या इंग्रजीचं करायचं तरी काय?

भाऊ चासकर



प्रसंग एक – आईसोबत शाळेत निघालेल्या लहानग्या मुलीनं वाटेत चॉकलेटसाठी आईकडे हट्ट धरला होता. ''हात पाय आपटत ती पोर हटून बसलेली. तू जर का चॉकलेट खाल्लं, तर तुला इंग्रजीतून बोलता येणार नाही'', आईनं मुलीला सांगितलं. इतक्यात, आईच्या ओळखीची एक स्त्री (ती शिक्षिकाच असावी) तिथून चाललेली होती. ''बघा हो, आमची कोमल रोज चॉकलेट मागते. चॉकलेट खाल्ल्यावर माणसाला इंग्रजी बोलता येत नाही ना?'' आईनं मुलीविषयी तक्रारीचा राग आळवताना भीती व्यक्त केली. ''बरोबरय. चॉकलेट खाल्ल्यावर तिला इंग्रजी बोलताच काय, लिहिताबी नाही येणार !'' त्या मॅडमनंही ढिगात आंबा टाकावा, इतक्या सहजतेनं आईच्या सुरात सूर मिसळला आणि त्या पुढे चालत्या झाल्या ! ती चिमुरडी बहुतेक ज्युनियर किंवा सिनिअर केजीमध्येच असावी. इतक्या लहान वयात त्या बिचारीला हे आंग्ल भाषेचं कवित्व म्हणा किंवा महती म्हण ती ऐकावी लागत होती. हा सारा अजब, अनाकलनीय प्रकार बघून मला धक्काच बसला.

प्रसंग दोन – असाच एके दिवशी शाळेच्या मैदानावर उभा होतो. इतक्यात चौथीच्या वर्गातला विशाल जवळ आला आणि म्हणाला, ''सर, आपल्या शाळेतली पोरं आता इंग्लिश मिडीयमचं दिसत्यात ना.'' मी बुचकळ्यातच पडलो. काहीसा चक्रावूनही गेलो. विशालच्या अनपेक्षित प्रश्नानं तर माझी विट्टी उडवली होती! त्याला नेमकं काय सांगावं हेच मला सुचत नव्हतं. काही क्षण असेच गेले. तो मात्र पुढे बोलतच होता, ''आपले पोरंबी भारी दिसायला लागल्यात. सगळ्यांना टाय हायेत. 'आयडेंटीटी कार्ड' बी हाये. आता अकोल्याच्या इंग्लिश मिडीयमवाल्यांच्या शाळेत कोण जाणार नाय. सगळी पोरं आपल्याच शाळेत येतील. बरोबर ना सर?'' काहीसं सावरत मी केवळ मान डोलवली. त्याला मी अनुमोदन दिल्यासारखं वाटलं असावं. तो भलता खुश झाला. टणाटण उड्या मारीत तिथून निघून गेला. तो तिथून गेला, पण माझ्या मनाच्या डोहात त्यानं टाकलेल्या एका विचाराच्या खड्यानं अनेक तरंग उठले होते. दोन्हीही प्रसंग अर्थातच वेगवेगळ्या ठिकाणचे आहेत. पण शिक्षण क्षेत्रातलं वारं कोणत्या दिशेनं वाहतंय, हे लक्षात आणून देणारे आहेत, हे नक्की.

चार महिने मागं जा. नुकतंच यंदाचं नवं शैक्षणिक वर्ष सुरू झालेलं. शाळा प्रवेशाची लगबग सुरूच होती. आपल्या पोरांना नेमकं कोणत्या शाळेत घालावं, या संभ्रमात अनेक पालक दिसत होते. गावाकडंही आता इंग्लिश मिडीअमची 'क्रेझ' आलीय. गावातील मराठी माध्यमाच्या म्हणजे जिल्हा परिषद शाळेत प्रवेश घेणाऱ्यांची संख्या बऱ्यापैकी रोडावलीय. शाळा सुरू झाल्यानंतर शिक्षक मित्रांना, ''पहिल्या वर्गात किती प्रवेश झाले'' असं उत्सुकतेनं विचारत होतो. उत्तर ऐकून निराश व्हायला होत होतं. जिथे गतवर्षी चौथ्या वर्गातून ५०-५५ मुले बाहेर गेलेली, तिथं अवघी १५-२० पहिलीत दाखल झालेली. तीही कशीबशी ! मनात धोक्याची घंटा आधीपासून वाजायला लागलेली. आता तिचा आवाज आणखीन खणखणीत ऐकू येत होता. अस्वस्थता वाढत गेली. का बरं असं झालं असेल?

'माध्यम मॅनियानं' इथल्या संस्कृतीशी, मातीशी मुलांचं नातं दुरावलंय. सण, उत्सव साजरे करायचे म्हणजे ई-मेल पाठवले, मेसेज टाकले की बस्स.

एकाएकी मराठी शाळांच्या लोकप्रियतेला अशी ओहोटी का

लागलीय? या यक्षप्रश्नाचं उत्तर शोधण्याचा प्रयत्न करतो आहे. शिक्षक जमातीतील असल्यानं अंतर्मुख होऊन करीत होतो. जेव्हा शाळा प्रवेशाची वेळ येते, तेव्हा ग्रामीण, कष्टकरी, गरीब, आदिवासी, जिरायतदार शेतकरी अशा ज्या लोकांसमोर अन्य पर्याय नसतो, तेच लोक आपली मुलं गावाकडच्या शाळेत घालताहेत. मात्र ज्यांच्याजवळ थोडेबहुत पैसे आले आहेत ते पालक आपली पोरं सरळ (कायम विनानुदानित) इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये पाठवताहेत.

इंग्लिश मिडीयम स्कूलमध्येही वेगवेगळे स्तर निर्माण झालेत. 'मागणी तसा पुरवठा' हे बाजाराचं सूत्र शिक्षणातल्या पुरवठादारांनी इमाने इतबारे पाळलंय. त्यामुळे कोणाची गैरसोय होण्याचं अजिबात कारण नाहीये. गावातील लहान व्यावसायिक, कर्मचारी, लहान बागायतदार यांची मुलं परिसरातल्याच ('क' दर्जाच्या) इंग्लिश मिडीअम स्कूलमध्ये जातात. (हो, नावात इंटरनॅशनल असलेल्या या शाळा घराच्या पडवीत, कांद्याच्या चाळीत अशा कुठंही भरतात. आमच्याकडे अशीच एक शाळा – सॉरी, इंटरनॅशनल स्कूल चक्क कृषी उत्पन्न बाजार समितीच्या व्यापारी गाळ्यात भरतं !) असो. तर या इंग्रजी शाळांमुळे ग्रामीण भागातल्या गरीब, बिचाऱ्या पालकांची केवढी मोठी सोय झालीय, हे नाकारून कसं बरं चालेल? हे पालक आपल्या मुलांच्या शिक्षणावर वर्षाकाठी जेमतेम चार – हजार खर्च करू शकतात. म्हणजे ऐपत तेवढीच असते म्हणून.

ग्रामीण भागातील तालेवार कुटुंबातली (म्हणजे प्रगतशील शेतकरी किंवा नोकरी – निमित्तानं गाव सोडून तालुक्याच्या गावी राहायला गेलेल्यांची) पोरं तालुक्याच्या ('ब' दर्जाच्या) इंग्लिश मिडीअम स्कूलमध्ये जातात. वर्षाकाठी पंधरा हजार रुपये खर्च करण्याची या पालकांची तयारी असते. आता यात आणखीन एक, मुलांच्या भवितव्याविषयी अत्यंत जागरूक आणि 'दक्ष' असा पालकवर्ग ग्रामीण भागात नव्यानंच उदयाला आलाय. ('इझी मनी'वाले मोठ्या संख्येनं आहेत !) तो तर आपली पोरं थेट कुठल्या तरी ('अ' दर्जाच्या) सी.बी.एस.ई. किंवा आय.सी.एस.ई. शाळांमध्ये पाठवितो आहे. वर्षाकाठी लाखात रुपये मोजून चांगलं शिक्षण खरेदी केल्याचं त्यांना समाधान असतं. वाढत्या आर्थिक विषमतेचं प्रतिबिंब शाळांमध्येही उमटतंय, ते असं.

खरं तर कोणी कोणाची पोरं कुठं घालायची, हा ज्याचा त्याचा प्रश्न. त्याविषयी काही बोलायचं नाही. तो या लेखाचा विषयच नाहीये. पण या इंग्लिश शाळांचं स्तोम नेमकं माजलं कसं? याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला, तेव्हा असं दिसलं की, इंग्रजीवाचून पोरांचं भवितव्य अंधारात राहील, इंग्लिशला पर्यायच नाही, इंग्रजी नाही आलं तर करिअरच्या संधी मिळणार नाहीत असं गावाकडच्या अनेक पालकांनाही आज वाटू लागलंय. आपल्या पोराच्या 'करिअर'चा मार्ग केवळ इंग्रजीच्या दारातूनच जातो, असा समज म्हणा किंवा अंधश्रद्धा म्हणा ग्रामीण भागात रूढ झालीय. आपण माहिती – तंत्रज्ञानाच्या युगात वावरतोय, आपल्या मुलांमध्ये कितीही गुणवत्ता असली तरी केवळ इंग्रजीमुळे प्रगतीच्या वाटा खुंटतील या भीतीनं पालकांना ग्रासलंय. इंग्रजी न येणाऱ्यांना आपल्या राज्याच्या मंत्रालयात वेडगळ म्हटलं जातंय म्हणे! स्वातंत्र्यानंतर ६५ वर्षं उलटून गेलीत तरी आपल्या देशात आजही इंग्रजी हीच सत्तेची भाषा राहिली आहे. उच्च न्यायालयं, सर्वोच्च न्यायालयं यांचं सगळं कामकाज तर इंग्रजीतूनच चालतं. घटनेतील तरतुदीप्रमाणे कोणताही कायदा इंग्रजीतून तयार केला जातो. हेही येथे लक्षात घेण्यासारखं आहे.

आधी फक्त तालुक्याच्या गावांपर्यंत पोचलेलं इंग्रजी माध्यमांच्या शाळांचं लोण आता गावा-गावांपर्यंत पोचलंय. इंग्रजी भाषेचा अनुनय ग्रामीण भागात पोहोचलाय. वर्गखोल्यांची फूटपट्टीनं मोजमापं घे, किंवा आणखीन कसलं तरी खुसपट काढून मराठी शाळांना परवानगी नाकारणारी सरकारी यंत्रणा यातल्या बेकायदेशीर शाळा बंद करण्याबाबत मात्र अजिबात गंभीर नाहीये.

आता आस्थेची गोष्ट. ग्रामीण भागातील या इंग्लिश शाळांतून दिलं जाणारं शिक्षण नेमकं आहे तरी कसं? तिथं खरंच गुणवत्तापूर्ण

इंग्रजीबरोबरच सेमी इंग्रजी माध्यमातून शिक्षण देण्याकडे पालकांचा कल वाढतो आहे. त्यामुळे मुलांच्या जीवनातून अनेक पारंपरिक मराठी शब्द हद्दपार झालेत. मातृभाषेतून नैसर्गिकपणे व्यक्त होणं काय असतं, या रसरशीत आणि संपन्न अनुभवाला ही लेकरं आपोआपच मुकली आहेत. ग्रामीण मराठीमधील काही वाक्यं पहा – १. **लई** मज्जा केली. २. जत्रेत **मोक्कार** फिरलो. ३. **लई भारी** पिच्चर व्हता रे. ४. मपली **माय** बाजाराला गेल्ती. ५. भाजीऐवजी कोरड्यास किंवा कालवण, माझ्या – तुझ्याऐवजी माह्या – तुह्या असे अनेक शब्द आजही ग्रामीण भागात सर्रास वापरले जातात. किंबहुना **आई**पेक्षा **माय** हा शब्द अधिक माया घेतो. जवळिकीच्या नात्याची साक्ष देतो. त्याला एक आपलेपण, ओलावा असतो. शाळेतल्या पुस्तकात त्यांना हे शब्द कुठंच भेटत नाहीत. मग अशा मुलांना न्यूनगंड छळायला लागतो.

शिक्षण दिलं जातंय का? ज्या अपेक्षेनं पालक मुलांना पाठवताहेत त्याचं काय होतं? या प्रश्नांची उत्तरं शोधूनही सापडत नाहीत. कदाचित कोणाला कटू वाटेल, पण हे आजचं वास्तव आहे. पहिली गोष्ट म्हणजे या शाळा अत्यंत तुटपुंज्या मानधनावर वेठबिगारासारखं शिक्षकांना राबवून घेताहेत. इंग्रजी माध्यमाच्या या शाळा आज शिक्षकांच्या शोषणाचे अड्डे बनल्यात !

हे असं असलं, तरी त्या शाळांमधील विद्यार्थ्यांचा ओघ मात्र दिवसेंदिवस वाढतोच आहे. सरकारी शाळांनी शे-दोनशे रुपयांची देणगी मागितली तर का-कू करणारे पालक इंग्लिश शाळांच्या चालकांच्या मागणीप्रमाणं डोनेशन देतात, कोणतेही आढेवेढे न घेता! यात एक भाग असाही दिसतो की, ग्रामीण भागातील ज्या पालकांची पहिली पिढी शिकलेली आहे, शिकलेली म्हणजे अल्पशिक्षित, अर्धसाक्षर, त्यातीलच अनेकजण कर्तेधर्ते झालेत. सुधारित शेती, छोटा - व्यवसाय करू लागलेत. त्यातून त्यांच्याकडे थोडाफार पैसा आलाय. पण यातल्या बहुसंख्य लोकांच्या घरात शिक्षणाची परंपरा नाहीये. (इंग्रजीची तर गंधवार्ताच नाही.) 'आपल्याला नाही शिकता आलं. तरी पोराला / पोरीला 'चांगलं शिकवायचंय' असं त्यांचं म्हणणं. पण चांगलं शिक्षण जणू केवळ इंग्लिश शाळांतूनच मिळतंय, असा 'समज' या नवशिक्या व नवश्रीमंत पालकमंडळींनी करून घेतल्याचं दिसतंय. कुटुंबातील वातावरण पूर्णपणे ग्रामीण मराठी वळणाचं. घरात मराठीतल्या कुठल्यातरी एका भाषेचा प्रकार बोलला जातोय. हे मूल घरी आल्यावर त्याच्याशी कोण आणि कसं इंग्लिशमधून बोलणार? असले प्रश्न या पालकांना अजिबात पडत नाहीत!

> पाठ्यपुस्तकी भाषेत लिहिण्याच्या संस्कारामुळे मुलं नीट व्यक्त होऊ शकत नाहीत. म्हणूनच मग त्यांचं जगणं, बोलणं, निरीक्षणं, लकबी, भाषा हे कुठंच आढळत नाही. मग स्वतःच्या आईविषयी लिहिण्यापेक्षा मुलं सोप्पा पर्याय निवडतात. 'रेडीमेड' तयार निबंध उतरवून काढतात. मग होतं असं की, 'नवनीत'ची आई साऱ्यांची आई होते !

> एका इंग्लिश माध्यमाच्या शाळेतल्या मुलांशी बोलताना मी मुलांना सहज विचारलं, ''अभ्यासात आईची मदत काही होते का रे?'' बहुतेक मुलं म्हणाली, ''आईला त्यातलं काही कळतच नाही. तिला कुठे इंग्लिश येतंय'' हे चिरंजीव/जोपर्यंत केजी-बीजीत होते, तोवर आईचं इंग्लिश ठीक होतं. आता हे महाव्या वर्गात गेलेत. आईला बिचारीला इंग्लिश येत नाही! तिनं अभ्यासाचं विचारायचं नाही. त्याविषयी बोलायचंही नाही. 'तुला काही कळत नाही. तू अभ्यास तपासायचा नाही'. असं मुलं उलटून बोलू लागलीत. जर का चुकून आईनं विचारलंच तर 'होमवर्क झाला' असं बिनधास्त सांगून टाकतात. या मुलांनी आतापासून आपल्या शैक्षणिक आयुष्यातून जन्मदात्या आईला वजा करून टाकलंय की काय? पुढं कसं होणार? अशी भीती माझ्या मनात तेव्हापासून घर करून बसलीय.

एकदा का मुलं शाळेत घातली की, झकपक युनिफॉर्म, बूट, सॉक्स, टाय, स्कूलबॅग, वॉटर बॅग केवढी मिजास असते ! जिल्हापरिषदेच्या शाळेत मात्र तोच तो पिढ्यान्‌पिढ्यांचा पांढरा शर्ट आणि खाकी चड्डी असा गणवेश असतो. (अर्थात ही 'चैन'देखील इकडच्या गरीब पालकांना परवडणारी नसते.) गावोगावी फिरणाऱ्या स्कूलबसमधून ही टाईट - 'लुक'मधली सो - कॉल्ड स्मार्ट मुलं हाय.. हॅलो.. गुड मॉर्निंग.. गुड बाय.. म्हणू, करू लागतात. तेव्हा पालक मनोमन केवढे सुखावतात म्हणून सांगू. शाळांतली सैनिकी शिस्त.. बेंचेस, इमारती.. नाही तर पेरेन्ट डे, मदर्स डे, फादर्स डे.. 'ॲन्युअल डे'चा तो कल्चरल प्रोग्रॅम म्हणजे केवढं ग्रेट, ग्रँड सेलिब्रेशन असतं ! तिथला तो झगमगाट, चमचमाट. पालकांच्या खर्चातून आणलेली रंगीबेरंगी ड्रेपरी. कोरिओग्राफरच्या नजरेच्या इशाऱ्यावर, ढाकचिक गाण्याच्या तालावर मुलांची चिमुकली पावलं जेव्हा स्टेजवर थिरकू लागतात, तेव्हा पालकांना कृतकृत्य झाल्यासारखं वाटू लागतं! पण ज्या अपेक्षेनं पालक आपल्या पोरांना त्या शाळांमध्ये घालतात, मोठा खर्च करतात त्याचं नेमकं काय होतं? शिक्षणाचं नेमकं काय होतं? हे प्रश्न पिच्छा पुरवत राहतात. काही पालक इंग्रजीची वारी करून परत मराठी शाळांकडे वळू लागलेत. आमच्या गावातल्या शाळेत अशी किमान १०-१२ मुलं शिकताहेत. पण त्यांना धड ना इंग्रजी येतं धड ना मराठी. गिनिपिगसारखी मुलांची केविलवाणी स्थिती झालेली आहे. 'इंग्रजी माध्यमामुळे त्रिशंकू पिढी जन्माला


येईल', अशी भीती कविवर्य कुसुमाग्रजांनी व्यक्त केलेली होती, त्याची आठवण इथं येते.

दुसरी वस्तुस्थिती अशी की, या शाळांना चांगले शिक्षकच मिळत नाहीयेत, याचं कारण असं की, इंग्लिश माध्यमातून शिकलेल्या मुलांना फक्त आणि फक्त 'एक्झिक्यूटिव्ह' व्हायचं असतं ! शिक्षक होणं, हे त्यांच्यासमोरचं उद्दिष्ट कधीच नव्हतं. नाही. कदाचित कधीच नसणार ! चुकून चांगले शिक्षक मिळालेच तर ते तुटपुंज्या पगारावर फार दिवस घासत बसत नाहीत. स्टेशनवर उभं राहिल्यासारखं ते थांबतात. चांगल्या पगाराची नोकरी मिळाली की ते निघून जातात. त्यामुळे या शाळांत शिक्षकांचं येणं – जाणं आता नित्याचं झालंय. वर्षभरात वर्गाला चार – शिक्षक होतात. त्यामुळे आज इंग्रजी माध्यमाच्या सर्वच शाळा चांगल्या शिक्षकांच्या शोधात आहेत. 'शिक्षकच मिळत नाहीत' ही दस्तुरखुद्द संस्था – चालकांचीच तक्रार आहे. जिथे अशी दैना असेल तिथे या जागरूक पालकांच्या मुलांना 'चांगलं' शिक्षण देणार तरी कोण? पर्यायानं मुलांचं मातेरं होणार.

एक महत्त्वाचा मुद्दा सांगायचा राहून गेला तो हा की, गावातल्या सजग पालकांची (गावाचं नेतृत्व करणाऱ्यांची) मुलं इंग्लिश मिडीयमला गेल्यामुळे त्यांनी गावातल्या शाळेतला 'इंटरेस्ट' काढून घेतलाय, त्यांनी या शाळेकडे साफ दुर्लक्ष केल्याचं दिसतंय. त्यामुळे गावातल्या शाळेवर नैतिक दबाव ठेवण्याची संधीही त्यांनी आपल्या हातानं गमावलीय.


कोणीतरी 'ग्रेट' व्हायचंय तर इंग्रजी माध्यमातून शिकलं पाहिजे, असं नाही. तर इंग्रजी बोलता आलं पाहिजे, हे या पालकांच्या गावी नसतं. इंग्रजी भाषा ज्ञात असणं जरूरीचं असलं, तरी अगदी आवश्यकच आहे असे नाही, असं जाणकार, भाषा-तज्ज्ञ सांगतात.

सरकारी शाळांमधील शिक्षकांचे प्रयत्न सुरू आहेत (काळेगोरे असे असणारच), धडपडणारी बेटं कमी नाहीत. पण 'जे सरकारी आहे ते फालतू आणि जे खासगी आहे ते चांगलं', अशी आपल्या समाजमनाची आधीपासूनच धारणा झालीय. सरकारी शाळांबाबत जी बोंब ठोकली जाते, त्यातला प्रमुख आक्षेप असतो गुणवत्ता घसरलीय, दर्जा नाहीये. या लोकांना 'गुणवत्ता म्हणजे काय?' असं विचारलं तर सांगता येत नाही. यांचे गुणवत्ता मोजण्याचे निकष काय? लेखन – वाचन कार्यक्रम ! गुणवत्ता म्हणजे विशिष्ट गोष्टी असं आपण ठरवून टाकलंय. सर्व समाजघटकांना एकसारखे निकष कसे काय असू शकतात? 'चांगला माणूस बनविणारं शिक्षण म्हणजे खरं शिक्षण' असं आपण बिंबवायला हवं. इथे गुणवत्तेच्या आड लपून सरकारी शाळा बदनाम करण्याचे करंटे उद्योग सुरू आहेत की काय अशी शंका येतेय.



चित्र - केतकी

मग पहिल्या प्रसंगातली चॉकलेट मागणाऱ्या कोमलची आई तिला जे सांगते ते असो किंवा दुसऱ्या प्रसंगातल्या विशालसारखी मुलं जेव्हा विचारू लागतात, ते असो. तेव्हा त्यात त्यांचा काही दोष नसतो. ही समजूत ज्या समाजानं त्यांच्या मनावर बिंबवली आहे, त्या समाजाकडेच शेवटी बोट दाखवणं भाग पडतं. मुलाला आपण मराठी



कृष्ण-सुदाम हे दोघं मित्र होते. आता काळ बदललाय. आताचा कृष्ण महागड्या इंग्लिश माध्यमाच्या शाळेत शिकत आहे, तर सुदामा जिल्हा परिषद, नगरपालिकेच्या कुठल्या तरी शाळेत! त्यामुळे कृष्ण-सुदाम भेट सोडाच; साधी ओळखदेखील होत नाहीये. सुदाम्याचे पोहे आजचा कृष्ण कुठले खाणार? कोठारी आयोगानं 'कॉमन स्कूल सिस्टीम'चा आग्रह धरला होता. तर 'मुलांच्या सामाजिकीकरणाची प्रक्रिया भारतातल्या केवळ सरकारी शाळांमध्येच घडत असते,' असं निरीक्षण ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ यशपाल यांच्या नेतृत्वाखालील समितीनंही नोंदवून ठेवलं आहे. याचं काय करायचं?

माध्यमाच्या सरकारी शाळेत शिकतोय, हे जणू कमीपणाचं वाटू लागलंय. इंग्लिश शाळा आणि तिथं शिकणारी मुलं आपल्यापेक्षा कोणीतरी ग्रेट आहेत, असा विचार त्यांच्या मनात चमकून जातो. या मुलांच्या शंकांचं समाधान करणं, त्यांच्या प्रश्नांना समर्पक उत्तरं, पर्याय देणं, ही 'एज्युकेशन कम्युनिटी' म्हणून आपली सर्वांचीच जबाबदारी नाही का?

इतक्या मोठ्या लोकसंख्येच्या समूहाला मराठीतून वैद्यकीय, अभियांत्रिकी, तांत्रिक अभ्यासक्रमांचे शिक्षण देण्याचा विचारही करत नसू, तर आपल्याइतके करंटे आपणच ठरू. सरकार वेळोवेळी शिक्षणात 'कॉस्मेटिक चेंजेस' करत असतं. पण आता यावर भागणार नाही. एक निश्चित धोरण आखण्याची गरज आहे. फार दूरचं कशाला आपल्याकडे अकरावी – अभ्यासक्रम मराठीमध्ये उपलब्ध आहे, हे तरी किती पालकांना माहिती आहे? एक बरं आहे की, सी.बी.एस.ई. किंवा आय.सी.एस.ई. शाळांचं महागडं खूळ ग्रामीण पालकांच्या डोक्यात अजून घुसलेलं नाहीये. नाही तर आज ना उद्या एखाद्या बुद्रुक गावात या शाळा निघू लागतील आणि मग स्थिती आणखीनच बिकट होत जाईल.



भाऊ चासकर, अकोले, जि. नगर
बहिरवाडी, ता. अकोले येथे प्राथमिक शिक्षक. मराठी भाषा, मास कम्युनिकेशन आणि पत्रकारिता या तीनही विषयांमध्ये पदव्युत्तर शिक्षण, विपुल वाचन आणि लेखन, शिक्षण आणि पर्यावरणाचेही अभ्यासक.
bhauchaskar@gmail.com

इंग्रजी माध्यमाच्या शाळा

इंग्रजी माध्यमाच्या शाळांतून अशी एक विचारधारा प्रसृत झालेली आढळते की इंग्रजी शिकणे म्हणजे पहिली भाषा शालेय व्यवहारातून पूर्णपणे वर्ज्य करणे। आज महाराष्ट्रात आयसीएसई, सीबीएसई, आयबी अशा अन्य बोर्डांच्या शाळांचे प्रस्थ वाढले आहे। महागड्या आंतरराष्ट्रीय शाळा फोफावत आहेत।
यांपैकी अनेक शाळांमधून मराठीचे उच्चाटनच झाले आहे। महाराष्ट्रातल्या या शाळांमधून फ्रेंच, जर्मन शिकवले जाते। पण 'मराठी'ला शाळांच्या चौकटीत स्थान नाही। हा मुद्दा महाराष्ट्रातील मुलांच्या शिक्षणाच्या दृष्टीने अत्यंत गंभीरपणे तपासला गेला पाहिजे। ज्यांची पहिली भाषा मराठी आहे, त्यांनी इंग्रजीतून शिकण्यासाठी किंवा इंग्रजी शिकण्यासाठी सर्वतोपरी इंग्रजीवरच भर दिला, आणि हे करताना इंग्रजी यावे यासाठी मराठी भाषेचा वापर जर टाळण्याचा प्रयत्न केला किंवा मराठी ही दुय्यम – कमी प्रतीची भाषा आहे असे मुलांच्या मनावर ठसवले, तर त्यांची मराठी बोलण्याची क्षमताच हळूहळू कमजोर होऊ लागते। असे आज बहुतेक इंग्रजी माध्यमाच्या शाळांमधून घडते आहे। भाषा म्हणून ठसवलेले भाषेचे दुय्यमत्व तुच्छतेच्या स्तरावर जाण्याची शक्यता लहान वयात अधिक असते। इंग्रजी माध्यमाच्या शाळांतील मुलांचे स्वतःचेच एक काल्पनिक असे इंग्लिश भाषिक विश्व तयार होते। त्यात त्यांच्या काही मोजक्या मित्रांशिवाय आणि परस्परातील शालेय जगाच्या संदर्भातील विनिमयाखेरीज अन्य विशेष काही असत नाही। साहजिकच ही मुले आपल्या भाषिक संस्कृतीतील संबंधांना पारखी होतात। अशाप्रकारे एकूण अनुभवविश्व मर्यादित राहण्याचे, सांस्कृतिक अनुभवविश्व मर्यादित राहण्याचे परिणाम हे एकूणच शिकण्याच्या बौद्धिक आणि भावनिक क्षमतांना मारक ठरतात। मराठी संस्कृती गळून पडलेली आणि इंग्रजी दूर राहिलेली,
अशा त्रिशंकू अवस्थेत विद्यार्थी शिकतात; आणि पुढे असेच जीवनही जगतात।

'निळे आकाश हिरवी झाडे काळी माती' मधून साभार.
लेखक – रमेश पानसे, प्रकाशक – ग्राममंगल, पुणे

इंग्रजीचा मॅनिया

नरेंद्र लांजेवार



आज महाराष्ट्रात विदर्भ मागासलेला समजला जातो. याच मागासलेल्या विदर्भात गडचिरोली आणि बुलडाणा हे दोन जिल्हे मानवनिर्देशांकानुसार मागासलेले आहेत. शेतकरी आत्महत्येच्या प्रमुख पाच जिल्ह्यात बुलडाणा जिल्ह्याचा अग्रक्रमाने समावेश होतो. अशा मागासलेल्या जिल्ह्यातही १९९० पासून इंग्रजी माध्यमाच्या शाळांची वाढ मोठ्या प्रमाणावर झाली आहे. बुलडाणा जिल्ह्यात प्रत्येक तालुक्यात आठ-दहा इंग्रजी माध्यमांच्या शाळा १९९०-९५ पासून सुरू झाल्या आहेत. विनाअनुदान तत्त्वावर सुरू झालेल्या या शाळांनी गावोगावच्या नगरपरिषदांच्या आणि जिल्हापरिषदांच्या शाळांची मुलं मोठ्या प्रमाणावर पळविली आहेत. बुलडाणा शहरात २००५ मध्ये पहिली ते चौथीपर्यंच्या नगरपालिकांच्या आठ शाळा होत्या. प्रत्येक शाळेत सरासरी चारशे विद्यार्थी होते. आता आठही शाळा मिळून एकूण आठशेच्या घरातही विद्यार्थी नाहीत. अशीच परिस्थिती प्रत्येक तालुक्यामध्ये दिसते. या शाळांमध्ये तज्ज्ञ शिक्षक आहेत, वर्गखोल्या आहेत, शैक्षणिक संसाधने आहेत तरीही विद्यार्थी संख्या गेल्या सात-आठ वर्षात कमी का होत आहे - याचा कानोसा घेतल्यास पालक म्हणतात, ''नगरपालिकेच्या शाळेत शिकविणाऱ्या शिक्षकांची मुलं इंग्रजी माध्यमाच्या खाजगी शाळेत का जातात? त्यांच्याजवळ पैसा आहे म्हणून ते 'चांगल्या' शाळेत मुलांना शिक्षण देतात आणि झोपडपट्टीतल्या आणि गरीब घरातल्या मुलांसाठीच आता नगरपालिकांच्या शाळा !'' हे नवे समीकरण घातक आहे. एकही अधिकारी किंवा उच्चशिक्षित पालक आपल्या मुलाला गरीब मुलांच्या सोबत नगरपालिकेच्या शाळेत टाकू इच्छित नाही, ही वस्तुस्थिती आहे.

नगरपालिकेच्या शाळेत शिकविणारे श्री. गणेश हिंगे यांच्या मते आज अनेक पालकांजवळ पैसा आहे, मुलांसाठी कितीही खर्च करावयाची तयारी आहे. आपल्याला गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळाले नाही पण आपल्या मुलांना ते मिळावे या अपेक्षेपोटी इंग्रजी किंवा सेमी इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मुलांसाठी प्रवेश घेतात. जे खरंच आर्थिकदृष्ट्या कमकुवत किंवा दारिद्र्यरेषेखालील आहेत, अशांचीच मुलं आज आमच्या नगरपालिकेच्या शाळेत येतात, असंही ते म्हणतात.

आज महानगरात मोठ्या प्रमाणावर इंग्रजी माध्यमांच्या शाळा सुरू आहेत. तीच हवा पाझरत पाझरत छोट्या छोट्या खेडेगावातही येत आहे. ज्यांच्या कुटुंबातील दुसरी किंवा तिसरी पिढी आज शिकत आहे, ते सर्व मोठ्या प्रमाणावर इंग्रजी माध्यमांनाच प्राधान्य देत आहेत. काही सुशिक्षित पालक महाराष्ट्र राज्यात राहूनही सी.बी.एस.ई. आणि आय.सी.एस.ई पद्धतीलाही प्राधान्य देत आहेत. बुलडाण्यासारख्या धड शहरही नाही आणि धड खेडेही नाही अशा नवमध्यमवर्गीय लोकांच्या वस्तीतही चार पूर्ण इंग्रजी माध्यमांच्या शाळा, पाच मराठी माध्यमाच्या शाळा, त्यातही चार सेमी आणि एकच पूर्ण मराठी माध्यमाची शाळा आहे. या बुलडाणा शहरात एकूण विद्यार्थ्यांचा सर्व्हे केला तर ४० टक्के विद्यार्थी हे पूर्ण इंग्रजी माध्यमांमध्ये, पहिली ते दहावीपर्यंत शिक्षण घेत आहेत. ३० टक्के विद्यार्थी सेमी इंग्रजीत आणि उरलेले ३० टक्के विद्यार्थी मातृभाषेत शिक्षण घेत आहेत. बुलडाणा शहरापासून २ कि.मी. परिसरात सुंदरखेड येथे जिल्हापरिषदेची प्राथमिक शाळा आहे. पहिली ते चौथीचे चार वर्ग, या शाळेत चार तज्ज्ञ शिक्षक, तरीही या शाळेची एकूण विद्यार्थी संख्या फक्त २७ आहे. या गावाला लागूनच बुलडाणा शहर असल्याने या गावातील सर्व पालक आपली मुले शहरात शिकायला पाठवितात. वेळप्रसंगी मोठ्या प्रमाणावर फी देतात. तिथे एका-एका वर्गात सत्तर-सत्तर मुलं आणि येथे चार वर्गामध्ये मिळून फक्त सत्तावीस मुले. शासन एका एका विद्यार्थ्यावर मोठ्या प्रमाणावर खर्च करीत असतानाही आज पालकांना खाजगी शाळांचे आकर्षण मोठ्या प्रमाणावर आहे.

सेवानिवृत्त मुख्याध्यापक मंगेश पाटील यांच्या मते ज्या पालकांना मेडिकल, इंजिनिअरिंग किंवा एम.बी.ए.कडे मुले पाठवायची आहेत,



चित्र - ओजस

ते पालक सुरुवातीपासूनच जागरूकतेने मुलांना इंग्रजी किंवा सेमी इंग्रजी माध्यमांमध्ये प्रवेश घेतात. पैसा खर्च करून वेगवेगळ्या 'ॲक्टिव्हिटी क्लासेस'मध्येही पाठवितात. पैसेवाल्यांचा ओढा पाहून कष्टकरी, गरीब घरातील काही पालक हिम्मत धरून मुलांना इंग्रजी माध्यमांच्या महागड्या शाळांमध्ये प्रवेश घेतात. मुळात शासनाने विनाअनुदान तत्त्वावर इंग्रजी माध्यमांच्या शाळा सुरू करण्यासाठी जी परवानगी दिली आहे, तीच मातृभाषा माध्यमातून शिक्षणासाठी अडसर ठरत असल्याचे मत मुख्याध्यापक मंगेश पाटील व्यक्त करतात.

'मातृभाषेतून शिक्षण' द्या असे शिक्षक जेव्हा पालकवर्गाला सांगू लागतात तेव्हा पालकही शिक्षकांच्या मुलांकडे बोट दाखवून, ''तुमची मुलं इंग्रजी, सेमी इंग्रजी माध्यमांच्या व आमची मुलं मराठी माध्यमाच्या शाळेत हा भेद का?'' असा प्रश्न विचारतात. पालकांच्या या प्रश्नाचे समर्पक उत्तर आजच्या शिक्षकवर्गाकडे नसल्याने सेमी इंग्रजी माध्यमांच्या व पूर्ण इंग्रजी माध्यमांच्या वर्गांमध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्यांची गर्दी वाढली आहे.

आम्ही बुलडाणा शहरात, वेगवेगळ्या वॉर्डांमध्ये पुस्तकमैत्री बालवाचनालयाची पन्नास केंद्रे चालवितो. मुलेच या बालवाचनालयाचे व्यवस्थापन बघतात. मराठी माध्यमाची जी मुले वाचनालयाचे व्यवस्थापन बघतात त्यांची केंद्रे अगदी सुरळीत चालतात. परंतु इंग्रजी माध्यमाची जी मुले आहेत, त्यांना मराठी पुस्तके वाचण्यात बरीच अडचण येते व त्यांच्या केंद्रांनाही फारच कमी प्रतिसाद मिळतो असे आमचे निरीक्षण आहे.

इंग्रजी माध्यमाच्या मुलांना इतर मुलांप्रमाणे मराठी स्पष्ट वाचता येत नाही. मराठीचे साधे-साधे वाक्प्रचार किंवा साधा विनोदही त्यांना लवकर कळत नाही. या भाषिक न्यूनगंडामुळे ते मराठी वाचनापासून दूर जातात, फक्त शालेय पाठ्यपुस्तके - त्याचे पाठांतर - बस ! ना कोणता विशेष छंद ना कशाची आवड... ना वाचनाशी मैत्री... ना सामाजिक समज वाढलेली... अशा विचित्र अवस्थेत ही मुले मोठी होत आहेत. या मुलांच्या पालकांनाही आता प्रश्न पडू लागले आहेत की, आमची मुले आमच्याशी मनमोकळे बोलत नाहीत... सारखी कॉम्प्युटर किंवा मोबाइलवर खेळत असतात. काही वाचन करा म्हटले की, 'बोअर होते' असे म्हणून अलिप्त राहतात... मुलांचे हे असे वागण्याचे प्रमाण वाढत आहे, याला माध्यम जबाबदार आहे का - याचा पालकांसह शिक्षकांनी आणि शिक्षणतज्ज्ञांनीही विचार करणे आता आवश्यक आहे.



▼▼▼

नरेंद्र लांजेवार, बुलडाणा
पत्रकारितेचा अनुभव असलेले विदर्भातील मान्यवर लेखक व कवी.
'भारत विद्यालय', बुलडाणा येथे ग्रंथपाल.
l_narendra2001@yahoo.com

Best Wishes From

Yashavardhan Swami

Kolhapur

सेमी-इंग्लिशचे फॅड

शालेय शिक्षण हे कमालीचे विस्कळित झाले आहे. शिक्षणात नवनवीन प्रयोग होऊन ते सबल होण्याऐवजी नवनवीन फॅडे येऊन ते गुणवत्तेच्या दृष्टीने दुर्बल मात्र होत चालले आहे. मूल्यशिक्षण, पर्यावरण, पहिलीपासून इंग्रजी, खिचडी, मुलींना हजेरीसाठी रोजचा एक रुपया ही किंवा अशीच आणखी काही फॅडे प्राथमिक शिक्षण सोसत आहे. त्यांच्यामुळे शिक्षणाची गुणवत्ता वाढल्याचे कधी दिसून आले नाही; तिचे घसरणे चालूच आहे.

अलीकडचे नवे फॅड आहे ते 'सेमी-इंग्लिश'चे! भराभर अनेक मराठी शाळा सेमी-इंग्लिशकडे वळत आहेत. आधी आठवीपासून सेमी-इंग्लिश, नंतर पाचवीपासून आणि आता तर पहिलीपासून मुलांना सेमी-इंग्लिश पर्याय देण्यापर्यंत हे फॅड पसरले आहे. मी तर काही शाळांतून बालवाडीपासून सेमी-इंग्लिशचे वर्ग चालू केल्याचे पाहिले आहे. इंग्रजी भाषेची एवढी गुलामी ब्रिटिश आमदानीतही आपल्या देशात नव्हती!

सेमी-इंग्लिश ही विद्यार्थ्यांची आणि पालकांची घोर फसवणूक आहे. मराठी शाळांमधील मुले इंग्रजी माध्यमाच्या शाळांकडे वळू नयेत म्हणून त्यांना दाखविलेले हे गाजर आहे. मुख्य म्हणजे पालकांना असे वाटते आहे की आपल्या मुलांना चांगले इंग्रजी यावे. पण जसे पाचवीऐवजी पहिलीपासून इंग्रजी विषय सक्तीचा केल्यामुळे मुलांना इंग्रजी आले नाही तसेच सेमी-इंग्रजी म्हणजे गणित व विज्ञान हे विषय इंग्रजीतून शिकविण्याचा घाट घातल्यामुळेही ते येणार नाही. कारण, हे दोन्ही विषय बरेचसे तांत्रिक स्वरूपाचे आहेत, त्यातील संज्ञा इंग्रजीतून माहीत होणे वेगळे आणि इंग्रजी भाषा म्हणून येणे वेगळे. (या ऐवजी वर्णनात्मक स्वरूपाचे इतिहास-भूगोल हे विषय इंग्लिशमधून शिकविल्यास जरा तरी इंग्लिश येईल!) शिवाय हे विषय शिकविणारे, सेमी-इंग्लिश शाळांतील शेकडो शिक्षक एकदम इंग्रजी भाषेत तरबेज कसे होतील? त्यामुळे बहुतेक ठिकाणी मराठीतूनच सेमी-इंग्लिशचे वर्ग चालविले जातात. हा तर चक्क खोटेपणाच आहे.

आणखी असे की, काही शाळांतून काही वर्ग सेमी-इंग्लिशचे असतात, व त्यात निवडक हुशार मुले घेतली जातात. केवढी गफलतीची गोष्ट आहे ही ! एक म्हणजे, शाळेतल्या मार्कांवरून हुशारी ठरविणे योग्य नाही. दुसरे म्हणजे, सेमी-इंग्लिशसाठी निवडलेली मुले 'हुशार' आहेत असा त्यांच्यावर शिक्का मारणे, आणि त्याहूनही जी या पर्यायासाठी निवडली नाहीत ती हुशार नसल्याचा शिक्का त्यांच्यावर मारणे हे शाळांचे अशोभनीय व अन्यायकारक कृत्य आहे. तिसरे म्हणजे, सेमी-इंग्लिशचे विद्यार्थी हे पुढे शास्त्र शाखेकडेच वळणार आहेत हे त्यांच्या लहान वयांत शाळेने ठरवून देणे, हे धाष्ट्र्याचे नि धोक्याचेच आहे.

मी तर अशीही एक शाळा पाहिली आहे की तेथे एक तुकडी सेमी-इंग्लिशची करून त्या तुकडीतील सर्व मुलांना टाय व बूट सक्तीचे केले आहेत. 'टाय' या निरर्थक नि अनारोग्यकारक वस्तूचे स्तोम माजवून शाळेत विषमतेचे बीज मुलांच्या मनांत पेरण्याचे केवढे पाप शाळाचालक करीत आहेत!

शहाण्या पालकांनी आणि विद्यार्थ्यांच्या हिताची काळजी असणाऱ्या शाळांनी हे फॅड तात्काळ बंद करावे. खरे तर, मुलांनी मराठीतून सर्व विषय शिकून ज्ञानसंपन्न व्हावे आणि इंग्रजीही उत्तम आत्मसात करावे. पण, हे होण्याचे मार्ग वेगळे आहेत. शाळांनी त्यांचा शोध घ्यावा. पण, सेमी-इंग्लिशमधून होणारी विद्यार्थी-पालकांची फसवणूक थांबवावी.

'निळे आकाश हिरवी झाडे काळी माती' मधून साभार.
लेखक - रमेश पानसे,
प्रकाशक - ग्राममंगल, पुणे

भटक्या विमुक्त मुलांना शिकवताना

पूनम गुजर



'पुनरुत्थान समरसता गुरुकुलम्' अर्थात 'गुरुकुल' सुरू झालं आणि दोन दिवसातच माझी शिक्षिका म्हणून निवड करण्यात आली. माझं एम.ए.बी.एड. झालेलं असल्यामुळे माध्यमिक स्तरावर शिकवायचं हे मनाशी पक्कं होतं. शिक्षणविषयक अनेक व्याख्या, भारतीय आणि विदेशी विचारवंतांनी मांडलेले विचार बी.एड. अभ्यासक्रमात शिकले होते. तशाच पद्धतीनं गुरुकुलात शिकवायचं असा विचार केला, पण प्रत्यक्षात मात्र तसं झालंच नाही.

गुरुकुलमधली मुलं खूप वेगळ्या सामाजिक, सांस्कृतिक पार्श्वभूमीमधून आलेली होती. पारधी, कैकाडी, मरिआईवाले, डोंबारी, तांबटकरी, वडार, ढोर अशा अनेकविध भटक्या जातीजमाती, मागास, दलित समाजातील कधीही शाळेत न गेलेली, शाळेचा गंधही नसलेली, मुक्त मोकळ्या वातावरणात वावरलेली ही मुलं होती. त्यांना शालेय विषय शिकवायचे हे एक आव्हानच होतं. कोणत्याही विषयाची सुरुवात भाषेपासूनच होते. मात्र इथल्या प्रत्येक मुलाची भाषा वेगळी, सवयी वेगळ्या, संस्कार वेगळे.

सुरुवातीच्या काळात शिकविण्यापूर्वी मुलांची भरपूर तयारी करून घ्यावी लागली. मुलांना फार वेगळ्याच सवयी होत्या. चिंचवडगावात दर चतुर्थीला यात्रा असते. या यात्रेमध्ये जाऊन विविध प्रकारच्या वस्तू मुलं चोरी करून आणायची. शिक्षकांच्या बॅगमधून पैसे चोरायचे, मंदिरात जाऊन ध्यानस्थ बसायचं व नजर चुकवून ताटातील पैसे, प्रसाद चोरून आणायचा. भांडणं सुरू झाली की एरवी गोंडस, सालस वाटणारी मुलंमुली एकमेकांच्या चेहऱ्यावर बोचकरायची, डोकी फोडायची. कधीही न ऐकलेल्या शिव्या द्यायची. या सवयींमध्ये बदल करणं हे प्रमुख ध्येय त्यावेळी आमच्यासमोर होतं.

'शिक्षणाने माणसात परिवर्तन होते' हे प्रत्येक बैठकीत गुरुकुलचे संस्थापक गिरीश प्रभुणे काका मांडायचे आणि आम्ही त्यावर विश्वास ठेवून प्रयत्न करत रहायचो.

शिकण्याची रुची निर्माण करण्यासाठी खेळ, गाणी, गोष्टी यापासून सुरुवात केली परंतु लक्षात आलं की प्रत्येकाची भाषा वेगळी आहे. मराठी भाषा समजते, बोलता येते परंतु आपापसात कुजबुजताना ते आपल्या बोलीभाषेचा वापर करतात. गोष्टीमधील पात्रं घेऊन नाटक बसवताना मराठीऐवजी बोलीभाषेत संवाद बोलून ते पात्र हुबेहूब वटवतात.

गुरुकुल सुरू करण्याच्या आधी तुळजापूरजवळ यमगरवाडी येथे असाच शिक्षणविषयक प्रकल्प प्रभुणेकाकांनी राबवला होता. त्यामधून त्यांच्या असं लक्षात आलं की मुलं दहावी बारावीपर्यंत शिकली खरी, परंतु प्रचलित सरकारी अभ्यासक्रमाप्रमाणे शिकल्यामुळे ती त्यांच्याकडे असलेलं ज्ञान, कौशल्यं पूर्णतः विसरली. काका सांगायचे की शाळेत आलेल्या पाच-सहा वर्षाच्या मुलांना वनस्पतींचं उत्तम ज्ञान होतं. त्याचा उपयोग मुलं स्वतःसाठी करत. इतरांसाठी करत, पण पुढील पाच-सहा वर्षांच्या काळात त्यांचं हे औषधी ज्ञान, पर्यावरणविषयक ज्ञान तसेच ग्रह - गोल तारे, ऋतुचक्र, मोजणं, तोलणं, मापन याबद्दलचं ज्ञान लुप्त झालं आणि नवीन शालेय ज्ञानातही त्यांना पारंगतता आली नाही. या मुलांकडचं ज्ञान गेलं कुठं? याची कारणं काकांनी शोधली. ती अशी होती की मुलं आपापसात बोलताना त्यांच्या भाषेतच बोलत मात्र शिक्षकांशी बोलताना किंवा बाहेरून आलेल्यांशी बोलताना मराठीत बोलत असत. शिवाय या सगळ्या शिक्षणामध्ये भाषा या विषयात पाठ्यपुस्तकाची भाषा आणखी वेगळी. परंपरागत असणारं ज्ञान जर मुलांच्याच बोलीभाषेतून शिकवलं असतं तर ते लुप्त झालं नसतं. कारण त्यांची भाषा ही त्यांच्या मनाची भाषा होती. त्यामुळे मनाची भाषा, विचारचक्राची भाषा व शिकण्याची भाषाही एक असली पाहिजे असा विचार सुरू झाला.

'गुरुकुलम' सुरू करताना ज्या काही महत्त्वाच्या बाबी विचारात घेतल्या गेल्या त्यात, शिकविताना मुलांच्या विचारचक्राशी जुळणारी भाषा आली पाहिजे, याचा मुख्यत्वे विचार केला गेला. त्यामुळे वडार, मरिआईवाले (तेलगू), पारधी (वाघरी), कैकाडी (कानडी), गोसावी, डोंबारी (गुजराती), बंजारा (राजस्थानी), भिल्ल (गुजराती, राजस्थानी), झारेकरी (उडीया), विश्वकर्मा (हिंदी), असामी अशा सर्व भाषक मुलांना मराठीतून शिकवणं, तसंच मराठीतून शिकविताना त्यांच्या मातृभाषेतील विचारचक्र सुरू व्हावं, यासाठी आम्ही काही प्रयोग सुरू केले. त्या प्रयोगातील पहिला भाग मुलांचं पूर्वज्ञान समजून घेणं. पूर्वज्ञानामध्ये पारंपरिक कौशल्यं, कला, गाणी, गोष्टी, कुटुंबांचा व्यवसाय, परिसरातील ज्ञान, जन्मल्यापासून पाच ते सहा वर्षात त्यांच्या विचार नि अनुभवविश्वात काय झालेलं असतं हे जाणून घेऊन त्याची नोंद केली आणि त्यावर आधारित अभ्यासक्रमाचं पहिल्या वर्षासाठी पूर्ण लेखन केलं. उदा. आमच्याकडे रोहित आणि शुभांगी अशी दोन मुलं होती. दोघं साडेतीन, चार वर्षाची होती. जेवण झाल्यावर काकांनी ताटातील पाणी बाहेर फेकायला सांगितलं. रोहित ताट घेऊन बाहेर गेला, पण ताट न घेताच आत आला. थोड्या वेळानं काकांनी त्याला विचारलं 'अरे ताटातलं पाणी टाकलं

मुळातच भाषा ही मुख्यत: भावना व्यक्त करण्यासाठी, संदेश/निरोप देण्यासाठी, एकमेकांशी संवाद साधण्यासाठी असते. संवादात मैत्री, राग, करुणा, प्रेम, रुसवा सर्व काही येतं. संवाद तुटला की तो विसंवाद.

कोणतीही भाषा घेतली तरी त्यात संवादाचे काय काय मार्ग/पद्धती असू शकतात – तर हावभाव, विविध प्रकारचे आवाज, हातवारे, थयथयाट, दातओठ खाणं, मुठी वळणं, दगड भिरकावणं, उड्या मारणं, मोडतोड करणं हे प्रारंभिक अवस्थेतलं संवादाचं स्वरूप. प्राणी पशुपक्ष्यांमध्येही संवाद असतो. यामध्ये दुसऱ्याला इशारा दिला जातो.

माणसाची भाषा ही त्या त्या प्रदेशानुसार असते. ज्यात कुठलंही मिश्रण नाही अशी एकच एक भाषा सापडणं अवघड आहे. अनेक भाषांचं मिश्रण होतहोत बोलीभाषा तयार झाली.

भाषा ही अमुकवर्गाची अशी मक्तेदारी नसते. भाषा हे विकासाचं अंग आहे आणि विकास म्हणजे अप्रगत स्थितीतून प्रगत स्थितीत जाणं. आज जरी संवादासाठी वेगवेगळी साधनं उपलब्ध असली उदा. दूरध्वनी, इंटरनेट तरी ही सर्व साधनं मुळात लिपी, चित्रं, बोलणं यांच्याशी जोडलेली आहेत. त्यामुळे प्रगत आणि अप्रगत असं कोणत्याही भाषेला म्हणू नये. भाषेचा आविष्कार व्यक्तीनुसार वेगवेगळा आढळतो. भाषेतील संकेतचिन्हं (इ, श) सारखीच असली तरी उच्चार मात्र त्या त्या व्यक्तीप्रमाणे बदलत जातो.

मुलाचं संगोपन हे विशिष्ट वयापर्यंत नैसर्गिकरित्या आईकडून होतं. त्यामुळे आईची भाषा ही मुलाची भाषा होणं स्वाभाविक आहे. ज्या वातावरणात मूल वाढेल ती भाषा मूल आत्मसात करतं, विशेषत: बोलीभाषा.

आज मराठी भाषेच्या ज्या काही समस्या जाणवताहेत त्याकरिता स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात जावं लागेल. शासनाच्या धोरणाचा, त्रिभाषा सूत्राचा अभ्यास करावा लागेल. स्वातंत्र्यपूर्व काळात भाषिक प्रांतरचना, भाषिक दंगली असं काही नव्हतं. व्यापार, उद्योग व्यवसायानिमित्त प्रादेशिक भाग बदलले तरी सहजगत्या एकमेकांची भाषा अवगत केली जात होती. प्राचीन काळात राज्यव्यवहाराची भाषा एकच पण बोलीभाषा वेगवेगळ्या होत्या. संस्कृत वाङ्मयातील निर्मिती सर्वसामान्यापर्यंत पोहोचावी यासाठी पूर्वीपासून संतांनी ती अनुवादित करून, रूपांतरित करून काव्यमयरीत्या आपापल्या मातृभाषेतून मांडली आहे उदा. तुकारामाची गाथा, दासबोध इ.

सर्वसामान्यांसाठी सामान्य भाषेत ज्ञान यावं हा प्रयत्न पूर्वीपासूनच केला गेलाय. मात्र इंग्रजी भाषा आली आणि स्थानिक भाषेला पर्यायी असं तिचं स्थान निर्माण केलं गेलं. त्यामुळे सध्या राज्यव्यवहार, दैनंदिन व्यवहार, व्यावसायिकांची भाषा असं सगळीकडेच इंग्रजीचं प्रस्थ दिसतंय. इंग्रजी माध्यमांचा, शाळांचा आग्रह पालकही धरू लागलेत. त्यामुळे शिक्षणाचं माध्यम हे इंग्रजी होण्याचंही प्रमाण बरंच दिसतंय.

इंग्रजी राज्यकर्त्यांनी ग्रंथालयं, शाळा, साहित्य, पुस्तकं अशी निर्मिती केली. शिवाय आधुनिक ज्ञान इंग्रजीत अधिक असल्यानं इंग्रजीचाच विकास अधिक होत गेला. भाषावार प्रांतरचना झाल्यानंतर खरं तर प्रादेशिक भाषा / स्थानिक भाषांचा विकास होणं अपेक्षित होतं, मात्र हा विकास झालाच नाही. म्हणून आज इंग्रजीला महत्त्व येऊन हळूहळू त्याचं अस्तित्व रोजच्या जगण्यात, जीवनशैलीत अधिकच वाढत चाललंय. पण तरीही 'विचार करणं' या क्षमतेला मातृभाषेशिवाय पर्याय नाही, असं वाटतं म्हणूनच 'समरसता गुरूकुलम' या शाळेचं माध्यम मराठीच आहे. शिवाय येथील मुलांना मराठीबरोबर संस्कृत, हिंदी, इंग्रजी याही भाषा पहिलीपासून शिकवल्या जातात व त्याकरिता मुलांच्या कानावर या भाषा जास्तीत जास्त पडतील असा प्रयत्न केला जातो.

गिरीश प्रभुणे
भटक्या विमुक्त जमातींसाठी काम.
'पुनरुत्थान समरसता गुरुकुलम्' या निवासी शाळेचे संस्थापक.

का? ताट कुठं ठेवलं?' रोहित काकांना घेऊन बाहेर गेला. त्यानं ताट उन्हात ठेवलं होतं. काकांनी त्याला विचारलं, 'ताट का ठेवलं, पाणी का टाकून दिलं नाही.' तर तो म्हणाला, 'पाणी आता उडून जाईल.' उन्हामुळे पाणी उडून जातं हे त्याला माहीत होतं. पक्षी उडून जातो, तसं पाणी उडून जातं. उडून जाण्याची क्रिया वरच्या दिशेनं होते. पाण्याची वाफ होते. तीही उडून जाते. एखादी गोष्ट संपणं याला उडून जाणं असा शब्दप्रयोग ही मुलं करतात. जसे पैसे उडाले, ज्वारी उडाली. त्यामुळे रोहितला वाफ, उष्णता यासारख्या संकल्पना शिकविणं सोपं झालं.

मुलांमध्ये सतत मारामारी करणं, हातातील पाटी मारणं, दगड मारणं, आईवडिलांवरून शिव्या देणं इ. प्रकारही चालू असायचे. शाळेमध्ये चापेकरांविषयी, तसेच अन्य क्रांतिकारकांविषयी सचित्र माहिती लावली होती. ही मुलं ती पहायची. एक मुलगा खूप भांडखोर, चिडखोर परंतु संवेदनक्षम होता. नाना प्रकारच्या गोष्टी तो करायचा. या मुलानं क्रांतिकारकांच्या कथा ऐकून त्यावर एक नाटक रचलं, फासावर जायचं आणि खरोखरच फास लावला. नशीब, हुतात्मा बनण्याचं त्याचं ते स्वप्न शिक्षकांच्या सावधानतेमुळं अपुरं राहिलं.

काही दिवसांनी गुरुकुलचं स्थलांतर पवना नदीकाठी झालं. इथे निसर्गरम्य ठिकाणी वर्ग आहेत. सुरुवातीला वर्गातून खारुट्या उड्या मारत जायच्या, विविध प्रकारचे पक्षी तिथे यायचे, नाग, साप तर अगदी तीन-चार फुटी होते. हळूहळू खारुट्या वर्गात येणं कमी झालं. सगळे पक्षी गेले. फक्त कावळेच राहिले. चौकशी केल्यावर असं लक्षात आलं की शिकार करणाऱ्या मुलांनी खारुट्या संपवल्या होत्या. बगळे, विविध रंगाचे पक्षीही संपले. मुलं या सगळ्याची शिकार करून खातात हे आम्हाला माहिती नव्हतं. गोंडस, निरागस मुलांनी या शिकारी केल्या होत्या. वर्गात त्यांची कुजबुज चालू असायची, ती त्यांच्या भाषेत असायची. आम्ही जवळ गेलो की ती गालातल्या गालात हसायची. ह्यांची कुजबुजही – मासे कधी मारायचे, शिकार कधी करायची, पोहायला कधी जायचं, यावर असायची. मग त्यांच्या या सगळ्या अनुभवविश्वावर आमची कार्यपद्धती ठरली व अभ्यासक्रम ठरवला गेला.

आम्ही फक्त मराठी, संस्कृत, इंग्रजी, हिंदी या शालेय भाषाच शिकवायचो. पण मुलं मात्र पारधी, कैकाडी, गुजराती, राजस्थानी, तेलगू यासारख्या अनेक भाषा कोणीही न शिकविता शिकली. त्यामुळे अन्य भाषा शिकविताना मातृभाषेचा, बोलीभाषेचा वापर केला गेला. पहिलीच्या वर्गात आई शिकविताना 'अम्मा', 'आया', 'गम्मा' यासारख्या बोलीभाषेतील शब्दाचा वापर केल्यानं मुलांना त्याचा अर्थ, वळण लगेच समजलं.

तसंच मुलांना शिकवताना पक्षी, वनस्पती इ.च्या माहितीचं संकलन, दैनंदिन वापरातील शब्दांचा संग्रह करत गेलो. अशा प्रकारच्या उपक्रमांमुळे शिक्षक – विद्यार्थी यांच्यातलं अंतर तर कमी झालंच आहे, शिवाय शिक्षकांनाही मुलांच्या बोलीभाषा समजू लागल्या आहेत. पाचवी, सहावी, सातवीतील मोठी मुलं इतर मुलांना मार्गदर्शन करतात. नवीन विद्यार्थी रडायला लागला की त्याला त्याच्या बोलीभाषेचा वापर करून समजावतात. त्यामुळे गुरुकुलात सगळी आपली भावंडंच आहेत असं मुलांना वाटतं व ती या परिसरात रमतात.

प्रमाणभाषेपर्यंत जाण्याचे अनेक अडथळे यामुळे दूर झाले. विज्ञान, गणित, इतिहास, भूगोल हे विषय शिकविताना येणाऱ्या अडचणी दूर झाल्या. ज्या बोलीभाषांना लिपी नाही अशा भाषांना देवनागरी लिपी देण्याचा छोटासा प्रयत्न सुरू आहे.

'गुरुकुल'मध्ये लेखी मूल्यमापनाबरोबर मौखिक व प्रात्यक्षिक याचंही योग्य मूल्यांकन केलं जातं. यामुळे मुलाला काय समजलंय, हे समजू लागलंय. मुलांमध्ये भाषेद्वारा विविध विषयांचं ज्ञान वाढत आहे.

गुरुकुलातील भाषेचा हा प्रयोग प्रत्येक दिवशी भाषेची नवीन कवाडं उघडणारा असल्यामुळे दररोज गुरुकुलातील शिक्षक आणि मुलं यांच्याकडे त्याविषयी विविध प्रकारची माहिती संकलित होत असते. प्रत्येकाची क्षमता वेगळी असते, गुणवत्ता वेगळी असते हे लक्षात आल्याने मुलांच्या क्षमतेप्रमाणे शिकवण्याचा प्रयत्न केला जातो. विद्यार्थी स्वयंप्रेरणेनं अभ्यास करतो आणि शिक्षक फक्त मार्गदर्शकाची भूमिका करतात.

प्रभुणेकाका म्हणतात, ''एखाद्या उपग्रहाला उड्डाण करण्यासाठी अग्निबाणाची गरज असते. हा अग्निबाण त्याला शेवटपर्यंत साथ देत नाही तर त्याला गती देतो आणि नंतर गळून पडतो. पुढे उपग्रह स्वतः गतिमान होतो. शिक्षकाचं काम अग्निबाणासारखं आहे.''

आधुनिक काळातील कोणतंही ज्ञान अवगत करण्यासाठी त्यांच्या बोलीभाषेतूनच ते देता आलं तर शिक्षणातील गळती शून्यावर आणणं शक्य आहे. पण हे सगळं घडून येण्यासाठी बोलीभाषांचा विकास व्हायला हवा आणि असं झालं तरच ज्ञान आणि विकासापासून कोणी वंचित राहणार नाही, असं मला मनापासून वाटतं.



पूनम गुजर, चिंचवड, पुणे
चिंचवडगाव येथील 'पुनरुत्थान समरसता गुरुकुलम'च्या स्थापनेपासून शिक्षिका म्हणून काम.
सध्या शाळेच्या मुख्याध्यापिका.
gurukulam.pune@gmail.com

स्मार्ट पी.टी. इंग्लिश

कृत्तिका बुरघाटे



महाराष्ट्र शासनाने प्राथमिक शिक्षणात इयत्ता पहिलीपासून इंग्रजी सुरू केले, त्याला आता बारा वर्षे पूर्ण होत आली. सुरुवातीला ह्या उपक्रमाबाबत बऱ्याचशा सकारात्मक आणि नकारात्मक चर्चांना उधाण आले. पण महाराष्ट्र शासनाने आपला निर्णय कायम ठेवला. इयत्ता पहिली ते आठवीच्या स्मार्ट पी. टी. (Statewide massive and rigorous training for primary teachers) या राज्यव्यापी भरीव शिक्षण-प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये प्रशिक्षक म्हणून सहभागी होताना मला बरेच अनुभव आलेत.

२००० मध्ये इयत्ता पहिलीपासून इंग्रजीला सुरुवात झाली. शंभर टक्के शिक्षकांना स्मार्ट पी. टी. इंग्लिशचे प्रशिक्षण देण्यात आले. सगळीकडे मोठ्या उत्साहाचे आणि जोशाचे वातावरण होते. साध्या-सोप्या, लहान आणि परिचित इंग्रजी कविता आणि बडबडगीतांनी सर्वांना मोहित केले. कृतीयुक्त कवितांचा तर खूपच गाजावाजा झाला होता. पहिली ते आठवीपर्यंतच्या सर्व शिक्षकांना पहिलीच्या कविता तोंडपाठ होत्या. तेव्हा इंग्रजीबाबतीत सकारात्मक वातावरणाची निर्मिती होऊ लागली असे वाटू लागले होते.

प्रशिक्षणाच्या दुसऱ्या फेरीच्या वेळेपर्यंत उलटसुलट प्रतिक्रिया व्यक्त करणाऱ्या समाजानेही इंग्रजीचे जोरदार स्वागतच केले. प्रशिक्षणाचा वापरही वर्गात झाला. पण हे सारे झाले ते केवळ कविता आणि बडबडगीतांच्याच बाबतीत. सुरुवातीला हे सगळे बरे वाटत होते, पण तिसरीमध्ये बाल कवितांचे प्रमाण कमी झाले, कविता लांबलचक व अवघड झाल्या, कृती कमी झाल्या. शिक्षकांनाही या कविता कठीण वाटू लागल्या, प्रशिक्षणात त्या पूर्ण पाठही झालेल्या नव्हत्या. तिसऱ्या फेरीपासून शिक्षकांच्या मानसिकतेत हळूहळू बदल होऊ लागला. शब्द, गोष्टी, संभाषण, हावभावयुक्त कृती त्यांना कठीण वाटू लागल्या. इंग्रजीबाबतचा उत्साह कमी होऊन चौथीत तर सगळाच जोश पूर्ण उतरणीस लागल्याचे दिसू लागले. पाचवीत काहीसे वेगळे चित्र दिसून आले. पाचवीचा अभ्यासक्रम पूर्ण उजळणी / सरावावर आधारित असल्यामुळे विद्यार्थ्यांना कदाचित सोपा वाटला. सहावी, सातवीत मात्र ते टिकले नाही.

एकंदरीत या बारा वर्षांचा विचार करता काही प्रमाणात सकारात्मक बाबी निश्चितच आढळल्या. पूर्वी एकदम पाचवीत इंग्रजी हा विषय नव्याने सुरू होताना मुलांमध्ये भीती / गंड असायचा, तो आता पहिलीपासून इंग्रजीमुळे काही प्रमाणात नाहीसा झाल्याचे जाणवते. कारण विविध कविता, बडबडगीते, शब्द, चित्रगोष्टी, सूचना अशा अनेक गोष्टी मुलांना लहानपणापासूनच परिचित होत आहेत.

इंग्रजीची आवड असणाऱ्या शिक्षकांच्या वर्गामध्ये डोकावून पाहिले तर पहिलीची मुलेही अभ्यासक्रमामध्ये नसतानाही A - Z पूर्णपणे म्हणतात, ओळखतात, छोटीछोटी स्पेलिंग वाचतात, तोंडपाठ सांगतात, घरातील मंडळींची ना इंग्रजीतून ओळख करून देतात, लिहितात. चौथीची मुले स्पेलिंग तयार करतात, संभाषण करतात, गोष्टीवर आधारित छोटी नाटुकलीही सादर करतात.

एकूणच विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासात वाढ, भीती कमी आणि शब्दसंग्रहात वाढ झालेली दिसते. त्यांची उत्सुकता आणि आवडदेखील



चित्र - ओजस

वाढली आहे. कोडी सोडवणे, विनोद समजून घेणे, जाहिराती समजून घेणेही विद्यार्थ्यांना आवडते.

हे बदल कमी प्रमाणात असले तरी ते निश्चितच सकारात्मक आहेत.

जिथे शिक्षकांनाच इंग्रजी येत नाही किंवा ज्यांचा शब्दसंग्रह कमी आहे, ज्यांना संभाषणाचे कौशल्य अवगत नाही, तिथे या उपक्रमाचा फायदा मुलांना होत नाही. पण नव्याने रुजू होणाऱ्या तरुण मंडळींचा इंग्रजीकडचा कल मात्र आशादायी आहे.

बदल ही नैसर्गिक प्रक्रिया आहे, त्याला कुणी अडवू शकत नाही. बदलाच्या प्रचंड वेगात प्रत्येकजण आपले स्थान निर्माण करण्याच्या प्रयत्नात आहे. जिल्हा परिषदेच्या शाळेत पहिलीपासून इंग्रजी असेल तरी पालक इंग्रजी माध्यमांकडे जास्त वळू लागलेत, ही खेदाची बाब आहे. कारण प्राथमिक शिक्षण हे मातृभाषेतून व्हायला हवे. स्पर्धा आणि चढाओढीच्या या युगात इंग्रजीकडे केवळ विज्ञान आणि तंत्रज्ञानाची भाषा म्हणून बघितले जात नाही. तर तिच्याकडे दर्जा, प्रतिष्ठा, सत्ता यादृष्टीने बघितले जाते आहे. खरे तर, इंग्रजीकडे केवळ व्यावसायिक भाषा म्हणून बघायला हवे, आणि ही दृष्टी निर्माण करण्याची जबाबदारी आज शासन, पालक, शिक्षक एकूणच सर्व समाजाची आहे. इंग्रजी ही जागतिक भाषा आहे, मराठी आपली मातृभाषा आहे. दोघांमध्ये तुलना करणे मला चुकीचे वाटते.

व्यावसायिक यशासाठी इंग्रजी गरजेची असली तरी व्यक्तिगत विकास आणि भावनिक बदल मातृभाषेतूनच परिणामकारकरित्या घडून येतात, याचे भान ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे इंग्रजीचा विचार होत असताना मातृभाषेकडे दुर्लक्ष होणार नाही, याची दक्षता नक्कीच घ्यायला हवी.

▼▼▼



कृत्तिका बुरघाटे, चंद्रपूर
इंग्रजी, मराठी, इतिहास व राज्यशास्त्र अशा बहुविध विषयांमधून एम.ए., मराठी भाषेच्या एम. फिल., जिल्हापरिषदेच्या शाळेत इंग्रजीच्या शिक्षिका.
krutika.burghate@gmail.com

भाषा शिकण्याच्या पद्धती

मराठी किंवा इंग्रजी या 'भाषा' आहेत व त्यांचे स्थान इतर शालेय विषयांपेक्षा वेगळे आहे याचे भान शालेय शिक्षणात आपण ठेवलेले नाही. इतिहास, भूगोल, विज्ञान, गणित अशा अन्य सर्व विषयांत आपल्याला त्या त्या विषयांतील काही 'आशय' मुलांपर्यंत पोहचवायचा असतो. पण मराठी किंवा इंग्रजी या 'विषयां'मध्ये आशय नव्हे तर खुद्द 'भाषा'च आपल्याला शिकवायची असते. साहजिकच भाषेचे शिक्षण इतर विषयांप्रमाणे असून चालणार नाही. इतर विषयांप्रमाणेच मराठी व इंग्रजी भाषा आपण क्रमिक पुस्तकांच्या साहाय्याने शिकवीत असतो, ही भाषा - शिक्षणातील मोठी अडचणीची बाब आहे. ज्याप्रमाणे संगीत, चित्रकला, खेळ हे 'विषय' आपण क्रमिक पुस्तके व त्यांमधील आशयांवरील लेखी परीक्षांतून शिकवू शकणार नाही, त्याचप्रमाणे भाषेचे शिक्षणही देता येणे शक्य नाही. हे सारेच विषय 'करून शिकण्या'चे आहेत. आपण जेव्हा क्रमिक पुस्तकांकरवी आणि क्रमिक पुस्तकांपुरती भाषा शिकवू पाहतो तेव्हा साहजिकच मुले प्रश्नोत्तरांच्या पाठांतराकडे वळतात आणि भाषा ऐकणे व भाषा बोलणे या दोन्ही क्षमता, संधी व सराव यांच्या अभावी कमकुवत राहतात. इतकेच नव्हे तर, भाषांची लेखन - वाचन - मनन कौशल्येही पुरेशी वृद्धिंगत होत नाहीत. इंग्रजीच्या शिक्षणासंदर्भात हेही लक्षात घेतले पाहिजे की नवी भाषा जेव्हा बऱ्यापैकी ऐकून समजू लागते आणि बोलता येऊ लागते तेव्हा मग भाषा संपादनाच्या पुढच्या अधिक कुशलतेच्या क्षमतांकडे म्हणजे लिहिण्या-वाचण्याकडे वळणे सहज सुकर होते. मात्र ऐकण्या बोलण्याच्या क्षमता विकसित न होताच जेव्हा लिहिण्या-वाचण्याचा घाट घातला जातो, तेव्हा, वर्गातील भाषासंपादनाच्या संदर्भात अनेक अडचणी उद्भवतात. विशेषतः भाषेबाबतची नावड अथवा भीतीही निर्माण होते. आपण गरजेनुसार नि कालोचित असे बदल अभ्यासक्रमात आणि त्या अनुषंगाने क्रमिक पुस्तकात वेळोवेळी करीत जातो. उपलब्ध भाषाविषयक वाङ्मयाचा वापर करून मुलांना वाढत्या प्रमाणात भाषा शिकवू पाहतो. या प्रचलित पद्धतीने मुलांचे भाषाशिक्षण करणे म्हणजे 'बाह्यदृष्टी'ने भाषा शिक्षण करणे होय. ही रूढ असलेली बाह्यदृष्टी सोडून आपल्याला 'अंतर्दृष्टी'कडे वळावे लागेल. मुळापर्यंत जाऊन शोध घ्यावा लागेल. निसर्गतः मूल भाषाग्रहण कसे करते हे समजावून घ्यावे लागेल. अर्थात भाषाशिक्षणाचा विचार 'शिकवण्या'च्या अंगाने न करता तो 'शिकण्या'च्या अंगाने करणे ही आपल्या विचाराची दिशा असायला हवी.

'निळे आकाश हिरवी झाडे काळी माती' मधून साभार.
लेखक - रमेश पानसे, प्रकाशक - ग्राममंगल, पुणे

आमची इंग्रजी शाळा

रंजना बाजी



'साधना व्हिलेज' ही आमची संस्था मुळशी तालुक्यातल्या कोळवण खोऱ्यात काम करते. गेली १८ वर्षे प्रौढ मतिमंदांसाठीचं निवासी केंद्र संस्था चालवते आहे, आजूबाजूच्या १५-२० गावांमध्ये महिला सक्षमीकरणाचं कामही चालू आहे. गेल्या ६ वर्षांपासून आम्ही मुलांसोबत काम करतो आहोत. मुलांसोबतच्या या कामाची सुरुवात अनौपचारिक गंमतघरापासून झाली. (पालकनीतीच्या खेळघरापासून स्फूर्ती घेऊन!) त्यातून मुलांच्या खूप जवळ जाता आलं. त्यांचे प्रश्न समजून घ्यायला मदत झाली.

पुढचं पाऊल हे गावातील जिल्हापरिषदेच्या प्राथमिक शाळांसाठी पूरक वर्ग सुरू करण्याचं होतं. हळूहळू लक्षात येत गेलं की या उपक्रमाला मर्यादा आहेत. मुलं आठवड्यातून फक्त दोनच दिवस आपल्याकडे येतात. त्यामुळे त्यांच्या जडणघडणीवर शाळेत, परिसरात घडणाऱ्या गोष्टींचा अधिक प्रभाव असतो. यातूनच, आपली शाळा असावी, जिथं मुलांबरोबर अधिक खोलवर काम करता येईल असा विचार पुढे आला.

कोळवण खोरं पुण्यापासून फक्त चाळीस किलोमीटर अंतरावर आहे. त्यामुळे घरोघरची तरुण मुलं, माणसं रोजगारासाठी शहरात जातात. खोऱ्यातल्या निसर्गसंपन्न वातावरणानं पर्यटन क्षेत्राचं लक्ष खेचून घेतलं आहे. वेगानं होणाऱ्या पर्यटनामुळे इथलं शेतीप्रधान ग्रामीण जीवन ढवळून निघालं आहे.

मुलांच्या शिक्षणासंदर्भात लोक जागृत झाले आहेत. पण त्यांच्यावर 'शहरी' संकल्पनांचा जबरदस्त प्रभाव आहे. 'इंग्रजी हे मुलांच्या प्रगतीचं साधन आहे', हा समज इथल्या पालकांच्याही मनात रुजला आहे. सातवी ते दहावीपर्यंत शिक्षण झालेले पालक 'इंग्रजी न आल्यामुळे आपण मागं पडलो आहोत' असं समजतात. मुलांनी लवकरात लवकर फाडफाड इंग्रजी बोलायला लागावं, लिहा - वाचायला लागावं, बूट - टाय - भारी युनिफॉर्म असावा अशा त्यांच्या अपेक्षा असतात. पौड आणि जवळपासच्या भागामध्ये तशा इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर इंग्रजी माध्यमाचीच परंतु मुलांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य देणारी शाळा सुरू करावी या निर्णयापाशी आम्ही पोचलो.

खेड्यातल्या दैनंदिन जीवनाशी मुलांच्या अनुभवविश्वाची नाळ जोडलेली ठेवणं, त्यांच्या रोजच्या जगण्याशी शिक्षण जोडणं हा आमच्या शाळेचा प्रयत्न आहे.

मात्र शाळेचं माध्यम इंग्रजी असल्यामुळे काही प्रश्नांचा सतत सामना करावा लागतो आहे.

- घरच्या वातावरणात इंग्रजी अजिबात नसल्यामुळे मुलांना रोजच्या वापरातले इंग्रजी शब्द येत नाहीत. मूल मातृभाषा ज्या सहजतेनं आजूबाजूच्या वातावरणातून वेचत जातं आणि समृद्ध होतं तसं इंग्रजीचं होत नाही.



चित्र : अर्णव, सानिया

– आमच्या शाळेत पूर्वप्राथमिक वर्गात लिहिणं शिकवलं जात नाही, याबद्दलही पालकांचा आक्षेप असतो. गाणी – गोष्टी – खेळ या गोष्टी त्यांना बिनमहत्त्वाच्या वाटतात.

आमच्या शाळेत पूर्वप्राथमिक वर्गात सुरुवात मराठीनं होते. मुलांशी भरपूर गप्पा मारल्या जातात. त्यांचं घर, आईवडील, मित्रमैत्रिणी, भावंडं, शेत सगळ्यांबद्दलच मुलांशी बोललं जातं. त्यावेळी मुद्दामच इंग्रजी प्रतिशब्द आम्ही वापरतो. छोटी छोटी इंग्रजी वाक्यं वापरतो. यातून मुलं ते शब्द आत्मसात करतात. पहिलीपासून इंग्रजी लिपीची ओळख करून दिली जाते.

– या सर्व प्रक्रियेत 'शिक्षकांची तयारी' हे खूप मोठं आव्हान आहे. शिक्षकांना पाठ्यपुस्तकातले शब्द माहीत असतात. पण ग्रामीण भागातील रोजच्या जीवनाशी संबंधित इंग्रजी शब्द त्यांना शोधावे लागतात. परिसरातल्या प्राण्या-पक्ष्यांची नावं माहीत करून घ्यावी लागतात.

खरं तर उत्तम इंग्रजी येणारे शिक्षक हा एक वेगळाच महत्त्वाचा प्रश्न आहे.

– शाळेत मुलांकडून फी घेतली जात नाही. तसेच विना अनुदानित शाळा असल्यामुळे शाळेसाठी पैसा उभा करणं हे एक आव्हानच आहे. शिक्षकांना चांगला पगार देणं अवघड होऊन बसतं. त्यामुळे आहेत त्या शिक्षकांना जास्तीत जास्त प्रशिक्षित करणं, हे एकच उत्तर आहे.

शाळेची कार्यपद्धती आवडल्यामुळे काही उच्चशिक्षित तरुण मंडळी आमच्याकडे शिक्षक म्हणून आली आहेत. तसंच यावर्षी डेन्मार्क आणि अमेरिकेतून काही स्वयंसेवक शाळेसोबत काम करण्यासाठी येणार आहेत. त्यांच्यामुळं मुलांना इंग्रजीची थेट भेट घडत राहील, असा विश्वास वाढतो.

शाळेची भूमिका आणि पालकांच्या अपेक्षा यातील फरकामुळे कधीकधी पालक मुलांना शाळेतून काढूनही नेतात. परंतु शाळा आपले प्रयत्न सोडत नाही.

गेल्या वर्षी दुसरीत असलेला सार्थक अचानक येईनासा झाला. त्याच्या वडिलांना फोन केला तर ते म्हणाले, 'सार्थकला दुसऱ्या मोठ्या शाळेत जायचे आहे.'

आम्ही सार्थकच्या वर्गशिक्षकाबरोबर त्याच्या घरी गेलो. त्यांच्याशी बोलल्यावर समजलं की सार्थक त्याच्या नातेवाईकांकडे गेला होता. तेव्हा त्यानं तिथल्या मुलाला टाय, बूट, इस्त्रीचे कपडे घालून शाळेत जाताना पाहिलं, त्याचं त्याला आकर्षण वाटलं.

आम्ही त्याच्या आईवडिलांशी आणि सार्थकबरोबरसुद्धा बोललो. आपण शाळेत या सगळ्याचा आग्रह का धरत नाही हे समजावून सांगितलं. त्यांनाही ते पटलं आणि या वर्षीपासून सार्थकचा धाकटा भाऊपण आमच्या शाळेत येतो आहे.

इंग्रजी हे माध्यम आहे, 'ज्ञान' नव्हे. मुलं आपली ज्ञानेंद्रियं वापरून जो जगाचा अनुभव घेतात तो शब्दातीत असतो. इंग्रजी येण्यानं मुलं परीक्षा पास होतील पण त्यांचं व्यक्तिमत्त्व परिपूर्ण बनेल का? असे सगळे मुद्दे आम्हाला हळूहळू पालकांपर्यंत न्यायचे आहेत. पालकांच्या बैठकीत याबद्दल चर्चा होतातच. तरीही खूप अवघड आणि लांबचा पल्ला आहे याचं भान सतत ठेवायला लागणार आहे.



▼▼▼

रंजना बाजी, पुणे
साधना व्हिलेज या संस्थेच्या विश्वस्त. कोळवण खोऱ्यातल्या मुलांबरोबरच्या शिक्षणासंदर्भातल्या कामात पुढाकार. बालकेंद्री, जीवनाभिमुख, अनौपचारिक शिक्षण संकल्पनांमध्ये रस.
dranjana12@gmail.com

With Best Compliments From

ASHWAMEDHA HALL

ASHWAMEDHA CATERERS

We accept all catering orders

Jayant Natu / Swati Natu
9822044476 / 9423568801

17/8 'A', Karve Road, Pune 411 004. Phone : 020-25443003 Email : jdnatu@yahoo.com



ENPRO INDUSTRIES PVT. LTD.

ISO ASME CERTIFIED

Leader in Mechanical Fluid System

DESIGNERS & MANUFACTURERS OF

Lube Oil Consoles
Seal Gas Panels
Water Wash Systems
Fuel Handling skids
Gas Conditioning skids
Chemical Injection Packages
Heat Exchangers & Pressure vessels

PRESTIGIOUS CUSTOMERS

GE Energy, Oil & Gas Siemens Energy
Alstom Power , HITACHI Industries
EBARA Corporation, Dresser Rand
Shin Nippon, Flowserve * Technip ,KSB, * SULZER, * ITT,
DMW * BHEL, * Larsen & Turbo ,EIL, * IOCL, * BPCL, * HPCL, * HM**EL**

WORKS :
MARKAL ALANDI ROAD, MARKAL,
TALUKA KHED, DIST. PUNE 412 105
TEL. : +91 02135-611000
***FAX : +91-20-27470909**
EMAIL : enpro@vsnl.com
Visit us at www.enproindustries.com

ADDRESS :
CORPORATE OFFICE :
A-17, H BLOCK, MIDC, PIMPRI,
PUNE 411018 (INDIA)
TEL. : +91 020-66313100, 27472157
***FAX : +91-20-27470909**
EMAIL : enpro@vsnl.com

प्रेमाच्या पाच भाषा

डॉ. अनघा दूधभाते



जगण्यासाठी माणसाच्या तीन मूलभूत गरजा पूर्ण होणं आवश्यक असतं, अन्न, वस्त्र आणि निवारा. आपल्या अस्तित्वाची जाणीव झालेल्या माणसाला जगण्यासाठी आणखी एका गोष्टीची अनिवार्य गरज असते, ती म्हणजे प्रेमाची.

भाषाकौशल्यामुळे माणूस सर्वांत प्रगत गणला जातो. भाषेमुळे माणसामाणसात संवाद घडतो. जगभरात वेगवेगळ्या भाषांमध्ये तऱ्हातऱ्हांचा संवाद घडत असतो. जन्मापासून आपण जी बोलू लागतो, ती आपली मातृभाषा किंवा प्रथमभाषा असते. त्यासोबत किंवा नंतरही आपण अनेक भाषा शिकतो. त्या भाषाही आपल्याला पुढे चांगल्या येऊ लागतात. अगदी जवळिकीचा संवादही त्यात घडतो, पण तरीही आपल्या इच्छा, अपेक्षा, जीवनदृष्टी, वेदना अशा विषयांवर आपण स्वत:शी बोलतो ते प्रथमभाषेतच.

'प्रेम म्हणजे काय' ह्याचं उत्तर माहीत नसलेला माणूस या जगात एकवेळ सापडू शकेल, पण प्रेम न केलेला माणूस सापडणार नाही ! प्रेमाच्याही तऱ्हा अनेक, त्या मी वाचकांना नव्यानं सांगाव्या, अशी काहीच गरज नाही. प्रेमातही भाषिक संवादाप्रमाणे आपण काहीतरी सांगत असतो, काही म्हणू पाहत असतो. ते स्पष्ट शब्दात असेलच असं नाही. कधी कृतीतून, कधी दृष्टीतून आपल्या माणसाला आपलं प्रेम आपण सांगत असतो, ऐकतही असतो. हे प्रेम व्यक्त करण्याच्या आपल्या प्रयत्नातही आपल्याला सर्वांना जाणवलं असेल की त्यातही आपली प्रत्येकाची एक न्यारी तऱ्हा असते. कुणी शब्दानं स्पष्टच सांगून टाकतं, तर कुणी हळुवार स्पर्शानं; कुणी कृतीतून, तर कुणी आपला विचार आपल्यासोबत नसतानाही करत असतात, हे आपल्यापर्यंत पोचल्यानं आपल्याला त्यांच्या प्रेमाची जाणीव होते. लहानपणापासून आपल्या जडणघडणीमध्ये आपल्याला प्रेम जसं उमगत जातं तशी ती आपली प्रथमभाषा होते. आपली प्रेमाबद्दलची अपेक्षा, प्रेमसंवाद हा आपल्याआपल्या भाषेतून सर्वात सुकर होतो. तिथे कळवून घ्यायला आपल्याला प्रयत्न करावे लागत नाहीत, आपल्याला काय म्हणायचं आहे, तेही आपल्या भाषेतूनच नैसर्गिकपणे व्यक्त होतं.

'गॅरी चॅपमन' या लेखकानं या प्रेमाच्या तऱ्हांना 'प्रेमाच्या पाच भाषा' असं नाव दिलेलं आहे. त्या पाच भाषा म्हणजे –

१. कौतुकाचे शब्द २. अमूल्य सहवास ३. सेवाभावी कृती ४. भेटींचा स्वीकार ५. शरीर-स्पर्श

प्रत्येक भाषा जशी वेगवेगळ्या धाटणीनं बोलली जाते, तशा एकाच प्रेमभाषेच्याही वेगवेगळ्या पद्धती आहेत. उदाहरणार्थ, केलेल्या कामाची शाबासकी देण्यासाठी बोललेले शब्द आणि कुठलंही काम करण्यासाठी बोललेले प्रोत्साहनाचे शब्द यात फरक असतो. तरीही कौतुकाच्या शब्दांची ही बोली असते. म्हणजे प्रेमाची भाषा क्रमांक एक !

कौतुकाच्या शब्दांमुळे व्यक्तीची, 'आपण प्रेम करण्यालायक आहोत, हवेसे आहोत', ही भावना फुलवली जाते. प्रत्येक नातेसंबंधांत संवाद आवश्यक असतोच. जर संवाद करणाऱ्या व्यक्तींच्या मूलभूत भाषा भिन्नच असतील तर भाषिक-संवाद नीट घडणं जसं मुश्कील होतं, तसंच 'कौतुकाचे शब्द' ही प्रेमभाषा असणारी व्यक्ती 'भेटींचा स्वीकार' ही प्रेमभाषा असणाऱ्या व्यक्तीबरोबर नीट संवाद साधू शकत नाही. त्यांच्यामधला प्रेमाचा संवाद काहीसा अपुराच राहून जातो.

लहानपणी ज्या मुलामुलींचे आईवडील लाडानं, प्रेमानं कौतुकाचा वर्षाव करत असतील किंवा लहानमोठ्या कामासाठी 'तू हुशार आहेस, हे करणं तुला सहज जमेल' अशा वाक्यांनी प्रोत्साहन देत असतील, त्या व्यक्तींची 'कौतुकाचे शब्द' ही प्रेमाची प्रथमभाषा झालेली असते. कौतुकाच्या शब्दातून आईवडिलांचं प्रेम व्यक्त झालेलं त्यांना जाणवलेलं असतं आणि मोठेपणी ही

भाषा
மொழி
भाषा Language

प्रेमभाषा त्यांच्या नातेसंबंधातली एक मूलभूत गरज बनते. ह्या भाषेत त्यांच्याशी बोललं तर त्यांची प्रेमाची भावनिक गरज सहजपणे पूर्ण होते आणि त्यांच्या मनात प्रेमाचा साठा भरलेला राहतो, त्यांचे नातेसंबंध बहरत राहतात. म्हणून गॅरी चॅपमन म्हणतात की नातेसंबंधात बिघाड झालेला दिसल्यास समजावं की या दोघांच्या भाषा बहुधा वेगवेगळ्या आहेत.

'कौतुकाचे शब्द' फक्त प्रोत्साहनानं नव्हे तर केलेल्या कामाची पावती किंवा शाबासकीनंसुद्धा दर्शविले जातात. एखाद्याची बोलीभाषा जर शाबासकीचे उद्‌गार असतील तर केवळ प्रोत्साहनानं काम भागणार नाही. 'माझ्यामध्ये प्रेम करण्यालायक काही गुण आहेत आणि ते माझ्या प्रियजनांना ज्ञात आहेत, यामुळे मी कुणाला तरी हवासा वाटतो आहे' अशी भावना शाबासकीनं येते. ही भाषा त्या व्यक्तीशी कुणी बोललं नाही तर वंचितता येते आणि प्रेमाचा साठा आटून पार कोरडा पडतो. त्याच्याकडे शिल्लकच नसलेलं प्रेम, ते माणूस मग दुसऱ्या व्यक्तीला देऊ शकतच नाही आणि त्यांच्या नातेसंबंधांमध्ये तणाव निर्माण होतो. अशा वेळी त्यांनी केलेल्या छोट्याशा कामाची जाणीवपूर्वक नोंद करून कुणी दाद दिली तर त्याचा उपयोग होतो. गाडीत आपणहून भरून दिलेलं पेट्रोल, आठवणीनं आणलेली भाजी किंवा झाडाला घातलेलं पाणी यासारख्या, म्हटलं तर साध्यासुध्या गोष्टींची पावती मिळाल्यानं प्रेमाच्या स्रोताला भरती येऊ शकते.

'मस्त जमलंय प्रोजेक्ट, किती हुशार आहेस तू !', 'छान केलंस हे – गाडी धुतलीस,' 'आजीची औषधं तू आपणहून आणलीस, किती बरं वाटलं' असं वारंवार म्हटलं जाऊनही जर कोरडेपणाच जाणवतच राहिला आणि 'नुसतं बोलून काय उपयोग? पाहिलास तरी का, काय प्रोजेक्ट आहे?' 'गाडी धुतली म्हणून नुसतं कौतुक काय कामाचं ! तिला कशी पॉलिश केलीय ते पाह्यलंय तरी का?' अशी भुणभुण जर ऐकायला मिळाली तर समजावं की इथे प्रेमभाषा क्रमांक दोन हवी आहे, 'अमूल्य सहवास' ! तुमच्या निव्वळ कौतुकानं किंवा शाबासकीच्या भाषेनं त्यांची प्रेमाची गरज पूर्णच होत नाही. लहानपणी मुलांबरोबर बसून मेकॅनोची साधीशी गाडी तयार करताना तुमचा मुलांबरोबर जो सहवास घडतो किंवा रात्री दिवे मालवून रोज अगदी तीच ती गोष्टही त्यांना सांगताना ज्या निकट स्पर्शातून मुलांना पालकांचं प्रेम जाणवतं, तिथे त्यांची प्रथम प्रेमभाषा घडत असते. ती म्हणजे, अमूल्य सहवास. त्यांची प्रेमाची भावनिक गरज ह्या अमूल्य सहवासात पूर्ण होते. फक्त त्या व्यक्तीसाठी म्हणून तुम्ही दिलेला तुमचा वेळ तिला तुमच्या प्रेमाची ग्वाही देतो. या अमूल्य सहवासाच्यासुद्धा निरनिराळ्या तऱ्हा आहेत. 'कौतुकाचे शब्द' ही भाषा मुख्यत्वे शब्दांनी बोलण्याची आहे, तर 'अमूल्य सहवास' ही प्रेमभाषा लक्षपूर्वक ऐकण्याची महती स्पष्ट करते. संभाषणाची ही कला लहानपणीच अवगत होते. स्वयंपाक करताना आईनं शाळेतल्या घडामोडी ऐकणं किंवा अभ्यास घेणं म्हणजे अमूल्य सहवास नव्हे. दोघांनी शांतपणे सोफ्यावर बसून एकमेकांना दिवसभराच्या गप्पागोष्टी सांगण्यातून ही जवळीक उत्पन्न होते.



एकाग्रतेनं किंवा एकचित्तानं दुसऱ्याचं बोलणं ऐकणं ही एक प्रेमभाषा आहे. एकीकडे टी.व्ही. चालू, हातात वर्तमानपत्र आणि 'चला, आपण बोलू' ह्याला एकाग्र लक्ष कसं म्हणता येईल? फक्त दोघांमध्ये दुसऱ्या कशाचाही व्यत्यय न येता घडणारा संवाद हाच खरा अमूल्य सहवास. मुलाला बास्केटबॉल आवडतो. म्हणून तुम्ही त्यांच्याबरोबर अधूनमधून बास्केटबॉल खेळत असाल, किंवा मॅच बघायला जात असाल, तर त्या सहवासातून तुमचं त्याच्यावरचं प्रेम बोलत असतं. पोहायला शिकणाऱ्या मुलाबरोबर वडील पाण्यात उतरले की मूल निर्धास्त असतं. वडील आपल्याबरोबर आहेत ह्या जाणिवेत त्याला त्यांचं प्रेम अनुभवायला मिळतं. वय वाढलं तरी या मुलांना या अमूल्य सहवासातूनच प्रेम मिळतं. फक्त बरोबरीनं करण्याच्या क्रिया बदलतात. जोडीनं जाऊन बुटांची खरेदी म्हणा किंवा मुलाच्या आवडीचा सिनेमा फक्त त्याच्याबरोबर पाहणं यातूनच ही प्रेमभाषा बोलली जाते आणि प्रेमाचा घडा भरत राहतो.

आपण एकमेकांना खूश करायला खूप

काही केलं तरी काहीजणांची भाषा थोडी वेगळीच असते. लहानपणी 'आई माझ्या कपड्यांना स्वतः इस्त्री करते', 'माझ्यासाठी गरम पोळ्या करते', 'माझ्या पुस्तकांना बाबा कव्हर्स घालतात', अशा विविध कामाच्या याद्या मुलं अभिमानानं सांगतात. तेव्हा त्यांच्या पालकांचं प्रेम या छोट्या-मोठ्या सेवाभावी कृतीतून त्यांना जाणवतंय असं लक्षात येतं. यांची प्रेमभाषा असते 'सेवाभावी कृती.' ही मुलं नेहमी आपल्या धाकट्या भावंडांना मदत करतात. शेजारपाजाऱ्यांच्या मदतीलाही तत्पर असतात. बाबा दमून आल्यावर त्यांच्यासाठी काही खास करणारी आई आणि आईची दमणूक कमी करण्यासाठी तिला भाजी चिरून देणारा बाबा यातून या मुलांना या प्रेमभाषेची शिकवण मिळते. बरेच वेळा आई-वडिलांच्या एकमेकांशी वागण्यातूनही प्रेमाच्या भाषेचे धडे मुलं गिरवत असतात. मातृभाषेप्रमाणे त्यांची ही प्रेमाची प्रथमभाषा होते. आई वडिलांची प्रेमभाषा वेगवेगळी असेल आणि त्या दोघांनी एकमेकांसाठी प्रेमभाषा त्या चांगल्या तऱ्हेनं आत्मसात केलेल्या असतील तर मुलंही बहुभाषक होतात. सेवाभावी कृती ही प्रेमभाषा असलेली मुलं आपल्या नातेसंबंधांना आपल्या प्रियजनांसाठी मनापासून छोट्या छोट्या गोष्टींतून मदत करताना दिसतात. कधी बिलं भरतील, कधी दवाखान्यात जाण्यासाठी सोबत करतील तर कधी जेवण नेऊन देतील. छोट्या छोट्या सेवाभावी कृतींमधून त्यांची ही प्रेमभाषा दृग्गोचर होते.

ही प्रेमभाषा अवगत नसणारे मात्र, कुणी त्यांच्याशी असं वागलं तरी त्याची पत्रास ठेवत नाहीत. 'हे त्यांचं काम आहे म्हणूनच करतात' असं समजून वेगळ्याच अपेक्षा ठेवतात.

काम करणाऱ्याला काही वेळा त्याबद्दलच्या साध्यासुध्या जाणिवेची अपेक्षा असते. एखादं गुलाबाचं फूल, छानसं भेटकार्ड किंवा फारतर एखादी भेटवस्तू, असा प्रेमपरतावा तर केला जात नाहीच, उलट कधीकधी त्यातल्या चुकाच काढून दाखवल्या जातात. 'आमच्या वाढदिवशी फक्त केक केला आणि एक साधं पेनपण दिलं नाही.' 'नव्या वर्षी शाळेत जाताना एक साधी नवी कंपास बॉक्सपण दिली नाही. आम्ही यांचे लाडकेच नाही' असं म्हणून नाराज होणारी मुलं बोलत असतात, चौथी प्रेमभाषा.

ही मुलं स्वतः खपून तुमच्या वाढदिवशी एखादं भेटकार्ड बनवतील, किंवा टाकाऊतून काही बनवून छान सजवून तुम्हाला आणून देतील, ह्यांची प्रेमभाषा आहे 'भेटींचा स्वीकार.' या भेटी काय सांगतात, तर देणाऱ्याच्या मनात प्रेमाच्या व्यक्तीचा विचार सतत जागता आहे. थोड्याफार प्रमाणात आईवडील आपल्या मुलाबाळांसाठी बऱ्याच गोष्टी आणतच असतात, या त्यांनी आणलेल्या भेटींमुळे या भाषेचा पाया सामान्यपणे रचला जातोच. प्रेमाच्या माणसानं दिलेली छोटीशी भेटही मुलं त्यांच्यावरच्या रंगीत कागदांसकट जपतात. कुठचीही, तशी म्हटली तर क्षुल्लक भेट हे प्रेमाचं दृश्य स्वरूप म्हणून स्वीकारून जपली जाते. या भेटी कारणाव्यतिरिक्तसुद्धा मिळायला हव्यात, नाही तर त्यांच्या प्रेमाच्या साठ्याला ओहोटी लागेल. 'आज खूप छान दिवस होता म्हणून तुला हे चॉकलेट' किंवा 'तू आज वेळेत उठलास म्हणून तुला हे घड्याळ' अशा भेटींमधून त्यांचा विचार भेट देणाऱ्याच्या मनात अग्रक्रमानं आहे, याचं त्यांना प्रत्यंतर येतं. अर्थात प्रत्येक गोष्टीत तारतम्य वापरावं लागतंच. अनेकदा किमती भेटी मिळत असलेल्या मुलांना अशा भेटींची काही किंमतच राहत नाही. काही वेळानंतर ती गोष्ट अडगळीत पडते.



काही घरात सहज येताजाता एकमेकांना मिठी मारण्याची, बोलताबोलता दुसऱ्याच्या हाताशी, कपडचाशी सहज, खेळत बोलण्याची, अंगावर हात-पाय टाकून शेजारी झोपण्याची, रोज आठवणीनं आपल्या मुलाबाळांना जवळ घेण्याची सवय असते, कारण यांची प्रेमभाषा असते - 'शरीर-स्पर्श' ही आहे प्रेमभाषा क्रमांक पाच.

माणसाच्या संवेदनशील मनाला स्पर्श नेहमीच जवळचा वाटतो आणि 'शरीर-स्पर्श' ही प्रथम प्रेमभाषा असणाऱ्यांचा तर तो अक्षरशः प्राणवायू असतो. आईच्या कुशीमध्ये तिचा प्रेमळ स्पर्श मिळालेला असतो, तसाच तो बाबाच्या मांडीवर बसून दंगामस्ती करताना पण जाणवलेला असतो. यातूनच त्यांना प्रेम जाणवलेलं असतं. प्रत्येक प्रेमाच्या उद्रेकाला ही मंडळी शारीर भाषेतून वाट देतात. आनंद किंवा दुःखाच्या प्रसंगी गळामिठी घालतील, तर उत्साहात असताना हळूच गालाला हात लावतील किंवा हलका धक्का देतील, माया करण्यासाठी केसातून हात फिरवतील, अशा तऱ्हातऱ्हांनी स्पर्श करून ते प्रेम व्यक्त करतात.

त्यांना इतर काही मिळालं नाही तरी चालतं. त्यांना कुठल्या संवादाची गरज वाटत नाही. हात हातात घेऊन, हळूच गालगुच्चा घेऊन किंवा शेजारी झोपले असता अंगावर पाय टाकूनच त्यांच्या प्रेमाचा संवाद घडतो आणि त्यानंच त्यांचा प्रेमाचा घडा भरत राहतो.

काही घरात मात्र प्रेमाची काही कमतरता नसूनही जवळ घेण्याला 'काय सारखं अंगचटीला यायचं' असं जरा तुच्छतेनं म्हटलं गेल्याचं तुम्हाला दिसलं असेल.

प्रेमाचा घडा रिकामा होऊ लागला, घरामध्ये तो भरण्यासाठी प्रेमभाषा बोलणं बंद झालं तर त्याच्या शोधात माणूस बाहेरही भरकटू लागतो. विशेषतः पौगंडावस्थेतील मुलांबाबत फार जागरूक असावं लागतं. त्यांची प्रेमभाषा त्यांच्याशी या वयात बोलली न गेल्यास आपला रिकामा घडा भरण्यासाठी ते बाहेर पडतात आणि वाममार्गाला लागू शकतात. शरीरस्पर्श ही प्रथम भाषा असणाऱ्या मुलांबाबत विशेष काळजी घ्यावी लागते, मुलगा मोठा झाला म्हणून 'आता अंगचटीला येऊ नकोस' असं म्हणून दूर लोटल्यास, किंवा या काळात आईवडलांच्यात बेबनाव झाल्यानं एकंदरीनं घरात प्रेमसंवादच बंद होऊ लागल्यास, मुलांचा प्रेमाचा घडा रिता होऊ लागतो आणि तो कुठून तरी भरून आणलाच पाहिजे अशी भावना त्यांच्या मनात येते.

मुलांची प्रेमभाषा कुठली आहे हे त्यांच्या वागण्याबोलण्यातून आपल्याला आजमावता येऊ शकतं.

'माझ्याबरोबर बसून तू पुस्तक वाच', किंवा 'माझ्याबरोबर कोडं सोडव', 'गाडी तयार करायला तू मदत कर' असा आग्रह धरणारी मुलं 'अमूल्य सहवास' ही प्रेमभाषा बोलतात.

'तू चॉकोलेट केक केलास तरच खरा वाढदिवस', 'माझ्या कपड्यांना तू इस्त्री करतेस ते मला फार आवडतं,' 'माझ्या पुस्तकाला कव्हर घातलंस, मला फार आनंद



झाला ग' असं म्हणणारी 'सेवाभावी कृती' ही प्रेमभाषा बोलणारी मुलं असतात.

'तू दिलेलं पेन वापरूनच मी माझी परीक्षा देतो.' 'केरळहून तू आणलेली कीचेन मी माझ्या स्कूटरला वापरणार.' 'तू दिलेला शर्ट मी अजून वापरतो.' ही आहे 'भेटींचा स्वीकार' प्रेमभाषा.

'आई तू या साडीत खूप छान दिसतेस' 'किती छान केक करतेस तू.' 'केक करावा तर तूच.' असे शब्द सातत्यानं वापर करणारी मुलं 'कौतुकाचे शब्द' ही प्रेमभाषा बोलत असतात.

'रॉस कॅम्पबेल' या समाजशास्त्रज्ञानं पौगंडावस्थेत वाममार्गाला लागलेल्या काही मुलांचा अभ्यास करून आपली निरीक्षणं नोंदवली. त्यांनी गोळा केलेल्या माहितीनुसार या गटातील मुलांना घरी पालकांकडून प्रेम मिळालं नव्हतं आणि त्यांच्या प्रेमाचा घडा रिता झाला होता. त्या प्रेमाच्या शोधात ती बाहेर भरकटली होती आणि वाईट मार्गाला लागली होती. या पालकांचं आपल्या मुलांवर प्रेम होतंच, पण लहानपणी शिकवलेली प्रेमभाषा सोडून वेगळीच प्रेमभाषा पालक बोलत होते आणि ती या मुलांची प्रथमभाषा नसल्यामुळे त्यांचा प्रेमाचा साठा लवकर संपला आणि ती भरकटली.

त्यामुळेच मुलामुलींची प्रथम प्रेमभाषा जाणून घेऊन त्यांची प्रेमाची ही भावनिक गरज पूर्ण केल्यास, त्यांना प्रेमात बहुभाषक बनवल्यास ही मुलं पुढं त्यांच्या आसपासच्या जगावर प्रेम करतील आणि अनेक प्रेमभाषा कल्पकपणे वापरण्यामुळे माणसांच्या प्रगतीलाही एक नवीनच परिमाण लाभेल.


▼▼▼

डॉ. अनघा दूधभाते, त्वचारोगतज्ञ, पुणे
संगीत, योग आणि पर्यटन आदी विषयांमध्ये रस.

प्रेमाच्या पाच भाषा
The 5 love languages
Gary Chapman,
मराठी अनुवाद – डॉ. अनघा दूधभाते
प्रकाशक – मंजुल पब्लिशर्स

बदलत गेलेलं बोलणं

सुधीर गाडगीळ



'व्यक्त' होणं ही माणसाची स्वाभाविक गरज आहे. भोवतालची परिस्थिती, घडणाऱ्या घटना, भेटणारी माणसं, अनुभवत असलेले सुखदुःखाचे क्षण यावर मनात प्रतिक्रिया उमटतच असतात. त्या कुणाबरोबर तरी, कुणासमोर तरी मोकळेपणी मांडाव्या, समोरच्याची प्रतिक्रिया समजून घ्यावी, त्यावर आपलं मत नोंदवावं, कुणाला काही तरी सुचवावं, असा परस्पर 'संवाद' परस्परात अखंड चालूच असतो. न बोलता घुमेपणी एकलकोंडे बसून राहणाऱ्यांच्या 'मानसिकते'ची शंका घेतली जाते, इतकं 'बोलणं' हा आपल्या दैनंदिनीचा अपरिहार्य भाग आहे.

हा सारा 'संवाद', हे सारं 'बोलणं' शब्दांच्या माध्यमातून होतं. हा 'भाषेचा' व्यापार-व्यवहार अव्याहतपणे चालूच आहे. त्या त्या व्यक्तीच्या स्वभावप्रकृतिनुसार, अभ्यासानुसार भाषेची मांडणी होते. कुणी शब्दातून मिस्कील फटकारे मारतात तर कुणी शब्दातून नम्रपणे 'आदर' व्यक्त करतात. कुणाच्या बोलण्यात अती स्पष्टता असते तर कुणाला शाब्दिक चिकित्सेत रस असतो. शब्दातल्या 'भावा'नुसार बोलणाऱ्याच्या आवाजाचा 'नाद' बदलतो. या नादावरून आपण समोरच्या बोलणाऱ्याला, चिडका, संयमी, चिकित्सक, नम्र अशी विशेषणे जोडत असतो.

शब्दांच्या माध्यमातून, भाषेच्या मांडणीतून अनेकजणांचे स्वतंत्र व्यवसाय होतात. भाषा कधी-कशी आणि काय स्वरूपात मांडावी, याची हुशारी असेल, तर ती माणसं फक्त भाषेच्या पाठबळावर, मूळ 'अभ्यास' केलेल्या क्षेत्रात यशस्वी होतात. कुणी मानसोपचार तज्ञ बनतो. कुणी वकील होतो. कुणी विक्रयकलेत यशस्वी होतो. तर कुणी प्राध्यापक होतो. सध्याच्या जगाची बाजारपेठ लक्षात घेता, तर एका गोष्टीला फारच महत्त्व आलंय. ते म्हणजे, तुम्हाला काय येतंय, कशात 'गती' आहे, हे आसमंतातल्यांना नेमकेपणी, नेटक्या भाषेत सांगता येणं. तसं करता आलं तर आणि तरच तो माणूस त्याच्या क्षेत्रात यशस्वी होतो, इतकं भाषेचं, पर्यायानं संवादाचं, पर्यायानं बोलण्यातल्या शब्दांचं महत्त्व वाढत गेलेलं आहे.

मला या शब्दांचं अप्रूप फार लहानपणापासून होतं. त्याचं कारण शालेय कालापासून मी उत्तम शब्द, नेमकी भाषा ऐकत गेलो. बोलणाऱ्यानं उत्तम श्रोता असणं महत्त्वाचं ! ऐकण्यातून उत्तम शब्द कळतात, त्याची मांडणी कशी करावी, ते कळतं. समोरच्याचं बोलणं नीट लक्ष देऊन ऐकत गेलं तर बोलणाऱ्याच्या बोलण्यातली विसंगती चटकन लक्षात येते, आणि त्यावर आपल्या कुवतीनुसार टिप्पणी करता येते.

आजी-आजोबांबरोबर बालपण गेल्यानं, मला पुण्याच्या देवळांमधून कथाकार - प्रवचनकार - कीर्तनकार ऐकता आले. फक्त बोलण्यातून समोर बसलेल्या विविध वयोगटाच्या, विविध विचाराच्या श्रोत्यांना खिळवून ठेवण्याची, या अध्यात्मातल्या माणसांची शक्ती जाणवली. पौराणिक किंवा ऐतिहासिक दाखले देण्याच्या कीर्तनकार - प्रवचनकारांच्या सवयीमुळे इतिहास - पुराणकथा माहीत झाल्या.

याच्या जोडीला 'पुणं' हे महत्त्वाचं राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक केंद्र असल्यानं देशभरचे उत्तम वक्तेही बालपणापासून ऐकता आले. त्यामुळे कसं बोलावं आणि कसं बोलू नये, हे भान लहानपणापासून येत गेलं. खट्याळ पुणेरी शब्दांचे फटके मारत, जरा जास्तच स्पष्ट बोलणारे इतिहासाचार्य दत्तो वामन पोतदार, विचारांची स्वच्छता आणि वाचनाचा व्यासंग यातून वाणीचा शुद्ध ओघ अखंड जपणारे डॉ. रा. शं. वाळींबे ऐकले. वेळेची शिस्त बाळगत मोजकंच बोलणारे ना. सी. फडके यांनी भाषेचं सौंदर्य उलगडलं. वाटेला जाणाऱ्या माणसाला उत्स्फूर्त शब्दातून जागीच त्याची 'जागा' कशी दाखवता येते, ते प्रल्हाद केशव अत्रे साहेबांच्या मिस्कील शेरेबाजीतून कळलं. तर विरोधकांच्या विचारांचा आदर केला पाहिजे हे यशवंतराव चव्हाण साहेबांच्या भाषणवजा संवादातून उमगलं. कधी कधी आक्रमक शैली. अत्यावश्यक असते, ही गोष्ट जॉर्ज फर्नांडिसांच्या राजकीय फडातल्या संभाषणानं समजली. शब्दांचा काटेकोर वापर

ಭಾಷೆ
भाषा
மொழி
ભાષા
Language

करत, आपला मुद्दा ऐकणाऱ्यांच्या गळी उतरवण्याची हातोटी प्रमोद महाजनांना ऐकताना लक्षात आली. मैदानात पसरलेल्या श्रोत्यांच्या महासागराला, त्यांच्या बोलीभाषेत बोलल्यावरच कळतं आणि त्यांची मन जिंकता येतात, हे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरेंच्या वक्तव्यानं दाखवून दिलं.


या सगळ्यांच्या बोलण्यातून आणखी एक गोष्ट जाणवली ती म्हणजे मुळात विचारांची स्पष्टता हवी, भाषेला देहबोलीची जोड हवी, नादाला भावनेनुसार वैविध्य हवं, हे भाषेचे संस्कार नकळत लहानपणापासून घडत गेल्यानं मी बोलायला लागल्यावर, मांडणीत स्पष्टता असूनही कुणी दुखावलं गेलं नाही. नेमक्या शब्दांमुळे ऐकणाऱ्याचा गोंधळ उडाला नाही आणि अखंड वाचनातून जमा केलेल्या संदर्भांच्या आधारे केलेल्या उत्स्फूर्त टिप्पणींमुळे, ऐकणाऱ्यांच्या मनात आनंद आणि जिवंतपणा येत गेला, त्यांना मूळ विषय समजत गेला.

मी मुळात कॉमर्सचा विद्यार्थी असूनही, या ऐकलेल्या भाषावैविध्याच्या वातावरणामुळे शब्दांची गोडी निर्माण झाली आणि शब्दातूनच लिहिण्याची – बोलण्याची म्हणजे पत्रकारितेची – निवेदन – सूत्रसंचलनाची 'दैनंदिनी' मी स्वीकारली. गेल्या ४० वर्षातल्या या आगळ्या – वेगळ्या शब्दांच्या व्यवसायामुळे भरपूर ऐकत गेलो. गावोगावच्या भाषेच्या विविध शैली अनुसरत गेलो, शब्दसंपत्ती वाढवत गेलो, संदर्भ गोळा करत गेलो. संदर्भांचं भान राहण्यासाठी सतत सतत सजग – सतर्क राहत गेलो. भेटणारा 'माणूस' बोलता करत गेलो. दिसणारे पुस्तक 'वाचत' गेलो. भोवतीच्या सर्व तऱ्हेच्या वातावरणात, परिस्थितीत रस घेत गेलो. आणि अधिकाधिक संपन्न होण्याचा प्रयत्न करत गेलो. या साऱ्या प्रवासाचा मुख्य गाभा होता शब्द, बोलणं, भाषा.

हे सारं मी माझी वैयक्तिक कहाणी सांगण्यासाठी लिहित नाहीए. तर माझे छोटेसे अनुभव नोंदवताना, भाषेचं महत्त्व आपल्याला कळावं, बोलण्याची उपयुक्तता ध्यानी यावी, आणि बोलणाऱ्यानं नेमके शब्द, शब्दांचा नाद वापरून शब्दांना देहबोलीची जोड दिली असेल. आणि त्याच्याकडे सतत जागरूक राहून विषय समजून घेण्याची सतर्कता असेल, तर 'भाषा' हे माध्यम किती परिणामकारक होऊ शकतं हे आपल्याला कळावं, हा हेतू!

मला या प्रवासात 'भाषे'बाबत ठळकपणे जाणवलेला फरक म्हणजे अगदी आरंभी अति-सुविचारी, अलंकारिक बोलण्याचा सोस होता. आपल्याला कसे अनोखे शब्द माहीत आहेत. हे दाखवण्याची घाई होती. समोरच्या ऐकणाऱ्यांना ते शब्द जड वाटतील, समजणार नाहीत हे समजत नव्हतं. किती वेळ बोलत रहावं, याचा पाचपोच नव्हता. मुळात निवांतपणा होता आणि वक्त्यांची संख्या कमी होती. त्यानंतरच्या टप्प्यावर विविध नामवंताच्या पुस्तकातली उदाहरणं देत, दाखले देत, बोलण्याचा प्रघात आला. मात्र हे करताना 'दाखले – उदाहरण'चं वाढतायत आणि मूळ विषय बाजूलाच पडतोय, हे काही वक्त्यांच्या लक्षात येत नव्हतं. सर्वसामान्यांवर असलेला संत – महात्म्यांचा प्रभाव ध्यानी घेऊन बोलतांना, क्वचित ओवी – श्लोकाचा उल्लेख करत, विषय समजावून देण्याची शैली आली, मग त्यात कधी थोडं नाट्य निर्माण करण्यासाठी अनाठायी घटनांचं विनाकारण रसभरीत वर्णन डोकावू लागलं.

मुद्देसूद बोलणाऱ्यांचीही एक फौज या काळातही होतीच. पण त्यांचा प्रकार 'मुद्दे'च



पटवण्याच्या अट्टाहासाचा अधिक. त्यामुळे भाषेची लय, शैली विसरून, त्यांच्या बोलण्यात 'रूक्ष'पणा अधिकच येत असे. स्वतःबद्दलचा आत्मविश्वास कमी असल्यानं बऱ्याच जणांनी कागद हाती धरत बोलण्याचं 'वाचन'च केलं आणि त्यावेळी आशय कधी चांगला असला तरीही वक्ता नि श्रोत्यामधला सहज संवाद मात्र हरवला.

शब्दातून व्यक्त होणाऱ्या भाषेची माध्यमं बदलत गेली. व्यासपीठ, रंगमंच, चित्रपट, दूरदर्शन या माध्यमांच्या गरजांनुसार काही वक्त्यांनी स्वत:च्या भाषेत बदल केले तर काहींनी केलेच नाहीत. बदल नेमका कसा आणि कुठे करायला हवा, हे ज्यांना समजलं, अशी मोजकीच माणसं भाषेच्या साहाय्यानं केलेल्या संवादातून लोकप्रिय होत गेली.

या साऱ्याचं भान कायमस्वरूपी असलेला आणि सर्व माध्यमातून लीलया संचार केलेला एकमेव शब्दप्रभू (लिहिणारा नि बोलणारा) मला आणि आपल्या सर्वांना भेटला : पुरुषोत्तम लक्ष्मण उर्फ पु. ल. देशपांडे. शब्दनिवडीतली स्वाभाविकता, शब्दमांडणीतली अनौपचारिकता संदर्भांची सतर्कता, क्वचित प्रसंगीची उत्स्फूर्तता, या गुणांमुळे 'पुल' केवळ 'शब्दां'च्या साथीनं माणसं जिंकत गेले.

भाषेच्या अभिव्यक्तीचं एक प्रभावी माध्यम म्हणजे लिहिणं. यात तर आमूलाग्र बदल होत गेला. पांडित्यपूर्ण जवळजवळ संस्कृत वाटावी अशा भाषेत लिहिणाऱ्यांपासून दलित साहित्यांपर्यंत ! त्यामुळे त्या त्या स्तराची नवी बोलीभाषा कळली. भाषारचनेची नवी स्पंदनं समजली. अनुभवांची दाहकता स्पष्टपणे मांडण्याच्या मोकळेपणामुळे नाट्यमयताही वाढली. नव्यानं राज्य करू लागलेल्या दूरचित्रवाणीतल्या वाहिन्यांमध्ये बोलल्या जाणाऱ्या भाषेबाबत बोलायचं तर या माध्यमात, स्वच्छ – साधी मराठी भाषा हरवत चाललीय. उत्स्फूर्ततेला वाजवीपेक्षा जास्त महत्त्व देण्यापायी किंवा ऐनक्षणी बोलावं लागण्याच्या गरजेपायी, ऐकणाऱ्यांच्या – पाहणाऱ्यांच्या मनाचा गोंधळ उडावा इतपत शब्दांची चुकीची कसरत, वाक्यांच्या बेशिस्त कोलांट्याउड्या वाढत चालल्याचं जाणवतं. अमूक एक प्रमाणभाषेचा माझा दुराग्रह नाही. विशेषत: बोलण्यात तर त्या त्या भागाची, समाजाची बोलीभाषा येणं, अपरिहार्यच आहे. पण 'मराठी' बोलताना इंग्रजी – हिंदी शब्दांची केली जाणारी निरर्थक पखरण, भाषा ऐकताना, ऐकणाऱ्याच्या मनाचा गोंधळ उडवते, हे तरी बोलणाऱ्यांनी थोडं ध्यानी घ्यावं, असं वाटतं.

आरंभी उल्लेखिल्याप्रमाणे, पोशाख, देहबोली, नाद, याचं भान या दृश्यमाध्यमांमध्ये 'भाषा' वापरताना ठेवायलाच हवं. आपण समोर प्रत्यक्षात अथवा व्यासपीठासमोर अथवा दूरदर्शन संचासमोर असलेल्या माणसाशी 'गप्पा' मारत आहोत. त्याला समजून घेत त्याला समजावून देण्याचा प्रयत्न करत आहोत, हे लक्षात ठेवायला हवं. कुठलाही 'संवाद' ही मास्तर आणि विद्यार्थ्यांमधली तोंडी परीक्षा न वाटता ती बोलणारे आणि ऐकणारे यांच्यामधली अनौपचारिक मैफल झाली तरच 'प्रसन्न' वाटेल.

भाषा मांडताना, शब्दांमागचा 'भाव' डोकावला तर विचार – मुद्दे समोरच्यांना सहज समजतील. हा संवाद या हृदयीचा 'त्या' हृदयी व्हायला हवा. बोलल्या जाणाऱ्या विचारांची स्पष्टता, मुळात तुमच्यात हवी. त्यासाठी अभ्यास हवा. तो विचार पक्का होण्यासाठी म्हणजे आधी स्वतःला पटण्यासाठी स्वतःचा स्वतःशी संवाद हवा. एकदा विचार पक्का असेल तर मांडणीत गोंधळ होऊच शकत नाही. वाक्यांची निरर्थक शब्दफेक येऊच शकत नाही. मांडणीत आरंभी म्हटल्याप्रमाणे थोडी उत्स्फूर्तता डोकावली, तर भाषा कितीही बदलत गेली तरी ऐकणाऱ्याला ऐकावीशी वाटेल.

मिस्कील, उत्स्फूर्त शेरेबाजीचं एक छोटं उदाहरण, शेवटाकडे जाताना देतो. साहित्य परिषदेच्या एका सभेत दत्तो वामन पोतदार आणि ललित कथा – कादंबरीकार श्री. ज. जोशी एका व्यासपीठावर होते. 'दत्तो वामन' बोलण्याआधी, 'श्री. ज.' त्यांच्या वाटेला गेले. म्हणाले, ''दत्तो वामन उर्फ दादांनी आपल्या भाषणातून, ते बराच काळ रेगाळलेलं शिवचरित्र कधी पूर्ण करणार ते सांगून टाकावं.''

यावर उपरणं सावरत 'दत्तो वामन' म्हणाले, ''मला निवृत्तीनंतर मोकळा वेळ असतो. काही चांगलं ऐकायला मिळेल म्हणून साहित्य परिषदेच्या या व्यासपीठावर आलो. पण नवं काही ऐकायला मिळालं नाही. श्री. ज. जोशीबुवा म्हणाले की, मी शिवचरित्र कधी पूर्ण करणार, ते एकदाच सांगून टाकावं. मी जोशीबुवांना सांगू इच्छितो की शिवचरित्र लिहिणं ही काही भाषांतरित कादंबरी लिहिण्याइतकी सोपी गोष्ट नाही. त्यासाठी चिंतन लागतं, वेळ लागतो. अजून तेवढा वेळ मला... वाक्य पूर्ण होण्याआधीच हशा पिकला आणि जोशीबुवांनी दादांकडे पाहून हात जोडले. एकमेकांना जाहीररीत्या असं बोलायला आणि ऐकायला मनाचा मोकळा उमदेपणा आणि स्वत:बद्दलची खात्री असावी लागते.

मलाही असं वाटतं की, आज भाषेचा विचार पुरेशा गांभिर्यानं होत नाही. नवीन माध्यमांतून– विविध माध्यमातून, सहजतेच्या नावाखाली बेशिस्तपणाच अधिक दिसतोय, तेव्हा मी इतकंच म्हणेन....

शब्द समजून घ्या
शब्द उमजून द्या
हवा तेव्हा, हवा तिथं
निःशब्दाला मान द्या.

▼▼▼

सुधीर गाडगीळ, पुणे
मराठीतील सुप्रसिद्ध निवेदक व मुलाखतकार. वृत्तपत्रे, आकाशवाणी, दूरदर्शन, चित्रपट, माहितीपट इत्यादी माध्यमांमधून झळकणारे व्यक्तिमत्त्व.
sudhir@sudhirgadgil.com

Avirat Graphics
&
Sudnya Architectural Consultants

1. Exterior Designing for Buildings.
2. Building Perspective Views.
3. Brochures Designing & Printing.

All Architectural Graphics &
Architectural Services

E-mail : aviratgraphics@gmail.com
sudnya_arch@yahoo.co.in

Office address :
Flat No. 25, Sakshatkar Apartment,
Jogeshwari lane, Near Appa Balwant Chowk,
128, Budhwar Peth, Pune - 411 002

Dnyanesh V. Wadekar
B. Arch.
99224 42727

Suhas S. Chakwate
B. Arch.
98222 00400



IN ALL GRAMANTEE IS AN OPEN BOOK
LEARNING EXPERIENCE ...!!!

Min batch size : 10 Participants
Max batch size : 20 Participants

Travel Plan	Students	Others
Day Tour	Rs. 600/-	Rs. 750/-
1 Night / 2 Days	Rs. 2500/-	Rs. 2900/-
2 Night / 3 Days	Rs. 3300/-	Rs. 3700/-

- **Inclusions :** Veg breakfast -lunch -dinner, group accommodation in Village homes, transportation from Kolhapur / Kankavali, local Guide, entry fees
- **Does not include :** Any train bus fare till Kolhapur / Kankavali Expenses of personal nature.
- **How to reach :** By road and rail : Kolhapur 60 kms / Kankavali 60km


SUVARNAYUG PARYATAN SANSTHA

Office : Yashodhan Apartment , 12th Street Rajarampuri, Kolhapur - 416008
Ph : 091-231-2521115 Email : gramanteekop@gmail.com

CENTRAL RESERVATION : 08007789763

Pugmark Art Gallery : 9822674822

ग्रामंती गगनबावड्याची !



Where India Meets Bharat...

SUVARNAYUG PARYATAN

Gennext...

Outbound Education..

Travela's GENNEXT are outbound educational visits to Metros of India, where young minds Nation's Next Generation Gets to observe :

- **Industrial & Professional Development**
- **Fast paced life in a large city**
- **Public systems : transport, water & power supply ,and housing.**
- **Places of Historical Importance , Science Center, Museum**



travela's GENNEXT offers valuable Outbound Education to motivate young minds a of new age India.

NATIONAL CAPITAL : NEW DELHI WITH AGRA

- India Gate, Janpath, Rashtrapati Bhavan, Raj Ghat, Qutub Minar, Light & Sound show at Lal quilla.
- Akshardham Temple.
- Agra Fort, Taj Mahal.
- Fatehpur Sikri.

03 Nights 04 Days

PROGRAM FEES ₹ **5500/-** Valid for 40 students

GLOBAL TRADE CAPITAL : MUMBAI

- Nehru Science Centre
- Nehru Planatorium
- Mahim Nature Park
- Bhau Daji Lad Museum
- Gate way of India
- South Mumbai : Photo Stops
- Essel World

02 Nights 03 Days

PROGRAM FEES ₹ **4000/-** Valid for 40 students

I.T. CAPITAL : BANGALORE WITH MYSORE

- Mysore Palace & Zoo, Vrindavan Garden
- Chamunda Hill, Srirangapattanam. Banergatta National Park , Butterfly Park, Iskon Temple.
- Sir Vishweshwaraiyya Museum, Hindustan Aeronautical Museum / Indian Institute of Sciences, Vidhansauda & Lalbag

03 Nights 04 Days

PROGRAM FEES ₹ **5000/-** Valid for 40 students

ELECTRONICS CAPITAL HYDERABAD

- Salarjung Museum, NTR garden, Laser show at Hussain Sagar Lake.
- Ramoji Film city
- Charminar, Snow World & Zoo, Light & Sound show at Golkonda Fort.
- Science centre & hightech city

03 Nights 04 Days

PROGRAM FEES ₹ **5500/-** Valid for 40 students

अत्यंत शक्तिशाली

.... मात्र वीजेचा वापर अगदिच कमी

KSB

के एस बी सबमर्सिबल आणि मोनोब्लॉक पम्पसेटस्

भरवसा जर्मन तंत्रज्ञानाचा



केएसबी पंप्स् लिमिटेड

अमोद अपार्टमेंट, 'बी' विंग, ब्लॉक नं. ३३, हॉटेल श्रावण जवळ, पोलिस ग्राऊंडसमोर, फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणे – ४११ ०१६.
फोन : ०२०–२५६५०३९३, ०३९४, ०३९६, ०३९८



पुरुष उवाच - दिवाळी २०१२

किंमत ९० रु.

नवविचारांचा संवेदनशील दिवाळी अंक!

चाळिशी-बिळिशी

आयुष्याच्या मध्यावर व्यक्तिगत-सामाजिक-भावनिक-लैंगिक पैलूंवर प्रकाश टाकताहेत

प्रा. सचिन गरूड, डॉ. अरुण गद्रे, किशोर बेडकिहाळ,
राजेंद्र बहाळकर आणि इतर.



•••

आजच्या तरुणाईची अपरिहार्यता 'ब्रेक अप के बाद'

नातं तुटत जाताना होणारी घालमेल, सुटकेची (?) भावना... संवेदनशीलपणे उलगडून दाखवताहेत

डॉ. आशुतोष जावडेकर, धर्मकीर्ती सुमंत, निखिल घाणेकर, विनय पाटील आणि इतर.

•••

बाप-लेक नात्याचा पट उलगडून दाखवतायत

सी. आय. डी. फेम शिवाजी साटम आणि अभिजीत
इंडियन मॅजिक आयचे श्रीरंग गोडबोले आणि सुहृद

•••

इतर वाचनीय- वैचारिक, ललित आणि कथा-कविता. भा. ल. महाबळ, चंद्रशेखर पुरंदरे, डॉ. भूषण शुक्ला, डॉ. हमीद दाभोळकर, प्रा. जयदेव डोळे, धर्मराज निमसरकर, सुनील गोडसे, अनिल किणीकर, प्रमोदकुमार अणेराव, विवेक उगलमुगले, गोविंद मोतलग आणि इतर

अंकासाठी संपर्क : ०२०-२५६५२३२४ मोबाइल : ९८२२५५२२६३

'साऱ्याजणी' ची 'थॉट ट्रेन' दाखल होतेय दिवाळीत!

विशेष विभाग एक उकल-पॉलिटिकल

सहभागी लेखकः सुहास पळशीकर, भाई वैद्य, जयदेव डोळे, प्रकाश बाळ, उल्का महाजन, सुनीती सु.र, विद्या बाळ, डॉ. विद्युत भागवत, शमा दलवाई, मंगला गोडबोले, सतीश काळसेकर , नीलम गो-हे, वंदना भागवत, वंदना खरे

इतर वाचनीय

- संत जनाबाईंच्या ओवीचे सौंदर्य आणि त्यांच्या आयुष्याचा पट उलगडून दाखवत आहेत ज्येष्ठ कवी इंद्रजित भालेराव
- बारोमास, तहान यासारख्या वास्तवदर्शी कादंबऱ्यांचे लेखक सदानंद देशमुख यांच्या आगामी कादंबरीतील अंश
- शंकेखोर मेंदूच्या संशोधनाविषयी आणि मेंदू विज्ञानातील इतर आयामांविषयी सांगत आहेत चित्रा बेडेकर
- आहार आणि त्याचा वर्तनावर, स्वभावावर होणारा परिणाम याविषयीचा आहारतज्ञ डॉ. विजया साठे यांचा लेख
- 'जलनीती'विषयी अभिजित घोरपडे यांचा लेख
- 'परिवर्तनाची सुरेल वाट' हा जाणकार रसिक मुकुंद संगोराम यांचा लेख

त्याची कथा
मधुकर धर्मापुरीकर
बालाजी इंगळे
श्रीनिवास भणगे
विश्वास सहस्त्रबुध्दे
सुनील गोडसे

तिची कविता
आसावरी काकडे
अश्विनी धोंगडे
छाया कोरेगावकर
आश्लेषा महाजन
प्रज्ञा दया पवार

दिवाळी अंक रु.१००

मिळून साऱ्याजणी

४०/१/ब, भोंडे कॉलनी, कर्वे रोड, पुणे ४. फोन : २५४३३२०७

Best Wishes From

Nitin and Vinita Bhosekar

254, Trimurty Bunglow, Manmohan Society Mane Road,
Near Sahwas Society Library Hall,
Karve Nagar, Pune - 411 052

With Best Compliments from

"SPN Risk Solution LLP"

Hanumant P. Sabale
Janardhan Residency,
Bunglow No.2, Vidyanagar,
Karad, (Banawadi Corner), Dist. - Satara.



Forbes Marshall

Trusted Partners.
Innovative Solutions.

If we can measure steam, gas, chemicals and water, then why not smiles?

A philosophy that drives Forbes Marshall's extensive social commitment program.

At Forbes Marshall, we firmly believe that an organization should actively contribute to the community that it operates in.

Our initiatives focus on community development, empowerment of women, education and healthcare for the underprivileged.

We also undertake extensive programmes on HIV awareness and literacy, besides enabling underprivileged youth with sustainable skills to earn a stable livelihood.

Over 140 of our self-help groups empower and equip women with special skills and train them to become self sufficient entrepreneurs.

Similarly, the Shehernaz Medicare Centre at our Kasarwadi campus provides all-round medical aid while handling sensitive issues like de-addiction and substance abuse in the community.

Our commitment to society is as unwavering as it is inclusive. In every initiative that we undertake, we aim to act as a facilitator for the betterment of lives.


To know more and get involved, email us at
socini@forbesmarshall.com

Energy Conservation Environment Process Efficiency

www.forbesmarshall.com

A-34/35, MIDC Estate, 'H' Block, Pimpri, Pune 411 018, India. Tel.: +91 20 27442020, 39851100, Fax.: +91 20 27442040
P.B # 29, Mumbai Pune Road, Kasarwadi, Pune 411 034, India. Tel.: +91 20 27145595, 39858555, Fax.: +91 20 27147413


Forbes Marshall | Forbes Marshall Arca | Forbes Marshall Codel | Krohne Marshall | Spirax Marshall | Forbes Solar | Forbes Vyncke


चांदण्याला आस आपुल्या
दिवाळीची
चांदण्याला आस आपुल्या दिवाळीची
शुभ्र चांदण्याशी आपला कायमच तीवर होतो.
तमाच्या चटप असा आहे की अशिक्ष्य
चांदण्या एकावेळी आपल्याला दिसतात,
अगदी आकाशाच्या पटलाप्रमाणे.
चांदण्यातली प्रत्येक तारिका असते एक आठवण.
चांदणं निमित्त ठरतं त्या प्रत्येक
आठवणीला डुलण्याशी जोडण्याचं,
ते आठवणींचं चांदणं एवढ्या ठरतं आपुल्यासाठी,
या लोभस चांदण्याला घरतीवर
साठवण्याचा आपण प्रयत्न करू.
आपुला तो उत्सव म्हणजेच दिवाळी !
दिवाळीच्या या सणेनेती चांदण्यात
आपलं आयुष्य उजळावं ही शुभेच्छा
दिवाळीच्या प्रत्येक दिव्यातोबत उजळावेत
असे क्षण जे एकाचा तारयाप्रमाणे
कायम तुमच्या आठवणीत राहतील.
OM
DEVELOPERS
35, Laxmi Park Colony,
Navi Peth, Pune - 411 030
Phone : +91-20-2453 4453 / 54
www.omdevelopers.com

With Best Compliments From

WORLD CLASS


Hoists & Cranes




Electric Wire Rope Hoist



Electric Chain Hoist





Flame Proof Wire Rope Hoist

Hoists :

- ☐ Electric Chain Hoists (250 kg to 2T)
- ☐ Electric Wire Rope Hoists
- ☐ Flame Proof Hoists (upto 5 T)
- ☐ Bi-rail-crabs

Cranes :

From 1 T to 50 T

- ☐ Overhead travelling cranes
- ☐ Underslung cranes
- ☐ Jib cranes
- ☐ Gantry/Semigantry cranes
- ☐ Experience of more than
- ☐ 33 years
- ☐ Proven German technology
- ☐ More than 12000 installations
- ☐ Complete service in selection of equipment, designing, manufacturing, installations and commissioning
- ☐ Being used for variety of applications.
 Reliable after sales service
- ☐

ISO 9001 COMPANY

SWIFT

CONSOLIDATED HOISTS PVT. LTD.

REGD.OFFICE & WORKS I :
29/30, Gultekdi Ind.Estate, Pune 411 037 (India)
Phone : 020 - 2427 1428, 2427 1429, 2427 1430
Fax : 020 - 2427 0246
E-mail : chpl@vsnl.com

Enquires for Dealers / Liaison Agents solicited

With Best Compliments From

Kelkar Brothers Sales Pvt. Ltd.,

Authorised Distributors :
KIRLOSKAR Pumps,
Monoblocks, Valves,
A. C. Generators, Diesel Engines,
Electrical Motors, Machine Tools.

711, Narayan Peth, Laxmi Road,
Opp. Commonwealth Building, Pune- 411030
Phone / Fax - 020 -24452913, 24452962, 24452364
Email : kbspl@vsnl.com,
website : www.kelkarbrothers.in

With Best Compliments From

T. WALKER'S PHARMACEUTICALS PVT. LTD.

Our Product range


Adrenaline
Atropine 1ml./10 ml.
Ascorbic Acid
Aminophylline
Potassium Chloride
Sodium Chloride 10 ml./25 ml.
Twacal
Methylene Blue 1 ml./10 ml.
Soda. Bicarb. 10 ml./25 ml.
Dextrose 25% / 50%
Ringer Lactate Conc. 20 ml.
Diclofenac 3 ml./30ml.
Lignocaine & Adrenaline 30 ml.
Twafylin
Ranitidine
Metoclopramide 2 ml. / 10 ml.
Lignocaine & Dextrose (Heavy)
Water for inj. 5 ml. / 10 ml.
Glycopyrrolate Injection



T. WALKER'S PHARMACEUTICALS PVT. LTD.

Factory :
Gat No. 285, B,
Village Kasaramboli,
P.O. Ambedvet. Tal. Mulshi,
Dist. Pune - 411 004.
Ph. : (020) 22922422 /2 2922449
Fax : (020) 22922475

Pune Office : "Vishnupad "
5 th Lane, Subhashnagar,
1253, Shukrawar Peth ,
Pune - 411 002.
Phone : (020) 2447 5959
Telefax : (020) 2446 7699
Email : t.walker@vsnl.net



"Everybody is a genius. But if you judge a fish, by its ability to climb a tree, it will live its whole life believing that it is stupid."


- Albert Einstein


Guru mantra™
www.egurumantra.com
Careers in
Graphic & Web Design

CADCAM GURU®
www.cadcamguru.com
Careers in
CAD, CAM & CAE

Malhar Machi

A MOUNTAIN RESORT









At Post Valane, Taluka - Mulshi, Dist - Pune 411 040.
Telephone : +91 020 8888000055/+91 020 8806000055
For Booking : + 91 020 27293999
Email : malharmachi@gmail.com / info@malharmachi.com
Website : www.malharmachi.com